
ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक !

दिवाळी विशेषांक २०१९

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक, शके १९४१ । वर्ष २० अंक २
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ ८०, पृष्ठे – १४०






www.viccolabs.com • Like us on /ViccoLabs • Shop online at www.viccoestore.com • Customer Care Cell No. 0712-2420890

## संवाद

**प्रिय प्रबोधकांनो,**

**सर्वप्रथम दिवाळी व नूतन संवत्सराच्या तुम्हाला हार्दिक शुभेच्छा!**

ज्याची तुम्ही आतुरतेनं वाट पाहात होतात, तो 'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक तुमच्या भेटीला सज्ज झाला आहे! महाराष्ट्र आणि गोवा मिळून एकूण पंधरा हजार घरांमध्ये वैविध्यपूर्ण साहित्याने नटलेला हा दिवाळी अंक पोहचतोय, हे सांगताना मनापासून आनंद होतो आहे. गेले वर्षभर छपाई माध्यमाला दृक्‌श्राव्य माध्यमाची जोड आपण QR *कोडद्वारा* दिली. यंदाच्या दिवाळी अंकात देखील दृक्‌श्राव्य माध्यमांचा जाणीवपूर्वक, वाढता वापर, आपण QR *कोडद्वारे* केला. लेख वाचताना हे QR *कोड* अवश्य *स्कॅन* करून पाहा. आणि QR *कोडमधील* साहित्याचा देखील आस्वाद घ्या!

दिवाळीच्या सुट्टीनिमित्त थोड्याकाळासाठी का होईना, तुम्ही अभ्यास, क्लास, शाळा, स्पर्धा या रहाटगाडग्यातून जरासे मोकळे झाला असाल. किती बांधले गेले असता तुम्ही घड्याळाशी, नाही का! वेळेची नुसती कसरत चालू असते. शाळा, गुण, स्पर्धा, चढाओढ यांमधून आजूबाजूला बघायला तुम्हाला वेळ तरी मिळतो का? घरात, शाळेत, तुमच्या आसपास रोज काहीना काही गोष्टी घडत असतात; पण तुम्ही त्याच्याकडे किती लक्ष देता? त्याला किती प्रतिसाद देता? वेळेचा ताण, वेगाचा ताण, सगळ्याच प्रकारच्या स्पर्धेचा ताण हा एक भाग झालाच; पण तुमची स्वत:ची या गोष्टींची नोंद घ्यायची, प्रतिसाद द्यायची इच्छा तरी आहे की नाही? की कशाचंच काही वाटेनासं झालं आहे तुम्हाला? तुमच्या भावना एवढ्या बोथट झाल्या नाहीत ना! तुमच्यातील काहीजण मात्र, आजूबाजूंच्या घटनांकडे डोळसपणे बघतात, त्यांची नोंद घेतात, जमेल तसा प्रतिसादही देतात! तुम्ही कोणत्या गटातले आहात? तुम्ही सर्वांनी दुसऱ्या गटात असायला हवं असं मला वाटतं.

संवेदनशील असणं, दुसऱ्याच्या भावना जाणणं हेच तर माणसाचं 'माणूस' म्हणून वेगळेपण आहे! आणि भावनाच जर बोथट झाल्या असतील तर यंत्रात आणि तुमच्यात काय फरक राहिला? हाच विषय आहे यंदाच्या दिवाळी अंकाच्या विशेष विभागाचा– **'जागवू संवेदना!'** आपल्यातील संवेदनशीलता ओळखण्यासाठी, त्याचं महत्त्व समजून घेण्यासाठी आणि 'माणूस' म्हणून घडण्यासाठी ही संवेदनशीलता कशी उपयोगाची ठरते? हे तुम्हांला त्यातून समजून घेता येईल. तुमच्यातील संवेदनशीलता फुलवण्यापासून ते तुमच्या संवेदनशीलतेचा उपयोग विधायक कृती करण्यासाठी कसा करता येईल? या प्रवासातील टप्पे, कसे गाठायचे? या प्रश्नांची उकल वेगवेगळ्या मान्यवर लेखकांनी व तज्ज्ञ व्यक्तींनी विविध लेखांद्वारा या विभागात करून दाखवली आहे. त्यातून भवताली घडणाऱ्या भल्याबुऱ्या घटनांकडे तुम्ही अधिक संवेदनशीलतेने पाहायला शिकाल. पुढे जाऊन भावनेच्या आहारी न जाता विवेकबुद्धीने कृतिरूप प्रतिसाद देण्याच्या वाटेवर तुमचा प्रवास सुरू होईल.

याची सुरुवात म्हणून कामवाल्या मावशींना त्यांच्या घरी जाऊन दिवाळी फराळ तुम्हाला देता येईल का? अजून काय काय करता येईल, विचार करा. या तुमच्या प्रवासात छात्र प्रबोधन एक मित्र, मार्गदर्शक म्हणून कायमच तुमच्या बरोबर असेल. हा दिवाळी अंक तुम्हाला कसा वाटला? विशेष विभाग कसा वाटला? त्याविषयीच्या प्रतिक्रिया आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. तसंच त्या त्या लेखक, चित्रकारांपर्यंत देखील तुमची प्रतिक्रिया पोहोचवा. अंकात शेवटी **'कल्पक भेट'** दिली आहे, ती करा. आणि त्यात पणती ठेवून दिसणारी छाया प्रकाशाची नक्षी पाहा! दिवाळी अंकातल्या या सर्व साहित्यामुळे तुमची दिवाळीची सुट्टी आनंददायी आणि समृद्ध करणारी जाईल, हा विश्वास वाटतो.

**तुमच्यातील 'संवेदनशीलता' वाढीस लागण्यासाठी तुम्हाला अनेक शुभेच्छा!**

**तुमची,**
**शिल्पाताई**

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
नीलिमा करमरकर,
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
आश्विनी गोऱ्हे-देशपांडे

**अक्षर जुळणी**
माधवी दाते, सुप्रिया कुलकर्णी

**ई-मुद्रित शोधन**
उदय हर्षे

**मुखपृष्ठ** – सचिन जोशी

**मांडणी/सजावट**
राहुल धामणे

**चित्रकार** – गिरीश सहस्रबुद्धे,
चित्रांजली, गोपाळ नांदुरकर,
राहुल देशपांडे, दीपक संकपाळ,
सौरभ उपळेकर

**शीर्षक लेखन** – निकेत दीक्षित

**अर्थ संकलन/व्यवस्थापन**
वेदा भागवत
श्रुती गोखले
सुलभा कुलकर्णी

**प्रचार व वितरण**
राहुल धायगुडे
विनायक श्रोत्री
ज्योती पवार
अपर्णा घाटे

## विशेष लेख

१७. **पैशापेक्षा मौल्यवान!!*** – सुभाष देशपांडे
३३. **ज्ञानोपासक लोकमान्य टिळक*** – वर्षा तोडमल
५१. **धुमसत्या बर्फातील आनंदघर*** – अधिक कदम
१०४. **कांचनजुंगाच्या शिखरावरून*** ... – भूषण हर्षे

## विज्ञानपर लेख

२९. **आम्ही सारेच आंबट...!*** – डॉ. कांचनगंगा गंधे

## मुलांचे पान

१००. **वाचलेच पाहिजे असे काही - ‘पाडस’** – चारूवाक् चासकर
१०३. **कविता - रंग फुलांचे*** – कु. मैत्रेयी लोहार

## कृतिपर लेख

३२. **कार्डबोर्डच्या खोक्याचा तरंग दिवा*** – वीणा लिमये
३८. **सर्वात आंबट आम्लधर्मीय...** – डॉ. कांचनगंगा गंधे
१३०. **‘क्विलिंग’च्या कल्पक कलाकृती!**

**कल्पक भेट**
**पणती कंदील**
**(लॅम्पशेड)**
**संकल्पना**
रोहित कोकिळ



## याशिवाय...

२०. एका टिंबाची करामत २१. पुस्तक सूची*
२२. सोडवा हे शब्दकोडे, शब्दवैभव
३७. आजची ज्ञान प्रबोधिनी*
१२४. ज्ञान प्रबोधिनी सर्वांची, सर्वांसाठी
१३४. अवश्य वाचा
१३५. पद्य - नव्या ताकदीने नवे* – वाच. अनघा लवळेकर
१३७. सर्व केंद्रप्रमुखांचे अभिनंदन!!*, जरा डोकं चालवा...
१३८. नावीन्यपूर्ण सांघिक स्पर्धा*, सफर दिवाळी विशेषांकाची

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

## मासिकाविषयी...

**ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक!**
**प्रकाशन दिनांक :**
राष्ट्रीय सौर २२ आश्विन शके १९४१,
(१४ ऑक्टोबर २०१९)
**या अंकाची किंमत :** ₹ ८०/-
**नोंदणी क्र. :** (RNINO.) MAHMAR/2000/5636
**वर्गणी– वार्षिक :** ₹ २००, **द्वैवार्षिक :** ₹ ४००,
**त्रैवार्षिक :** ₹ ५५०, **दशवार्षिक :** ₹ १७००
(घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा.)
**संपर्क पत्ता – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ, पुणे 411 030.
☎ ०२०-२४२०७१७४/१७५
**ई-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org

# अंतरंग

## दिवाळी विशेषांक २०१९

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक । शके १९४१
वर्ष २० । अंक २
वार्षिक वर्गणी – ₹ २०० । मूल्य ₹ ८०

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

## कथा

७. ऑपरेशन वंडकपुरा* ... - मेजर हृषीकेश बर्डे
४१. समशेर सोडवतो घोड्याचं रहस्य* - भारत सासणे
५५. लख्ख* - डॉ. प्रदीप आवटे
९५. बाईस्कोप* - डॉ. छाया महाजन
१२०. नेकी* - अमर हबीब

## कविता

१२. थंडीचे कुंपण* - आश्लेषा महाजन
२७. मिळून मित्रा चालत जाऊ* - रेणू पाचपोर
५८. हिरवी शेते, हिरव्या वाटा - संगीता बर्वे
६१. इथे दिवाळी; तिथे दिवाळी* - मृणालिनी कानेटकर-जोशी
१२५. सरी गुरूंच्या* - अरुण म्हात्रे

## ललित

१३. उन्हाची गोष्ट* - मल्हार अरणकल्ले
२३. गेले विझूनिया दिवे* - ऐश्वर्य पाटेकर
११७. यशस्वी भव! - आसावरी काकडे
१३१. चला प्रश्न विचारूया!* - रवींद्र पंढरीनाथ

## विशेष विभाग

### जागवू संवेदना - ६३ - ९४

६४. ललित - संवेदनांची कोवळी डहाळी*
- प्रवीण दवणे
६९. संवेदनशीलता जाणीवपूर्वक जोपासताना*
- स्वप्नीला सेठिया
७३. कथा - गोधडी*
- स्वाती राजे
८३. तिचा रिकामा डबा...
- रेणू दांडेकर
८५. असंही जगणं असतं!*
- हेरंभ कुलकर्णी
८७. संवेदनशीलता आणि वैद्यकीय व्यवसाय
- डॉ. वर्षा दंडवते
८९,९२ संदेश - मोहन गुजराथी*
- जयंत नारळीकर
९१. ललित - स्नेहल अश्रू
- मृणालिनी चितळे
९३. ललित - माझी रोजनिशी, माझा आरसा
- शिल्पा कुलकर्णी
९४. संवेदनशील साहित्याचा खजिना!*

वाचा
छात्र प्रबोधन
दिवाळी अंक २०१८

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**

* या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.

त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR Code Scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.

# ज्ञान प्रबोधिनी

**स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था! देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणारी गतिशील संघटना! प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ!**

## ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा पाया असलेली सात तत्त्वे म्हणजेच तत्त्वसप्तक

**विज्ञानाभिमुखता, उत्तमता, विकास, संघटना, जनी जनार्दन ऐसा भाव, हिंदू जीवनदृष्टी, समाजसंस्थापना**

# ।। हिंदू जीवनदृष्टी।।

**सण, उत्सव, खाद्यपदार्थ, कपडे शिवण्याच्या आणि नेसण्याच्या पद्धती, भावना व्यक्त करण्याच्या पद्धती हे सर्व मिळून जीवनपद्धती होते. भारतीयांची जीवनपद्धती इतर देशांपेक्षा वेगळी आहे. भारततही जीवनपद्धतींमध्ये प्रांताप्रांतात फरक पडतो. इतर देशांपेक्षा वेगळेपण आणि भारतातील वेगळेपण असतानाही त्यातील समानता ज्यातून ठरते व कळते ती भारतीयांची जीवनदृष्टी म्हणजेच हिंदू जीवनदृष्टी.**

## 'हिंदू जीवनदृष्टी'चे पैलू व त्यांचे आविष्कार

❖ **ईश्वरी शक्तीची अभिव्यक्ती : समाजातील सर्व जाती, पंथ व धर्मांतील प्रत्येक व्यक्तीमधून एकच ईश्वरी शक्ती विविध प्रकारे व्यक्त होते. ही या हिंदू समाजाची जीवनदृष्टी आहे. सर्वच जात, पंथ व धर्मांमध्ये या जीवनदृष्टीने आयुष्य जगलेले अनेक महात्मे भारतात होऊन गेले.**

  ✻ प्रबोधिनीत या जीवनदृष्टीचा विविध प्रदेशातील प्रभाव पाहण्याकरता अभ्यास दौरे होतात व अनेक महात्म्यांच्या चरित्रांचा अभ्यास होतो.

❖ **जीवनाचा हेतू : प्रत्येक माणसाने सामर्थ्यपूर्ण, आनंदपूर्ण व कामांमध्ये मग्न असे शंभर वर्षे आयुष्य जगावे.**

  ✻ आयुष्याच्या विविध टप्प्यांवर आनंदपूर्ण व हेतुपूर्ण जीवन जगण्यासाठी विद्याव्रत, वीरव्रत,विकासव्रत आणि सेवाव्रत यांची मांडणी प्रबोधिनीत केली आहे.

❖ **पूजास्वातंत्र्य : ईश्वरपूजेचे सर्व विविध मार्ग ईश्वरी शक्तीची ओळख करून देतात. त्यांच्याबद्‌दल समान आदर आहे. प्रकटपणे पूजा किंवा उपासना न करण्याचे, फक्त मानसपूजा किंवा चिंतन करण्याचेही स्वातंत्र्य आहे.**

  ✻ विविध उत्सवांमध्ये प्रबोधकांचा आवर्जून सहभाग. अनेक धर्मांचा परिचय होण्याकरता महापुरुष पूजा, मातृभूमी पूजन, सर्वधर्म प्रार्थना इत्यादी उपक्रमांना प्रबोधिनीत प्रोत्साहन.

❖ **दोन प्रकारच्या साधना : सृष्टीमध्ये घडणाऱ्या घडामोडींचा विविध विज्ञानांद्वारे अभ्यास. त्यांची विविध कलांद्वारे अभिव्यक्ती. तंत्रज्ञान आणि संपत्ती निर्माण करत सृष्टीतील साधनांचा उपयोग. या सर्वांबरोबर प्रत्येकाने आत्मचिंतन करत स्वत:च्या मन व बुद्धी या साधनांचाही सदुपयोग करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.**

  ✻ कोणत्याही क्षेत्रातील पराक्रमाला, अभ्यासाच्या योजनांना व आत्मचिंतनाला प्रबोधिनीत प्रोत्साहन. प्रत्येक उपक्रमात उपासनेचा आग्रह.

❖ **सहजीवन : स्वीकृत उद्दिष्टांसाठी एकमनाने काम करणे, परस्पर सहकार्याने परस्परांच्या विकासाला पोषक अशा रीतीने काम करता येणे, कामात आनंद वाटणे, समाजातील इतर व्यक्तींच्या सुखात व प्रगतीत आपले सुख व इतर व्यक्तींच्या दु:खात आपले दु:ख आहे असे वाटणे; यासाठी सहजीवन आचरणात आणणे महत्त्वाचे आहे.**

  ✻ कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्रीय प्रेरणेचा व समूहगुणांचा विकास होत राहावा यासाठी प्रबोधिनी उपक्रम आखते.

❖ **समाजरचना : वर्ण-जाती रहित, भेदाभेद न मानणारा समाज असावा. १. विद्याध्ययन २. प्रापंचिक व सामाजिक कर्तव्ये ३. सामाजिक, राष्ट्रीय कार्यात नि:स्वार्थ बुद्धीने काम ४. उत्तर आयुष्यात प्रवृत्तीपर संन्यास, अशा चार प्रकारची कामे प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या आयुष्यात करावीत. समाजातील मूल्ये व व्यवस्थांमध्ये कालानुरूप बदल होत राहावेत.**

  ✻ कुटुंबातील व सार्वजनिक प्रसंगांसाठी विविध संस्कारपोथ्यांची कालोचित पुनर्रचना. सर्व जाती-जमातींच्या स्त्री-पुरुषांसाठी पौरोहित्य प्रशिक्षण व स्वयंपौरोहित्यासाठी कार्यशाळांचे आयोजन प्रबोधिनीत होते.

❖ **राष्ट्रीय वृत्ती : वरील प्रकारची भूमिका असणाऱ्या व्यक्तींनी संघटित होत विद्या, संपत्ती आणि नीतिमूल्ये या तिन्हींनी युक्त असे सामर्थ्यशील राष्ट्र उभे करावे. जगाच्या कल्याणाचा एक भाग म्हणून राष्ट्र उभारणीचे काम करायचे आहे.**

  ✻ व्यक्तींच्या क्षमतांचा परिचय करून देऊन त्यांचा आत्मसन्मान जागृत करणे व अनेक सामर्थ्यशील संघटना उभ्या करण्यासाठी प्रबोधिनीचा प्रयत्न.


प्रबोधिनीची माहिती देणारी संक्षिप्त चित्रफीत

## संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

**शिक्षण। संशोधन। ग्रामविकसन। आरोग्य। नेतृत्व विकसन। स्त्रीशक्ती प्रबोधन। राष्ट्रीय एकात्मता। सामाजिक उद्योजकता**

# ऑपरेशन वंडकपुरा...

**– मेजर हृषीकेश बर्डे**



*आपल्याला मनापासून आवडणारी गोष्ट किंवा जे आपण आपलं स्वप्न मानतो तेच जर आपल्याला करायला मिळालं, तर छान वाटतं की नाही? मलासुद्धा असंच कायम मनाशी बाळगलेलं स्वप्न पूर्ण करायला मिळालं आणि ही त्याचीच अगदी खरीखुरी गोष्ट!*

शाळेत असल्यापासूनच मला कायम गणवेश घालून लढाईवर जावं, असं वाटे. पण लहान मुलांना कोण पाठवणार, म्हणून मग माझ्यासारखे गुणी विद्यार्थी वेगवेगळ्या खोड्या करून शाळेतलं वातावरण कायम मजेदार ठेवत. शिक्षकवर्ग आणि आमच्यातला हा सामना एखाद्या लढाईपेक्षा कमी नसे. ते क्षण मी विसरलो नाहीच; पण पुढे आयुष्यात खरोखरीचा गणवेश घालून लढण्याची वेळ आली, तो क्षण मात्र अजूनही तस्साच लक्षात आहे. आवश्यक ते शिक्षण घेऊन मी भारतीय सैन्यात भरती झालो. 'रात्रंदिन युद्धाचा प्रसंग' हे अनुभवताना अनेक थरारक मोहिमांमध्ये सहभागी झालो. त्यातीलच हा एक चित्तथरारक अनुभव!

ही गोष्ट आहे २०१६ सालातील. पुलवामा आणि पांपोर ही नावं तुम्ही नक्कीच ऐकली असतील; बऱ्याचजणांनी त्याबद्दल वाचलंही असेल. मूळचा केशर आणि अक्रोड यासाठी प्रसिद्ध असलेला हा जम्मू-काश्मीरचा जिल्हा गेल्या दोन दशकांपासून अशांत आहे. दहशतवादाचं मुख्य केंद्र बनला आहे. याच पुलवामा जिल्ह्यात पांपोरमध्ये

**देशाच्या रक्षणासाठी लढणारा शूर सैनिक होण्याचं स्वप्न लहानग्या हृषीकेशनं शाळेत असतानाच उराशी जपलं होतं. ते प्रत्यक्षात आल्यावर मेजर हृषीकेश बर्डे यांनी अनेक थरारक मोहिमांमध्ये सहभाग घेतला. मार्च २०१६ साली झालेल्या काश्मिरमधील पुलवामा – वंडकपुरा येथील अतिरेक्यांविरूद्धच्या मोहिमेवर प्राणांची पर्वा न करता त्यांनी अतिरेक्यांना नमवलं! त्याची ही रोमहर्षक कथा!! या मोहिमेतील कामगिरीबद्दल त्यांना सेनामेडलने (वीरता) गौरवण्यात आलं.**

मला तैनात केलं होतं, तेव्हाची ही गोष्ट.

हा भाग अतिरेक्यांसाठी नंदनवन असल्यानं इथे कायम भारतीय सेना आणि अतिरेकी यांच्यात चकमकी होत असत. 'हुर्रियत' या फुटिरतावादी गटाचं देखील पांपोरमध्ये प्राबल्य असल्यानं, कायदा व सुव्यवस्था राखणं हे आव्हान असे. अतिरेक्यांना स्थिरावायला मिळू नये म्हणून आम्हाला कायम जागरूक राहावं लागे. सीमेवर घुसखोरी केलेले अतिरेकी कायम आश्रयासाठी पांपोर भागात येत असत. इथूनच जम्मू-श्रीनगर-लेह हा *हायवे* जात असल्यानं लष्कराच्या ताफ्यांवर हल्ले होत असत. अशा वातावरणात जानेवारी २०१६ मध्ये कुपवाडा भागातून चार दहशतवाद्यांच्या गटानं सीमा पार केल्याची खबर मला मिळाली. त्यांचा पुढचा टप्पा पुलवामा असणार हे नक्की होते. आम्ही आमचे सर्व खबरे कामाला लावले. फेब्रुवारीमध्ये दोन अनोळखी लोकांना पाहिल्याची खबर आली. याचा अर्थ दोन अतिरेकी येऊन पोहोचले होते. आम्ही आमच्या मोहिमेचा आराखडा तयार केला. काही दिवस मुद्दाम त्या भागाकडे दुर्लक्ष करून, आम्ही त्यांना जम बसवू देण्याचा विचार केला. हे पाकिस्तानी अतिरेकी असल्यानं त्यांना कुठलाही घातपात करण्याआधी वातावरणाचा अभ्यास करावा लागणार, हे उघड होतं. शिवाय त्यांचे उरलेले दोन साथीदार तोपर्यंत तेथे येऊन पोहोचले असणार, हाही मुद्दा होताच. जवळपास पंधरा दिवस आम्ही त्या भागात जाणूनबुजून गस्त घालणं किंवा सापळा लावणं हे प्रकार टाळले. त्याचा परिणाम म्हणून दिनांक ८ मार्च रोजी तिथे जवळच असलेल्या जंगलात अशा लोकांना पाहिल्याची बातमी आली. बातमीची आणखी तीन-चार लोकांकडून खातरजमा करण्यात आली. आता घाव घालायची वेळ आली होती.



जिथून ही बातमी आली


भेट द्या : **सारनाथ संग्रहालय**, सारनाथ, उत्तरप्रदेश (बुद्ध व बोधिसत्वाबाबत शिल्पे, पुरावशेष)
वार्षिक प्रायोजक - • श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर
• श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे

होती, तिथे दाट जंगल होतं. कुठलीही कारवाई करण्याआधी व्यवस्थित नियोजन अत्यंत आवश्यक होतं. घाईगडबडीत आपल्याच लोकांना इजा होण्याचीही शक्यता होती. अतिरेक्यांना आधी जंगलाबाहेर काढून झेलम नदीकडं पिटाळायचं ठरलं. नदीकाठच्या शेतात पिकांची कापणी झाल्यानं अतिरेक्यांना तिथे लपून बसता येणार नव्हतं. हे सर्व दिवसाउजेडी करायचंही ठरलं, ज्यामुळे कुठलीही हानी टाळता येणार होती.

सर्व नियोजन करून प्रथम पूर्ण जंगलाला अतिशय सावधगिरीनं वेढा घालण्यात आला. यासाठी सर्व जवान लष्कराच्या गाड्यांमधून न नेता वाळूच्या ट्रकमधून नेण्यात आले; त्यामुळे अतिरेक्यांना कुठलीही पूर्वसूचना मिळायची शक्यता उरली नाही. जंगलातून झेलम नदीकडं येणारा रस्ता मुद्दाम खुला ठेवण्यात आला. सर्व वेढा पूर्ण झाल्यावर मी माझ्या *कमांडिंग ऑफिसरांना रिपोर्ट* दिला आणि हळूहळू वेढा आवळायला सुरुवात केली. सकाळचे साधारण दहा वाजले होते. अतिशय सावधगिरीनं हे सर्व सुरू होतं. अचानक जंगलाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या कंपनी कमांडरनं रेडिओ सेटवरून चार लोकांना पाहिल्याचं सांगितलं. ते सर्वजण त्यांना थांबवण्याच्या आधीच पुन्हा जंगलात पळून गेल्याचंही कळलं. याचा अर्थ आता ते झेलम नदीकडे येणार होते. आणखी काही वेळ गेला. वेढा अधिकच घट्ट होत गेला. मी आणि माझे जवान त्या नदीकडे उघडणाऱ्या पायवाटेवर दबा धरून बसलो. काही वेळात दोन-दोनजणांचे दोन गट मला जंगलातून येताना दिसले. ते अतिशय सावधपणे चालत होते आणि त्या सर्वांनी काश्मिरी फेरन घातल्या होत्या. अर्थात कुठलीही कारवाई करण्याआधी पूर्ण खातरजमा करणं खूप महत्त्वाचं असतं. अशा ठिकाणी तर खूपच; नाहीतर निरपराध जीव जाऊ शकतात. ते टप्प्यात येताच मी त्यांना थांबण्यास सांगितलं. ते सर्वजण थबकले; पण थांबले नाहीत. मी पुन्हा त्यांना इशारा दिला आणि तो पाळला नाही, तर गोळी सुटेल हेही बजावलं. पुढच्या दोनजणांपैकी एकानं मागे वळून पाहिलं आणि ते सर्व काहीतरी कुजबुजले. मी माझी रायफल घट्ट पकडली. काही कळायच्या आत पहिल्या अतिरेक्यानं फेरन उचलून गोळीबार सुरू केला. आम्ही सर्वजण आडोशाआड असल्यानं काहीही इजा झाली नाही; पण त्याचा फायदा घेऊन त्या पुढच्या गटानं पळायला सुरुवात केली. मागचा गट डावीकडे वळून जंगलात घुसला. पुढचे दोन्ही अतिरेकी पायवाटेवरून शेतात घुसताना दिसले आणि मी माझ्या *टीमसह* त्यांचा पाठलाग सुरू केला. एका थरारक अनुभवाची सुरुवात झाली होती.

अतिरेकी अवाक झाले होते आणि त्यांच्या जिवाची बाजी लागली होती. म्हणून त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. मागे न पाहता रायफल खांद्यावर ठेवून त्यांनी गोळ्या झाडायला सुरुवात केली. गोळ्या आमच्या आजूबाजूनं सूं सूं आवाज करत जात होत्या; पण आता थांबायला वेळ नव्हता. जसं कापणी केलेलं उघडं बोडकं शेत अतिरेक्यांना आसरा देत नव्हतं, तसंच ते आम्हालाही आडोसा देत नव्हतं, शेत


क्षुद्र सुखांचा होम मांडुनि, प्रपंच केला देशाचा। हसत झेलणे आघातांना, हाच वारसा युवकांचा।।
वार्षिक प्रायोजक – • श्री. प्रमोद वासुदेव जोशी, पुणे
• श्री. विनोद कुलकर्णी, पुणे

संपल्यावर वंडकपुरा नावाचं गाव होतं आणि तिथं जमून जमाव घोषणाबाजी करायला लागला होता. अतिरेक्यांना तिथे पोहोचू न देता संपवणं गरजेचं होतं. अन्यथा ते गर्दीत मिसळून गेले असते.

आम्ही त्वेषानं पाठलाग सुरू केला. तशा अवस्थेतच मी गोळ्या झाडत होतो. अतिरेकी आणि आमच्यातलं अंतर झपाट्यानं कमी होत होतं. इतक्यात ते दोघंही शेतात मध्यभागी असलेल्या बांबूच्या बेटात घुसताना मी पाहिलं. लगेच मी *टीमचे* दोन भाग केले आणि आगेकूच जारी ठेवली. आता सावधपणे जाणं महत्त्वाचं होतं. आत असलेल्या शत्रूला आमची येण्याची दिशा माहीत होती, शिवाय तो तयारीत होता. आतून गोळ्यांची एक फैर झडली आणि इथून रांगत रांगत पुढे जावं लागणार, हे लक्षात आलं. तो टप्पा सर्वांत अवघड होता. रांगत असल्यानं नीट दिसत नव्हतं; आतून येणाऱ्या गोळ्या आजूबाजूने जात होत्या. सभोवताली आडोसा घ्यायला मातीची ढेकळं सोडून काहीच नव्हतं. दैवावर भरवसा ठेवून आम्ही चाललो होतो.

शेवटी त्या बेटापासून साधारण वीस फुटांवर मी येऊन पोहोचलो. तिथे एक छोटंसं झाड होतं. आडोसा म्हणून त्याचा काहीच फायदा नव्हता; पण तिथून शेवटचा हल्ला करायचा मी ठरवलं. कुजबुजतच मी एका *टीमला* बेटाच्या दुसऱ्या टोकाकडं जायला सांगितलं. अतिरेकी नक्कीच गावाकडे पळतील असा माझा अंदाज होता. बाकीच्यांना मी त्वरेनं *प्लॅन* सांगितला आणि 'एक, दोन, तीन' म्हणताच आत घुसण्याचं ठरलं. मी मोजायला सुरुवात केली आणि 'एक-दोन' होईपर्यंत आतून दबकी कुजबूज आणि काहीतरी फेकल्याचा आवाज आला. तो *हँडग्रेनेड* होता, हे सुट्या झालेल्या पिनच्या आवाजानं जाणवलं. मी वर पाहिलं. सुसाटत येणारा तो ग्रेनेड मला बरोबर माझ्या डोक्यावर दिसला. आता कठीण समय होता. *ग्रेनेड* फुटल्यावर तीस फुटांच्या त्रिज्येत असणाऱ्या सर्व गोष्टींची राख होते, हे मला आठवलं आणि आपण वीस फुटांवर आहोत हेसुद्धा! आई-बाबा, मित्र यांचे चेहरे क्षणात डोळ्यांसमोर तरळून गेले.

देवाचं स्मरण करून मी आकडे मोजायला सुरुवात केली. साधारणपणे *सेफ्टी पिन* काढल्यावर सात सेकंदांत *ग्रेनेड* फुटतो. मी चार सेकंदांपर्यंत पोहोचलो होतो, तेव्हाच अचानक एक प्रचंड धडाका झाला. कानाचे पडदे फुटतील असा तो स्फोट होता. सर्वत्र एक गरम हवेचा पडदा पसरला आणि कानातून कर्कश्श कूं कूं ..., सुरू झालं. जळालेल्या स्फोटकांच्या वासानं वातावरण कोंदून गेलं. माझ्या कानाजवळून अतिशय वेगात काहीतरी गेलं. ताळ्यावर यायला काही सेकंद लागले. मी आधी सर्व चेक केलं; सुदैवाने मला आणि माझ्या साथीदारांना काहीच इजा झाली नव्हती. हा खरोखरच चमत्कार होता, नाहीतर इतक्या जवळ ग्रेनेड फुटल्यावर वाचणं, हे जवळपास अशक्यच असतं. आता त्वरित निर्णय घेऊन, कृती करणं भाग होतं. *ग्रेनेड* फेकून, अंदाधुंद गोळीबार करत वेढा तोडणं हा अतिरेक्यांचा ठरावीक *पॅटर्न* होता. आता कुठल्याही क्षणी ते निसटू शकत होते. मी खुणेनंच माझ्या साथीदारांना



भेट द्या : **बिर्ला विज्ञान संग्रहालय**, तेलंगणा (तारांगण, डायनोसॉरसंबंधी संग्रहालय)

**वार्षिक प्रायोजक – • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका**

**• सौ. उषा पुरंदरे, पुणे**

'आता आत गेलं पाहिजे,' हे सांगितलं. मी उठून उभा राहिलो आणि रायफल सांभाळत सर्वात आधी आत घुसलो. काही फूट अंतर पार केल्यावर झाडी लागली. तिच्या पलीकडे शत्रू असावा असं मला तीव्रतेनं वाटून गेलं. मी एका हातानं ती झाडी दूर केली व आत घुसलो आणि तिथं तो मला दिसला. आत एका झाडाच्या खोडाला पाठ लावून तो बसला होता. क्षणभर त्याची आणि माझी नजरानजर झाली. भीती, अविश्वास असं काहीतरी त्या नजरेत मला जाणवलं. त्याने पुढची काही हालचाल करायच्या आत मी रायफलचा चाप ओढला. सटासट गोळ्या सुटल्या आणि त्याची चाळणी झाली. त्याचं निर्जीव डोकं कलंडलं आणि त्याच्या हातातून रायफल कायमची सुटली. दुसरा अतिरेकी तोपर्यंत उठून गावाकडे पळाला. तिथे असलेल्या दुसऱ्या *टीमला* तो आयताच सापडला. काही पावलं टाकेपर्यंत त्यालाही टिपलं गेलं. जंगलात घुसलेले दुसऱ्या गटाचे दोघे देखील पळायच्या प्रयत्नात मारले गेले. सर्व



मिळून चार पाकिस्तानी अतिरेकी ठार झाले आणि आमच्यापैकी कुणाला साधा ओरखडादेखील उमटला नाही, हे खरं यश होतं.

त्या चारही पाकिस्तानी अतिरेक्यांनी काही करायच्या आतच त्यांचा सफाया झाल्यानं दहशतवादी संघटनेचं कंबरडं मोडलं. हा एक जोरदार धक्का होता! इतका की, पाकिस्ताननं त्यांचे मृतदेह स्वीकारायला नकार दिला. यातून सावरायला त्यांना बराच वेळ लागणार होता.

या *ऑपरेशनबद्दल* मला आणि दुसऱ्या *टीमचा कमांडर* अशा दोघांना सेना मेडल (वीरता) आणि दोन साथीदारांना सेनाप्रमुखांचं प्रशस्तिपदक जाहीर झालं.

मला मनापासून करावीशी वाटलेली गोष्ट खरोखरच करायला मिळाली होती. आणि तो आनंद काही औरच होता. सोबत्यांना काहीही इजा झाली नव्हती, हे जास्त महत्त्वाचं होतं. पुढे मी जोपर्यंत तिथे होतो, तोवर भरपूर *ऑपरेशन्समध्ये* सक्रिय सहभाग घेतला; पण हे *ऑपरेशन* आणि त्या तरुण अतिरेक्यांचे भीती व अविश्वासाने भरलेले डोळे मी आजही विसरू शकत नाही.

**– मेजर हृषीकेश बर्डे**
जे ८०८, मधुकोश अपार्टमेंट,
वडगाव खुर्द, पुणे 411068

**चित्रकार : दीपक संकपाळ**

**वाचूया चित्रकथा – 'हरिसिंह नलूआ' लेखक – डॉ. वि. वि. पेंडसे**



कविता

# थंडीचे कुंपण

वाचूया
थंडीतील निसर्ग आणि
थंडीच्या कवितांचा रसास्वाद
'शिशिरगान'
लेखिका – शैलजा देशमुख



शुष्क बोचऱ्या वाऱ्यामध्ये
गोठलेला दिवस आळशी
कवेत त्याच्या चक्क हुडहुडी
आणिक डुलकी जराजराशी...!

क्षणाक्षणांवर पांघरलेली
सुंदर कंटाळ्याची चादर
स्वेटरमधूनी आरपारशी
लहर हिमाची करिते थरथर...

आक्रसलेल्या अंगावरती
संकोचांचे असंख्य काटे
ऊन, ऊब अन् ऊर्जेसाठी
हेही करावे, तेही वाटे...

भल्या पहाटे गजर वाजतो
शनिवारी सक्काळी शाळा
शाळेला थंडीचे कुंपण
आणिक दवबिंदूंच्या माळा...

दवात भिजल्या धुक्यात जेव्हा
कर्दमलेले दप्तर भिजते
पेन गोठते, रबर ताठते
अक्षरांवरी अक्षर चढते...

थंडीमध्ये दुपार विणते
ऊन ऊन सूर्याची लोकर
गाठ मारण्याआधी होते
मावळतीची शीतल पाखर...

हाडांमधे मग घुसते थंडी
दिवसच होतो अगदी कष्टी
शेकोटीच्या सोबत रात्री
भुतावळीच्या भयाण गोष्टी...

गोधडीवरी कांबळ असुनी
रात्रीलाही भरे कापरे
स्वप्नामध्ये राक्षस येता
थंडी असुनी घाम पाझरे...!

थंडीमध्ये रम्य दिवाळी
येते दिव्य सणांची राणी
तिच्याचसाठी सहन करावी
हट्टी थंडीची मनमानी...

– आश्लेषा महाजन
मंजिरी, २३० चित्ररेखा सोसायटी, सहकारनगर-१, पुणे 411009
चित्रकार : गोपाळ नांदुरकर

भेट द्या : नेहरू सायन्स सेंटर, वरळी, मुंबई (विज्ञान व तंत्रज्ञान संग्रहालय)
वार्षिक प्रायोजक – • श्री. आदित्य मोडक, बोरीवली
• एक हितचिंतक, पुणे

# उन्हाची गोष्ट

– मल्हार अरणकल्ले



**लहानपणी गावाला अनुभवलेलं ऊन... कधी झाडांच्या पायथ्याशी कलाकुसरीची रांगोळी काढणारं, तर कधी झाडांच्या उंच शेंड्यांवर आरामात झुलणारं... शाळेतल्या दिनक्रमाला आकार देणारं... कवितेच्या, पाढ्यांच्या सुरांवर झुलणारं... वय वाढत गेलं की, हीच किरणं जणू ग्रीष्मातल्या तापासारखी तर कधी रिमझिमत्या श्रावणसरीतील इंद्रधनुष्यासारखी... शालेय वयात सुरू झालेली आणि अवघं आयुष्य व्यापून उरणारी 'उन्हाची ही गोष्ट...' सतत साथसंगत देणारी!**

एखाद्या बेटाभोवती निळं-पारदर्शी पाणी खेळत असावं, तसं आमच्या घराच्या आजूबाजूनं उन्हाची वेगवेगळी रूपं सांडलेली असायची. उगवतीकडून येणारी पिवळी-भगवी किरणं अंगणात आली की, सुवर्णरसाच्या चकचकीत तुकड्यांनी घर उजळायला सुरुवात होई. ही किरणं कमालीची अवखळ असत. ती निमिषभरही एका जागी स्थिरावत नसत. एका ठिकाणाहून पुढं जातानाची किरणांची वस्त्रगाळ थरथर पाहताना, खूप गंमत वाटत असे. दरवाजांतून, खिडक्यांच्या गजांतून, झाडा-वेलींच्या पानांच्या दाटीतून अशी कुठलीही वाट किरणांनी शोधून काढलेली असे. त्यातून तयार झालेले किरणांचे विविधाकार काही वेळ अंगणात आणि घरात कुठं कुठं खेळत-रेंगाळत राहत. या कवडशांशी खेळताना किती वेळ गेला, ते कळतही नसे.

आमचा सारा दिनक्रम या किरणांच्या धाग्यांशी घट्ट बांधलेला असे. आमची घटिका-पळं उन्हावर आणि



उन्हे पहुडली दूर दूरवर, रंग केतकी फुलला। नटखट, अवखळ, हसरा वारा पानातुन थरथरला।।

वार्षिक प्रायोजक – • एक हितचिंतक, नाशिक, कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ
• सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद

त्यांच्या फिरत्या सावल्यांवर ठरत असत. ओसरीतल्या विशिष्ट फरशीवर उन्हं आली की, शाळेची वेळ होई आणि मग दप्तरं पाठीवर टाकून आम्ही शाळेसाठी घरांतून निघत असू.

घराच्या बाहेर यावं, तर रस्ताभर उन्हाचा पूर आलेला असे. पिवळ्या-पांढऱ्या रंगांच्या वेगवेगळ्या छटांचं उन्हाचं पाणी सगळीकडे तुडुंबलेलं असे. त्या प्रवाहांना विलक्षण वेग असे. गोल फिरणारे भोवरे त्यात असत. उड्या घेणारे धबधबेही असत. उन्हं चहूबाजूंनी धावत येत आहेत आणि त्यांच्यावर स्वार होऊन आपण सहजपणानं शाळेला जातो आहोत, असा भास पायांना आपसूक गती देत राही. रस्त्यांच्या चढ-उतारांवरून जाताना त्यांना समांतर असलेले उन्हाचेही चढ-उतार जाणवत असत. रस्त्यानं वळण घेतलं की, उन्हंही आपला प्रवाह बदलत. रस्त्यांतल्या खाच-खळग्यांत उन्हं भरून राहिलेली असत. खिडक्यांच्या तावदानांवरून ती ओघळताना दिसत. घरांच्या दरवाजांवरसुद्धा उन्हाचाच रंग भरलेला असे. घरांच्या पत्र्यांवर, कौलांवर, झाडांच्या उंच शेंड्यांवर उन्हं हात-पाय पसरून बसलेली असत. गावाजवळून वाहणारं नदीचं पात्र उन्हानं कवेत घेतलेलं असे; तसंच डोंगरमाथेही उन्हानं काबीज केलेले असत.

रस्त्यांवरली उन्हं शाळेच्या मोठ्या दरवाजांपर्यंत आमची सोबत करीत. आम्ही जसे आपापल्या वर्गात जात असू, तशी उन्हंही त्यांच्या त्यांच्या वर्गांत गेली असावीत, असं वाटत राही. आम्हाला हालचाल करू न देणारे, 'हाताची घडी, तोंडावर बोट' असं म्हणणारे शिक्षक, उन्हाच्या अशा खट्याळपणाला का अडवत नाहीत; असा प्रश्न तेव्हा आम्हाला सारखा पडे. आम्ही वह्या-पुस्तकं उघडली की, उन्हंही आमच्याबरोबर धडे-कविता वाचण्यासाठी; काही-काही लिहिण्यासाठी तिथं हजर होत. दप्तर उघडून काही शोधताना कुणाकुणाच्या दप्तरांतही उन्हं शिरून बसत. ही उन्हं तशीच दप्तरात बांधून ठेवावीत आणि घरी घेऊन जावीत; मग रात्री घरात लावलेल्या कंदिलाला ती दाखवून हरवून टाकावं, असं वाटत राही. दप्तरात कोंडून ठेवलेली उन्हं शाळा सुटल्यावरही आपल्या बरोबरच येत असावीत, असा विश्वास वाटे. मात्र, कंदिलापुढे दप्तर उघडलं की, आत अंधारच भरलेला दिसे, तेव्हा उन्हाचा खूप राग येई. 'घर उन्हात बांधण्याची' शिक्षा उन्हालाच कशी देणार? असाही प्रश्न पडे आणि मन अधिकच खट्टू होऊन जाई.

शाळेच्या दुसऱ्या नंबराच्या जिन्याजवळ उन्हं आली की, जेवणाच्या सुटीची घंटा वाजायला सुरुवात होई. काही 'अनुभवी' मित्रांनीच ही अटकळ साऱ्या वर्गभर सांगितलेली असे. वर्गात मध्यभागी बसलेल्या मित्रांना, खिडक्यांलगत असलेल्या मित्रांकडून ते जाणून घेण्याची खूपच उत्सुकता लागलेली असे. शिक्षकांना कळू नये, म्हणून मुलांनी त्यासाठी काही सांकेतिक खुणाही ठरवल्या होत्या; त्यामुळे हा सगळा संवाद अगदी बेमालूम चालत असे.

मधल्या सुटीची घंटा वाजविणारे काका आमच्या वर्गावरून निघाले की, त्यांची सावली आतल्या

भेट द्या : रणगाडे संग्रहालय, अहमदनगर, महाराष्ट्र (विविध युद्धांमध्ये वापरलेले रणगाडे)
वार्षिक प्रायोजक - • श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५/९८२२०८९४६३
• श्री. सागर सुराणा, पुणे

प्रकाशवाटांवरून पुढे गेल्याचं स्पष्ट जाणवत असे. ही सावली सरकत असतानाच मुलांनी डब्याच्या पिशव्या बाहेर काढून ठेवलेल्या असत. काही चपळ मित्र तर घंटेच्या पहिल्याच ठोक्याला वर्गाबाहेर पोहोचलेले असत.

झाडांखाली अंथरलेल्या सावल्यांच्या गोलाकारांत मुलांनी डबे उघडून खाणं सुरू केलेलं असे. कुठं कुठं चिमणीच्या दातांनी खाऊचं वाटप सुरू असे. सुटीचा जास्तीतजास्त वेळ खेळण्यासाठी वापरण्याचे मनसुबे असलेले कित्येक मित्र, उभे राहूनच डबे फस्त करीत असत. या घाईगडबडीत काहींचे डबे हातांतून निसटत आणि वेगवेगळ्या झाडांखालून डब्यांनी उड्या मारल्याचे आवाज लक्ष वेधून घेत. मग इतर सवंगडी आपल्या डब्यांतले घास त्यांना देत आणि सगळेच खेळण्यासाठी सज्ज होत.

मग मैदानावरल्या पिवळ्याधमक उन्हात वेगवेगळे खेळ सुरू होत. शिवाशिवी, लगोरी, रुमाल–पाणी आणि लपाछपीसुद्धा! कितीतरी खेळ. कितीतरी *टीम्स.* कुणी चेंडूचा पाठलाग करी. कुणी गुडघे दुमडून लगोरी रचत राही. कुणी बुंध्याआड लपलेलं असे; तर कुठल्या गटातला रुमाल, दुसऱ्याच कुणी उचलून दूर भिरकावलेला असे. मैदानभर जणू आनंदाची कारंजी नाचताहेत, उत्साहाचे पतंग भिरभिरताहेत आणि निरागसतेचे *कॅलिडोस्कोप* क्षणाक्षणाला नवी नक्षी साकारताहेत, असं वाटत राही.

उन्हातला हा उत्साह मुठीमध्ये साठवून आम्ही घंटेच्या ठोक्याला वर्गांत पोहोचत असू. दुपारी शाळेत कविता शिकविल्या जात.

कविता शिकतानाचं वर्गातलं वातावरण वेगळंच असे. मधूनच वर्गाबाहेर नजर फेकावी, तर मैदानावरची उन्हं भिंतींवर चढून बसलेली दिसत. त्यांचा परावर्तित प्रकाश वर्गात पसरलेला असे. खिडक्यांच्या जवळच्या रांगांनी भगभगीत प्रकाश पांघरलेला असे; तर मधल्या रांगा त्या मानानं काळपट–करड्या रंगांत शिरल्यासारख्या दिसत. वर्गाचे कोपरे मात्र तिथपर्यंत प्रकाश न पोहोचल्यानं काहीसं अंधारून आलेलं असत. कवितांचे सूर घुमू लागले की, सारा वर्गच




सूर्य आला दाराशी आपुल्या, किरण वेचुनी घ्या रे। दिशा दिशांचे पहाटगाणे, अवघे सारे वाचा रे।।
वार्षिक प्रायोजक – • श्री. संजय रिसबूड, पुणे
• 'संतुल'– श्री. मिलिंद संत, पुणे

जणू उजळून जाई. कवितांच्या शब्दांतली निरांजनं, समया आपोआप प्रकाशवर्तुळं पसरवीत असल्याचा भास होई. अनेकदा कवितांचं सामूहिक गायन होत असे, तेव्हा तर शिक्षकांसह आम्ही सगळे आणि अख्खी शाळाच गोड सुरांच्या फांद्यांवर झुलत असल्यासारखी जाणवत राही. पाडाच्या आंब्यातून गोड रस गळत राहावा, तसा वर्गभर सुरांचा रस ठिबकत राही. आंब्याच्या त्या बनात मोरांचे थवे निळ्या-मखमली पिसाऱ्यांवरले डोळे उघडून मनसोक्त नाचत असल्याचं चित्र झुलत राही.

मग पाढे सुरू होत. एकेका ओळीनं एकेकदा पाढे म्हणायचे, अशी पद्धत असे. एक ओळ म्हणे : 'अकरा एके अकरा.'

दुसऱ्या ओळीतून आवाज येई : 'अकरा दुणे बावीस.'

पुढे तीसपर्यंतच्या पाढ्यांच्या लाटा वर्गात कितीतरी वेळ लहरत राहात. पाढ्यांची विशिष्ट लयही एक कविताच बनून राही. शब्दांची नव्हे; तर आकड्यांची कविता. उलटे-सुलटे किंवा उभे-आडवे असे पाढे शिक्षक म्हणायला सांगत. पाढे म्हणण्याचे सूर कधी उंचावत; तर कधी ते अगदी संथ लयीवर येऊन बसत. जमिनीवरल्या पक्ष्यानं अचानक भरारी घेऊन झाडाचा उंच शेंडा गाठावा, तसा टिपेचा आवाज एखाद्या ओळीतून सुरू होई आणि मग उंचावत जाणाऱ्या आवाजांची स्पर्धाच लागे. पाढ्यांची ही मैफल कधी संपूच नये, असं वाटत राही.

पाढे तिसापर्यंतच्या मुक्कामाला येईपर्यंत वर्गाबाहेरची उन्हं गायब झालेली असत. पाढे संपत येत, तेव्हा वर्गातल्या प्रकाशाच्या रेघांनी रंग बदललेले असत. 'तीस दाही तीनशे'पर्यंत पोहोचतानाच नेमकी शाळा सुटल्याची घंटा वाजू लागे आणि आम्ही मुलं रस्त्यांवर उरलेली उन्हं पकडण्यासाठी पाखरांसारखी धावत सुटत असू.

घरी पोहोचेपर्यंत सूर्य डोंगराच्या उंच शिखरापलीकडे घरंगळलेला असे. तिथूनही त्याची रक्तवर्णी, पीतवर्णी किरणं आम्हाला पकडण्यासाठी आलेली असत. हळूहळू ही किरणं मंद होत जात; आणि गावात संध्याकाळ उतरून येत असे.

शालेय वयात आकंठ पिऊन घेतलेली उन्हाची ही बदलती प्रतीकं नंतरच्या आयुष्यातही बरोबर असल्याचं आज जाणवतं, तेव्हा मोठं आश्चर्य वाटतं.

आयुष्यातली आनंदाची, सुखाची, समाधानाची किरणं कधी ग्रीष्मातली असतात, माघातली असतात आणि कधी ती रिमझिमत्या श्रावणसरींतून इंद्रधनुष्यासारखी मंद हसणारीही असतात. मावळत्या उन्हांत उद्याच्या दिवसाचा नवा आशावाद दडलेला असतो. शालेय वयात सुरू झालेली ही उन्हाची गोष्ट अजूनही कशी सुरूच आहे, ते कोडं मात्र काही केल्या उलगडत नाही; अगदी आजही!

**– मल्हार अरणकल्ले**
१०-२, गुरुजन सोसायटी, कोथरूड
पोलीस चौकीजवळ, पुणे 411038

**चित्रकार : राहुल देशपांडे**

**वाचूया**
**ललित लेख – हा खेळ सावल्यांचा**
**लेखक– मल्हार अरणकल्ले**



भेट द्या : विश्वेश्वरय्या संग्रहालय, बंगळुरु (विज्ञानातील अद्भुत चमत्कारांचे, शोधांचे भव्य संग्रहालय)
वार्षिक प्रायोजक – • सौ. प्राची व श्री. अमर परांजपे – सांगली
• सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे

# पैशापेक्षा मौल्यवान!!

– सुभाष देशपांडे




कोणी जर तुम्हाला विचारलं की, पैशापेक्षा मौल्यवान काय? तर अनेकजण उत्तर देतील 'सोने!' म्हणजे कागदी नोटांपेक्षा सोने हा धातू अनेकांना जास्त भारी वाटतो. कुणी त्यावर कडी करायची म्हणून हिरे, मोती, माणके यांचीही उदाहरणे देतील. भूगोल आणि रसायनांचे विद्यार्थी म्हणतील, 'पेट्रोलियम'; कारण ते दिवसेंदिवस दुर्मिळ आणि म्हणून महाग होत चाललं आहे. युद्धशास्त्राचे अभ्यासक म्हणतील, 'हो, युरेनियम!' कारण त्यातून विश्वसंहारक अणुबॉम्ब बनविता येतो.

दुष्काळानं होरपळलेला शेतकरी म्हणेल, 'अहो, पाऊस! त्याच्याशिवाय जिणं व्यर्थ आहे, 'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा!' आपणही म्हणतोच की!

दोन वर्षांपूर्वी पाचशे आणि हजार रुपयांच्या प्रचलित नोटा सरकारनं रद्दबातल केल्या, तेव्हा ज्यांनी त्या बँकेत भरल्या नाहीत, त्यांच्याकडे त्याचा 'कचरा' तयार झाला! 'मूल्य' या गोष्टीची अशी गंमत आहे. त्या विशिष्ट कागदांवर शासन छप्पा मारते; म्हणून त्याला किंमत येते. आपण जेव्हा सगळीकडे भ्रष्टाचार बोकाळला आहे, असे म्हणतो; तेव्हा पैशाच्या बाबतीतही 'खरा पैसा' आणि 'खोटा पैसा' किंवा 'काळा पैसा' अशी

**जगात मौल्यवान गोष्ट कोणती? जमीनजुमला, सोने-हिरे-मोती? पैसाअडका? या प्रश्नाचं उत्तर व्यक्तिसापेक्ष म्हणजे व्यक्तिनुसार बदलणारे असते. पण आपल्या व्यक्तिगत जीवनात समाजाच्या संदर्भात अनेक नीतिमूल्ये ही शाश्वत म्हणजे न बदलणारी असतात. चारित्र्य, स्वातंत्र्य, समता, कृतज्ञता, सहिष्णुता, सद्सद्विवेकभाव, यांसारखी मूल्ये लहान वयातच रूजली, तर माणूस म्हणून होणारी आपली जडणघडण आपल्या स्वत:लाच खूप समृद्ध करणारी ठरेल! आपली स्वत:ची ओळख आपल्याला पटली, तर समाजाचा घटक म्हणून आपलं वागणं आपोआपच योग्य दिशेनं जाणारे होईल. या हेतूनं गेल्या वर्षभरात 'स्व-ओळख' या लेखमालेअंतर्गत ११ लेख दिले गेले. या लेखमालेतील हा अंतिम लेख! 'स्व-ओळख' पटवून घ्यायच्या प्रक्रियेतील विविध पैलू जाणून घेण्यासाठी संपूर्ण लेखमाला जरूर वाचा!**

विभागणी होते. काळ्या पैशाला कायदेशीर मूल्य नाही. तो जप्त तरी होतो किंवा त्या माणसाला अटकही होऊ शकते.

माणसाच्या वागण्यातल्या अशा काही गोष्टी आहेत की, सगळा समाज त्याच्यावर छप्पा मारतो अन् त्याला 'मूल्य' येते. आपल्या समाजात अशी वेगवेगळी मूल्ये प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, 'सत्य सदा बोलावे', हा उपदेश आपण ऐकत असतो. गांधीजींनी सत्याचा आग्रह धरला आणि इंग्रजांना हाकलून लावलं. कितीही पैसे देऊ केले असते, तरी इंग्रज येथून गेले नसते; त्यामुळे सत्य हे पैशापेक्षा मौल्यवान ठरलं! आपण रोजच्या जीवनात किती खरे बोलतो आणि किती दडवतो, याचा हिशेब ज्याचा त्यानेच करावा. काल शाळेत का आलो नाही, याची खरी कारणं सांगा, अशी एखादी स्पर्धा घ्यायला हरकत नाही!

दैनंदिन जीवनात चारित्र्याला मोठे महत्त्व आहे. चारित्र्य अनेक सद्गुणांनी घडतं. गुन्हा घडल्यावर तुरुंगात जाताना एका मुलाने आईचा कान चावला आणि म्हणाला की, 'तू मला वेळीच का सावध केलं नाहीस?' ही गोष्ट आपल्याला माहीत आहे. उलट मुलांना चांगलं वळण लावणाऱ्या आई-वडिलांच्या आपण पाया पडतो, गुरुजनांना वाकून नमस्कार करतो; याचा अर्थ त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. आपलं आयुष्य चांगलं घडविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दल आणि संस्थेबद्दल कृतज्ञ असणं, हे एक महत्त्वाचं मूल्य आहे. 'कामापुरता मामा' किंवा 'गरज सरो अन् वैद्य मरो' अशी जगरहाटी आजूबाजूला दिसते. तिथे मूल्यांचा ऱ्हास आहे, त्याला उतरती कळा लागली आहे, असं म्हणावं लागतं.

कृतज्ञतेच्या नमस्कारात आणखी एक जादू आहे. सद्वर्तनी मुलं जर व्यसनी बापाला रोज वाकून नमस्कार करू लागली, तर लाजेकाजेस्तव बापाचं व्यसन कमी होतं किंवा सुटतं, असा अनुभव आहे. मात्र, अशा वागण्यात आपण मन किती घालतो, यावर त्याचा परिणाम अवलंबून आहे. उठताबसता आई-बाबांना किरकोळ *'थँक्यू'* असे शब्द आपण फेकून मारतो, त्याचा कृतज्ञतेशी काही संबंध राहात नाही. पढविलेले *'मॅनरिझम्स'* आपल्या मनोरचनेचे, व्यक्तिमत्त्वाचे जोपर्यंत एकात्म घटक होत नाहीत, तोपर्यंत ते मूल्य आपल्यात रुजलं, असं होत नाही.

दुसऱ्याच्या मताचा आदर करणं, आपल्या विरोधी असलेल्या त्याच्या मताची हेटाळणी न करता मोकळ्या मनानं त्याची भूमिका त्याला जगू देणं, ही भारतीय मूल्यव्यवस्था आहे. कोणत्या देवाची पूजा करावी, कोणता पोषाख करावा, कोणता आहार घ्यावा याबाबत परस्परांचा आदर करणं, म्हणजे सहिष्णुता बाळगणं हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. अनेक धार्मिक संप्रदायांना मुभा देऊन तरीही गुण्यागोविंदानं, एकत्र नांदता येणं, ही भारताची जगाला 'मौलिक' देणगी आहे.

शाळेत प्रार्थनेनंतर आपण प्रतिज्ञा म्हणतो. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.' हे केवळ शब्द आहेत की, त्यामागे काही मूल्यविचार आहे? आपल्याला सर्वांमध्ये जी 'राष्ट्रभावना' रुजवायची आहे, त्याचे प्रतिज्ञा हे साधन आहे. पूर्वी आम्ही विभागलेले होतो; त्यामुळे परकीयांची आक्रमणे झाली. त्यात फंदफितुरी झाली. आमच्यातल्याच काहीजणांनी शत्रूला मदत केली, म्हणून आपला पराजय होत गेला. आज दहशतवाद, नक्षलवाद फोफावताहेत,



भेट द्या : पाटणा संग्रहालय, पाटणा, बिहार (नाणी, कलाकृती, चित्रे, छायाचित्रे, शिल्पे)
वार्षिक प्रायोजक – • श्रीमती लीला आचवल, नाशिक
• सौ. सीमा परांजपे, पुणे

याचं कारण आपल्यातलेच काहीजण त्यांना मदत करतात. शत्रूचे सैनिक आपली सीमारेषा ओलांडून आत येतात; कारण आपल्यातले फितूर नागरिक पैशाच्या लोभापायी त्यांना मदत करतात. माझ्या राष्ट्राचा अभिमान पैशानं विकत घेता येणार नाही, असं आपल्याला वाटतं का?

'स्वातंत्र्य' ही असंच मौल्यवान आहे. क्रांतिकारकांनी त्यासाठी प्राणार्पण केलं. इतकं त्याचं महत्त्व आहे. स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला म्हणून सावरकरांना फर्ग्युसन महाविद्यालयातून तात्पुरतं काढून टाकलं होतं. मात्र, आज त्यांची वसतिगृहातली खोली म्हणजे 'तीर्थस्थळ' झालं आहे. असे स्वातंत्र्यवीर पूर्वी भारताच्या प्रत्येक प्रांतात निर्माण झाले; त्यामुळे आज आपण चैनीत जगत आहोत. 'मला पाहिजे ते आइस्क्रीम, पाहिजे त्या वेळी मिळालेच पाहिजे', असा हट्ट धरणं म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. समोर आइस्क्रीम दिसत असूनही 'आजचा अभ्यास झाल्याशिवाय ते खाणार नाही' असा विचार करणं आणि त्याप्रमाणे वागणं म्हणजे स्वातंत्र्य!


मला एकट्यालाच नाही, तर सर्वांना आपापलं स्वातंत्र्य उपभोगता आलं पाहिजे. मी रस्त्यावरून कशीही सायकल चालवेन, *सिग्नलची* पर्वा करणार नाही. बागेत गेलो की, भेळेचा कागद हिरवळीवर फेकून देईन, पाण्याची रिकामी बाटली *फूटपाथवर* फेकून देईन; अशा गोष्टी म्हणजे स्वातंत्र्य उपभोगणे नव्हे, तो स्वैराचार आहे. समाजाला घातक आहे. एक नागरिक म्हणून समाजात शिस्तीनं वावरणं, हे लोकशाहीतलं मूल्य आहे.

मुळात लोकशाही पाळणं, टिकवणं हेच उद्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मोठं मूल्य आहे. आपल्या पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला जी प्रतिज्ञा छापलेली असते. ती भारताच्या संविधानाची म्हणजे आपल्या राज्यघटनेची सुरुवात आहे. आपण सगळे १३५ कोटी लोक या देशात कसे वागू, एकमेकांना समजावून घेऊन, त्यांच्यात भेदभाव न करता सर्वांची प्रगती कशी साधू, ही अपेक्षा त्यात व्यक्त केली आहे. आपलं शिक्षण जसजसं वाढत जाईल, तसतसा त्याचा अर्थ आपल्याला अधिकाधिक कळत जाईल. आणि १८ व्या वर्षी आपण मतदार झाल्यावर लोकशाहीचं आपलं भानही वाढेल. त्याची पायाभरणी आता चालू आहे.

चांगलं काय आणि वाईट काय याची निवड आपण सतत करत असतो. चांगल्या गोष्टी सातत्यानं केल्या की, त्यांची सवय होते. या सवयी मोडणं आपल्याला आवडत नाही. म्हणजे त्या गोष्टी आपल्या व्यक्तिमत्त्वाचं 'मूल्य' होतात. मी परीक्षेत *कॉपी* करणार नाही, हे चांगल्या विद्यार्थ्याचे मूल्य आहे. अगोदर वर्षभरात एकमेकांना अभ्यासात मदत करणं, हेच अपेक्षित आहे. परीक्षा चालू असली की, मी अनाठायी मदत मागणार नाही किंवा देणार नाही. शेंगाच्या टरफलांवरून टिळकांना वर्गात बोलणी खावी लागली, तरी त्यांनी आपला करारी बाणा सोडला नाही; म्हणून मोठेपणी ते 'लोकमान्य' झाले.

शाळेत किंवा घरी आपल्याला अनेक गोष्टी पाठ करायला लावतात. कधीकधी आपण त्रागा व्यक्त करतो; पण मनाचे श्लोक असतील किंवा गीताईमधील श्लोक असतील, तर पाठांतरातून त्यातला अर्थ आपल्या मनात खोल जाऊ लागतो. *'विवेके क्रिया आपली पालटावी।'* असे वारंवार म्हटल्यानं तसं आचरण होण्याची शक्यता वाढते.


वार्षिक प्रायोजक – • श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु – कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.
• एक हितचिंतक, दिल्ली



*'फुकाचे मुखी बोलता काय वेचे।'* हा श्लोक म्हणत म्हणत 'मी जे बोलेन, ते करूनच दाखवीन' असं वागण्याचं मूल्य अंगी बाणतं. *'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले।'* असे आपल्याकडे संतवचन आहे. समाजात तसा मान मिळवायचा असेल तर आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी. आणि हे आपले मूल्य व्हावयास हवं.

असं मूल्याधिष्ठित जगणं, त्याची तयारी करणं हे आपल्या शिक्षणाचं उद्दिष्ट आहे. दुसरा चुकीचा वागतो; मग मीच का योग्य वागायचं? त्याला शिक्षा नाही आणि मीच का सोसायचं? असे प्रश्न आपल्याला पडत राहतात. सज्जनतेची किंमत अशीच चुकवावी लागते. त्यासाठी सहनशीलता, निश्चय आणि संकल्पापासून, मूल्यापासून न ढळणं असं मनात पक्कं बाणवावं लागतं. 'चलता है', किंवा 'कोण येणार आहे पाहायला?' असे विचार मुळापासून दूर नेणारे ठरतात. रस्त्यात पैशाची नोट पडलेली दिसली म्हणून मी खिशात घालणार नाही. दुसऱ्याच्या झाडाचे फळ विनापरवानगी तोडून खाणार नाही; असं प्रामाणिकपणाचं मूल्य जगण्यात अपार आनंद आहे.

आपल्या चांगल्या वागण्याचा परिणाम इतरांच्या वाईट वागण्यांवर होत असतो. तो लगेच दिसला नाही, तरी आपलं चांगलं वागणं सोडायचं नाही. माणसानं माणसासारखं वागणं यातच खरी माणुसकी आहे. आणि 'माणुसकी' ही पैशापेक्षा मूल्यवान आहे!

**– सुभाष देशपांडे**
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३०

**चित्रकार - चित्रांजली**

**सोबतच्या QR Code मध्ये 'स्व–ओळख' लेखमालेतील लेखांक ११ जोडला आहे, तो जरूर वाचा तसेच सर्व लेखांची नावे दिली आहेत. आपल्याला हे सर्व लेख वाचायचे असल्यास 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयाशी संपर्क करा.**

## एका टिंबाची करामत

| | | | |
|---|---|---|---|
| माडी | मांडी | चिता | चिंता |
| भाडे | भांडे | राग | रांग |
| भाग | भांग | पथ | पंथ |
| खत | खंत | खडू | खंडू |
| बाग | बांग | मास | मांस |
| डाबर | डांबर | साग | सांग |
| वदन | वंदन | दीड | दींड |
| नदी | नंदी | रग | रंग |
| सजीव | संजीव | हस | हंस |
| भीती | भिंती | कुडी | कुंडी |


**भेट द्या : नाणी संग्रहालय,** नाशिक, महाराष्ट्र, (चलनात असलेली नाणी, छपाईची जुनी नवी तंत्रे)
**वार्षिक प्रायोजक – • श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे**
सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !**

## खास कुमारांसाठीची पुस्तके



**✻ कथासंग्रह**

१. मोहोर........................................६०
२. रस्काझी-रशियन कथा .......................७०
३. सफर विज्ञानकथांची..........................८०
४. प्रेरक कथा...................................४०
५. कहाणी दोन भावांची.........................४०

**✻ ललित लेखसंग्रह**



६. अलगुज....................................५०
७. केवड्याचं पान...............................५०
८. बकुळफुलं ....................................६०

**✻ कविता/काव्यपंक्ती संग्रह**

९. कवितेच्या गावा..............................७०
१०. शब्दांची रत्ने ...............................६०

**✻ काव्य-रसग्रहण लेखसंग्रह**

११,१२. गंध मोहवी काव्याचा भाग १ व २(प्रत्येकी) ७०
१३. पाहिलेच पाहिजे असे काही ................८०
१४ ते १६. वाचलेच पाहिजे असे काही
भाग १,२,३* (प्रत्येकी) .........................४०



**✻ माहितीपर पुस्तके**

१७. आपला पाऊस .............................३०
१८. छंद आकाश दर्शनाचा ......................१००
१९. वनस्पतींचे अनोखे विश्व.....................८०

**✻ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**



२०. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत..............१३०
२१,२२. कल्पक बनू या/Be Creative १००/१५०
२३. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास .................७०
२४. तरंग मनाचे*...............................६०
२५. उजळती वाट*..............................४०
२६. निर्णय कौशल्य*............................४०
२७. नियोजन कौशल्य*..........................४०
२८. भावनांच्या प्रांगणात .........................७०
२९. गीता-गीताई ...............................२०
३०. प्रबोधन गीते भाग १.........................४०
३१. प्रबोधन गीते भाग २.........................३०



**✻ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके**

३२. जिद्दीची लोभस रूपं ........................६०
३३. आयुष्यातील वादळलाटा ...................८०
३४. कथा इस्रोची ...............................८०
३५. आम्ही असे घडलो..........................८०
३६. हरिसिंह नलुआ.............................६०
३७. आमची जडणघडण.........................८०
३८. गोष्टीरूप आप्पा.............................५०
३९. आपले आप्पा...............................५०
४०. समाजशिल्पी आप्पा ........................८०




**✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह**

४१. स्वीकारशील स्वदेशी .......................५०
४२,४३. हरित संदेश/Green Messages . १५/२०
४४. हट्टी व्हा हट्टी ...........................७०



**✻ अभ्यासविषयक पुस्तके**

४५. असे घटते सुंदर अक्षर......................२०
४६. प्रज्ञाबोध भाग-५...........................७०
४७,४९. अभ्यासातील स्वावलंबन
भाग १ - अभ्यासाची पूर्वतयारी .................७०
भाग २ - अभ्यास कौशल्ये* ...................८०
भाग ३ - परीक्षा तंत्र* ..........................८०
५०. चला प्रकल्प करूया .......................१००



**✻ कलाकृतिपर पुस्तके**


५१, ५२. त्रिमितीची किमया/3D Magic ........८०/९०
५३. कागदी हस्तकलेच्या दुनियेत ..................५०
५४. हस्तकलांचा उत्सव ...........................७०
५५. कलेच्या विश्वात ..............................७०
५६. अभिवाचन एक कला.........................७०

## युवा-शिक्षक-पालकांसाठी उपयुक्त पुस्तके




**✻ ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक पुस्तके**

१,२. बुद्धिवैभव*/ Glory of Intelligence........३०/४०
३,४. हसत खेळत बुद्धिविकास भाग १व२ (प्रत्येकी) १५०
५,६.Enhancing the Intelligence through
Play - Part 1*, Part 2 (each)..............१५०
७. आश्वासक पालकत्व ..........................१००
८. सामाजिक जाणीव संवर्धन......................१००
९. मनुष्य घडणीसाठी आवाहन : खंड १ .........१३०
१०. मनुष्य घडणीसाठी आवाहन : खंड २..........१२०
११. Man Making...............................२५०
१२. राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण ...................१५०
१३ ते १५ ज्ञान प्रबोधिनी खंड - ४
भाग - १ शिक्षण प्रभाग .........................१००
भाग - २ संशोधन प्रभाग........................१००
भाग - ३ ग्रामविकसन प्रभाग....................१००
१६. चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी .......................७५



**✻ ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक पुस्तके**



१७. राष्ट्रद्रष्टे विवेकानंद.........................१२०
१८. विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता..........८०
१९. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. वि.वि. पेंडसे १००
२०. Appa Pendse-The Man & The Mission४०

**✻ ज्ञान प्रबोधिनीची वैचारिक पुस्तके**

२१. विवेकानंदांचा राष्ट्रधर्म......................६०
२२. समर्थ रामदास काय म्हणाले?.............. ६०
२३. महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म.................... ६०
२४. राष्ट्रदेवो भव ..............................७०
२५. महर्षी दयानंद काय म्हणाले? ...............३०
२६. स्वत:ला घडविण्यासाठी उपासना............ ३०

(* या पुस्तकांची आवृत्ती संपली असून जानेवारी २०२० पुढील आवृत्ती प्रकाशित होईल त्यावेळी किंमतीत थोडा बदल होऊ शकेल.)

**वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - ३०**
**☎ ०२०- २४२०७१७४/१७५**

**वाचूया परिचय ज्ञान प्रबोधिनीच्या प्रकाशनांचा**



नवीन छंद, नव्या आकांक्षा। कल्पकतेच्या रुंदावू कक्षा।।

**वार्षिक प्रायोजक - • श्री. विक्रम कामठे, पुणे** - कु. वैदही व वीरजा यांच्याकडून दीपावलीच्या शुभेच्छा!
**• श्री. साहिल कोठारी, बारामती**

# सोडवा हे शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | | ५ | | ६ |
| | | | | ७ | | | | | |
| | | | ८ | | | | ९ | | |
| | १० | | | | | ११ | | | १२ |
| | | | १३ | | | | | | |
| | | १४ | | | १५ | | | | |
| | १६ | | | | | | | | |
| १७ | | | | | १८ | १९ | | २० | |
| | | | २१ | | | | | २२ | २३ |
| २४ | | | | | | | | | |

## आडवे शब्द

१) रक्षक
५) लाल रंगाचे रत्न
७) मर्दन
११) च्यात सहभागी असणे/होणे
१३) लक्ष्मी
१५) स्त्रियांचा एक पोशाख
१६) न्यूनता
१७) लाल रंगाचा महाग मसाल्याचा पदार्थ
१८) मनोहारी विलोभनीय
२२) अभिप्राय
२४) सात सागरांच्या पलीकडे

## उभे शब्द

१) वाळूतील रेघोट्यांवर भविष्य सांगणे २) वसा ३) किंमत ४) रसाने भरलेला ६) कारस्थान ८) लाल रंगाचे कंदमूळ ९) लक्ष्मी १०) चहा पिण्यासाठी वापरले जाणारे पात्र ११) प्रश्न १२) हिंदीतली 'शंका' १४) दीन, गरीब १५) तार छेडून वाजवायचे शास्त्रीय वाद्य १६) व्यायाम १९) १० व्या क्रमांकाची रास २०) मृत्यूदेवता २१) समुदाय/गट २३) अंधार

# शब्दवैभव

**अग्नी कुठे पेटला आहे त्यावरून त्याला ठरावीक शब्द वापरला जातो.**
**शेजारी दिलेल्या शब्दसमुहातून त्यासाठी योग्य शब्द ओळखा!**
**उदा. जंगलात आपोआप पेटलेला - वणवा**

१) समुद्रातला अग्नी
२) शेगडीत किंवा वाफेच्या इंजिनात असलेला धगधगता कोळसा
३) संतांच्या समाधीस्थळी अगर मठामध्ये कुंडात सतत धुमसत असणारा अग्नी
४) जहाज, मोटार, आगगाडी अगर इमारती यामध्ये एकाएकी भडकलेला अग्नी
५) उदबत्ती अगर पेटत्या वस्तूवरून उडालेला अग्नीचा कण.
६) मेणबत्ती, समई, पणती यामध्ये दिसून येणारे अग्नीचे रूप.
७) शेकोटी, होळी यातील अग्नीचे स्वरूप
८) हातातल्या काठीला लावले पेटते कापड
९) कोकणात बाटलीत तेल घालून वात पेटवतात.

- धुनी
- आग
- ज्योत
- वडवानल
- निखारा
- पलीता
- ठिणगी
- जाळ
- भुत्या

**– रजनी दाते,** २०१, सॉलीटेअर अपार्टमेंट, भोंडे कॉलनी, कर्वेरस्ता, पुणे 411004

**भेट द्या : आसाम स्टेट संग्रहालय,** गुवाहाटी, आसाम (प्राचीन हत्यारे, शिल्प, लोककलाकृती)
**वार्षिक प्रायोजक – • कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे**
**• सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे**


# गेले विझूनिया दिवे

– ऐश्वर्य पाटेकर

दिवाळीच्या सणानं कितीतरी आठवणी काळजात कोरून ठेवलेल्या आहेत. आता त्यातल्या काही आठवणी उकरायच्या म्हटलं, तर काळजाला मुंघेर लागेल. साऱ्याच आठवणी काही दु:खाच्या नाहीत. काही मनाच्या वावरात सुखाचं पीक पेरत जाणाऱ्याही आहेत. यासाठी थेट माझ्या बालपणातल्या दिवसांपर्यंत उतरत जावं लागेल.

तेव्हा खेड्यापाड्यांत आजच्यासारखी विजेची सोय नव्हती. गावं सदोदित अंधारात बुडालेली असायची. मात्र, दिवाळीत पणत्यांच्या लखलखत्या उजेडाची झड गावभर असायची! गाव उजेडात न्हाऊन निघालेलं. माहेरवाशिणींनी गजबजून उठलेलं. सडासारवणाच्या वासात भिजलेलं. रांगोळ्यांच्या नक्षीनं मढलेलं, फटाक्यांच्या आवाजानं पुन:पुन्हा जागं होणारं.

माझ्या घरी मात्र, दिवाळीची चिंता सुरू होती. ज्या बाजरीच्या पिकावर आमची दिवाळी साजरी होणार होती, ते पीकच अवकाळी



दिवाळी-पणत्यांच्या लखलखत्या उजेडाची! रांगोळ्यांच्या नक्षीची! फटाक्यांच्या आवाजाची! मोठ्या प्रयासानं दिवाळी साजरी करण्याचं स्वप्न पुरं करण्यासाठी भावड्या, तायडी, पमी आणि त्यांची माय सगळे झटत होते. ...पण उजेडाची रोपं लावण्याआधीच सुकून गेली... आगलदिवा फाटून गेला... फटाक्यांचा नादही कायमचा सुटला... कशामुळे? जे घडलं ते बरोबर नव्हतं. त्यावेळची परिस्थिती आणि लेखकाचं दु:ख समजून घेता-घेता, आज कुणाच्याच घरी असं घडायला नकोय! पुरुषी वर्चस्व आणि स्त्रीवरील अन्याय थांबायला हवा; त्यासाठी सर्वजण सक्षम होऊया!



काटेरी ही झाडे सारी, पाऊस-वादळ-ऊन साहती। काट्यांमधुनी फुलतानाही, त्यागाचे हे तत्व सांगती ।।

वार्षिक प्रायोजक – • सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे
• एक हितचिंतक, पुणे

पावसानं हिसकावून नेलं होतं. म्हणजे मागच्या दिवाळीसारखी ही दिवाळी कोरीच जाणार. अक्का अन् आई बोलत बसल्या होत्या,

''आई, यंदापन आपली दिवाळी सुनीच जानार! काय-काय चिंतलं व्हतं आपून. आपल्या त् साऱ्या सपनाचंच मातेरं झालं!''

''असं नको बाई चितागती बसू; कुनी मेल्यासारखं! म्या वरवाडातल्या मुक्ताईची एक एकर बाजरी सोंगायला घेतलीय उक्ती. तेवढेच चार-पाचशे येतील; आपली दिवाळी साजरी व्हईल तेवढ्यावर!''

''आई, मला अन् पमीलाही यावं लागंल का कामाला?''

''त्याशिवाय का उरकंल काम. दिवाळी आठ रोजांवर आलीय. सगळे बिलगले त् येळेवर व्हईल!''

आमचं झालेलं नुकसान विसरून पुन्हा समद्यांनी एकदा कामाला जुंपून घेतलं. ऊन डोक्यावर घेतलं. धस्कटं म्हटलं नाही की काटे. विसाव्याला बसलो नाही. सारखं काम आणि काम. पमीनं हाताला विळा लागून घेतला. आईनं लुगड्याच्या पदरानं तिच्या भळभळत्या जखमेवर फडकं बांधलं. तिला एकटीला विसावा मिळाला. ती बाभळीच्या झाडाखाली बसली. तायडीला काही ते सहन झालं नाही. पमी नेहमीच मुद्दाम कामचुकारपणा करते! असं तिला वाटायचं. आईनं तिची समजूत काढली.



मला बाजरीत वाळूक सापडलं. ते चिरून समद्यांना एकएक खाप दिली. उभ्याउभ्याच वाळूक खाल्लं. अशा काही कडू-गोड गोष्टी घडत. चार एक दिवसांत बाजरीचा फडशा पाडला, तेव्हा कुठं आम्ही धरणीवर बूड टेकवलं. मजुरीचे चारशे रुपये हातात पडले! मग कष्ट हे कष्ट वाटलेच नाहीत; कारण आता आमची दिवाळी साजरी होणार होती. आईनं मला फटाके घेऊन द्यायचं कबूल केलं होतं. अजून एकाही दिवाळीला आम्हा भावंडांना फटाके मिळाले नव्हते.

मी आणि आमच्या सारखेच काही गरीब दोस्त मिळून आम्ही करायचो काय? तर आमच्या गावात मुसळे गुरुजींच्या दारी, कौशाआत्याच्या दारी, रात्री जाम फटाके फोडले जायचे. आम्ही पोरं दिवस उजाडायला त्यांचे अंगण धुंडाळायचो. एकूण एक अंगण पायाखाली घालायचो. फुस्स झालेले फटाके गोळा करायचो. एखाद-दुसरा फटाका पेटायचा

राहिलेला असेल, तर खूप मोठं घबाड सापडल्यागत एकाच वेळी सगळ्याच नजरा त्याच्यावर जायच्या. एकच गडबड उडायची. ज्याला सापडे, तो जग जिंकल्याच्या मिजाशीत! आम्ही सर्व मिळून फुसक्या फटाक्यातली दारू एका ठिकाणी ओतायचो; काडी लावून तो निळा अद्‌भूत जाळ पाहायचो!

आता यावेळी मात्र, स्वत:चे फटाके वाजवता येतील; म्हणून मी खूश होतो. आई आणि अक्की दिवाळीच्या बाजाराची खरेदी करायला उमरगावला जाणार होत्या. त्या दोघींची लगबग सुरू होती. मी, पमी अन् तायडी आम्हाला घर आवरायचं काम दिलं होतं.

''तायडे, पमे हस्त्यामस्त्या खेळू नका; सांजेपर्यंत सारं आवरून टाका!''

''म्या नाही भांडत. ही तायडीच कायतरी कुरापत काढते; तिला तेवढं समजून सांग, आई!''

''आई, माझे फटाके आणाया विसरू नको!''

''अक्के, लिस्टं करून घेतली न् बाई काय-काय घ्यायचंय त्यांची?''

आई व अक्का गेली अन् मारुतीच्या मंदिरापासून परतही आली. मी म्हणलो,

''काय गं आई, काही इसरली का?''

''नायी इसरले बाबा; तुजा बाप येतोय!''

''आता कशाची दिवाळी! आता बसा मनाचे लाडू खात!'' तायडी म्हणाली.

''उलट तुमचा बाप येतोय; म्हणजे दिवाळी चांगलीच व्हईल. एवढ्या दिवाळ्या गेल्या; पन एकदाही तुमचा बाप आला नायी.''

''आई, यवढं तुज्या आयुष्याचं वाटुळं केलं तरी बायी तुला इस्वास हायेच!'' अक्का तोंडातल्या तोंडात पुटपुटत म्हणाली.

आमच्या बापानं दुसरं लग्न केलं होतं. म्हणून तो आमच्यात राहात नव्हता. नोकरीच्या ठिकाणी दुसऱ्या आईबरोबर राहात होता. कधीतरी आमच्या घरी यायचा.

बाप डुलत डुलत घरी आला. बरोबर फुकट्या महादू, दाताळा दत्तूही. तोपर्यंत तायडीनं गोधडी अंथरून ठेवली होती. तिघांनी बस्तान मांडलं. फुकटची सिगारेट पिता पिता महादू बापास म्हणाला,

''भाऊसाहेब, तुमच्यासारखी हुशार व्यक्ती व्होल तालुक्यात नाही; तुमाला चांगली साथ मिळाली अस्ती त् तुमी तालुक्याचे आमदारसुद्धा झाले अस्ते; पण आपलं गाव धड नायी!'' दत्तू दाताळ्यानेही त्याची री ओढली. बापाचा बेडूक नाहकच फुगत चालला होता. त्या दोघांचं खास दारूसाठी हरिकीर्तन चाललेलं होतं अन् हे दरवेळचं होतं.

बापानं आईला हाक मारली. आई येऊन उभी राहिली; अवघडल्यासारखी उंबऱ्यात.

बाप आईला म्हणाला,

''तुझ्याकडे दोन-तीनशे रुपये आहेत का?''

''हायेत; पण दिवाळीचा बाजार खरेदी करायचाय.''

''उद्या देतो तुला. मी निघताना तिनं पैसे काढून घेतले वाटतं खिशातनं. भाड्यापुरते ठेवले, तेवढं तरी बरं! नाही तर मला येताही आलं नसतं.''

अक्का मधल्या घरात पुटपुटल्यावानी हळू आवाजात म्हणत होती, ''तुमी आले


वार्षिक प्रायोजक - • सौ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे
• श्री. समीर चावरे, नवी मुंबई

म्हणजे आमच्यावर उपकारच केले. चार पैशाचा खाऊ कायी आणला नायी. दिवाळी हाये त्याचंही कायी नायी.''

आई मधल्या घरात आली. अक्का तर बिलगूनच पडली आईला.

''कशाला सांगितलं गं पैसे हायेत म्हणून; आपल्या मोलमजुरीचे पैसे घाल आता त्याच्या भंजाळी अन् दिवाळीत आमाला ठिव भाजी-भाकरीवर!''

''काय करती मंग? त्या मेलीनं घेतले त्याच्या खिशातलं पैसे काढून.''

''तू कशी इस्वास ठिवते आई?'' अक्का म्हणाली.

''जाव दे; आता मी बोलून गेले.''

आईनं आमच्या मजुरीचे सारे पैसे बापाच्या हवाली केले. या विश्वासावर की, उद्या पैसे मिळतील. पर कसलं काय, रात्री त्या दोघांबरोबर पार्टी झाली.

आईला वाटलं, बाप आला दिवाळीसाठी; पण बापानं दुसऱ्या दिवसाची सकाळ उजाडताच आवरासावरायला सुरुवात केली. आई भीतभीतच म्हणाली,

''निंगाले का?''

''हो, इकडं राहून कसं चालंल. उमरगावला काम होतं. इतक्या जवळ आलो तर म्हटलं येऊ चक्कर टाकून.''

''पैसे देनार व्हता ना? मला बाजार करायचाय!''

''कुठून देऊ पैसे? माझ्याकडे परत पैसे मागते काय? नवरा आला, त्याचा काही आनंद नाही! सगळे मतलबीच आहात.''

बापाच्या रागाचा पारा चढला. तो लालबाल होत आईला म्हणाला,

''पैसे पाहिजेत तुला?''

असं म्हणत घालत असलेला बूट फेकून मारला.

''माज्या पोरायच्या तोंडातला घास हिसकून तुमच्या मढ्यावर घातला म्या!''

आईच्या या वाक्यासरशी बापाचा राग अस्मानाला भिडला. बापानं आईला लाथा-बुक्क्यांनी मारायला सुरुवात केली. मी आणि पमी बोंबलायला लागलो. आमच्या गल्लीतल्या चिमबाबानं येऊन आईला सोडवलं, तरी बाप चवताळलेलाच! नवऱ्याकडे पैसे मागते म्हणजे काय?

वातावरण निवळलं. आई कोपऱ्यात गुडघ्यात तोंड घालून बसलेली. अशाही वेळी मला माझे फटाके समोर दिसले. मनात म्हटलं, 'बापासमोर आईकडे फटाके मागितले तर बाप फटाके तरी घेऊन देईल,' म्हणून मी आईकडे फटाक्यांसाठी पैसे मागितले. तेव्हा बापानं त्याच्या दणकट हाताची पाचही बोटं उमटवली माझ्या गालावर अन् बाप निघून गेला.

दिवाळीच्या पणत्यांची उजेडाची रोपं लावण्याआधीच सुकून गेली होती. आगलदिवा फाटला होता, तेव्हापासून फटाक्यांचा जो नाद गेला तो फुसके फटाके धुंडाळतदेखील फिरलो नाही.

**ऐश्वर्य पाटेकर**
मु. पो. काकासाहेबनगर,
ता. निफाड
जि. नाशिक 422308

**चित्रकार : गोपाळ नांदुरकर**

अवघड शब्दांचे अर्थ :
१. मुंघेर लागणे - मुंग्या लागणे
२.आगलदिवा- आकाशकंदील

**वाचूया**
**कथा - फुलांचे गाणे**
**लेखक - डॉ. यशवंत पाठक**



कविता

# मिळून मित्रा चालत जाऊ



प्रकाशाने धरा उजळते
सृष्टी खुलते चैतन्याने
दरीत झुळझुळते पाणी
डोंगर होती भरजरी बाहू!

अंगणभर उजेड होईल
दिवे एवढे मित्रा लाव
अंधाराला नकोच थारा
उजळलेले चेहरे पाहू!

झाडावरती पक्षी येतील
आनंदाने गाणे गातील
ज्यांचे जगणे आपल्यासाठी
आपणही झाडांना जगवू!

आयुष्याचे पुस्तक सुंदर
ज्ञान वहीच्या पानोपानी
सुविचार नि संस्कारांचा
अमूल्य ठेवा देऊ घेऊ!

हातामध्ये हात असावा
पावलांना साथ असावी
गाठण्यास ते शिखर यशाचे
मिळून मित्रा चालत जाऊ!

ऐकूया
कवी – रेणू पाचपोर
यांच्याच आवाजात
त्यांची दुसरी एक कविता


– **रेणू पाचपोर,** 'पाकळ्या', रचनानगर, परभणी 431 401

चित्रकार : राहुल देशपांडे



आनंदाला आले भरते, शिवारातले हिरवे पाते। डोळ्यांची ना लवे पापणी, मातीशी मग जडते नाते।।

वार्षिक प्रायोजक – • श्री. शशांक चांदोरकर, पुणे
• श्री. निखिल आपटे, पुणे



बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
न्यूनतम ब्याज दरें और ईएमआई
अपने होम लोन को
बैंक ऑफ बडौदा में स्विच करें
बड़ौदा
होम लोन
1YR MCCR
• पात्रता की उच्चतम राशि
• 30 वर्ष तक की लंबी चुकौती अवधि
• नि:शुल्क व्यक्तिगत दुर्घटना बीमा
• बाधा रहित टॉपअप लोन की सुविधा
बड़ौदा
कार लोन
1YR MCCR+.50%
• पात्रता की उच्चतम राशि
• 7 वर्ष तक की लंबी चुकौती अवधि
• ऑन रोड लागत का 95% तक वित्तपोषण
शर्तें लागू*
बड़ौदा
मोरगेज लोन
1YR MCCR+1.20%
• पात्रता प्रोपर्टी के रिलाईजेबल
• वैल्यू का ६० प्रतिशत
• व्यक्तिगत /व्यवसाय उपयोग हेतू
पि. व्हि. सिंधू
ऑलिंपिक रजत पदक विजेता
व्यापार
के लिए लोन
1YR MCCR+1.75%
• नये व्यवसाय की शुरुवात
• वर्तमान इकाई के नवीनीकरण
• व्यावसायिक विस्तार के लिए
Open Instant Saving Bank Account
with us by TAB Banking
Home Loan linked with
Saving Bank (SB) Account
Baroda
HOME LOAN
ADVANTAGE
Your interest
on Home Loan
comes down
When your
Savings go up
Open Instant Saving Bank Account with us by TAB Banking
RAILWAY LINES, SOLAPUR
GARDAS VINAYAK
MOB : 95189 78209
Ph : 0217 - 2314499
दीपावली की
हार्दिक
शुभकामनाएँ।
बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

# आम्ही सारेच आंबट !

– डॉ. कांचनगंगा गंधे,



चिंचा, कैऱ्या, आवळे, लिंबू, बोरं, चन्यामन्या, करवंद, स्टारफ्रूट, आलुबुखार, जांभूळ, द्राक्षं, ओले जर्दाळू, आमसूल अशी नुसती नावं घेतली तरी तोंडाला पाणी सुटतं! हे सारे आंबट चवीचे! प्रत्येकाचा आंबटपणा वेगळा; पण मूळ चव आंबटच! एक तुकडा जरी दाताखाली आला तरी तोंड आंबट होणार! अगदी *सेल्फी* काढण्यायोग्य!

खरं तर फळ म्हटलं की, त्यात *सुक्रोज, फ्रक्टोजसारख्या 'शुगर्स'* असणारच. तरीही फळं इतकी आंबट का? फळं कच्ची असताना ती तुरट, आंबट असणार, हे आपण समजू शकतो. पण ही फळं पिकल्यावरही आंबटच? शिवाय प्रत्येक प्रकारच्या, प्रत्येक जातीतल्या फळातला आंबटपणा वेगळा, स्वत:ची वेगळी ओळख सांगणारा!

गोड फळं आणि आम्लधर्मीय (आंबट) फळं नक्की आपलं वैशिष्ट्य कसं जपतात? फळांमध्ये *'शुगर्स'बरोबर* काही आम्लं *(ॲसिड्स)* असतातच. या आम्लात आंबटपणा असतो. काही फळं कच्ची असताना आंबट लागतात (उदाहरणार्थ कैरी); पण ती जेव्हा पक्व व्हायला लागतात, तेव्हा त्यात *'शुगर्स'*चं प्रमाण वाढतं आणि आम्लाचं प्रमाण कमी होतं काही फळांमध्ये आम्ल पूर्ण जातं, त्याचं विघटन होतं (उदाहरणार्थ आंबा). काही फळांमध्ये आम्लांचं *(ॲसिड्स)* प्रमाण जास्त असतं व फळे पिकल्यावर या आम्लांचे प्रमाण वाढतं आणि त्यामानाने 'शुगर्स' अगदीच कमी प्रमाणात तयार होतात. त्यामुळे ही फळं कच्ची असली तरी आणि पक्व झाल्यानंतर देखील आंबटच लागतात. अशा फळांना 'आम्लधर्मीय फळं' म्हणतात. या फळांत मुख्यत्वेकरून *'सिट्रीक ॲसिड', 'मॅलिक ॲसिड', 'टारटारिक ॲसिड', 'ॲस्कॉरबिक ॲसिड'* असतात. प्रत्येक प्रकारच्या फळांमध्ये या *ॲसिड्सचं* प्रमाण वेगवेगळे आणि कमीजास्त असतं, यावरच त्या त्या प्रकारच्या फळांचा 'आंबटपणा' अवलंबून असतो. शिवाय त्यात हायड्रोजन विद्युत भारीत कणांचे (हायड्रोजन आयॉन $H^+$) प्रमाणही जास्त असते. ही सर्व *ॲसिड्स* सौम्य आम्लं (weak acids) असली, तरी त्यांची चव आंबट असते. फळ पक्व होत असताना, या आम्लांच्या मूळ गुणधर्मांमध्ये फारसा बदल होत नाही. त्यामुळे त्यांचा 'आंबटपणा' टिकून राहातो किंवा वाढतोही.

कागदी लिंबू, ईडलिंबू, संत्री, मोसंबी या सर्व लिंबूवर्गीय फळांमध्ये सर्वात जास्त आंबट कागदी लिंबू आहे; कारण त्यात *'सिट्रीक ॲसिड'*चे प्रमाण भरपूर आहे. लिंबू कापल्यावर रसानी गच्च भरलेले लांब धागे (पेशी) दिसतात. या पेशींमध्ये पोकळ्या (Vacuoles) असतात.



शास्त्रांचा अभ्यास हवा । परी मानव्याचा ध्यास हवा ।।
वार्षिक प्रायोजक – • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे
• श्री. सचिन उल्हास गाडगीळ, पुणे

$Cit\ PH_1$ आणि $Cit\ PH_5$ विकरांच्या साहाय्याने *हायड्रोजन आयॉन्स* भरले जातात. आणि त्यात *सिट्रीक ॲसिड* तयार होऊन लिंबू आंबट होते. लिंबाच्या सालीत आणि काही प्रमाणात लिंबाच्या रसात *'मॅलिक ॲसिड'* असल्यामुळे चव थोडी कडसर होते. म्हणूनच लिंबू जास्त जोरात पिळलं की, रस कडसर होतो. शिवाय यात *'ॲस्कॉरबिक ॲसिड'* अत्यल्प प्रमाणात असते, तरीसुद्धा लिंबाची चव बदलते. ईडलिंबूमध्ये *सिट्रीक ॲसिड* व *मॅलिक ॲसिड* यांचे प्रमाण बहुतांशी सारखे असल्यामुळे ईडलिंबू आंबट व कडसर (विशेषत: जाड साल) लागते.

मोसंबी, संत्री त्यामानानं गोड लागतात; कारण त्यात *सिट्रीक ॲसिडपेक्षा सुक्रोज, फ्रक्टोज, ग्लुकोज* अशा *'शुगर्स'*चे प्रमाण जास्त असतं. ह्यात *ॲस्कॉरबिक ॲसिड* ही असतं, पण लिंबापेक्षा त्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे मोसंबी, संत्री यांची चव लिंबापेक्षा वेगळी असते.

*ॲस्कॉरबिक ॲसिड* हे सौम्य आम्ल सर्वात जास्त आवळ्यात असते. ह्या *ॲसिडमध्ये 'व्हिटॅमिन सी'* भरपूर प्रमाणात असल्यामुळे हे *ॲसिड 'व्हिटमिन सी'* ह्या नावानं पण ओळखलं जातं. या *ॲसिडमुळेच* आवळ्याला विशिष्ट चव व आंबटपणा असतो. आवळ्यात असलेल्या *'गॅलिक ॲसिड'मुळे* आवळा थोडा 'गोडसर' लागतो; पण *'इलॅगीटॅनीन'मुळे* तो कडसर-तुरट होतो. आवळा खाऊन वर पाणी प्यायल्यावर पाणी गोड लागतं. आवळ्यातल्या *व्हिटॅमिन सी (ॲस्कॉरबिक ॲसिड)* आणि *सुक्रोज, फ्रक्टोज* व *ग्लुकोज* या *शुगर्सची 'मॉलिक्युलर जॉमेट्री'* (Molecular Geometry) सारखी आहे. *ॲस्कॉरबिक ॲसिड* पाण्यात विरघळते. आवळा खाल्ला की, त्यातलं *ॲसिड* जीभेवरच्या लाळेत व पाण्याच्या घोटात विरघळतं. जीभेवर चवीचे ज्ञान असणाऱ्या रूचिकलिकांवर आवळ्यातले क्षार व *पॉलिफेनॉल्सचं* आवरण चढतं, त्यामुळे तिथली चवीची संवेदनशीलता तात्पुरती कमी होते. आवळा तुरट, कडसर लागतो. जीभेवरच्या लाळेमुळे आणि पाण्यामुळे, हे आवरण निघून जातं, जीभ पूर्ववत होते आणि *ॲस्कॉरबिक ॲसिडची* गोड चव जीभेला कळते.

कच्च्या कैरीत *'ऑक्झॅलिक ॲसिड'* या सौम्य आम्लाचं प्रमाण जास्त असल्यामुळे ती तुरट लागते, घसाही खवखवतो. *सिट्रीक ॲसिडचे* प्रमाण वाढायला लागले की, कैरी आंबट लागते. *सिट्रीक ॲसिडचं* प्रमाण वाढलं की, 'तयार' कैरी आंबट ढसाण लागते. कैरी पक्व झाली की, मात्र गोड लागते. कारण त्यातल्या सर्व *ॲसिड्सचे* प्रमाण कमी होऊन *फ्रक्टोज, सुक्रोजचं* प्रमाण वाढतं, त्यामुळे 'आंबा' गोड लागतो. पण त्याचवेळेसे *'सक्सिनिक'* व *'मॅलिक' ॲसिड्स* तयार होतात आणि आंब्याला वेगळी चव येते.

चिंचेची कोवळी पानं, फुलं आणि फळं (चिंचेचा आकडा) आंबट लागतात, ती त्यांच्यात असलेल्या *'टारटारिक' ॲसिडमुळे!* चिंचेचा आकडा हिरवागार असताना या *ॲसिडचे* प्रमाण जास्त असल्यामुळे तो आंबट लागतो, जीभही थोडी चुरचुरते! गाभुळलेली चिंच मात्र गोडसर-आंबट लागते. *टारटारिक ॲसिडचे* प्रमाण थोडे कमी होते आणि अल्प प्रमाणात 'शुगर्स' तयार होतात. हे *ॲसिड* व *शुगर्स* ही पाण्यात विरघळतात; पण चिंच खाऊन पाणी प्यायल्यावर 'गोड' लागत नाही; कारण *'टारटारिक' ॲसिड* आणि *शुगर्सची 'मॉलिक्युलर जॉमेट्री'* सारखी नाही.

*'स्टार फ्रुट'* म्हणजे 'कॅरमबोला' हे फळ म्हणजे 'आंबटपणाचा कळस' आहे. ह्यात


भेट द्या : राष्ट्रीय रेल्वे संग्रहालय, नवी दिल्ली - वाफेवर चालणारी रेल्वे इंजिन्स आणि दुर्मिळ छायाचित्रे
वार्षिक प्रायोजक - • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे
• श्री. हृषिकेश कुलकर्णी, पुणे

*'ऑक्झॅलिक' ॲसिडचे* प्रमाण प्रचंड आहे. सफरचंद, पेर, द्राक्षं आणि लिंबू वर्गीय सर्व फळांची 'एकत्र चव' जशी लागेल तशी चव ह्या *'स्टार फ्रुट'ची* लागते.

'अननस' आणि 'किवी' फळं 'आम्लधर्मीय' फळं म्हणून ओळखली जातात, ती त्यांच्यात असलेल्या *'ॲस्कॉरबिक' ॲसिडमुळे!* पण ही फळं खाल्ली की, जीभ मात्र बराच काळ चुरचुरत राहाते. ती त्यांच्यात असलेल्या *'ब्रोमेलिन'* या विशिष्ट विकरामुळे (Enzyme)! अननस आणि किवी ही फळं दुधात घातली तर कडसर लागतात.

बोरं चवीला आंबट गोड क्वचित तुरटही लागतात. कच्च्या बोरात *'ॲस्कॉर्बिक ॲसिड'चे* प्रमाण जास्त आहे; पण आवळ्याच्या तुलनेत कमीच आहे. शिवाय त्यात असलेल्या *'ज्युज्युबोसाईड'* व *'लिनोलेईक' ॲसिडमुळे* बोराला स्वत:ची वेगळी चव असते. त्याच्याच जातीतल्या लाल, बारीक 'चन्यामन्या' बोराची चव त्यांच्यात असलेल्या *'फेनॉलिक' ॲसिडमुळे* मात्र वेगळी लागते.

करवंदामध्येही *ऑक्झॅलिक* व *सिट्रीक ॲसिड्स* अल्प प्रमाणात असतात, त्यामुळे ती आंबट लागत असली, तरी त्यात असलेल्या *टर्पिनॉइड्स* आणि क्षारामुळे ती गोड लागतात आणि *फेनॉलिक* पदार्थांमुळे तुरटही लागतात.

स्ट्रॉबेरी, रासबेरी, गुजबेरी या फळात *सिट्रीक ॲसिड* व *शुगर्सचे* प्रमाण जवळजवळ सारखे असल्यामुळे ही फळं आंबटगोड लागतात. क्रॅनबेरी ही आंबटगोड लागते; पण तिची चव वेगळी, किंचित चुरचुरणारी लागते कारण तिच्यात *सिट्रीक ॲसिड* ऐवजी *'बेन्झोईक' ॲसिडचे* प्रमाण जास्त असते.

*मॅलिक ॲसिड* हे सौम्य आम्ल मुख्यत्वेकरून सफरचंदामध्ये सापडते. तरीही सफरचंद आम्लधर्मीय फळ नाही. सफरचंदाच्या प्रत्येक जातीत या आम्लाचे प्रमाण कमी-अधिक असल्यामुळे त्यांच्या चवीत फरक जाणवतो. *'ड्रॅगन'फ्रुटमध्ये* सुद्धा मॅलिक ॲसिड असलं, तरी त्याच्या गरातले इतर घटक सफरचंदातल्या गरापेक्षा अगदीच वेगळे असतात.

कोकणचं वैशिष्ट्य असलेलं 'कोकम' (आमसूल) ह्याची चव सर्वच फळांपेक्षा वेगळी, पण थोडी लिंबाची आठवण करून देणारी! ह्यात *'हायड्रॉक्सी सिट्रीक ॲसिड'* हे *सिट्रीक ॲसिडचे 'डेरिव्हेटीव्ह' (Derivative)* आहे. कोकमाची आणि आमसूल (वाळवलेले व बिया काढलेले कोकम) यांची चव आंबट, उन्हाळ्यात हवीहवीशी वाटणारी, उत्साहवर्धक, चुरचुरणारी पण गोडसर लागते.

विशिष्ट ऋतूत विशिष्ट फळं येतात. प्रत्येक ऋतूत येणारी काही फळं खाताना ती कच्ची असताना खायला सुरूवात करा. ती फळाच्या कोणत्या अवस्थेत असताना आंबट, जास्त आंबट व आंबटढसाण लागतात ते नक्की चाखून पाहा. आणि हो प्रत्येक वेळेस *'सेल्फी'* काढायला विसरू नका. कोणता *'सेल्फी'* जास्त 'आंबट' आलाय, ते ही अवश्य पाहा.

**– डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७, लोकमान्यनगर, पुणे 411030

**पाहूया
जगभरातल्या आंबट
चेहऱ्यांच्या बालमुद्रा!**



संकल्प सिद्धी फार दूर नसतात। प्रयत्नांचे सदैव मोल मागीत असतात।।

वार्षिक प्रायोजक – • श्री. सतीशचंद्र गोरे, पुणे
• चि. अखिलेश संतोष काकडे,पुणे

# कार्डबोर्डच्या खोक्याचा तरंग दिवा



**साहित्य :** साधारण १० × १० × १५ सेमी. मापाचं *कार्डबोर्डचं* एक खोकं. (मी *मिल्टनच्या* बाटलीचं खोकं कापून वापरलं आहे. त्याच मापाने इथे लिहिते आहे. तुम्ही वेगळ्या मापाचं खोकं वापरू शकाल.)

*कटर*, पतंगाचा कागद, *बटर पेपर*, *फेव्हिकॉल*, दोरा, जाड *करोगेटेड* पुठ्ठा, (जुन्या खोक्याचा वापरावा) काळ्या रंगाचा *मार्कर पेन*, *हायलायटर पेन*, रंगीत कागद, रंगीत मणी, लोकरीचे तयार गोंडे, भोके पाडण्यासाठी कर्कटक / जाड सुई / दाभण

**कृती :** • आपल्याला हव्या त्या आकाराचे खोके घेऊन त्याचा तळ कापून घ्यावा.

आता त्याच्या चारही बाजूंच्या कडांपासून आतल्या बाजूला साधारण १.५ सेमी. चौकटी आखून घ्याव्यात.

- या आखलेल्या चौकटी कापून घ्या. चारही बाजूंच्या चौकटी कापल्यावर आपल्याकडे मधे रिकामा चौकोन असलेला एक सांगाडा उरेल.
- आता या बाजू काळ्या रंगाने रंगवून घ्या आणि सुकायला ठेवा. यासाठी काळे *मार्कर पेन* वापरा.
- आपल्या खोक्याच्या लांबी, रुंदीच्या आकाराचे पतंगाच्या कागदाचे व *बटर पेपरचे* तुकडे कापून घ्या.
- एका ताटलीत थोडे *फेव्हिकॉल* काढून घ्या आणि त्यात पुडीचा दोरा भिजवा.
- आता हा दोरा कागदावर वरून खाली सोडत सोडत चिकटवा. त्याचे आकार जसे येतील तसे मुक्तपणे येऊ दया. हे कागद वाळू द्या.
- कागद वाळल्यावर हायलायटर पेन, स्केच पेन यांच्या साहाय्याने दोऱ्यांनी केलेल्या आकारांच्या मध्ये आवडीप्रमाणे रंग भरा.
- आता हे कागद आपल्या खोक्याच्या चौकटींच्या आतून व्यवस्थित चिकटवून घ्या.
- आपल्या खोक्याच्या आकारापेक्षा मोठे चौकोन दुसऱ्या जाड खोक्यातून कापून घ्या.
- या चौकोनांच्या मधोमध आपले खोके घट्ट बसेल अशी चौकट कापून घ्या.
- दोन्ही चौकटी एकमेकांवर चिकटवून घ्या. या चौकटींवर रंगीत कागद चिकटवा. चौकट रंगवा.
- आता आपले तयार खोके या चौकटीत बसवा. ते घट्ट बसते. आतून थोडे *फेव्हिकॉल* लावून बसवलं तर ते अजिबात निघणार नाही.
- आता खोक्याच्या वरच्या झाकणाच्या मध्यभागी एक मोठा गोल कापून घ्या. इथून आत लाईट सोडता येईल. तसेच दोन बाजूला छोटी भोके करून अडकवण्यासाठी दोरी बांधा.
- खोक्याच्या खालच्या चौकटीवर चारही कोपऱ्यात भोक पाडा.
- यातून दोरा ओवून खालच्या बाजूला गोंडे लावा.आता आपल्या खोक्याचा मस्त तरंग दिवा (आकाशदिवा) तयार झाला.

याचा उपयोग लँपशेड म्हणून कसा करता येईल?.... विचार करा.

वेगवेगळ्या आकारांच्या खोक्यांमधून अशी वेगवेगळ्या कलाकृती बनवा.

**– वीणा लिमये**
१७ सीमानगर सोसा., अप्पर इंदिरानगर, पुणे – ४६

**पाहूया**
**कागदापासून तयार केलेल्या**
**कल्पक कलाकृती**

**भेट द्या : गोवा विज्ञान केंद्र**, पणजी, गोवा (डिजिटल तारांगण, ३ डी फिल्म शो, विज्ञान चित्रपटाचा खेळ इ.)
**वार्षिक प्रायोजक –• श्री. अमित बागाईतकर, पुणे**

# ज्ञानोपासक लोकमान्य टिळक

– डॉ. वर्षा तोडमल



मित्रांनो, लोकमान्य टिळकांच्या शालेय जीवनातील शेंगांच्या टरफलांची घटना, गणित फळ्यावर लिहून हात खराब करून घेण्यापेक्षा गणित तोंडी सोडवण्याचा उपाय, संत हा शब्द सन्त, संत किंवा सन्‌त अशा तीन पद्धतीने लिहिला तर बिघडते कुठे? असा शिक्षकांना केलेला खडा सवाल. या सगळ्या गोष्टी तुम्हाला माहीत असतील. त्यांचे राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाविषयी तुम्ही ऐकले असेल. त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा वेध थोडक्या शब्दांत घेणं अवघडच! म्हणून येथे त्यांच्या एका पैलूचा परिचय आपण करून घेऊया. तो म्हणजे त्यांची अफाट स्मरणशक्ती आणि अखंड ज्ञानोपासना! लोकमान्य टिळकांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त हे पुण्यस्मरण!

लोकमान्य टिळकांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाच्या दिवशी सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरून जामीन भरण्याची नोटीस बजावली. त्यावेळी लोकमान्य त्यांच्या मित्रांना म्हणाले, ''माझ्या मनात असलेली पुस्तके आता तुरुंगात लिहून पुरी करता येतील.''

१९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली आणि त्यांना ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात पाठविण्यात आले. तिथे त्यांना स्वयंपाक करून देणाऱ्या आचाऱ्याचे नाव वासुदेव होते. ते कैदी होते. सतत चिंतनात असणाऱ्या टिळकांना एकदा वासुदेवाने विचारले, ''आपण एकसारखा इतका कसला विचार करता?'' टिळक हसतच म्हणाले, ''अरे, माणसाच्या डोक्यात ब्रह्मदेवाची सारी सृष्टी मावते आणि त्याची तेथे घडामोड चालू असते.''...एकदा ते सहज म्हणाले, ''मी शाळेतला विद्यार्थी आहे. ही तुरुंगाची माडी म्हणजे माझी शाळा, पुस्तके म्हणजे माझे मास्तर. येथे मी जर्मन, फ्रेंच, पाली, संस्कृत आणि दुसऱ्याही काही भाषांचा अभ्यास करत असतो...''

टिळकांच्या आयुष्यातून काही घटना व लेखन वजा करता येईल; पण गीतारहस्याशिवाय अपूर्णताच राहील. गीतारहस्य लिहिण्यापूर्वी काही फ्रेंच व जर्मन तत्त्वज्ञांचे ग्रंथ त्यांनी मुळातून वाचले. त्यासाठी पुस्तकांच्या साहाय्याने ते



सहज मिळे त्यात, जीव तृप्तता न पावे। जे असाध्य, जे सुदूर तेथे मन धावे।।

वार्षिक प्रायोजक – • श्री. अंबरीश देशमुख, पुणे
• श्री. रवींद्र पालेकर, पुणे

फ्रेंच व जर्मन भाषा २० × १२ फूट तुरुंगाच्या खोलीत शिकले. *ओरायन* आणि *'आर्क्टिक होम इन द वेदाज्'* या दोन ग्रंथांमध्ये टिळकांच्या बुद्धिमत्तेची अफाट झेप दिसून येते.

सुप्रसिद्ध कवी यशवंत यांनी एका कवितेत जणू टिळकांचेच मनोगत व्यक्त केले आहे...

**वाढू दे कारागृहाच्या भिंतींची उंची किती,**
**मन्मना नाही क्षिती ।**
**भिंतींच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडूनी?**
**मुक्त तो रात्रंदिनी ।।**

टिळकांनी याच कारावासात ज्ञानोपासना चालू ठेवून कर्मयोगाची शिकवण देणारा 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. अत्यंत निकृष्ट अन्न आणि कुबट वातावरणातील मंडालेच्या तुरुंगातील ते दिवस होते. १९१४ मध्ये टिळक सुटून आल्यावर मागाहून येणाऱ्या त्यांच्या सामानसुमानात गीतारहस्याचे हस्तलिखित होते. सरकारने ते तपासणीसाठी ठेवून घेतले. बरेच दिवस झाले तरी ते परत आले नाही, तेव्हा त्यांच्या मित्रांना चिंता वाटू लागली; परंतु टिळक म्हणाले, ''वह्या सरकारच्या ताब्यात असल्या तरी ग्रंथ माझ्या डोक्यात आहे. हस्तलिखित परत न आल्यास सिंहगडाच्या एकान्तात चार महिने राहून मी तो ग्रंथ पुन्हा लिहून काढीन.''

मित्रांनो, इथे आपला मेंदू आपण समजतो त्यापेक्षा निदान दहापटीने तरी अधिक कार्यक्षम व प्रभावी आहे हे लक्षात येईल. मेंदू हा एक महाकाय यंत्रासारखा आहे. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार मेंदूची क्षमता अफाट असून आपण मात्र त्याचा १०० टक्के वापर करून घेत नाही असे लक्षात आले आहे. दैनंदिन जीवनात चित्त ताळ्यावर ठेवून वागलं तरी असं लक्षात येईल की, आपल्याला बऱ्याच गोष्टी लक्षात राहतात. मन स्थिर ठेवता आलं, तर बाकी चाललेल्या कलकलीकडे लक्ष न जाता आहे ते काम माणूस नीट पार पाडू शकतो, तेच टिळकांनी केलं.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित शिकविताना टिळक रंगून जात. बायनॉमिअल थिअरम्मधील काही भाग ते तोंडीच सांगत; त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांची त्रेधा उडत असे. त्या वेळी फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ल. रा. पांगारकर होते. पांगारकर यांना साहित्याची विशेष आवड होती; पण गणित मात्र नीट येत नसे.

पांगारकर विद्यार्थी असतानाच भाषणे करीत. एका भाषणात ते म्हणाले, ''रसिक माणसे साहित्य, काव्य यांचा अभ्यास करतात आणि रूक्ष माणसे गणित-शास्त्र या विषयांकडे वळतात.''

टिळकांना हे समजल्यावर त्यांनी पांगारकर यांना बोलावून, ''तू असं बोललास का?'' असं विचारलं. पांगारकरांनी 'हो' म्हटल्यावर टिळक म्हणाले, ''गणितात काव्य असते आणि काव्यात गणित असते; पण ते समजायला बुद्धीची झेप असावी लागते.'' हे सांगताना टिळकांनी उच्च गणित, ग्रहांची गती यांचा अभ्यास करताना सौंदर्याचा साक्षात्कार घडू शकतो, असं सांगितलं आणि ते म्हणाले, ''गणितामुळे विचारांची साखळी सलग होते. ज्याला गणिताची गोडी नाही त्याची विचारसरणी सदोष राहते.'' काव्यात गणित कसे असते हे सांगताना मेघदूताच्या एका श्लोकातून दुसरा कसा निघतो हे दाखवून टिळक म्हणाले की, खऱ्या प्रतिभावान ग्रंथकारांच्या विचारांचा ओघ अस्खलित असतो; त्यामुळे त्याच्याशी एकरूप झाल्यावर तो पुढे काय सांगणार ते रसिकाला कळू शकते.



टिळक हे गणिती होते; त्यामुळे त्यांच्या विचारात कधी सैलपणा आला नाही की, पाल्हाळीकता नाही. तर्कसंगती कधी शिथिल झाली नाही.

टिळकांच्या कुशाग्र बुद्धीचा आणि स्वतंत्र पद्धतीने गणिताचा अभ्यास करण्याच्या सवयीचा असा प्रत्यय प्रा. छत्रे यांनाही आला होता. म्हणूनच तर भोवतालच्या विद्यार्थ्यांना ते म्हणाले होते, 'हा टिळक म्हणजे सूर्याचे पिल्लू आहे!'

या सर्व गोष्टींवरून लोकमान्य टिळकांचे मन ज्ञानोपासनेत कसे तल्लीन होत असे, याची कल्पना येते. अज्ञात क्षेत्रात संचार करण्याचे जबरदस्त आकर्षण त्यांच्या बुद्धीला होते. लोकमान्यांना आपल्या या बुद्धीसामर्थ्याची पुरेपूर जाणीव होती. तरीही त्यांनी ती संशोधनाची ऊर्मी दाबून ठेवली आणि स्वराज्य मिळवण्याच्या कार्याला जीवन समर्पण केले. याचे कारण ज्ञानाबद्दल कितीही प्रबळ आकर्षण वाटले तरी भारताच्या परतंत्र अवस्थेत ज्ञानसाधनेत गुंतून पडणे योग्य नाही, अशी टिळकांची मनोमन खात्री पटली होती. 'ज्ञान की कर्म' या त्यांच्या मनातील द्वंद्वात अखेर 'ज्ञानपूर्ण कर्म' हा सुवर्णमध्य त्यांनी साधला.

सुधीर मोघे लिहितात–

**'सह्याद्रीच्या खड्या कड्यासम**
**ताठ धीट छाती**
**लाख रवींची आग**
**तिच्यातून साठविली होती**
**तेजाचा लसलसता अंकुर काळजात होता**
**जगावेगळा होता हा तर जनतेचा नेता**
**नररूपे अवतरलेला तो पुरुषसिंह होता!!'**

भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार 'गीतारहस्या'च्या रूपात भगवद्गीतेवर आधुनिक पद्धतीने भाष्य करणाऱ्या लोकमान्य टिळकांचे हे पुण्यस्मरण!!

**– डॉ. वर्षा तोडमल**
द्वारा तोडमल नर्सिंग होम, ३९७ अ, संचय,
सोमवार पेठ, पुणे 411001

**पाहूया**
**लोकमान्य टिळकांविषयीची**
**माहिती देणारी चित्रफीत**

*Happy Diwali*
**IDEAL GAS SPRINGS PVT. LTD.**
Plot No. E-3/3, Old MIDC, Satara, Cotact-02162 244294
Email-igspl@sancharnet.in response@idealgassprings.com



साऱ्याच समस्यांना, मी झेलणार आहे।
लढ्यात स्वातंत्र्याच्या, मी जिंकणार आहे।।

Don't lower your goals
to the level of your abilities.
Instead, raise your abilities
to the heights of your goal!

**AMG Corporation**

**Office No. 33, Tapaswi Plaza,**
**Opp. Greaves Ltd.,**
**Chinchwad, Pune-19**

**Happy Diwali**

Lakhani SHOES

**M/s. AKASH TRADERS**
**Distributors : Lakhani**
**Think Positive. It's Possible.**

**Atmanagar co-op. Housing Society,**
**Shop No. 17, Survey No. 157/B/1-A-2,**
**Kharlwadi, Pimpri, Pune-18**
**Ph.: 020 27422479, Mob.: 9822453922**

आली माझ्या घरी
ही दिवाळी...

**आमच्या सर्व ठेवीदार, ग्राहक आणि हितचिंतक यांना**
**दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

इंडियन बैंक
Indian Bank

# आजची ज्ञान प्रबोधिनी

## शके १९४१ (इ. स. २०१९)

**केंद्रे** – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी **उपकेंद्रे** – शिवापूर, वेल्हे, शिरवळ, साळुंब्रे
**विस्तार केंद्रे** – अंबाजोगाई, डोंबिवली, बोरीवली **उपक्रम केंद्रे** – आंबवणे, चिखली (जि. पुणे)
**कार्यक्षेत्रे** – शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता

### १. शिक्षण

१. **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**संकेतस्थळ :** prashala.jnanaprabodhini.org

२. **ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल)
**संकेतस्थळ :** jnanaprabodhininigadi.org

३. **ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

४. **शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

५. **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** (माध्यमिक, सहनिवास)

६. **ज्ञान प्रबोधिनी, हराळी** (माध्यमिक, सहनिवास)
**संकेतस्थळ :** jpharali.org

७. **कृषितंत्र पदविका विद्यालय, हराळी**

८. **शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे**
(बुद्धिमत्ता संवर्धन, शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साधन केंद्र)
**संकेतस्थळ :** erc-pune.org

९. **छात्र प्रबोधन, पुणे** (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
**संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org

१०. **पूरक शिक्षण प्रकल्प – पुणे, डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, हराळी**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

### २. संशोधन

१. **प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे**
(संशोधन, प्रशिक्षण, बुद्धीमापन, संवर्धन, समुपदेशन)
**संकेतस्थळ :** jpip.org

२. **संस्कृत संस्कृती संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, व्याख्याने, अभ्यासगट)
**संकेतस्थळ :** santrika.org

### ३. ग्रामविकसन

१. **नैसर्गिक संसाधने – गुंजवणी खोरे, हराळी**
(पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

२. **स्त्री शक्ती प्रबोधन–शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी–युवती–महिला विकास, स्वयंरोजगार)

३. **तांत्रिक प्रशिक्षण केंद्र – शिवापूर, साळुंब्रे**

४. **सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

### ४. आरोग्य

१. **दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**
**संकेतस्थळ :** dmhospital.org

२. **नेत्र रुग्णालय, शिरवळ**

### ५. नेतृत्व संवर्धन

१. **युवक विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**

२. **युवती विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**

३. **नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे** (प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)

४. **स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

### ६. स्त्री शक्ती प्रबोधन

**संवादिनी – पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर**
(समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम इ.)

### ७. राष्ट्रीय एकात्मता

१. **नागरी वस्ती अभ्यास व सल्ला मार्गदर्शन केंद्र, पुणे**

२. **ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)

३. **ज्ञानसेतू प्रकल्प**
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू आणि काश्मिर)

### ८. सामाजिक उद्योजकता

१. **उद्योजकता विकास कक्ष, पुणे**

**मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०** ☎ ०२०–२४२०७००० **संकेतस्थळ :** jnanaprabodhini.org




प्रेमाचे, मैत्रीचे दीप नवे लावूया। आश्वासक नात्यांचे बंध पुन्हा जोडूया।।
वार्षिक प्रायोजक – • श्री. उदय परांजपे, पुणे
• श्री. धनंजय गोखले, पुणे

# सर्वात आंबट 'आम्लधर्मीय' फळ कसे ओळखाल?

**साहित्य :** लिंबू, संत्र, मोसंब, चिंच, स्टार फ्रुट, आवळा, इत्यादी गटींग पेपर, वाट्या, रंगीत जांभळा कोबी, मिक्सर, ग्राफ पेपर, पेन्सिल, पट्टी, सेकंदाचे घड्याळ इ.

**कृती :** प्रत्येक फळाचा गर (पाणी थोडे घाला) तयार करून वेगवेगळ्या भांड्यात ठेवा. लिटमस पेपर घ्या किंवा तुम्ही घरी करा. रंगीत कोबीची पानं काढून ती पाण्यात उकळा. किंवा पानं *मिक्सरमध्ये* घालून बारीक करा. नंतर ते एका भांड्यात काढून त्यावर गरम पाणी ओता. थोडा वेळ थांबा. पाणी जांभळे झाल्यानंतर ते कोमट होऊ द्या. एक ब्लॉटिंग पेपर घेऊन त्यात बुडवून ठेवा. किंवा त्याच्या पट्ट्या करून त्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. नंतर वाळत घाला. पूर्ण वाळल्यावर तुमचा लिटमस पेपर तयार होईल. तो बरोबर झाला की नाही ते बघा. रंगीत कोबी पासून केलेला लिटमस पेपर लिंबाच्या रसात (आम्लधर्मीय) पिवळा होईल आणि साबणाच्या पाण्यात हिरवा होईल.

आपल्याला सर्वात आंबट फळ कोणते ते बघायचे आहे. त्यासाठी रंगीत कोबी पसून तयार केलेला लिटमस पेपर जास्त उपयोगी पडेल; कारण जांभळा पेपर पिवळा होईल. आता एकेका भांड्यातल्या रसात जांभळा लिटमस पेपर हळूहळू बुडवा. घड्याळात वेळ बघा. पेपर किती वेळात पिवळा होतो. ते बघा. वेळ नोंदवून ठेवा. पेपर पट्टी पूर्ण पिवळी होण्यासाठी किती वेळ लागतो, तेही लिहून ठेवा. सर्व फळांच्या रसासंबंधीचा, वेळेचा तक्ता तयार झाला की *ग्राफ पेपरवर एक्स* आणि *वाय ॲक्सिस* आखून घ्या. *एक्स ॲक्सिसवर* फळांची नावं लिहा आणि *वाय ॲक्सिसवर* वेळ (सेकंद, मिनिट) घ्या. तक्त्यामधले आकडे (किती वेळ लागला) घेऊन ते *ग्राफवर* योग्य ठिकाणी भरा. आणि बघा कोणते फळ सर्वात आंबट आहे ते. ज्या फळातल्या रसात *लिटमस पेपर* लवकर पिवळा होईल ते फळ सर्वात जास्त आम्लधर्मीय!!

**– डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७, लोकमान्यनगर, पुणे 411030

ज्योत चेतवू ज्योतीने अन् मन जिंकूया स्नेहाने
दीपावलीचा प्रकाश निर्मळ उजळू दे अवघी सदने

**टेक्नोफोरच्या सौजन्याने**



# मातृमंदिर विश्वस्त संस्था

**ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील मातृमंदिरापासून स्फूर्ती घेऊन, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे काही कार्य करावे अशा हेतूने काही तळमळीच्या नागरिकांनी १९८८ साली गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर मातृमंदिर विश्वस्त संस्था या न्यासाची स्थापना केली.**

## • कार्याचे स्वरूप •

राष्ट्रनिर्माणासाठी काही उत्पादक कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक केंद्रे, ग्रंथालये, गिरिजन आणि उपेक्षित घटकांसाठी काम करणाऱ्या संस्था अशा सर्वांना त्यांच्या कामासाठी माहिती, मार्गदर्शन, अर्थ वा वस्तू साहाय्य मिळवून देणे या स्वरूपाचे काम मातृमंदिर विश्वस्त संस्था करते.

प्रारंभी अकरा-बारा जणांनी स्वत:जवळची काही हजारांची रक्कम जमवून सुरू केलेल्या या संस्थेच्या कार्यावर प्रेम करणारे आणि तिला अर्थसाहाय्य करणारे शेकडो लोक आज या संस्थेशी जिवाभावाच्या नात्याने जोडले गेले आहेत. आपल्यालाही या कार्यात सहभागी होणे निश्चितच आनंदाचे वाटेल आणि मानसिक समाधानाचेही! अर्थात आपण कोणत्या कामासाठी साहाय्य करीत आहोत हे त्यापूर्वी आपण समजून घेतले तर आपल्या रकमेचा विनियोग एका अत्यंत उपयुक्त अशा प्रकल्पासाठी होत आहे याबद्दल आपल्याला विश्वास वाटेल.

## संस्थेतर्फे दिले जाणारे विविध पुरस्कार

- अध्यापकोत्तम पुरस्कार
- राधामाता पुरस्कार
- वेदाध्ययन पुरस्कार
- अन्नपूर्णा पुरस्कार
- संत साहित्य पुरस्कार
- तपस्वी विद्वत पुरस्कार
- गुरुगौरव पुरस्कार

## जरूर सहभाग घ्या

**संस्थेतर्फे गेली २६ वर्षे विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. स्पर्धेचे परीक्षण परीक्षक प्रत्यक्ष विद्यालयात येऊन करतात.**

### १. विद्यार्थी समूहगायन -

इयत्ता ५ वी ते १० वी च्या २०० किंवा त्याहून जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित.

### २. योगासने स्पर्धा -

१० मिनिटात ४ स्थितीमधील प्रत्येकी २ प्रमाणे ८ आसनांचे सादरीकरण अपेक्षित.

### ३. अध्यापकांचे समूहगायन -

सर्व विभागातील अधिकाधिक अध्यापकांचा सहभाग अपेक्षित.

**वरील तीन स्पर्धांची नावनोंदणी १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर, प्रत्यक्ष स्पर्धा जानेवारी महिन्यात**

### ४. अध्यापक व विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धा -

**दरवर्षी ऑगस्ट महिन्यात आयोजन.**

**संपर्कासाठी क्रमांक –** ९१५८५२०२०१, ९९७०६३३०००, ८८८८४३१८६८
**संपर्क –** शशिकला निवास, पेठ क्र. २५, निगडी प्राधिकरण, पुणे-४४
(संस्थेला दिलेल्या देणग्या आयकर धारा- 80G सवलतीस पात्र आहेत.)

**TEAM NBC .. together everyone achieves miracles**

*We are specialized in*
*Residential projects, Commercial Projects,*
*Institutional Projects*
*Interior designers & Turnkey Projects*
*landscape & Infrastructure Development Projects*

**NBC**

**NARENDRA BAKALE**
**Constructions**
Let's Make The World Happy

❖ BAKALE Group ❖ Narendra Bakale construtions ❖ R-EVOLUTION
❖ Shubhankar Enterprises ❖ G 9 Entertainment

1, Phulebaug, Opp BSNL Office, Shahu Collage Road, Parvati, Pune 411009
Tel:020-24421450, Fax-020-24420214, 9010 92848 Email::nbc@bakalegroup.com, www.bakle group.com






कथा

# समशेर सोडवतो घोड्याचं रहस्य

– भारत सासणे

**१/ 'काय झालं?'**

रागावलेला, थोडासा रुसलेला तो पोलीस अधिकारी सुनंदाताईच्या मामांच्या घरी पोहोचला, तेव्हा तिथे सगळे हजर होते. फक्त आपला समशेर कुलूपघरे मात्र तिथे नव्हता. समशेर बुद्धिबळ स्पर्धेमध्ये भाग घ्यायला गेला होता. आणि तिथून तो थेट सुनंदाताईकडे येणार होता. बाकीचे सगळे वाट पाहत थांबले होते. म्हणजे कोण कोण? सुनंदाताई, तिचे मामा, यांच्या बरोबरीने हरी, भिमू-शक्तिमान, लीला, पिंकी, गंपू व त्याचा कुत्रा,

We specialize in providing manufacturing services where functional and process challenges are evident. We mainly cater to the customers needing high precision in manufacturing of components, sub-assemblies / assemblies often involving special processes.

SANTOOL
211/4, Navi Peth
Pune - 411 030
www.santool.co.in

We, are committed to achieving higher quality standards in manufacture and supply of engineering items/components/equipment as per customers' drawings and specifications by employing appropriate technology, ensuring customers' satisfaction every time.



Kirloskar
Enriching Lives
Enabling a Cleaner & Greener
Tomorrow!
Pumpsets
Power Tiller
Engines
Gensets
With best compliments from
KIRLOSKAR OIL ENGINES LIMITED
A Kirloskar Group Company
Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune 411 003, INDIA.
Tel.: +91 (20) 2581 0341. Fax: +91 (20) 2581 3208, 2581 0209.
Website: www.koel.co.in

निलेश, गोट्या, डॉली ही मंडळीसुद्धा तिथे जमलेली होती. म्हणजे सगळी *टीमच!* सगळे थोडेसे कोड्यात, थोडेसे चिंतेत पडून मोठमोठ्या डोळ्यांनी त्या पोलीस अधिकाऱ्याकडे पाहात होते. हा पोलीस अधिकारी समशेरची का चौकशी करतोय, याचं कोडं त्यांना काही सुटत नव्हतं. समशेरनं काही केलं तर नाही? त्यांच्या मनातला प्रश्न मामांनादेखील पडला होता, म्हणून त्यांनी उघडच विचारलं,

''अहो, पण समशेरनं केलं तरी काय? तुम्हाला तो कशासाठी पाहिजे आहे?''

''समशेर कुलूपघरे इथे येणार आहे ना? माझी त्याच्याशी भेट घडवा...''

''पण कशासाठी? हे बघा, मी वकील आहे आणि ही सगळी *गँग* तुम्हाला दिसते आहे ना, ती सगळी समशेरची आणि माझीसुद्धा मित्रमंडळी आहेत... आता वेळ नाही म्हणून, नाहीतर तुम्हाला 'राक्षसाच्या पावला'ची सगळी हकिकत सांगितली असती... पण ते जाऊ दे... तो लहान मुलगा आहे, हे लक्षात ठेवा... त्याच्याविरुद्ध काही

**आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान संशोधक डॉक्टर बुद्धिसागर अचानक नाहीसे झाले होते. 'शेरलॉक होम्स' प्रमाणे हुशार - समशेरच आपल्याला शोधू शकेल' हा त्यांचा विश्वास होता. त्यासाठी त्यांनी काही सूचना दिल्या होत्या.. 'दूध नको, आंबा हवा, वरचं गाव, बुद्धिबळाचा डाव, इक्यूस, ब्रूटस् नको...! वगैरे वगैरे... काय होता या सूचनांचा अर्थ? समशेरने त्या सूचनांचा अर्थ लावून डॉक्टर बुद्धिसागरना कसे शोधले? चला तर हे रहस्य शोधायला भारत सासणे यांच्या या रोमहर्षक कथा सफरीत!**

ॲक्शन घेण्यापूर्वी...''

''अहो, थांबा थांबा! मी काही *ॲक्शन* घेण्यासाठी आलो नाही... तो म्हणे 'शेरलॉक होम्स' आहे आणि आम्हाला त्याची मदत घ्यायची आहे...''

आता सगळ्यांचं *टेन्शन* कमी झालं. समशेरची मित्रमंडळी थोडं हसू लागली आणि तेवढ्यात समशेर येऊन पोहोचलाच. तो डाव जिंकला होता आणि आनंदात होता; पण सगळे असे बसून राहिलेले पाहून आणि विशेषतः त्या रागावलेल्या आणि रुसलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना पाहून तो एकदम थबकला आणि मोठ्यानं म्हणाला,

''काय झालं?''

## २/ समशेरची मदत पाहिजे!

काय झालं आहे ते पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या करारी आवाजात मोठ्यानं सांगितलं. ती हकिकत थोडक्यात अशी–

झालं होतं असं की, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान संशोधक डॉक्टर बुद्धिसागर अचानक नाहीसे झाले होते. ते लहरी आणि *'मॅड जिनियस'* आहेत, अशी त्यांची थोडी ख्याती होती. ते समशेरबरोबर बुद्धिबळ खेळत असत आणि त्याला मार्गदर्शनही करीत असत. म्हणजे ते समशेरचे गुरूच! नाहीसे होण्यापूर्वी त्यांनी त्यांच्या टेबलावर एक *टेपरेकॉर्डर* ठेवला होता. एक बुद्धिबळाचा डावही मांडून ठेवला होता. त्यांनी स्वत:च्या आवाजात एक संदेश *टेपरेकॉर्डरवर रेकॉर्ड* करून ठेवला होता. त्यात त्यांनी स्पष्टपणेच 'समशेरची मदत घ्यावी,' असं म्हटलेलं होतं; म्हणून हे पोलीस अधिकारी मोठ्या नाइलाजाने, थोडे रुसून


वार्षिक प्रायोजक – • श्री. गौरव मोडक, डोंबिवली
• एक हितचिंतक, पुणे

आणि थोडे रागावून समशेरची भेट घेण्यासाठी इथे आले होते.

''साहेब, पण बुद्धिसागर यांनी म्हटलंय तरी काय?''

''हे सगळं सांगत बसण्यापेक्षा तुम्हा सगळ्यांना तिथं नेलं पाहिजे, अशी मला सबइन्स्पेक्टर नंदकुमार यांची सूचना आहे... ते तुमचे भाऊ वगैरे आहेत ना?''

''हो!... पण थोडीतरी माहिती द्या...''

''बुद्धिसागर एका संशोधनामध्ये मग्न होते... अचानक त्यांना काही आश्चर्यकारक माहिती गवसली होती... ती माहिती त्यांच्याकडून मिळवण्यासाठी काही आंतरराष्ट्रीय ठग त्यांच्याशी मैत्रीचा देखावा करीत होते... बुद्धिसागरांना वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर, त्यांनी ती माहिती लपवून ठेवली... त्या ठगांनी त्यांना जबरदस्तीने कुठेतरी नेलं असावं... जाण्यापूर्वी त्यांनी जो *मेसेज रेकॉर्ड* करून ठेवलेला आहे, तो आपल्याला ऐकायचा आहे आणि समशेरनं आम्हाला मदत करायची आहे! बुद्धिसागरांना शोधण्यासाठी आणि त्यांनी लपवून ठेवलेली गुप्त माहिती शोधण्यासाठीसुद्धा...''

सगळे निघाले अगदी गंपूच्या कुत्र्यासह. आपली 'शेरलॉक होम्स'ची सगळी *टीम* नव्या साहसात भाग घेण्यासाठी उत्सुक झाली होती. अर्थात आपला समशेर तर उत्सुक होताच आणि त्याचे डोळे आत्तापासूनच चमकू लागले होते. नव्या बुद्धिचातुर्य-साहसाला सुरुवात झाली होती ना!

**३/ *बुद्धिसागरांचं संशोधन!***

दोन मोठ्या गाड्यांतून सगळे बुद्धिसागरांच्या घरी पोहोचले. प्रत्येक खिडकीखाली एकेक पोलीस उभा ठेवण्यात आला होता आणि दारावर सक्त पहारा होता; पण सगळ्यांना प्रवेश मिळाला. सोबतच्या पोलीस अधिकाऱ्याने विचारायला सुरुवात केली.

''कशाला हात लावला नाही ना?''

''नाही साहेब!''

''कुणी आलं नव्हतं ना?''

''कुणीच नाही!''

नंतर सगळ्यांचं लक्ष तिथे बसलेल्या हडकुळ्या आणि घाबरलेल्या चष्मेवाल्या गृहस्थाकडे गेलं. ते कुणी संशोधक असावेत. ते उभे राहिले आणि त्यांनीच स्वत:ची ओळख करून दिली. ते म्हणाले,

''मी बी.आर. टसकर! डॉक्टरसाहेबांचा मी साहाय्यक आहे...''

सगळे टसकरांकडे कुतूहलानं पाहात असताना त्यांनी सगळ्यांना उद्देशून बोलायला सुरुवात केली. जणू ते एखादं व्याख्यानच देताहेत. आपला समशेर मात्र तीक्ष्ण नजरेने सर्वत्र पाहत होता आणि ऐकतही होता. टसकरांनी म्हटलं,

''खरंतर हे सगळं अगदी गुप्त आहे... म्हणजे *कॉन्फिडेन्शिअल*... त्याची वाच्यता करायची नाही... थोडक्यात स्वरूप असं आहे...''

टसकरांनी जे सांगितलं त्याचा सारांश असा होता-

- महाभारत हा भारतीयांचा महान ग्रंथ. प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचं उत्कृष्ट संकलन. या महाभारत ग्रंथावर जगभर संशोधन सुरू आहे. जर्मनीत तर महाभारतावर सखोल अभ्यास सुरू आहे. संशोधकांचा

अंदाज असा आहे की, दोन हजार वर्षांपूर्वी या ग्रंथाचं अंतिम असं संकलन करण्यात आलं. मात्र, हे संकलन कधी पूर्ण झालं आणि संकलन कामामध्ये व्यासांच्या शिष्यासह तत्कालीन कोणकोणत्या विद्वान ऋषींनी भाग घेतला, याबाबत महाभारत ग्रंथामध्ये कोणताही स्पष्ट उल्लेख नाही.

मात्र, 'द्विश्लोकी रहस्या'बद्दल पुसटसा उल्लेख आहे. संशोधकांना या दोन कूट श्लोकांबद्दल माहिती असली, तरी हे श्लोक कोणाच्याच हातात पडलेले नाहीत, कारण ते गुप्त ठेवण्यात आले आहेत. डॉक्टर बुद्धिसागरांनी हे दोन श्लोक शोधलेले आहेत आणि म्हणून अत्यंत महत्त्वाची गुप्त अशी माहिती त्यांच्या हातात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या दोन श्लोकांची किंमत कित्येक कोटी डॉलर्स अशी आहे...

''कायऽऽ?''

सगळे ओरडले.

**४/ संशोधनाची हकिकत–पुढे चालू**

डॉक्टर बुद्धिसागरांचे ते साहाय्यक संशोधनाबाबतची माहिती पुढे सांगू लागले. आपला समशेर मात्र ऐकताऐकता टेबलावरच्या बुद्धिबळाच्या पटाकडे बारकाईने पाहत होता. टसकर म्हणाले,

''दोन ठग मैत्रीचा देखावा करीत आणि संशोधक असल्याचे दाखवत डॉक्टरांशी जवळीक करू लागले आणि ते श्लोक पाहायला मागू लागले, तेव्हाच डॉक्टर सावध झाले होते...''

टसकरांची पुढची हकिकत रोमहर्षक होती. तिचा सारांश असा होता–

– तंजावरच्या राजांच्या पूजेत असलेल्या एका मूर्तीच्या आतल्या पोकळीत एक तलम कापडाचा तुकडा शिताफीने दडवून ठेवला होता. हे दोन कूट श्लोक याच तलम कापडावर लिहिले होते. डॉक्टर बुद्धिसागर यांनी हे श्लोक शोधले आणि पुढील संशोधनासाठी हे रहस्य त्यांच्याकडेच सुपूर्त करण्यात आले. आपल्यावर दडपण येतं आहे आणि चोरीसुद्धा होण्याची शक्यता आहे, हे लक्षात आल्यानंतर डॉक्टरांनी हे दोन श्लोक अर्थात तलम कापडाचा प्राचीन तुकडा कुठेतरी लपवून ठेवला.

पोलीस अधिकाऱ्याने विचारलं.

''तुम्ही पाहिलेत ते दोन श्लोक?''

''नाही! डॉक्टरांनी मलासुद्धा ते दोन श्लोक दाखवले नाहीत...''

आत्तापर्यंत हे सर्व शांतपणे ऐकत असलेल्या समशेरने पहिल्यांदाच प्रश्न केला.

''हा जो *टेपरेकॉर्डरमध्ये* रेकॉर्ड केलेला संदेश आहे, तो कोणी कोणी ऐकला आहे?''

टसकर थोडे गडबडले. मग म्हणाले,

''पोलिसांनी आणि मी... बाकी कोणी नाही...''

''म्हणजे हा संदेश अजून गोपनीयच आहे, नाही का?''

''हो!''

समशेरने पुढे विचारलं.

''आणि तो श्लोक लिहिलेला कापडाचा तुकडा या घरातच लपवला आहे ना?''

''हो!... त्यांनी मला तसं सांगितलं! काल रात्री त्या दोन ठगांनी डॉक्टरसाहेबांना जबरदस्तीने नेलं असावं...''

पोलीस अधिकाऱ्याने विचारलं.

''ते दोन ठग कसे दिसत


वार्षिक प्रायोजक – • श्री. अनिल रिसबूड, पुणे
• डॉ. नीरज रायते, पुणे

*With best Compliments from...*

**Ashish Pitalwar**
**Director**

VOLMAX®
Your Vehicle Protector

***Factory Add :*** Sr. no. 30/8, 30/9
Saraswali industrial Estate, Block No 15,
Near Prabhat Press, Narhe, Pune 411041
**Website :** www.bharatsprays.com
**E-mail:**sales@bharatsprays.com

Management is doing things right,
leadership is doing the right things

GANESH INDUSTRIES

**GANESH INDUSTRIES**

**Unit No. 1, Sr. No. 39, Warje Malwadi,**
**Nr. Tiny Tots Eng. Med.School, Off N.D.A. Rd, Pune-52**
**Tel: 020-25291188, 25294049 Fax: 25291188**

**Unit No. 2, 79/2, Shade No. 19, Dangat Industrial**
**Estate, Nr. Agarwal Godown, N.D.A. Rd. Shivane, Pune**
**411023, Tel: 020 25294170**

**E-mail : makarandpatankar@ganesh_industries.com**
**ganesh_industries@rediffmail.com**
**website: ganesh_industries.com**

SJSB

2019
उत्सव
कर्ज योजना
10%*
पासून

येणाऱ्या उत्सवात...
आपल्या
स्वप्नपूर्तीसाठी !

* नियम व अटीस अधीन राहून

'बँकिंग' हा आमचा व्यवसाय... 'सेवा' ही आमची संस्कृती...!
विशेष कर्ज योजना आता आकर्षक व्याजदरात....

**योजनेची वैशिष्ट्ये**
- तारणी कर्जे
- नाममात्र प्रोसेसिंग प्रभार
- शाखा स्तरावर तत्काळ कर्ज मंजुरी

**व्याजदर**
- 10% ते 15%

**परतफेड मुदत**
- 60 महिन्यांपर्यंत

**प्रयोजन**
- दुचाकी वाहन खरेदी
- चारचाकी वाहन खरेदी
- गृहोपयोगी वस्तू खरेदी

आजच आपल्या नजिकच्या शाखेत संपर्क साधा.

त्वरीत मंजूरी

छोट्या लोकांची...
मोठी बँक...!

प्रकाश वाईकर — मुख्य कार्यकारी अधिकारी
वरदराज बंग — उपाध्यक्ष
प्रा. गजानन धरणे — अध्यक्ष
व संचालक मंडळ

SJSB
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**Solapur Janata Sahakari Bank Ltd.**
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप. बँक    Multi-State Scheduled Coop.Bank

मुख्य कार्यालय Head Office
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, 'Gaganbharari' Shivsmarak Sankul, Goldfinch Peth,
सोलापूर Solapur 413 007 फोन क्र. Ph. No. : 0217- 274 1100 ते to 06 Visit us : www. sjsbbank.com

होते, हे तर तुम्ही मला सांगितलं आहेच आणि त्यांचा आम्ही तपाससुद्धा सुरू केला आहे; पण ते मौल्यवान आणि अत्यंत महत्त्वाचं संशोधन म्हणजेच, ते दोन श्लोक कुठे ठेवले आहेत याबद्दल त्यांनी काही सांगितलं नाही का?''

टसकर म्हणाले,

''ते लहरी आणि गोपनीयता बाळगणारे संशोधक होते... त्यांनी या संदेशातच *क्ल्यू* दिला असेल... म्हणूनच त्यांनी कोणा समशेर कुलूपघरेला बोलावलेलं दिसतं...''



समशेर पुढे झाला आणि म्हणाला,

''मी समशेर!... ही आमची मित्रमंडळी!... आम्ही तुम्हाला मदत करू... पण संदेश तरी ऐकला पाहिजे ना! ऐकवा तो...''

मग सगळे अत्यंत उत्सुकतेनं टेबलाभोवती गोल करून उभे राहिले आणि *टेपरेकॉर्डरकडे* पाहू लागले. पोलीस अधिकाऱ्याने बटन दाबलं आणि डॉक्टर बुद्धिसागर यांचा आवाज खोलीमध्ये घुमून सगळ्यांना ऐकू येऊ लागला.

**५/ संदेश**

''माझ्या प्रिय मित्रांनो, हा संदेश ऐकेपर्यंत या दोन मित्रांसोबत मी कुठेतरी गेलेलो असणार! ... जाण्यापूर्वी घरातल्या व्यवस्थेच्या दृष्टीने काही सूचना द्यायच्या आहेत, अशी माझी विनंती या दोन मित्रांनी मान्य केली आणि त्यांची काही हरकतही दिसत नाही... ज्या अर्थी हा संदेश तुम्ही ऐकता आहात त्या अर्थी कोणतीही हरकत न घेता त्यांनी मला परवानगी दिली आहे, असे समजूया! ... तर समशेर, त्याची मित्रमंडळी आणि बाकीचे सगळे तुम्ही हा संदेश ऐकत असाल असं मी गृहीत धरतो... विशेषतः समशेर कुलूपघरेला आणि त्याच्या मित्रमंडळींना हा संदेश ऐकवा! त्याला तो समजेल...''

सगळे अगदी उत्सुकतेने तो संदेश ऐकत राहिले आणि पोलीस अधिकाऱ्याने, मामांनी आणि टसकरांनी समशेरकडे जरा नवलाने पाहिलं. संदेश पुढे सुरू राहिला.

''तर मित्रहो! पहिली सूचना अशी की, मीच घरी नसल्यामुळे आता दूध घेऊ नका... तो बिचारा दूधवाला इतक्या वेळा चकरा मारीत राहील की, त्याच्या *कॅनमधलं* दूध घुसळून घुसळून लोणी निघेल... म्हणून दूध नको! पण आंबेवाला येणार आहे... त्याला नाही म्हणू नका... आंबे तर पाहिजेच आहेत... आंबेगावच्या वरच्या अंगाला आपलं गाव आहे ना! दुसरं असं की, *टूथपेस्टवाला टूथपेस्ट* घेऊन येणार आहे... तो बिचारा जणू घोड्यावरच बसून येतो; त्याला इतकी घाई लागलेली असते... तर, *टूथपेस्ट* जवळ ठेवा... टेबलावर बुद्धिबळाचा डाव मांडलेला आहे... समशेरला




वार्षिक प्रायोजक – • बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे
• श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

तो पाहायला सांगा... त्याला समजेल!... हे दोन मित्र घाई करताहेत म्हणून मी आता आटोपतं घेतो... पण माणसं गाढवासारखी पैशाच्या मागे धावतात... निदान घोड्याच्या मागे धावले असते तर चाललं असतं, नाही का? मुख्य म्हणजे तुम्हाला *'इक्यूस'* माहिती आहे?... इ...*क्यू... यू... यू... एस!* दुसरं असं की, त्या बिचाऱ्या शेक्सपिअरने ते पात्र निर्माण केलं ना... *ब्रुटस्?* तर, हा *ब्रुटस्* नको!... तो गद्दार आहे!!...शेक्सपिअर मात्र पाहिजे!... जातो मी आता... *बाय बाय...''*

संदेश संपला. आवाज थांबला. सुन्न शांतता पसरली. सगळे एकमेकांकडे आश्चर्याने पाहात राहिले. कुणालाच काही अर्थबोध होत नव्हता. समशेर मात्र टेपरेकॉर्डरच्या शेजारी मांडलेल्या बुद्धिबळाच्या डावाकडे पाहात उभा होता. पोलीस अधिकाऱ्याने घसा खाकरला आणि म्हणाला,

*''वुईथ ड्यू रिस्पेक्ट...* डॉक्टर बुद्धिसागर लहरी विद्वान, म्हणजे *'मॅड जिनियस'* आहेत, असं मला सांगण्यात आलं आहे!... त्यामुळे हा संदेशसुद्धा असाच काहीसा विक्षिप्त वाटतो!... पण आता समशेरनेच उलगडा करावा... कारण बुद्धिसागरांनी त्याच्यावर विश्वास टाकलेला आहे...''

सगळे समशेरकडे पाहू लागले. समशेर मात्र स्तब्ध उभा होता, बुद्धिबळाच्या डावाकडे पाहात. जणू काही तो तंद्रीत गेलेला आहे.



**६/ *शोध!***

सुनंदाताईकडे न पाहाता आणि एकाग्रपणे बुद्धिबळाच्या डावाकडे पाहात असताना समशेरने विचारलं,

''सुनंदाताई! तो सगळा संदेश तू लिहून घेतलास ना?''

''*ऑफ कोर्स!* या वहीमध्ये मी तो लिहून घेतला आहे...''

पोलीस अधिकाऱ्याने तिच्याकडे जरा नवलाने पाहिलं.

''वाच मग तो...''

सुनंदाताईने तो संदेश हळू आणि स्पष्ट आवाजात पुन्हा वाचला. सगळे डोकं खाजवू लागले. काहीच अर्थबोध होत नव्हता. समशेर म्हणाला,

''ती वही दे इकडे... आणि तू निलेश! मी सांगतो ते

शब्द लिहून घे...''

संदेशावर नजर टाकत समशेर एक-एक शब्द सांगू लागला आणि निलेश त्याच्या वहीमध्ये पेन्सिलीने लिहू लागला. समशेरने सांगितलेले शब्द असे होते-

१) दूध, २) मिश्रण,
३) दूध नको, ४) आंबा पाहिजे, ५) वरचं गाव,
६) बुद्धिबळाचा डाव, ७) *टूथपेस्ट,* ८) *टूथपेस्टवाला* घोड्यावरून येतो, ९) *इक्यूस,*
१०) शेक्सपिअरने निर्माण केलेलं पात्र नको म्हणजे ब्रुटस् नको, ११) शेक्सपियर पाहिजे.

भिमू-शक्तिमान म्हणाला,

''आता हे अकरा शब्द तू निवडलेस; पण त्यांचा अर्थ काय?''

''हो रे शेरलॉक?... दूध नको, आंबा पाहिजे, इक्यूस वगैरे वगैरे... त्यातून बुद्धिबळाचा डाव... काय अर्थ आहे याचा?''

सुनंदाताईने विचारलं. मामा गंभीरपणे म्हणाले,

''यातून काही जरी अर्थ निघत असला तरी भारतीयांचा जो आद्यग्रंथ महाभारत आहे, त्या ग्रंथाचं काहीतरी रहस्य या कूटात म्हणजे या कोड्यात दडलेलं आहे... हे सोडवता आलं तर आपल्या हातून ऐतिहासिक असं कार्य घडेल, हे तर नक्की... म्हणून आता समशेर काय म्हणेल ते खरं... बघू! हा शोध घ्यावाच लागेल!''

आणि मग सगळे समशेरकडे अपेक्षेने पाहू लागले.

**७/ इक्यूस!**

समशेर पहिल्यांदा अगदी स्तब्ध आणि एकाग्र उभा राहिला; जणू तो त्यातून काही अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. नंतर तो अस्वस्थपणे सबंध घरभर चकरा मारू लागला. मग त्यानं टेबलावरचं शेक्सपिअरचं पुस्तक उचललं. त्यात शेक्सपिअरची सगळी नाटकं छापलेली होती. या पुस्तकाच्या पहिल्या पानावरच पेन्सिलनं बुद्धिबळाचा डाव लिहिलेला होता. समशेर म्हणाला,

''टेबलावर मांडलेला हाच बुद्धिबळाचा डाव यांनी इथं लिहून ठेवला आहे... म्हणजे चुकून या डावाला जर धक्का लागला आणि हा विस्कटला, तरी तो कुठंतरी लिहिलेला असावा अशी काळजी त्यांनी घेतलेली आहे... म्हणून शेक्सपिअर पाहिजे... एका कोड्याचं उत्तर तर मिळालं...''

नंतर तो सर्वत्र पाहत पाहत घरामध्ये फिरत राहिला आणि पुन्हा *टेपरेकॉर्डरजवळ* आला. मग म्हणाला,

''दूधवाला इतक्या वेळा चकरा मारणार आहे की, त्याच्या *कॅनमधलं* दूध अगदी घुसळून निघेल... म्हणून दूध नको... म्हणजे काय? घुसळणारं दूध म्हणजे काय?...*मिल्कशेक?*''

हरी म्हणाला,

''पलीकडच्या गल्लीत *मिल्कशेकचं* दुकान आहे ना! इथून आपण नेहमी तिथेच जात असतो... हो ना?''

आपल्या समशेरचे डोळे चमकायला लागले. तो उत्तेजित झाला आणि म्हणाला,

''अगदी बरोबर! आणि त्याच्या वर आंबेवाल्यांचं पण दुकान आहे... आणि त्याच्याही वर ते बंद पडलेलं *लॉज* आहे... *मिल्कशेक* नको; पण आंबा पाहिजे आणि त्याच्या वरच्या गावाचा उल्लेख म्हणजे ते लॉज!... काही कळलं का?''

**(पान क्रमांक १११ वर पुढे सुरू)**

cyronics®

Driven by Vision,
Powered by Technology

1989 - 2019
30 Years
of Service Excellence

G.E.
HEALTH CARE
BUSINESS

T M I
BUSINESS

MEDICAL
ELECTRONICS
BUSINESS

cyronics®

ELECTRICAL &
POWER
BUSINESS

INDUSTRIAL
CALIBRATION

MEDICAL
CALIBRATION

Business Partners - Brands we represent ... are Global Leaders...

smiths medical
bringing technology to life

Medtronic

GETINGE

Trumpf Medical

TSI

Hill-Rom

GOSSEN METRAWATT

KEYSIGHT TECHNOLOGIES
Authorized Technology Partner

CHAUVIN® ARNOUX

Ainuo®

DRANETZ

GOSSEN METRAWATT

iDRC

PRODIGIT
Instrument Professional

aAP®

metrix

cyronics®

Cyronics
Instruments
Pvt. Ltd.

Corporate office:
#11, Electronic Co-op. Estate,
Pune-Satara Road, Pune: 411 009.
Maharashtra INDIA
Tel.: +91 20 2420 8200
Fax : +91 20 2420 8202

Manufacturing
Sales
Services
Integration
Calibration
Training

**For more details please contact**
Nitin Bhonge M +91 99229 98220 E : nitinbhonge@cyronics.com

**www.cyronics.com**

विशेष लेख

# धुमसत्या बर्फातील 'आनंदघर'



**जम्मू-काश्मीर मधील धुमश्चक्रीमुळे फरपट झालेल्या मुलींचे आयुष्य उजळविण्यासाठी अधिक कदम हा मराठी तरूण 'बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशन' च्या माध्यमातून काम करतो आहे. या संस्थेचे बालिकाश्रम म्हणजे मुलींसाठी आनंदाचे घरच! जाणून घेऊ, या उमद्या, धडाडीच्या तरुणाची जडणघडण आणि त्याचे कार्य!!**

काश्मीर अर्थात भारताचं नंदनवन! मात्र, या राज्याचे नाव उच्चारल्यावर मनात येणारी अनामिक भीती, जाळपोळ, कायम बॉम्बस्फोट घडणाऱ्या अशा धगधगत्या प्रदेशातील माझा आत्तापर्यंतचा २३ वर्षांचा 'कसोटी'चा प्रवास तितकाच अनुभवसमृद्ध! एका बाजूला त्या प्रदेशाकडून मिळणारं इतकं अफाट प्रेम, आपुलकी; तर दुसऱ्या बाजूला 'अधिक, तू इथं मरायला आलास का?' असं क्षणोक्षणी वाटायला लावणारे, जीवावर बेतणारे कितीतरी प्रसंग! अशा द्विधा परिस्थितीत या प्रदेशाने मला मात्र दिला माणुसकीचा जिवंत अनुभव व 'ये हृदयीचे ते हृदयी...' अशी दिलेली साद!

आज मागे वळून बघताना वाटतं, अधिकाधिक काश्मिरी आया-बहिणींच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी मला हा जन्म मिळाला आहे की काय?

पुण्याच्या शेजारीच असणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदे या गावाचा मी. घरची परिस्थिती मध्यमच! वडिलांची नोकरी पुण्यात असल्यामुळे, सर्वसामान्य मुलाप्रमाणेच माझे शालेय शिक्षण पुणे येथे पूर्ण झाले. पुढील शिक्षणासाठी मी पुण्यातील स. प. महाविद्यालयात प्रवेश घेतला. मी राज्यशास्त्राचा विद्यार्थी. अनेक देशप्रश्नांचं काहूर मनात घेऊन, महाविद्यालयीन शिक्षण घेत होतो. महाविद्यालयीन जीवनात भेटलेले अनेक प्राध्यापक, मित्र व अनेक माणसं हे माझ्या एकूणच जडणघडणीत फार मोलाचे मार्गदर्शक ठरले.

याच दरम्यान १९९०च्या दशकात काश्मीर खोऱ्यातील अस्थिरता शिगेला पोहोचेली होती. काश्मीरबद्दल बरंच उलटसुलट कानावर येत होतं. मात्र, आणखी तपशिलात, खोलवर जाणून घेण्याच्या जिज्ञासेपोटी आमची राज्यशास्त्र विषयाची अभ्याससहल आम्ही काश्मीर राज्यात घेऊन गेलो. यात एकूण १५ जण सहभागी झाले होते. तिथे गेल्यानंतर तेथील विदारक सत्य परिस्थिती व अशांतता माझ्या मनाला खोलवर व्यापून राहिली. पुढे पंधरा दिवसांचा हा दौरा तेथील अडचणींमुळे दीड-दोन महिने लांबला.



ओळख पटली ज्यास स्वत:ची। कर्मात रंगुनी जाय सदाची।।
शुभेच्छुक – • श्री. आदित्य प्रमोद करंदीकर, पुणे
• श्री. अमोल बोरोले, पुणे

एका १४ वर्षांच्या मुलानं खिशात बॉम्ब ठेवून घडविलेला सैनिकांच्या तळावरील स्फोट व त्यामुळे गेलेले निष्पाप जीव! दौऱ्यादरम्यान डोळ्यांदेखत घडलेली ही घटना काश्मीरमधील माझ्या कामाला कलाटणी देणारी ठरली. एक मन भीतीनं 'परत घरी माघारी जा' म्हणत होतं, तर दुसरं मन म्हणत होतं, 'या प्रश्नाचं उत्तर कामातून देण्यासाठीच तर देवानं मला इथे बोलावलं नसेल ना?' अशा असंख्य विचारांचं काहूर मनात उठलं होतं. मी त्या दिवशी रात्रभर झोपलो नाही. शेवटी इथे, या मातीसाठीच काम करण्याचा मी त्या रात्री संकल्प केला.

एकूण काश्मीरमधील तीन वर्षांचा प्रवास व तेथील जनसंपर्क यातून १९९७ ते २००१ या काळात मी तेथील प्रश्न, समस्या याची माहिती पुरवण्यासाठी काही संस्थांना मदत केली. 'UNISAFE' च्या एका सर्वेक्षणात तेथील मुली व स्त्रिया यांच्याबद्दल धक्कादायक वास्तव समोर आलं. मुलींवर लहान वयात पडणारी मातृत्वाची जबाबदारी आणि अगदी कमी वयात येणारं वैधव्य सुन्न करणारं होतं. संस्थेच्या माध्यमातून मुली व महिला यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने २००२ मध्ये मी **'Borderless world foundation'**ची स्थापना सहकाऱ्यांमार्फत केली. त्यापूर्वी आधीच ४-५ वर्षे काम उभं राहिलं होतं. मात्र, तोपर्यंत काश्मीरमध्ये अनाथ मुलींसाठी कुठेच अनाथाश्रम नव्हता आणि यातूनच अनाथ मुलींसाठी कुपवाडा येथे उभं राहिलं ते **'बसेरा ए तब्बसुम' अर्थात 'आनंदघर!'** महाराष्ट्रातील एक हिंदू तरुण येऊन तेथील अनाथ मुस्लीम मुलींचा सांभाळ करण्याचा विचार करतो, ही कल्पना स्थानिक मौलवींना मानवणारी नव्हतीच. त्यांनी अनेकदा फतवे काढून मला विरोध केला. मात्र, एका विशिष्ट ध्येयासाठी वाहून घेतलं असल्याकारणाने, मी अडचणींवर मात करत लढत होतो. पुढे वाटचाल करत होतो.

कठीण प्रसंगात काम करताना रोज अनेक संकटांचा सामना करावा लागतो आणि रोज नवा अनुभव खूप काही शिकवून जातो. आजपर्यंत १९ वेळा मला आतंकवाद्यांनी पकडून नेलं आणि माझी सुखरूप सुटका मी करून घेतली.

एक दिवस तर भयानक प्रसंग घडला. दुपारच्या वेळी मी आनंदघरातील मुलींना गणित विषय शिकवत होतो. आणि ३ व्यक्ती आनंदघराच्या दिशेनं येत होते. मला काहीच कल्पना नव्हती की, हे आतंकवादी आहेत. मात्र गावातील लोकांनी त्यांना संस्थेकडे येताना पाहिले होते. गावकऱ्यांना पूर्ण खात्री झाली होती की, आज अधिकभैयाच्या जीवाचं काही खरं नाही. मला एका आनंदघरातल्याच मुलीनं निरोप दिला की, 'भैया तुमसे मिलने कुछ लोग आये है...' मी बाहेर गेलो. त्यांना आत बोलावून नेहमीप्रमाणे पाणी दिलं. बराच काळ त्यांनी मला अनेक प्रश्न विचारून माझ्या कामाची खात्री केली. तासाभरानंतर ते तिघं निघून गेले. मला आतंकवाद्यांनी काही केलं नाही, हे पाहून गावकरी आश्चर्यचकित झाले.

त्यानंतर सुमारे आठ महिन्यांनंतर एक महिला चार-साडेचार वर्षाच्या मुलीला सोबत घेऊन आपल्या आनंदघरात प्रवेश घेण्यासाठी आली. ती विनंती करत होती की, 'माझ्या मुलीला प्रवेश द्या!' संस्थेच्या व्यवस्थापकांनी त्या महिलेशी चर्चा केल्यावर त्या महिलेनं सांगितलं की, 'तिचा नवरा आतंकवादी आहे. आठ महिन्यांपूर्वी त्याच्या दोन साथीदारांच्या सोबत तो इथे एका आतंकवादी संस्थेच्या

सांगण्यावरून अधिकभैयांना मारण्यासाठी येऊन गेला होता. इथलं अधिकभैयांचं काम पाहून मात्र, अधिकभैयांना काहीही न करता ते निघून गेले. माझ्या नवऱ्याच्या सांगण्यावरून मी माझ्या मुलीसाठी इथं प्रवेश घ्यायला आली आहे,' असं ती महिला विश्वासाने म्हणाली. शेवटी आतंकवादी हा माणूसच असतो. त्यालाही मन असतंच! पुढे त्या मुलींना प्रवेश दिला गेला. मात्र असे शेकडो अनुभव मी घेतले आहेत.

हळूहळू काम वाढत राहिलं; स्थानिक लोकांच्या मनात आमच्या कामाविषयी विश्वास निर्माण होत गेला. काश्मिरी मुलींचा हक्काचा 'अधिकभैया' नुसता भाऊच नाहीतर वेळप्रसंगी आईही बनून केसाच्या वेण्या घालू लागला. बालवयात त्यांच्या राहण्याची व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणं, पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या पायावर उभं करणं या हेतूने कुपवाडा, अनंतनाग, श्रीनगर, बिखा, जम्मू अशा एकूण ५ जिल्ह्यांत आमच्या संस्थेची 'आनंदघरे' उभी राहिली आहेत.

छोटंसं लावलेलं हे रोप आज खूप विस्तारलंय. त्यातील ११३ मुलींची लग्नं लावून दिल्याने मला ११३ जावई आहेत! अनेक मुलींचा आई बाप म्हणून मी अभिमानाने मिरवतो आहे. 'अहमदनगर ते श्रीनगर' या माझ्या प्रवासात महाराष्ट्राच्या मातीत दिसणाऱ्या इथल्या स्त्रिया व काश्मिरी स्त्रिया यांच्यात वेगळं असं काही जाणवलं नाही. लुगड्यात दिसणारी इथली स्त्री व बुरखा घातलेली काश्मिरी स्त्रीयांचं ममतेचं रूप एकच! राज्यांच्या सीमा या आपण तयार केल्या. मात्र, कोणत्याही सीमा नसलेली ही वाट मला नेहमीच प्रेरणा देत आली आहे.

काश्मीरमधील कामाच्या सुरुवातीची परिस्थिती व आताची परिस्थिती यात खूप बदल जाणवतो. अनेक मुली उच्च शिक्षण घेऊन, उंच भरारी घेत आहेत. संस्थेच्या आनंदघरात वाढलेली एक मुलगी एका गावाची सरपंच म्हणून उत्तम काम पाहते आहे. आनंदघरातल्या अनेक मुलींनी आपल्या कुटुंबातील पुरुष सदस्यांना समुपदेशन करून, वाईट मार्गातून पुन्हा नव्या वळणावर आणलं आहे.

नुकताच काश्मीरमधील कलम ३७० बद्दल महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारकडून दिला गेला. कलम ३७० जम्मू-काश्मीर राज्यातून हद्दपार करण्यात आले. हा राष्ट्रीय एकात्मता व समानतेचा पुरस्कार करणारा निर्णय घेतला गेला, असं मला वाटतं. यात स्थानिक जनतेची अनेक मत-मतांतरे असू शकतात. मात्र, काश्मिरी जनतेच्या जीवनमानावर बदल करणारा निर्णय म्हणून या निर्णयाकडे पाहावं लागेल. भारताच्या मुख्य प्रवाहात नक्कीच काश्मिरी जनतेचा सहभाग वाढण्यास मदत होईल व आपुलकीची भावना वाढेल. त्यामुळे एकसंधता वाढण्यास मदत नक्कीच होईल.

सीमेची ही भिंत पाडून, मने सांधणाऱ्या सेतूकडे जाणारी सुंदर वाट निर्माण करण्यासाठी गेली अनेक वर्षे हिमालयातील या घरट्यात दुआ मिळतोय; तो अधिक मिळावा हीच अपेक्षा!

**- अधिक कदम**
ब्लॉक एफ, निखिल प्राईड फेज ३,
सदाशिव पेठ, पुणे 411030
**शब्दांकन - अमित कदम**

**पाहूया**
**आनंदघरची कहाणी**


विश्वासाची ज्योत निरंतर तेवावी..
सुखसमृद्धीची दीपावली
चिरंतन रहावी!
गृह कर्ज
व्याजदर 8.65%*
महिलांसाठी व्याजदर 8.60%*
कार कर्ज
३ वर्षांपर्यंत 8.25%*
३ वर्षांच्या पुढे ते ५ वर्षांपर्यंत 8.75%*
*ROI p.a. *अटी लागू
मर्यादित कालावधीसाठी प्रोसेसिंग चार्जेस नाहीत.*
आमच्या सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक आणि हितचिंतकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
'कॉसमॉस टॉवर', युनिव्हर्सिटी रोड, शिवाजीनगर, पुणे-07., फोन: 020-6708 6708
Email: customercare@cosmosbank.in • www.cosmosbank.com
महाराष्ट्र | मध्य प्रदेश | आंध्र प्रदेश | तेलंगणा | कर्नाटक | गुजरात | तामिळनाडू

# लक्ष्य

– डॉ. प्रदीप आवटे



'काय ही सारिका? सकाळचे आठ वाजले, अजून हिचा पत्ता नाही!' आईचा आवाज आला. तसा आर्यन मनाशीच म्हणाला, 'आईचा पारा तिसऱ्या मजल्यावरून थेट *टॉप फ्लोअरला* गेलाय, तोही लिफ्टची मदत न घेता!! आणि तो गालातल्या गालात हसला.

हा *सीन* आठवड्यातून दोन-तीन वेळा तरी होत असे. त्यांची कामवाली सारिका मावशी कधीतरी दांडी मारे किंवा कामावर यायला उशीर करे. आणि मग आईचा पारा एकदम चढत असे. आज तर असं झालं की, आर्यन गालातल्या गालात हसल्याचं आईनं पाहिलं आणि ती आणखी भडकली.

'आई म्हणजे नुसती कामवाली वाटते यांना! सगळं बसल्या जागी पाहिजे सगळ्यांना. इकडची गोष्ट तिकडं करायला नको. सगळे आपले *मोबाईलवर* डोकं खाली घालून बसलेले!'

आर्यनला वादळाची पूर्वसूचना मिळाली. तो शांत, गुणी मुलासारखा बसून राहिला. आईला *ऑफिससाठी* नऊ वाजता निघावं लागे. पावणेदहापर्यंत *ऑफिस* गाठलं नाही, तर *लेटमार्क* ठरलेला; त्यामुळे सारिका मावशी आल्या नाहीत की, तिचं सारं वेळापत्रकच कोलमडून पडे. मग तिची चिडचिड होई. आई चिडली की, आर्यनला अजूनच गंमत वाटे.

बाबा तर म्हणत, ''आपापल्या खोलीत दारं-खिडक्या बंद करून बसून राहा. नऊनंतर वादळाचा वेग ओसरेल, मग ते दक्षिणेकडे *ऑफिसच्या* दिशेने सरकत जाईल.''

त्यावर आर्यन आणि बाबा हसत; पण आईला ऐकू जाणार नाही, अशा बेताने! आर्यनला मुळात घरकामाची बिलकूल सवयच नव्हती. तो एकदम पुस्तकी किडा.. *बुकवर्म!* अभ्यासात एकदम हुशार! गणित त्याला पाणी प्यावं इतकं सोप्पं वाटायचं आणि सामान्य विज्ञान तर... केळं सोलून खाण्याइतकं किरकोळ! आर्यनला '*आयआयटी'ला* जायचं होतं; त्यामुळे त्याचे वेगळे *क्लासेस,* शिवाय क्रिकेट *क्लास* आणि शाळा; तोही एकदम *पॅक* असायचा. शनिवार-रविवार बऱ्याचदा *क्लासची* परीक्षा असायची; त्यामुळे आई का चिडते आहे, हे त्याला कधी नीट कळायचंच नाही. बाबा तर म्हणायचे, ''अगं, तुला नाही ना होत, तर अजून एखादी बाई लाव कामाला; पण रोज ती किरकिर नको गं तुझी.''

''होत नाही म्हणजे काय? नोकरी आणि घर



कुठले कुठले अनोळखीचे, लखख कवडसे हृदयात। न कळे कुठल्या सुख-दु:खांनी, तुडुंब डोळे भरतात।।
शुभेच्छुक – • सौ. अपर्णा घाटे, पुणे – कै. नारायण बाळकृष्ण घाटे स्मरणार्थ
• श्री. रमाकांत शिवनारायण भुतडा, पुणे

दोन्ही गोष्टी सांभाळायच्या म्हणजे प्रत्येकानं आपापल्या गोष्टी स्वतः केल्या, तर काही बिघडतं का? पण प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट बसल्या जागी पाहिजे. आणि बाई लावायला एक बाई तर धड मिळायला पाहिजे. आणि तिचे पैसे?'' आई कातावल्या आवाजात बोलत राहायची; पण पालथ्या घड्यावर पाणी!

आजदेखील याच नाटकाचा नवा प्रयोग होणार, असं आर्यनला वाटत असतानाच घराची *बेल* वाजली.

''अरे, दार तरी उघडा कुणीतरी,'' *किचनमध्ये* काम करताकरता आईचा आवाज आला आणि आई रागावण्याच्या भीतीने आर्यन *मोबाईल* बाजूला टाकून दाराकडे धावला. दार उघडलं आणि पाहतो तर एक तेरा-चौदा वर्षांची मुलगी दारात उभी होती. काळी सावळी, हडकुळी आणि चमकदार डोळ्यांची, धारदार नाकाची ही मुलगी आर्यन पहिल्यांदाच पाहत होता.

''कोण आहे रे, आर्यन?'' आईचा आवाज आला. आर्यन भांबावला; पण ती मुलगी आर्यनला बाजूला करत आत येत म्हणाली, ''काकू, म्या हाय धनश्री.''

''का गं, तू का आलीस? सारिकाला काय झालं? सांगायची तर पद्धतच नाही आपल्याकडे.''

''काकू, काल रातच्याला बापूनं लई मारलं तिला. झोपून राहिलीया अजूनपन. आंग लई ठणकतंय म्हणतीया. घरातलं स्वैपाकपानी पन म्याच केलं; पन आई म्हनली, काकूचा नगू घोटाळा करू, भांडी आन फरशी तरी करून ये.''

धनश्री हे सगळं सांगताना आर्यन तिच्याकडे पाहत तिथंच उभा होता.

''अगं पण धनश्री, तुला होणार का हे सारं? तुला वेळ लागेल खूप आणि तुझी शाळा नाही का?'' आईनं विचारलं.

''नाय, नाय काकू, मला कामाची लई सवय हाय. आता उरकती ह्यो भांड्याचा पाळा, किचन कट्टा, फरशी आन समदं! आता आज आईची तब्येतच ठीक नाय, मग काय शाळंला दांडी!''

थोडं गावाकडलं, थोडं शहरी असं काहीतरी फार गोड बोलत होती धनश्री.

''अगं, पण असं शाळा बुडवून...''

''आवो काकू, आई परीस शाळा लई मोठी लागून गेली का सांगा?''

असं म्हणत धनश्रीने कंबरेला ओढणी बांधली आणि *सिंकजवळच्या* भांड्यांना हात घातला.

आर्यन तिथंच शांत उभा होता. तो हे सारं ऐकत होता. त्याच्या मनात प्रचंड काहीतरी होत होतं. त्याला काय करावं तेच सुचेना. एक आपल्याएवढी मुलगी, आई आजारी आहे म्हणून शाळा बुडवून आईचं काम करतेय. धनश्रीच्या शेवटच्या वाक्याने तर तो हललाच होता.

तो एकदम म्हणाला, ''ऐक ना धनश्री, आपण दोघं मिळून काम करू या. म्हणजे कामही लवकर होईल आणि आईला *ऑफिसला* जायला उशीरही होणार नाही. तुलाही शाळेत जाता येईल.''

आईनं एकदम चमकून त्याच्याकडे पाहिलं. तिचा तिच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता.

'आर्यनऽऽ, तूच आहेस ना,' असं तिला पुढं म्हणायचं असावं; पण ती म्हणाली,

“अरे, तुझा क्रिकेटचा क्लास असतो ना आज?”

*“सो व्हॉट! इट्स ओके मॉम,”* आर्यन एकदम निश्चयाने म्हणाला.

“तुला कामाची सवय तरी आहे का?” आई म्हणाली.

“अगं ही धनश्री शिकवेल ना मला.”

आईच्या डोळ्यांत पाणी तरळलं.

आर्यनला नेमकं काय करावं, कुठून कामाला सुरुवात करावी ते कळेना. धनश्री त्याला म्हणाली, “आर्यन, *व्हेरी गुड!* मी भांडी घासते पटापटा; तू ती धुवून पालथी घाल. ओ ऽ के?”

ती एकदम *टीचरच्या मोडवर शिफ्ट* झाली. आर्यनने मान डोलवली आणि त्यानं कामाला सुरुवात केली. काल आईनं त्याला आवडतो म्हणून बैंगन-मसाला बनवला होता; पण ती कढई किती खरकटी, चिकट आणि घाण वाटत होती.

धनश्री हातात घासणी घेऊन वेगानं ती कढई घासू लागली. क्षणभर आर्यन क्रिकेटची मॅच पाहावी तसं तिचं भांडी घासणं पाहत होता. तिनं कढई घासून ती आर्यनच्या हातात दिली.



कढई धुण्याकरता त्यानं नळ सुरू केला. एकदम फुल्ल... मोठा !

“आर्यन, एवढ्या मोठ्या धारेची गरज तरी हाय का? *डोन्ट वेस्ट वॉटर!* नळ बारीक कर रे,’ धनश्री एकदम काकूबाई थाटात बोलत होती आणि इतर कुणाचंही ऐकून न घेणारा आर्यन तिचं ऐकत होता. त्यानं कढई धुतली. किती लख्ख निघाली होती कढई! मग दुधाचं पातेलं... ताटं वाट्या... स्टीलची भांडी धुतल्यावर तर आर्यनचा चेहरा त्यात दिसत होता. भांडी झाली. मग धनश्रीने फरशी पुसायला घेतली आणि आर्यन *किचन* कट्टा पुसू लागला. *किचन* कट्ट्यावर पडलेले चिरलेल्या भाजीचे तुकडे, सांडलेला चहा, दूध, एखादा तेलाचा थेंब... आर्यन *ब्रशने किचन* कट्टा घासत होता आणि नंतर पाणी ओतून साफ करत होता. मळकट पाणी सिंककडे चाललं होतं. त्याला वाटलं, ‘हा सारा मळ असा रोज काढायला हवा. अरे, आपणच साफ होत चाललो आहोत की काय ? आपण आपल्यालाच तर घासत-पुसत नाही ना!’

भांडी घासताना, धुताना, किचन कट्टा साफ करताना प्रत्येक क्षणी त्याला असं वाटत होतं! त्यानं पाहिलं, *हॉल अन् बेडरूमची* फरशी पुसून धनश्री किचनपर्यंत आली होती; तरी तो अजून *किचन* कट्टाच धूवत होता. घर पुन्हा



कर आत्मनिरीक्षण, वळवुनिया दृष्टीस। मग कळत जाशील तू, तुजला स्वत:स।।
वार्षिक प्रायोजक - • सौ. किरण मुसळे - कुलकर्णी, सांगली

लख्ख झालं होतं. पाऊस पडून गेल्यासारखं छान, ताजंतवानं वाटत होतं. त्यानं *हॉलमध्ये* पाहिलं, कितीतरी दिवसांनी आई *ऑफिसला* जाण्यापूर्वी सोफ्यावर शांत बसून पेपर वाचत होती. त्याला खूप भारी वाटलं. क्रिकेटचा क्लास तर बुडालाच होता; पण तरी त्याला आपण '*मॅन ऑफ द मॅच*' झाल्यासारखं वाटत होतं.

कंबरेची ओढणी सोडत, चेहरा हलकेच पुसत; धनश्री म्हणाली, ''येते काकू मी.''

''शाळा बुडवू नकोस गं आणि आईला काही लागलं तर सांग,'' आई म्हणाली.

होकारार्थी मान हलवत ती निघाली. आर्यन तिला सोडवायला दारापर्यंत गेला.

''*थँक यू!*'' तिला *शेक हॅन्ड* करत आर्यन म्हणाला.

''*यू आर वेलकम,*'' म्हणत ती ठमाकाकू *लिफ्टची* वाट न बघता खाली पळाली. तो दारातून वळला, तेव्हा आई त्याच्याकडे पाणावल्या डोळ्यांनी पाहते आहे, हे त्यानं बरोबर टिपलं. त्याला एकदम स्टीलच्या लख्ख प्लेटमध्ये पाहिलेला त्याचा स्वतःचा चेहरा आठवला आणि तो तसाच लख्ख उजळत आईच्या कुशीत शिरला.

**– डॉ. प्रदीप आवटे**
बी/, सोबा विहार, उजवी भुसारी,
कोथरूड डेपो, पुणे ३८.
dr.pradip.awate@gmail.com

**चित्रकार : राहुल देशपांडे**

**ऐकूया**
**डॉ. प्रदीप आवटे यांच्या आवाजात**
**त्यांची कथा 'हक्काची पोळी'**



कविता

# हिरवी शेते, हिरव्या वाटा



**हिरवी शेते, हिरव्या वाटा; हिरवी हिरवी गावे**
**हिरव्या हिरव्या कणसांवरती, हिरवे हिरवे रावे**

**स्वत:शीच डोलती निरागस, कोमल हिरवी पाती**
**नवरंगी लेवून पैठणी, नटली नवथर माती**

**नाजूक इवले पंख फुलांचे डुलती वेलींवरती**
**मध सेवाया फुलपाखरेही त्यांवरती भिरभिरती**

**निर्मळ अवखळ जळ झुळझुळते कडेकपारींमधुनी**
**रिमझिम रिमझिम श्रावणसरींनी सृष्टी गेली भिजूनी**

**इंद्रधनुचे रंग अनोखे फुलले अभ्रांवरती**
**पूर्वीपेक्षा अधिक सुंदर दिसू लागली धरती!**

**– संगीता बर्वे,**
९१ ए, स्नेहल बाग, तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती,
सहकारनगर – १, पुणे 411009

**चित्रकार : राहुल देशपांडे**

श्रद्धांजली : खय्याम - मृत्यू १९ ऑगस्ट २०१९ हिंदी चित्रपट सृष्टीतील संगीत दिग्दर्शक

वार्षिक प्रायोजक –● असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे

Lata Mangeshkar Medical Foundation's

## Deenanath Mangeshkar Hospital And Research Centre, Pune

Near Mhatre Bridge, Erandawane, Pune – 411004 .
Tel No. : +91 20 40151000 / 49153000
Email : info@dmhospital.org
Web site : www.dmhospital.org



### Experience Quality Healthcare Services Under One Roof

### EXCIMER LASER SYSTEM FOR OPHTHALMOLGY

- Freedom from Glasses within Minutes.
- Removal of Glasses for Therapeutic and Cosmetic Purposes.
- Faster and Accurate Refractive Engineering for Customized Lasik Treatment for Each Eye.





### LINEAR ACCELERATOR

- High End Machine with Latest Technology
- True Beam
- Faster & Accurate Treatment
- IGRT ( CT Based )
- Advanced Treatment Technique like SRS ( Stereotactic Radio-surgery ) And SRT (Stereotactic Radiotherapy) with Motion Management.

### BILD Clinic (Rehab – Exercise)

Behavioural Intervention for Lifestyle Disorders Clinic

- State of the art fitness centre under medical supervision
- Scientific evaluation & exercise prescription for lifestyle diseases.
- Pre and post- intervention monitoring of fitness progress.
- Periodic patient awareness & motivational programmes.






### YOGA CENTER (Rehab – Flexibility)

- Yoga sessions conducted for Healthy individuals as well as Patients.
- Expert Trainers from Major Yoga Schools like, B.K.S. Iyengar Guruji, Bihar School of Yoga & Yoga Vidya Gurukul Dham.
- Ample Space and Flexible Timings.......

**24 Hrs. Pharmacy & Blood Bank Services Available**


Ideas to IMPACTS
Distributing The Future Evenly®
Ideas to IMPACTS
wishes you a very
Happy Diwali
I2I is initiating a positive change with its differentiating smart town model in India's non metros by uniquely focusing on "Distributing the future evenly ® through reaching out to global customers at one hand and India's smart towns on the other.
Services
Content Data & Transformation
Security Testing Services
Product & data engineering
Enterprise Services

# इथे दिवाळी, तिथे दिवाळी

आभाळावर चढली लाली, आणिक मोठी धांदल झाली
सूर्य म्हणे, ही क्षणात पृथ्वी, साज कसा झगमगता ल्याली?

निरोप गेले ढगांस साऱ्या, निरोप गेले खगांस साऱ्या
चंद्रालाही बोलावून घ्या, लगेच कलत्या संध्याकाळी!

तारे आले, वारे आले, निरोप मिळता सारे आले
शोध घ्या म्हणे त्या ताऱ्यांचा, जे ना दिसती सभोवताली!

आभाळाची बाळे इवली, असतील का हो रस्ता चुकली?
खेळ खेळता मौजमजेचे, पडली असतील घसरून खाली!

पृथ्वीवरती कोणी धावा, काय जाहले द्या सांगावा
चंद्रकिरण मग दूत होऊनी, आभाळातून आले खाली!

ताऱ्यांची ही नव्हती किमया, ही तर इथली इवली दुनिया
लक्ष दिवे लावून भवताली, नभांगणाहून सुंदर सजली!

पृथ्वीवरची शोभा पाहून, दूत परतले निरोप घेऊन
हा तर आहे स्वागत-उत्सव, तिथे पाहुणी आली दिवाळी!

रेखून नवरंगी रांगोळी, दाराशी पणत्यांच्या ओळी
आकाशकंदील मिरवीत नगरे, तिच्या स्वागता सज्ज जहाली!


क्षणात खाली झुकले अंबर, लखलखले ताऱ्यांचे झुंबर
सजली धरणी, नभही सजले, इथे दिवाळी, तिथे दिवाळी!

– मृणालिनी कानिटकर–जोशी
फ्लॅट नं. एफ ३४, वृंदावन पार्क अपार्टमेंटस्, कोथरूड, पुणे 411038
चित्रकार : गोपाळ नांदुरकर



ऐकूया प्रस्तुत कवितेचे सादरीकरण आणि कविता कशी सुचली ते कवयित्रीच्या शब्दांत...

सिद्धी गॅस एजन्सी
भारत गॅसचे पिंपरी परिसरासाठी वितरक
पत्ता : प्लॉट नं. एच्-पी-१, एच् ब्लॉक, एम.आय.डी.सी.,
पिंपरी, पुणे ४११०१८ दूरभाष : ०२०-२७४८५९६०


130 YEARS
1888 - 2018
of Engineering Excellence
Kirloskar
Enriching Lives
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
किर्लोस्कर पम्पस्
१३० वर्षांचा विश्वास
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
किर्लोस्कर ग्रुप कंपनी
स्थापित १८८८
टोल फ्रि नंबर:
1800 103 4443
www.kirloskarpumps.com

# जागवू संवेदना



**को**णत्याही अनुभवाची चाहूली लागली की, तो आपलासा करण्यासाठी आपली सगळी इंद्रियं सज्ज असतात. तो अनुभव घेण्यातली लय, उत्कटता, साधली की, खूप मोठा आनंदाचा साठा आपल्याला गवसतो. रस-रूप-गंध-नाद-स्पर्श या संवेदना आपण वेगळ्या करू शकत नाही. आपल्या भवताली निसर्गातील सुंदर दृश्य, विविध फुलांचे आविष्कार, नात्यातले कडू-गोड तरीही एकमेकांना जोडून ठेवणारे अनुभव, जीवनातील सुख-दुःखांचं दर्शन घडवणारा विराट समाज असतो. त्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहावं. हळुवार वृत्ती जपणारं मन असलं, सगळ्या संवेदना जाग्या असल्या, तर आपण प्रत्येक क्षण उत्कटतेने जगू शकतो.

मनातील ही 'संवेदनाची कोवळी डहाळी' कशी जपायची याचं गुपित प्रवीण दवणे, यांनी आपल्या लेखात उलगडली आहे. तर ही संवेदनशीलता जाणीवपूर्वक कशी जोपासायची, कशी फुलवायची, त्यासाठी अभिव्यक्त होणं आणि महत्त्वाचं म्हणजे तिला कृतीची जोड देणं या महत्त्वाच्या पैलूंवर स्वप्नीला सेठिया यांनी 'संवेदनशीलता जाणीवपूर्वक जोपासताना' या लेखातून प्रकाश टाकला आहे.

इथली संस्कृती जपणारी आजी असो, की अमेरिकन संस्कृतीत गेलेली नात असो किंवा आजीकडे काम करणारी रखमाबाई असो वा तिची नात नंदिनी असो... प्रेमाचे बंध, माया, वात्सल्य, करूणा, कृतज्ञता अशा विविध भावनांच्या तुकड्यांची रंगीबेरंगी 'गोधडी' ही स्वाती राजे यांची कथा तुम्हालाही ऊब देऊन जाईल.

क्षेत्र कोणतही असो, संवेदनशीलता जागी असली की, येणारं समाजभान रेणू दांडेकर, हेरंब कुलकर्णी आणि डॉ. वर्षा दंडवते यांच्या अनुभवकथनातून येईल. 'आम्हाला सहज मिळालेल्या सोयीसुविधा आम्हाला आमच्या नशिबाने मिळाल्या आहेत, त्यात काय एवढं? असा बोथट विचार विसरून, तुम्हाला निश्चित दुसऱ्याचा विचार करण्याची प्रेरणा मिळेल.

आपण नेहमी शब्दातूनच बोलतो असं नसतं. काही वेळा डोळे बोलतात, तर काही वेळा चेहऱ्यावरचे भाव! काही वेळा चेहऱ्यावरचं पारदर्शी हसू, तर कधी डोळ्यातील आसू! 'स्नेहल अश्रू' या लेखातून मृणालिनी चितळे यांनी अश्रूतून माणूस कसा अभिव्यक्त होतो, हे खूप हळूवारपणे मांडलं आहे.

आई-बाबा, आजी-आजोबा अशा अगदी जवळच्या माणसांना आपण किती गृहीत धरतो! आजोबा असताना त्याचं मोल न कळलेल्या रोहनला, आजोबा नसताना त्यांच्याशी बोलावंसं वाटतं. हा अनुभव शिल्पा कुलकर्णी यांच्या 'माझी रोजनिशी माझा आरसा' या ललित लेखात, कमी शब्दांत खूप काही सांगून जातो.

मित्रांनो, संवेदना जाग्या असतील, तर माणूस म्हणून आपलं वैयक्तिक जीवन आणि समाजजीवन हे नकळत आनंद, समाधानाने समृद्ध होत जाईल. संवेदना 'जागवण्या'पासून ते संवेदना 'जाणवण्या'च्या ह्या टप्प्यात अधिक कृतिरूप होत जाण्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!



'मी'... 'मी'... 'माझे'... 'माझे'... पुरे, म्हण 'आपले'। मन मोठे कर, जरी थोडंफार खुपले।।
शुभेच्छुक - • मे. सी. व्ही. कांड कन्सल्टंट प्रा. लि., पुणे
• एक हितचिंतक, पुणे



ललित

# संवेदनांची कोवळी डहाळी

– प्रवीण दवणे

**शा**ळेतून बाहेर पडलो. गुणवत्ता यादीतील मुलांचं कौतुक करण्याचा समारंभ उत्तम झाल्याचं समाधान माझ्या मनात तरळत असतानाच, समोरच्या दृश्यानं मी व्यथित झालो. त्याच शाळेतील काही मुलं जवळच्या कण्हेरीच्या झाडाला दगड मारीत होती; एकानं तर उंच उडी मारून गुलाबी फुलांचा झुबका आलेली हिरवीकंच फांदी काडकन मोडली नि तो जणू काही घडलंच नाही, अशा आविर्भावात पुढे चालू लागला. झपाझप चालत जाऊन त्या मुलाला मी गाठलं, थांबवलं. इतरही मुलं कुतूहलाने थांबली. नुकतंच त्यांनी कार्यक्रमात मला ऐकलं होतं नि पाहिलंही होतं; म्हणूनच त्यांच्याशी मी बोलतोय म्हटल्यावर जराशी दबकलीही.

फुलांनी लगडलेली ती फांदी तोडणाऱ्या मुलाला मी विचारलं–''मित्रा, ही फांदी तू का तोडलीस?''

तो बावरलाच! मी पुन्हा काहीशा ठळक स्वरात विचारलं, ''ही फांदी तोडून तुला काय मिळालं?''

तो विद्यार्थी काही न सुचून इथे-तिथे पाहू लागला. *''सॉरी सर!''* अचानक

**निसर्गात आनंद ठायीठायी भरलेला आहे. रस, रूप, गंध, स्पर्श, ध्वनी यातलं सौंदर्य टिपणारं मन निर्माण करणं, हा एक रियाज आहे. त्यासाठी हवं वाचन, श्रवण, मनन, भटकंती!**
**एकदा अशी हळुवार वृत्ती जपायला शिकलं की पशू, पक्षी, झाडं यांना पण आपण समजून घेऊ शकू. संवेदनांची ही कोवळीक मनात निर्माण झाली की, आपण भवतालातील वस्तूंशीही सभ्यतेने वागू लागतो...**



श्रद्धांजली : अरुण जेटली - मृत्यू २४ ऑगस्ट २०१९, माजी केंद्रिय अर्थ व संरक्षणमंत्री
शुभेच्छुक – • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे
• श्री. सुमेध फाटक, पुणे

उद्गारला. झाडाला दगड मारणारी मुलंही त्या समूहात होती. 'तुम्ही झाडाला दगड का मारत होतात?'

बहुधा असा प्रश्न त्यांना कुणी विचारला नव्हता. खरं तर, त्या मुलांची ती रोजची सवयच होऊन गेली होती. शिक्षकही त्यांना हे असं वागताना कदाचित बघत असतील; पण आजपर्यंत त्या मुलांना 'ही फांदी तोडून तुला काय मिळालं?' असं विचारण्यात कुणीही वेळ दवडला नव्हता.

मुद्दाम उभं राहून मी त्यांना शांतपणे म्हटलं, ''ही फांदी तयार करण्यासाठी आणि त्या फांदीवर इतकी रंगीत, सुखद दिसणारी फुले निर्माण करण्यासाठी, झाडाने कितीतरी महिने, रात्र न् दिवस श्रम घेतले असतील. मुळांतून, जमिनीतून अन्नरस घेतला असेल, पानांतून सूर्यप्रकाश पिऊन हरितद्रव्य तयार करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली असेल. आपल्याला सुंदर फुलं यावीत आणि ती पाहून कुणाला आनंद व्हावा असंसुद्धा कदाचित त्या फांदीला वाटलं असेल! केवळ 'तुम्हाला वाटलं' या एवढ्याच कारणाने फांदी तोडण्याचा आपल्याला काय अधिकार आहे?

काय रे, यातला दगड आपल्यावर कुणी भिरकावला तर वेदना होतील की नाही?''

''होतील!''

''मग, झाडही एक 'सजीव'च आहे ना! ते आपल्यासारखं बोलू शकत नाही किंवा आपली माती सोडून ही मुळं माणसासारखी धावू शकत नाहीत, म्हणून असं अभद्र वागणार का तुम्ही?''

मुलं मुळात गुणी होती. त्यांना बहुधा 'झाडांनाही संवेदना असतात' हे इतक्या आत्मीयतेने कुणी सांगितलेलं नसावं. एकाग्रचित्त झालेले विद्यार्थी नेहमीच खूप सुंदर दिसतात. सहज जमलेला तो समुदाय तसाच दिसत होता.

ज्यानं फांदी तोडली, त्या मुलाला मी म्हटलं,

''अरे, ही फांदी म्हणजे त्या झाडाचा हातही असू शकेल, आपण चालताना जर कुणी अचानक आपला...''

''सर, चुकलो मी!''

डोळ्यांत पाणी तरारलं होतं त्याच्या. पाठ थोपटत मी म्हटलं, ''मनातल्या मनात झाडाची क्षमा माग आणि या वर्षी शाळेच्या मदतीने पंधरा-वीस तरी नवीन झाडे लाव; ऐकशील?''

आपल्या सांगण्यातील खरेपणा जाणवला की, मुलं किती भक्तिभावानं ऐकतात, याचा अनुभव मी असंख्य वेळा घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या समजून घेण्याच्या आणि चूक मान्य करण्याच्या गुणांवर माझा विश्वास वाढत चालला, तो अशाच प्रसंगांमुळे.

'शिकवण्या'पेक्षा 'सांगण्यातून' ती तरल होतात. एकदा शाळावंचित मुलांच्या शिबिराला संवेदनांचे नवे सूर शोधणाऱ्या मनांचा अंतर्मुख करणारा अनुभव मी घेतला.

पंचसंवेदनांपैकी 'गंध' या संवेदनेविषयी गप्पा रंगल्या होत्या.

मला वाटलं, मुलं फुलांच्या सुगंधाविषयी बोलतील; पण त्या लहानग्यांच्या तीव्र संवेदनशीलतेतून आणि इतक्या विविध माध्यमातून, शब्दांत मावणार नाहीत अशा प्रकारचे



कळ्या उमलता, फांदीलाही काही माहीत नसते । कुणी लावता हात फुलाला, घाबरते थरथरते।।
शुभेच्छुक - • सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे
• सौ. वर्षा जगदाळे, पुणे



गंध येतील, याची मी कवी असूनही कल्पना केली नव्हती.

मी आपला जाई, जुई, मोगरा, चाफा यातच गुंतून पडलो होतो; पण त्या चाळीस-पन्नास मुलांनी विविध प्रकारच्या गंधांचं जणू संमेलनच भरवलं होतं.

पहिल्या पावसानंतर मातीला येणारा गंध! मृद्‌गंध! चुलीवरच्या भाकरीतील वाफेचा येणारा गंध, भूक चाळवणारा सुर्बट गंध! ताज्या शेणानं मातीचं अंगण सारवल्यानंतर येणारा गंध! नव्या इयत्तेत गेल्यावर, नव्या पुस्तकाच्या पानांना येणारा गंध! कपड्यांच्या दुकानात नव्या, कोऱ्या कापडांचा अन् सुती सदरा धुतल्यावर उन्हात वाळल्यावर येणारा धुप्पट गंध! गावाकडची मुलं ताज्या प्रवाहासारखं जगतात नि हे सारं टिपतात.

शहरातील गर्दीत, कामाच्या धांदलीत आता स्वत:चा आनंद गमावण्याचं आणखी एक साधन आपण बाजारातून विकत आणलं आहे, *मोबाईल* नावाचं; ते कसं नि केव्हा वापरायचं, हे न कळल्याने आनंद घेण्याच्या आपल्या 'आतल्या' सतारीवर नवे आवरण घातले जात आहे.

सतत काचेवरची फुलं नि निरर्थक विनोद बघताना खिडकीत एक निळा छोटा पक्षी येऊन, साद घालून गेला हे आपल्याला कळतही नाही. जवळची अशी कोवळी, रंगीत पंखांची सुंदरता न अनुभवताच उडून जाणं, म्हणजे केवढं नुकसान आहे; याची नुसती जाणीवही आपल्या मनाला हळूवार करेल.

अगदी आपल्या शहरातील भाजी बाजारात तुम्ही अनेकदा जाता. नसाल गेलात, तर वेळ काढून जा. भाज्या आपल्या पिशवीत घेण्याआधी शांतपणे भाज्यांचे विविध रंग तर पाहा-

हिरव्याच रंगाच्या केवढ्या छटा! गवारीचा हिरवा रंग नि दोडक्याचा हिरवा रंग! वांग्याचा जांभळा निराळा, तर बिटाचा जांभळट गुलाबी न्याराच! गाजराचा केशरी रुबाबदार! तर लिंबाचा पिवळा हळद लागलेल्या नवरदेवासारखा! मुळ्याची


जरूर पाहा : www.studentrecipes.com, मुलांनी बनवलेल्या पदार्थांच्या पाककृती
शुभेच्छुक - • डॉ. प्रियव्रत देशपांडे, चेन्नई
• औमा इंजिनिअर्स, पुणे

शुभ्रता ओलसर!

हे सारं रंगांचं! त्यात रसरसून भरलेल्या चवींचं जग, अगदी आपल्या हाताच्या अंतरावर असतं; पण असे रंग 'बघायचे' असतात हे शिकवण्याच्या शाळेत आपण ती खुली असूनही, कधी जातच नाही. रंगांप्रमाणे गंधातही अनेक छटा! चवींच्या नाना तऱ्हा!

मला आश्चर्यच वाटतं.

माणसांचं जगणं एकसुरी, एकरंगी होऊ नये; म्हणून निसर्गानं केवढी अपार काळजी घेतली आहे. महाराष्ट्रकन्या बहिणाबाई चौधरी यांनी किती सहज लिहिलंय–

*किती रंगविशी रंग!*
*रंग भरले डोयात;*
*माह्यासाठी शिरीरंग*
*रंग खेये आभायात!*

त्या म्हणतात, 'डोळ्यातच रंग भरलेल्या रंगांचा रास सुरू आहे; पण मनानं 'राधिका' व्हायला हवं!

आनंद असा ठायी ठायी आहे. तो टिपणारं मन निर्माण करणं हा एक रियाज आहे. त्यासाठीच तर वाचन, श्रवण, मनन, भटकंती! जो असा आनंद वेचू शकतो, त्याला दुसऱ्याला दुखावण्याची कधी इच्छाच होणार नाही! इतकंच काय पशू, पक्षी, झाडे यांचीही वेदना तो समजून घेऊ शकतो. गंमत वाटेल, संवेदनेची ही कोवळीक एकदा मनात निर्माण झाली की, आपण वस्तूंशीही सभ्यतेने वागू लागतो.

एकदा वर्गात एक नेहमी घडते तशीच घटना घडली. *बेंचवरून* पेन खाली पडला. क्षणभर माझं लक्ष विचलित झालं; धक्काच बसला! कारण मुलानं पायाच्या बोटांनी, ते पेन हळूच उचलून घेतलं.

त्या मुलाला मी उभं केलं. अर्थात् आपला गुन्हा तरी काय त्याला कळेना. मी एवढंच म्हटलं, ''मित्रा, ज्या लेखणीनं तुला शिशुवर्गापासून इतक्या इयत्ता पुढे आणलं. ज्या पेनानं तू अनेक परीक्षांमध्ये उत्तम उत्तरं लिहिलीस, पुढे तुझ्या भविष्यात, जडणघडणीत फार मोठा वाटा असणार आहे या पेनाचा; ते पेन हातानं उचलू शकला असतास ना? पायानं का कुणी लेखणी उचलतं?''

वर्ग खरोखर शांत होता.

ती शांतता, विचार करणारी शांतता होती! शांतता 'ऐकणारी' मुलं मनानं एक पाऊल विचारांच्या दिशेनं जातात.

''मित्रा, आधी त्या लेखणीची क्षमा माग. म्हण, चुकलो! अरे सरस्वतीची वीणा आहे ती –''

मुलाचे डोळे भरून आले होते.

अगदी पाठच्या *बेंचवरची* मुलेही मन एकाग्र करून ऐकत होती. पाच मिनिटं 'काहीच न बोलण्यात' जाऊ दिली; पण मी 'न बोललेलं' मुलं 'ऐकताना'चा अनुभव मलाच नव्हे, साऱ्या वर्गाला थरारून टाकणारा अनुभव होता!

त्या दिवशी पुस्तकातलं मी काही शिकवलं नसेल; पण त्याही पलीकडचं काही मुलांना उमगलं होतं. 'वस्तूंशीही जो नीट वागतो, तो व्यक्तींशी नीट वागणारच,' हे त्यांना कळलं होतं! आयुष्यातला माझा तो संस्मरणीय पाठ होता!!

**– प्रवीण दवणे**
ब–३०३, राजहंस, लुईसवाडी,
ठाणे (पश्चिम) ४००६०४

**चित्रकार :राहुल देशपांडे**

**पाहूया**
**शॉर्ट फिल्म – 'न कळता काही कळले'**
**लेखिका – स्वाती राजे**
**पटकथा, संकलन, दिग्दर्शन**
**सुमेध फाटक**



वाऱ्यावरती फूल जुईचे, अलगद खाली येते । गंध मिसळता हवेत सारा, माती मनात फुलते ।।

शुभेच्छुक – • श्री. अनिल देशमुख, पुणे
• श्री. चैतन्य वझे, डोंबिवली

*Happiness is an interval between periods of unhappiness*

**PRATIBHA ELECTRICAL CONTRACTOR LLP**

Flat No.1, S. No. 29/3/4/5,
Safalanand Society, Anand Nagar,
Hingane Khurd, Pune 411051
Phone No. – 020-24351021 / 020-24340122

The best preparation for tomorrow is doing your best Today

**Spark Engineers**

526, Narayan Peth, Punit Apts.,
Opp. Modi Ganapati, Pune- 411 030
Contact - 020 24450363

**Laughter is the tonic, the RELIFE, The surcease for pain**

**Vinod Kulkarni**

• 98609 99133 • 94204 96242 • 97673 34536

*Vaccinate*

Shop No. 3, Build No. C, Utkarshanagar,
Gadital, HadapSar, Pune - 411 028, Ph.: 020 26991906

जरूर पाहा : www.instructables.com मुलांनी सहज तयार करण्यासारख्या अनेक कलाकृती
स्वावलंबनातून आत्मविश्वास, धडपडीतून आनंद, **'छात्र प्रबोधन'** वाचून लागतो, या साऱ्याचा छंद.



# संवेदनशीलता जाणीवपूर्वक जोपासताना

– स्वप्नीला सेठिया

आज बाईंनी व्यक्तिमत्त्व विकसनाचा तास *प्रोजेक्टर रूममध्ये* घेतला होता; त्यामुळे सर्वांची उत्सुकता ताणली गेली. बाईंनी *प्रोजेक्टर* सुरू केला. नुकत्याच आलेल्या महापुराची चित्रे एकापाठोपाठ दिसू लागली. प्रचंड वेगाने वाहणारी नदी, त्यातून वाहून जाणारी जनावरे, गाड्या, धडाधड पडणारी घरे, इमारती बघून मुले भयचकित होत होती. तोंडातून वेगवेगळे उद्‌गार बाहेर पडत होते. पुढची चित्रे होती महापुरानंतरची. सगळीकडे साठलेला चिखल, कचरा, पडलेली घरे, निर्वासितांसारखी छावणीत राहणारी माणसे, घाबरलेली मुले, ओसाड झालेली शेते. हे बघून काही मुलांच्या डोळ्यांत पाणी आले, काही सुन्न होऊन गप्प झाले. सर्वजण *नॉर्मलवर* येण्यासाठी बाई काही वेळ थांबल्या. मग पुढचा तासभर खूप चर्चा झाली. काहीजण म्हणाले की, 'किती वाईट परिस्थिती झाली आहे; लोकांना केवढा त्रास होतो आहे.' काही म्हणाले की, 'आपण तिथे राहात नाही, हे किती बरे झाले. आपल्यावर अशी वेळ आली असती तर...' काही मुलांनी घरातील मोठ्या माणसांच्या चर्चा ऐकल्या होत्या. त्यांचा संदर्भ देत 'या महापुरात माणसांचीच कशी चूक आहे,' हे त्यांनी सांगितले. दोन-तीनजणांनी मात्र वेगळाच विषय काढला की, 'चर्चेपेक्षा या लोकांना मदत करणं, त्यांना धीर देणं आवश्यक आहे.' सर्वांना त्याचे महत्त्व पटले आणि बाईंनीही सगळी चर्चा या दिशेला वळवली. त्यातून मदत कशी करता येईल, याचे अनेक मार्ग निघू लागले.

वरचा प्रसंग तुम्ही बघितला, त्यात जी चर्चा सुरू होती ती खूप संवेदनशील विषयावर सुरू होती. खूप वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया आपण बघितल्या, त्या कशा प्रकारच्या होत्या.



पृथ्वीवरचे सूर्य होऊनी लागू आम्ही तळपाया। मित्रत्वाचा हात असू दे पोटी असू दे माया।।
शुभेच्छुक – • श्री. शरद श्रीपाद पालकर, पुणे
• श्री. शिवप्रसाद आगटे, पुणे

हे आपण समजून घेऊ या. संवेदनशील हा शब्द खूप वेगवेगळ्या प्रकारे वापरला जातो. जसे – संवेदनशील परिस्थिती, संवेदनशील मन इ. 'संवेदनशीलता' म्हणजे भावनिकता किंवा भावनाविवशता नाही. मुळात संवेदना म्हणजे समवेदना किंवा सहवेदना! ही सहवेदना जाणवणं म्हणजे संवेदनशीलता; आपल्याला माणूस म्हणून ती खूप समृद्ध करते, आपले माणूसपण घडवते.

आज आपण बघणार आहोत ती मुख्यकरून माणसांच्या संदर्भातील संवेदनशीलता. संवेदनशीलता सहसा भावनांच्या रूपात प्रकट होते. मघाच्या प्रसंगात लोकांना किती त्रास झाला, असा विचार करून मुलांना वाईट वाटलं, रडू आलं, त्यांची संवेदनशीलता भावनिक स्वरूपाची होती. ज्या मुलांना असं वाटलं की, बरं झालं बुवा आपण तिथं नव्हतो, नाहीतर आपलं काय झालं असतं. अशांची संवेदनशीलता 'स्वकेंद्रित' होती. म्हणजे या मुलांना परिस्थितीची जाण आहे. संवेदनशीलताही समजली आहे; पण ती स्वत:च्याच संदर्भात केंद्रित झाली आहे. काही मुलांना असं वाटलं की, आपण अशावेळी तिथं असायला हवं, तिथे मदत करायला हवी; त्यांची संवेदनशीलता ही 'कृतियुक्त' किंवा 'कृतिपूर्ण' या प्रकारातील.

बऱ्याचदा आपण आपल्या आजूबाजूला अनेक मोठी माणसं बघत असतो, खूप संवेदनाशून्य पद्धतीने ती वागत असतात. उदाहरणच द्यायचं तर कुत्र्यांना दगड मारणारी, काठ्यांनी मारणारी माणसं, मुलं, अपघात बघून तिथे उभे राहून *शूटिंग* करणारी, घरातला/दुकानातला कचरा रस्त्यावर आणून टाकणारी, दुसऱ्यांच्या वह्या-पुस्तके मुद्दाम शाई सांडून खराब करणारी अनेकजण आपण बघत असतो.

अशी माणसं दुसऱ्यांच्या हक्कांबद्दल, त्यांच्या परिस्थितीबद्दल विचार करू शकत नाहीत; त्यामुळे दुसऱ्याच्या भावना, विचार त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. असं का होतं? खरंतर, मुळात प्रत्येक व्यक्ती भावनिकदृष्ट्या कमी-जास्त प्रमाणात संवेदनशील असते. काहीजण आपली संवेदनशीलता जपतात, जाणीवपूर्वक तिला संधी, वाव देतात. त्यांच्या आजूबाजूचे वातावरणही तसे पूरक असते. त्यातून त्याची संवेदनशीलता फुलत जाते. तिला योग्य वळण मिळत जाते. काहींच्या बाबत मात्र, त्यांच्या संवेदनशीलतेची टवाळी केली जाते, नावं ठेवली जातात; त्यामुळे 'संवेदनशीलता असणं म्हणजे कमीपणाचे,' असं त्यांना वाटू लागतं. विशेषत: आपल्या भारतीय समाजात स्त्रियांनी संवेदनशील असणं योग्य मानलं जातं; पण पुरुषाने जास्त संवेदनशील असणं स्वीकारलं जात नाही; त्यामुळे बऱ्याच वेळा मुलांची संवेदनशीलता तितकीशी फुलत नाही. मागे पडत जाते; त्यामुळे त्यांनी जास्तीतजास्त व्यावहारिक आणि कठोर होणं आवश्यक वाटू लागतं.

संवेदनशीलतेच्या दोन पायऱ्या असतात. पहिली पायरी अभिव्यक्तीची म्हणजे संवेदनशीलपणे व्यक्त होणे. दुसरी पायरी म्हणजे कृतिपूर्ण प्रतिसाद देणं. संवेदनशीलपणाने काही कृतियुक्त असा प्रतिसाद देणं म्हणजे काय? ते समजून घेऊ या. मघाच्या उदाहरणाच्या संदर्भात महापूर आणि एकूणच परिस्थितीबाबत आपल्या भावना व्यक्त करणं, वाईट वाटणं, अस्वस्थ वाटणं ही संवेदनशीलतेची अभिव्यक्ती (expression) आहे. याच्या पुढील पायरी म्हणजे प्रत्यक्ष

जरूर पाहा : www.nobelprize.org, नोबेल विजेत्या व्यक्तींची माहिती

शुभेच्छुक – • श्री. सचिन सहस्रबुद्धे, पुणे
• श्री. प्रमोद कुलकर्णी, पुणे

तिथे जाऊन तिथली परिस्थिती हाताळणं किंवा ती सुधारावी म्हणून आपल्याकडून मदतीचा, खारीचा वाटा उचलणं. ही कृतिपूर्ण/कृतियुक्त संवेदनशीलता! पहिली पायरी आवश्यक आहेच; पण दुसरी पायरी त्याहून महत्त्वाची आहे. तिच्याशिवाय संवेदनशील अभिव्यक्ती ही कोरडी किंवा तोंडदेखली ठरू शकते. कोरड्या संवेदनशीलतेचं ज्वलंत उदाहरण म्हणजे, अपघातग्रस्त व्यक्तींच्या भोवती कोंडाळं करून उभे राहणाऱ्या व्यक्ती. त्यांच्यापैकी बरेचजण नुसते हळहळत असतात; पण कोणीही त्यांना उचलून दवाखान्यात घेऊन जात नाही. म्हणजेच संवेदनशील अभिव्यक्तीचे कृतीत रूपांतर होत नाही.

हे कसं टाळायचं? किंवा आपली संवेदनशीलता कृतिपूर्ण होण्यासाठी काय करावं. असा विचार करू या. माणसं संवेदनशीलतेने का वागत नाहीत? त्याला बऱ्याच अंशी आपले विचार कारणीभूत असतात. बरेच वेळा 'दुसरं कोणीतरी करेल की, मीच कशाला? किंवा मी एकट्याने केलं आणि त्याचे वेगळेच, चुकीचे परिणाम झाले तर?' असा विचार केला जातो. काही वेळा घटनेचे, प्रसंगाचे चटके आपल्याला कधीच न बसल्याने, त्याचे गांभीर्य आपल्या लक्षातच येत नाही, तर काही वेळा आपला संकोची, भित्रा स्वभाव आडवा येतो. मग हे सगळं सगळ्यांबरोबरच घडत असतं, तरीही काहीजण आपल्या संवेदनशील भावनेचं कृतीत रूपांतर करू शकतात. मग ते हे कसं करू शकतात?

आपण जर अशा व्यक्तींचं निरीक्षण केलं किंवा त्यांचे अनुभव ऐकले, तर आपल्या लक्षात



येईल की, ते सर्वात प्रथम आपल्या मनाचे ऐकतात. 'कोण काय म्हणेल? कोणी नावं ठेवेल का? हसेल का?' हे विचार ते धुडकावून लावतात, ते स्वत:वर विश्वास ठेवतात आणि त्यांच्या संवेदनशीलतेला महत्त्व देतात, तिला कमी लेखत नाहीत. ते आजूबाजूच्या जगाकडे सजगपणे बघतात. आपल्यापुरतं जगण्याचा संकुचितपणा विसरून इतरांच्या गरजांविषयी अभिमुख (Oriented) होतात; त्यामुळे ते कृतियुक्त संवेदनशील असतात. आपणही याची सुरुवात करू शकतो.

आपली संवेदनशीलता फुलवण्याचा पाया आपल्या घरापासून सुरू होतो. घरामध्येच कितीतरी वेळा कितीतरी गोष्टींकडे बघण्याची संधी आपल्याला मिळते. सातत्याने काम करून दमलेली आई, वयोमानानुसार डोळ्यांनी कमी दिसत असणारे आजी- आजोबा, घरात कामाला येणाऱ्या भांडीवाल्या काकू, आपण न सांगताच आपल्या गरजा ओळखणारे आपले वडील.



छान भिंतीचे ते घर, नुसतेच नका पाहू । भावुकतेच्या खिडक्या सदा, उघड्याच ठेवू ।।
शुभेच्छुक - • सौ. पद्मजा पोटे, डोंबिवली
• डॉ. विशाखा चिंचणीकर, पुणे

**आपल्या संवेदनशीलतेची जोपासना कशी करता येईल?**

१) आठवड्यातून एकदा (सहसा सुट्टीच्यादिवशी) घरातील कोणत्याही मोठ्या व्यक्तीचा 'मदतनीस' म्हणून अर्धवेळ काम करता येईल, त्यांच्या जबाबदाऱ्या, कामं समजून घेता येईल.

२) आपल्याला संवेदनशील वाटणाऱ्या पाच घटना रोज वर्तमानपत्रातून शोधून काढाव्यात. त्यातील कोणत्या गोष्टी आपल्याला संवेदनशील वाटतात, याची नोंदी करा.

३) दिवसभराच्या दैनंदिन वेळापत्रकातून अर्धा तास काढून आई आणि बाबांशी गप्पा मारा (अभ्यास आणि प्रोजेक्ट सोडून).

४) घरामध्ये घडणाऱ्या समारंभांमध्ये एक महत्त्वाची जबाबदारी स्वत: उचलता येईल. उदा. समारंभाची बैठकव्यवस्था बघणं किंवा सामानाची यादी बघून सर्व गोष्टी आल्या आहेत ना, ते तपासणे इ.

५) दोन महिन्यातून एकदा आपल्या मित्र/मैत्रिणींच्या गटासह जाऊन आपल्या परिसरात, रस्त्यांवर राहणाऱ्या किंवा काम करणाऱ्या मुलांशी संवाद साधा. त्यांच्या गरजा, आवडी समजून घ्या.

६) सणांच्या दिवशी आपल्या घरी काम करणाऱ्या मावशींच्या घरी भेट देता येईल. जाताना आपण स्वत: तयार केलेली भेटवस्तू, खाऊ न्या.

७) काही चित्रपट, पुस्तके आवर्जून बघण्याने, वाचण्यानेही आपली संवेदनशीलतेशी ओळख वाढू शकेल. तशी यादी घरातील मोठ्यांशी, शिक्षकांशी बोलून ठरवता येईल. उदा. 'तारे जमींन पर', 'नाळ', '१० वी फ' यांसारखे चित्रपट बघा किंवा मृत्युंजय, राजा शिवछत्रपती, माझी जन्मठेप यांसारखी पुस्तकं वाचा. ही पुस्तकं मोठी असली तरी संवेदनशीलता समजून घ्यायला फार उपयुक्त अशी आहेत.

यांच्या गरजांबाबत त्यांना काय वाटतं? याबाबत आपण संवेदनशील, सजग असतो का? कोणीही न सांगता, घरातील छोटी छोटी कामं करणं, दमून आलेल्या बाबांना न विचारता पाणी आणून देणं, भांडीवाल्या काकूंना खूप भांडी पडू नयेत म्हणून स्वत:ची कपबशी, मग, ग्लास, चमचे, *बाउल्स* स्वत: विसळून ठेवणं, अशा छोट्या छोट्या गोष्टी केल्यानेही माणसांना समाधान देता येणं शक्य असतं. त्यातूनच त्यांच्या प्रति असलेली आपली संवेदनशीलता 'कृतियुक्त' करता येते. काही वेळेला तर फक्त संवेदनशीलता व्यक्त करणंही पुरेसं असतं. आईने खूप वेळ खपून केलेला पदार्थ नावाजणे, तिच्या कष्टांचा आदरानं उल्लेख करणं, हे तिच्या मनाला सुखावून जातं

हीच संवेदनशीलता, आपला मित्रपरिवार, आपला समाज, देश, निसर्ग यांबाबतही आपण विकसित करू शकतो. त्यासाठी आपणच आपल्यासाठी थोडा वेळ काढू या. अभ्यास, गुण, स्पर्धा, करमणूक, *मोबाईल* यांच्या पलीकडे जाऊ या. माणसांमध्ये, निसर्गामध्ये रमू या. त्यांना समजून घेऊ या. आपले कान आणि डोळे एखाद्या टीपकागदासारखे वापरू या. मग बघा, तुमच्या संवेदनशीलतेला कसा बहर येतो ते!

**– स्वप्नीला सेठिया**
५, जय मंगल अपार्ट., उजवी भुसारी कॉलनी,
पौड रस्ता, कोथरुड, पुणे – ३८

**चित्रकार : राहुल देशपांडे**

**पाहूया**
**संवेदनशीलतेचा पैलू दर्शवणारी**
**ॲनिमेटेड शॉर्ट फिल्म**

जरूर पाहा : www.madehow.com दैनंदिन वापरातल्या वस्तूंची वैज्ञानिक माहिती

शुभेच्छुक – • सौ. गुंजन कुलकर्णी, नाशिक
• सौ. स्नेहल परब-एकंबीकर, पुणे

कथा



पाहूया
ही ‘कथा कशी सुचली’
हे सांगणारं लेखिकेचं
मनोगत आणि सोबतच्या
कथेची झलक!

# गोधडी

– स्वाती राजे

गोधडी म्हणजे गोधडी
गोधडी म्हणजे *क्विल्ट* नाही,
गोधडी म्हणजे *ब्लँकेट* नाही,
गोधडी म्हणजे चादरीपेक्षा जरा
जाड; ब्लँकेटपेक्षा जरा मऊ!

गोधडी रंगीबेरंगी कापडाच्या तुकड्यांची किंवा आजीच्या मऊ साडीची. छान जुनी असणारी. म्हणजे काय, ते माझ्या मैत्रिणींना कळत नाही. माझं बोलणं त्यांना खूप वेळा कळत नाही. व्हेरोनिका मला म्हणते, ‘*यू आर विअर्ड*’ मला आधीच एकटं वाटता वाटता खूपच एकटं वाटायला लागतं. माँ म्हणते, ‘थोडे दिवस! होशील *सेटल!*’ *सेटल* म्हणजे काय व्हायचं, ते मला कळत नाही. मी *इंडियात* आजीकडे जायची वाट बघते.

हे क्षितिज रंगीत माझे, मी सहज तिथे झेपावे। त्या रंगांमध्ये माझे, आयुष्य रंगुनी जावे।।
शुभेच्छुक – • डॉ. रवींद्र सेठिया, पुणे
• श्री. विजय निकम, पुणे

*समर व्हेकेशन;* तेव्हा *इंडियात* पाऊस आणि पाऊस. बाबा म्हणतो, 'जग जवळ आलंय.' मला तसं काही वाटत नाही. गोल पृथ्वीवर इकडून तिकडे जाता-जाता फक्त चोवीस तासांत, सगळंच कसं बदलत जातं, ते मला कळत नाही. आकाशातून उडता-उडता इथल्या *समरचा* पोहोचेपर्यंत तिकडे होतो पावसाळा.

इथला दिवस की, तिथली रात्र आणि तिथला दिवस की, इथली रात्र! *सेजेटलॅगमुळे* *इंडियात* आल्यावर मला झोप येत नाही. तेव्हा आजी तिच्या कपाटातून माझ्यासाठी गोधडी काढते. थोडीशी जाडुली. थोडीशी जडुली. त्या जाडुल्या जडुल्या गोधडीत शिरता शिरता मी आजीच्या अंगावर पाय टाकते. आजी तिच्या मऊ हातानी मला हळूहळू थोपटत राहाते; अगदी झोपेपर्यंत.

*'हाऊ डू यू स्लीप विथ युवर ग्रँडमा?'* *व्हेरोनिका* विचारते. तिला त्याच्यापुढे तेव्हा खरं तर मला तीच *विअर्ड* वाटते. अमेरिकेला जायच्या आधी तर आजीजवळच झोपायची मी! माँ-बाबा दिवसभर कामात. कधीकधी महिनाभर *यूएसला.* मग मी आणि आजीच. मग बाबाला मिळालं तीन वर्षांसाठी *यूएसला* काम, तर तो घेऊन आला मला आणि माँला अमेरिकेला; पण अशी जागा बदलली की, बदलूनच जायला लागतो का आपण, आपलं सगळं? घर, शाळा, मैत्रिणी आणि आपली झोपण्याची सवयसुद्धा? नाही येत मला *यूएसमधल्या* मोठ्ठ्या घरातल्या माझ्या-माझ्या खोलीत एकटं एकटं झोपता. मैत्रिणी हसतात. *'आर यू अ बेबी?'* कॅरल विचारते. *'एन्करेज हर टू स्लीप बाय हरसेल्फ.* सवय लावा तिला एकटीनं झोपण्याची.' शाळेतली *काउन्सेलर* माँला सांगते. मला राग येतो. *दॅट इज नॉट देअर प्रॉब्लेम!* मग त्यांचं कोणाचंच न ऐकता मी रोजच माँ-बाबाच्या मध्ये पांघरुणात गुपचूप झोपून जाते. माँ हसते. म्हणते, ''मोठी कधी होणार गं तू?''

मला आजीची आठवण येते. बाबाला हे माहित्ये. तो सुट्टी लागल्यालागल्या मला *इंडियात* सोडायला येतो. मग मी खूपचखूप दिवस आजीकडे राहाते. आजीकडे, आत्याकडे, मावशीकडे. जून, जुलै, ऑगस्ट. चिक चिक. कुठं बाहेर जाता येत नाही. *इंडियातल्या* मित्र-मैत्रिणींची शाळा सुरू होते. *यूएसचा समर* सोडून मी *इंडियात* पावसात का येते हे माझ्या कुठल्याच मैत्रिणींना कळत नाही.

आजीला हे सांगितलं मी, तर ती हसली. म्हणाली, ''अशी वेडी नात सगळ्यांना नसते.'' आणि मग मीसुद्धा गोधडीत शिरता शिरता तिला म्हणाले, ''अशी गोडुली आजी पण सगळ्यांना नसते.''

तर बोलता बोलता माझे पायच आले एकदम गोधडीबाहेर! *स्कूलमध्ये* मुली मला *'ऑस्ट्रिच'* म्हणतात. शहामृग. लांब पायांचं. तर *ऑस्ट्रिच!* पाय दुमडून पुन्हा गोधडीत शिरता शिरता मी आजीला सगळ्या गंमती सांगितल्या. नेहमीसारख्या; पण या वेळचं *स्पेशल सिक्रेट* म्हणजे मी *डायरी* लिहायला लागलेय... आणि ती कशी *लॉक* करून ठेवते... कुठे ठेवते... आणि व्हेरोनिकाला *स्टेप* डॅड कसा आलाय आणि *वीकेंडला* भरणाऱ्या मराठी शाळेत काय काय शिकवताहेत... तर आजी

जरूर पाहा : www.physlink.com भौतिक आणि खगोलशास्त्राविषयी बातम्या
शुभेच्छुक - • श्री. अनिल पालकर, सातारा
• एक शुभेच्छुक, बंगळुरु

म्हणाली, ''छान रुळलीस की तू आता!'' तरीसुद्धा इकडेच यावंसं वाटतं *इंडियात* असं सांगताना मी मिठीच मारली आजीला. तर म्हणाली, ''उंच बिंच झालीस तरी बाळच आहेस की माझं अजून!''

मग रखमाबाई आल्या कामाला दुसऱ्या दिवशी अन् म्हणाल्या, ''आगं बाय! ताडमाड झालीस जनू!'' तर आजी रखमाबाईंना म्हणाली, 'गोधडी पुरेनाशी झाली हो पोरीला! नवी घालायला हवी; पण नजर झाल्ये अंधूक. आता *कॅटरॅक्टचं ऑपरेशन* झाल्याशिवाय काय दिसणार डोळ्यानं!' मग '*कॅटरॅक्टला* 'मोतीबिंदू' म्हणतात' असं आजीनं रखमाबाईंना सांगेपर्यंत रखमाबाई 'हुश्श!' करून बसल्या जमिनीवर टेकून. मला वाटलं की, त्यांना तहान लागलीय. मग मी *ग्लासमधून* त्यांना *फ्रीजमधलं* पाणी आणून दिलं. तर त्या म्हणाल्या, ''माझा हाये ना गिलास!''

उठून त्यांनी कोपऱ्यात ठेवलेल्या त्यांच्या स्टीलच्या पेल्यात पाणी घेतलं नळातून. मग घटाघट प्यायलं वरून. त्यांच्याकडे बघता बघता मला मॅगीच आठवली एकदम. आमची अमेरिकन *हाउसहेल्प. मॅगी* ऐटीत येते. *स्वेट शर्ट-पँट* घालून. ती रखमाबाईंसारखी 'येऊ का वैनी?' म्हणून विचारत नाही दारातून. त्यांच्यासारख्या 'व्हाणा' दारात काढून हातपाय धुवून पण येत नाही. कधीकधी ती कारने येते. मला *'हाय डार्लिंग'* म्हणते आणि किटलीत पाणी उकळायला ठेवते. आमच्या कपाटातला कप काढते. *'वुड यू लाइक टू हॅव सम टी?'* विचारते. आणि कपात चहा ओतते. चहा पिऊन झाल्यावर कामाला लागते. मी खाली बसून 'च्या' पिणाऱ्या रखमाबाईंकडे पाहिलं. त्या *'हाय डार्लिंग'* कसं म्हणतील? असं वाटून हसूच आलं एकदम! त्या म्हणाल्या, ''काय सकाळ सकाळचं हसाया येतंय? सुट्टीवर आल्या म्हणून? ऱ्हावा आता इथंच! काय आजी?'' आजी हसली त्यांच्याकडे बघून. पुढे काय म्हणायचं ते न कळल्याने मी कधीकधी *ऑकवर्ड* होऊन हसते तशी.

रखमाबाईंनी मोठं कुंकू लावलंय. चालत आल्यामुळे ते घामाने फिसकटलंय. काचेच्या खुळखुळ



बांगड्यांखाली त्यांचा सुरकुत्या पडलेला हात आणि हातावर बांगड्यांच्या आतल्या बाजूला हिरवं निळं *डिझाइन!* आजी त्याला 'गोंदण' म्हणते. ते त्यांच्या आईनं जत्रेत एका माणसाकडून काढून घेतलं, त्या लहान असताना; तेव्हा त्यांना दुखलेलं, सुजलेलं. मग त्यांच्या आईनं तेल लावलं. मग तो टॅटू *पर्मनंट.* कायमचाच. मी रखमाबाईंना म्हटलं की, 'आमच्याकडे काम करणाऱ्या मॅगीला पण टॅटू आहे; पण रंगीत फुलपाखराचा!'

''अगं बाई, म्हंजे तिथल्या जत्रेतली फ्याशनच जनू!'' त्या म्हणाल्या.

रखमाबाई माझ्या लहानपणापासून कामाला येतात. म्हणजे मी बाळ



शब्द, सूर, भाव कथेतून एक चित्र उलगडावे । सौंदर्य त्यातले समजायाला, मन तरल हवे ।।
शुभेच्छुक - • श्री. कृष्णराव वाळिंबे, सातारा
• श्री. हेमंत जोशी, पुणे

अंतरात ज्ञानज्योत पेटवू आम्ही.
सर्वदूर ज्ञानवन्ही चेतवू आम्ही.

**अश्विनी गानू**
कन्सल्टिंग, ऑप्टोमेट्रिस्ट व ऑक्युलॅरिस्ट

**न्यू मॉडर्न ऑप्टिशियन्स्**
मापानुसार कृत्रिम डोळ्याचे निर्माते



११३०, सदाशिव पेठ, निंबाळकर तालमीजवळ,
पुणे ४११ ०३०.
फोन : ९१ ०२० २४ ४७ ७३ ७३,
मोबाईल : ९१ ९४ २२ ०० ७१ २५

**दहावीनंतरची शाखा निवड**
लेखक
विवेक वेलणकर

यंदा
दहावीची परीक्षा
देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
महत्त्वाचे आणि
आवश्यक पुस्तक

आत्तापर्यंत ८ वर्षात
२७ आवृत्त्या संपल्या

पुस्तकासाठी संपर्क
ए. आर. व्ही. इन्फोटेक
१२००, सदाशिव पेठ, लिमयेवाडी, पुणे -३०,
फोन नं. ९८५०६३८४८२/९८५००६३४८०
ई मेल :- vkvelankar@gmail.com

When it is dark enough, you can see the stars

**Happy Diwali**

**Anupam Enterprises**
Manufacturers of VSAT Antenna Mounts,
Transformer/Machinery Spares, Fabrications

**Office and Works**
**B-25, Salim Compound,**
**Marol Naka, Andheri (East), Mumbai - 400 059.**
**(M) 9820104492, Email : anuengin@rediffmail.com**

असल्यापासून. त्या मला पायावर ठेवून अंघोळ घालायच्या, तेव्हा मी खूप रडायची. त्यांच्या पसरलेल्या पायावर मावणारी मी आता मोठी झाल्ये, म्हणून त्यांना मज्जा वाटते. त्या आता नवं घर शोधताहेत. त्यांचं घर नदीजवळच्या वस्तीत आहे. खरं तर त्यांचं शेतपण आहे, लांब गावाला. तिथे खूप दिवस पाऊस नाही पडला. पाऊस नाही पडला म्हणून शेत नाही पिकलं. शेत नाही पिकलं म्हणून धान्य नाही आलं. धान्य नाही आलं मग बाजारात नाही विकलं. बाजारात नाही विकलं तर पैसे कसे मिळणार?

तीन वर्षं असंच झालं. तीन वर्षं म्हणजे खूप दिवस. खूप म्हणजे खूपच दिवस. तीन वर्षांत सगळंच बदलतं. त्यांचा मुलगा आणि सून गाव सोडून इकडे आले. ''नंदिनी आल्यावर घर भरलं जणू!'' रखमाबाई म्हणाल्या. ''नंदिनी कोण?'' मी म्हटलं, ''रखमाबाईंची नात'' आजी म्हणाली, ''नंदिनीला घेऊन या हो उद्या... खेळायला!'' आजीनी सांगितलं.

दुसऱ्या दिवशी पाऊस थोडा कमी झाला. मी *बिल्डिंगमध्ये* चक्कर मारायला चप्पल घालून बाहेर पडले. *लिफ्टचं* बटण दाबलं. डिंगडाँग करत लिफ्ट थांबली. दार सरकत उघडलं. *लिफ्टमध्ये* रखमाबाई आणि एक मुलगी. माझ्यासारखी; पण थोडी लहान. दोन वेण्या, लाल रिबिनी, कपाळाला टिकली आणि लाल *फ्रॉक*. लाल *फ्रॉक*... लाल *फ्रॉक!* त्याला सोनेरी बटणं. *फ्रॉकभर* सुंदर पांढरी फुलं... *फ्रॉक*.... माझ्या ओळखीचा... माझ्यासारखा... माझ्यासारखा? नाही...

माझाच! माझा *फ्रॉक*.!! बाबांनी लंडनहून एकदा माझ्या *बर्थडेला* आणलेला. *फ्रॉक*.... सोनेरी बटणं, जाळीजाळीची *कॉलर*, पाठीमागे मोठ्ठा बो... *फ्रॉक*वर पांढरी छोटीछोटी फुलं... आकाशातून तरंगत येऊन उतरणाऱ्या बर्फाच्या शुभ्र फुलांसारखी... माझा राजकन्येचा *फ्रॉक*.... आख्ख्या *स्कूलमध्ये* कोणाकोणाकडेच नव्हता, तो *फ्रॉक*.... तो *फ्रॉक*.... तो रखमाबाईंच्या शेजारच्या मुलीच्या अंगावर... मला काही कळेचना... पण बघत्ये ते खरं वाटे ना...!





मन सदैव रहावं निरामय, निर्मळ । नुकत्याच उमललेल्या फुलासारखं कोमल।।
शुभेच्छुक – • श्री. सुशील मसलेकर, पुणे
• श्री. विश्वास हर्षे, पुणे

Health is not Valued, till sickness comes.

# Padmini Enterprises

***Dealers in Pathological Instruments, Chemicals & Reagents***

**Address** : Office No. 113, Swamipuram, Wing 'C',2160 A, Sadashiv Peth, Near Dandekar Bridge, Pune - 411 030.

**Phone No.** : 020-24327533, Mobile No. : 9822113598 / 9850652562

## PRABODHAN

Avoid Electricity Board penal charges for low power factor by installing PRABODHAN make L.T. shunt capacitor.



PRABODHAN capacitors are available in three designs: MPP, MD, ALLPP- Impregnated with N-PCB oil.

PRABODHAN capacitors are tested and approved by CPRI, ERDA, Tariff advisory Committee and Electricity Boards - all over India.

# Seva Engineering Works Pvt. Ltd.

Post Box No. 822, Deccan Gymkhana, Pune - 411 004.

Tel : 020-24450363, 25531347 Telefax : 020 - 24455344

नंदिनी तिच्या आजीचा हात धरून बाहेर आली. मला घशात काहीतरी अडकल्यासारखं झालं. कानात गरमगरम आणि हात गार... रखमाबाई म्हणाल्या, 'चला आत...' मी तिथेच उभी राहिले. हे असं काय झालंय ते कळत नव्हतं. रखमाबाईंनी माझा *फ्रॉक* कसा नेला? माझ्या कपाटातला *फ्रॉक.* कपाटाची किल्ली आजीकडे. मागच्या मागे मी घरात गेले. आजीकडे धावले. आजी काय म्हणते ते पाहायला किचनपाशी गेले. आजी त्या मुलीकडे बघत हसली. ''छान दिसतोय *फ्रॉक*'' ती म्हणाली, 'म्हणजे... म्हणजे आजीनी *फ्रॉक* दिला? माझ्या कपाटातला *फ्रॉक*? एकदम छातीत धडधड होत कोंडलं... आपला हात धरून उभ्या असलेल्या माणसांनी न सांगताच उंचावरून ढकलून दिलंय आपल्याला *स्विमिंग पूलमध्ये* खोल खोल तसं वाटलं... नाकातोंडात पाणी जाऊन बुडतोय की, काय असं वाटेपर्यंत. मी खोलीचं दार धाडकन लावलं. आजी म्हणाली, ''अगंऽ नंदिनी आलीय बघ!''

मी उत्तर दिलं नाही. छातीत गच्चच गच्च झालेलं आणि नाकात सर्दीच सर्दी! डोकं गरम गरम वाफांनी भरल्यासारखं. मी उशीत डोकं खुपसलं. मनाच्या आत खूप दुखल्यासारखं खूप-खूप फसवल्यासारखं. आजीनी दिला *फ्रॉक* माझा. मी नसताना. या मुलीला. *हाऊ कुड शी?* मोठ्यांदा रडावंसं वाटूनसुद्धा रडू येईना. रागराग राग झाला. डोकंभर. अंगभर. छातीत राग कोंडता कोंडता मी पायातल्या चपला भिरकावल्या. कोपऱ्यात *न्यूजपेपरच्या* गठ्ठ्यातले कागदाचे बोळे चुरगळले. फाडले. फेकले. हात पाय झाडले. डोकं हलवलं. बेडवरची चादर खेचली. गुंडाळून चुरगळली. खोलीबाहेर आलेच नाही. जेवले नाही. बोलले नाही. मला मॉंकडे, *यूएसला* जावंसं वाटायला लागलं. का आले मी इथे! पुन्हा इथे येणार नाही! नाही म्हणजे नाही. कितीही बोलावलं तरी नाही. खूप खूप एकटं वाटता वाटता झोपूनच गेले. मी खोलीबाहेर आले, तेव्हा अंधार झालेला. आजीनं शेजवान *नूडल्स* केलेल्या आणि शिरा. तरी खावासा वाटेना. अंग ताप आल्यासारखं जडजड झालेलं. रात्री आजीनं जवळ घेतलं. मला तिच्याजवळ झोपावंसं वाटेचना. ती कोणीतरी वेगळीच होती. मला फसवणारी बाई. माझं स्वत:चं *बर्थ डे गिफ्ट* मला न विचारता दुसऱ्याला देऊन टाकणारी बाई. *व्हेरोनिका वॉज राइट! 'ग्रँडपेरेंट्स आर अ न्यूसन्स'* तेव्हा राग आला होता मला तिचा; पण खरंच ही बाई कोण मला न विचारता माझ्या कपाटाला हात लावणारी? मी घरात नाही बघून माझी वस्तू दुसऱ्याला देऊन टाकणारी? *दॅट वॉज नॉट हर बिझनेस.* राधाची *इंडियातून* येणारी *ग्रँडमा* राधाच्या खोलीत *नॉक* करून येते आणि ही माझी *ग्रँडमा,* असेल माझ्या वडिलांची आई; पण माझ्या *लाइफमध्ये* इतकी *इंटरफिअर* करते? *'शी हॅज टू बी केप्ट अवे फ्रॉम माय पर्सनल लाइफ'* असं वाटता वाटता एकदम माझ्या छातीत धडधडलं. मी आजीकडे पाहिलं. ती



या धरतीवरती माझी, रुजुनी नाती। माणूस माणसांवरती करू दे प्रिती।।
शुभेच्छुक – • श्री. आनंद कुलकर्णी, पुणे
• डॉ. अभय लिमये, पुणे

डोळे मिटून मला गोधडीवरून हळूहळू थोपटत होती. रात्रभर खूपखूप पाऊस पडत राहिला. मी गोधडी डोक्यावर घेऊनसुद्धा डोक्यात, कानात वाजत राहिला.

दुसऱ्या दिवशी मी उठले तर आजी गप्प गप्प होती. तिने खीर केली होती. केशर, वेलची, जायफळाची, माझ्या आवडीची आणि रखमाबाई आल्या नव्हत्या. ती कुकर लावत होती. खिरीचा मस्त वास येत होता. आणि काल मी रागाने जेवलेसुद्धा नव्हते. खिरीत चमचा बुडवत मी तिरक्या डोळ्यांनी आजीकडे पाहिलं. तर ती म्हणाली, ''पोटभर खा. तुझ्याचसाठी केलीय.'' मला एकदम कसंतरी झालं की, मी तिला 'फसवणारी बाई' म्हणाले. पण तिनं फसवलं होतंच मुळी. मी खीर खाऊन पुन्हा खोलीत जाऊन बसले. दार लावून 'स्पायडरमॅन' बनून बाहेर आले तर रखमाबाई किचनमध्ये बसलेल्या. साडी भिजलेली त्यांची आणि हाताला बँडेज. आजीनी त्यांना आल्याच्या चहाचा कप दिला. त्या म्हणाल्या, ''राहू द्या आजी; म्या घाशीन भांडी.''

आजी म्हणाली, ''काय तरी काय! मुळीच हात घालू नका पाण्यात चार दिवस!'' काय झालं म्हणून मला विचारावंसं वाटलं; पण बोलायला कसंतरी वाटतं होतं, असं ओठ गच्च मिटल्यासारखं. मग त्यांच्याकडे न बघताच दूध पिताना ऐकताऐकता कळलं मला की, पावसामुळे रखमाबाईंच्या वस्तीत नदीचं पाणी शिरलंय आणि सगळं सामान भिजलंय. म्हणजे चपला, कपडे, चादर, भांडी आणि रेडिओ. सामान हलवता हलवता त्या घसरून पडल्या आणि लागलं. त्यांच्या हाताला. म्हणून मग त्या कुठे राहाणार आता आणि मग त्यांची ती नंदिनी कुठे आहे, असं वाटलं एकदम. मग आजी आणि रखमाबाई बोलताबोलता कळलं एवढंच की, त्यांचा मुलगा काही काम करत नाही आणि पाणी आलं तर तो बसला होता कुठेतरी दारू पिऊन. मग रखमाबाईंनी नंदिनी, तिची आई आणि नंदिनीच्या तान्ह्या भावाला हलवलं स्वत:हून कुठेतरी. ''बसलाय म्हसोबा कुठे जाऊन!' रखमाबाई रागानं म्हणाल्या. कपाट उघडत, आजी म्हणाली, ''ही घ्या साडी रखमाबाई; ओलेत्यानं कशा राहाल?''

'नका नका देऊ आजी! वाळेल की अंगावरचं घडीभरात!' रखमाबाई म्हणाल्या. त्यांच्या हातात साडी कोंबत आजी म्हणाली, 'असू द्या! तुमचा माझा जीव वेगळा आहे का रखमाबाई?' पाठीमागे वळत पदरानं डोळे पुसत रखमाबाई म्हणाल्या, ''हवा तिथे पाऊस नाय... नको तिथे पडतोय!''

आजी म्हणाली, 'तसंच असतं बाई! तोंड द्यायचं आल्या दिवसाला. आपल्या हातात दुसरं काही नाही!'

रात्री आजी मला जवळ घेत म्हणाली, 'मी तुला विचारून *फ्रॉक* द्यायला हवा होता. तुला तो लहान होतोय, असं वाटलं. कपडे नव्हते तिला घालायला म्हणून दिला; पण तू मोठी झालीस हे लक्षात आलं नाही माझ्या आणि नुसतीच मोठी नाही, अमेरिकेतली मोठी झालीस हेच कळलं नाही मला. *सॉरी*, बरं का बाळा!' माझ्या गळ्यात कसंतरीच झालं.

मोठं होणं इतकं वाईट असतं का? असं वाटता वाटता, आजीचं *'सॉरी'* असं अध्येमध्ये मनात टोचता टोचता सुट्टी संपायला आली. नंदिनी पुन्हा खेळायला आली नाही. रखमाबाई नेहमीसारख्या 'हुश्श!' करून घरात खूप वेळ चहा पीत बसल्या नाहीत. आजीचं *कॅटरॅक्टचं ऑपरेशन* झालं. बाबा मला घ्यायला आला. आजीच्या डोळ्यांवर काळा चष्मा आला. ''पोरीसाठी गोधडी घालायची राहिली...'' आजी रखमाबाईंना म्हणाली. *ऑपरेशनमुळे* आजी *गॅसजवळ* गेलीच नाही. शंकरपाळ्या आणि चुरमा लाडू रखमाबाईंनीच बनवले. मी जाता जाता नेहमीच येणारं आजीच्या डोळ्यातलं पाणी तिच्या चष्म्यामुळे मला दिसलं नाही. *बॅग* तर आत्यानंच येऊन भरली. खूप खाऊ, पुस्तकं, नवे *ड्रेसेस!* रखमाबाईंच्या हातात 'स्वस्त धान्य दुकान'ची जाड जाड पिशवी. म्हणाल्या, 'हे घ्या सोनूबाई!'

मी म्हटलं, ''काय हे?'' तर म्हणाल्या, ''उगं आपलं काय तरी!'' मी त्यांचं कायतरी पिशवीतून बाहेर काढलं. रंगीबेरंगी कायतरी. तुकड्यातुकड्यांनी जोडलेलं. मी बघतच राहिले... हिरवे, जांभळे, खणाचे, गुलाबी, बुट्ट्यांचे, एकमेकांना नीट जोडलेले सुंदर सुंदर तुकडे. आतल्या बाजूला आजीची साडी. आजीनं परवा रखमाबाईंना दिलेली. मी तिच्यावरून हात फिरवला. गोधडी... जाडुली-जडुली...

रखमाबाई म्हणाल्या, 'हाये ना जागा ब्यागेत? तशीच ठेवली साडी आजीची. तुझ्या गोधडीसाठी. पांघर बरं का रोज... चांगली मोठ्ठी घातल्ये...' मी गोधडी *बॅगेत* खाली नीट ठेवून दिली.

आता इथे विंटर सुरू झाला आहे. दुपारीच अंधार व्हायला लागतो. माझ्या खोलीच्या खिडकीतून मी बाहेर बघते. लांबच्या घरातले पिवळे दिवे पेटतात. आकाशातून बर्फाची पांढरी फुलं हळूहळू खाली यायला लागतात. माझ्या *फ्रॉकवरच्या* फुलांसारखी. आता तो *फ्रॉक* माझा नाही. पाय गार पडता पडता मी गोधडी ओढून घेते.

गोधडी म्हणजे गोधडी.



गोधडी म्हणजे *क्विल्ट* नाही. रखमाबाई म्हणजे कोण ते मला व्हेरोनिकाला सांगता येत नाही. बर्फानं जमीन भरून जाते. पाय, गुडघे, छाती, गळ्यापर्यंत बर्फ साचता साचता मी अंगभर गोधडी गुंडाळून घेते. आता मला थंडी वाजत नाही. मी मोठी झाले का ते मला कळत नाही; पण आता मला खोलीत झोपायला एकटं वाटत नाही.

**– स्वाती राजे**
२७/९२ सागर सोसायटी, वाकडेवाडी,
पुण-मुंबई रस्ता, पुणे 411003

**चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे**



कळसावरती हेमझळाळी, खाली फुलांचा सडा। आशेच्या किरणांनी द्रवते हिरवी काळीजकडा।।
शुभेच्छुक – • श्री. अतुल कडूसकर, पुणे
• श्री. विनय गडीकर, पुणे

*Wish you a very*
*Happy Diwali*

**Vinayak Polymers Industries**

# 2, Vighnahar Chambers, Opp.
Telephone Exchange, Karve Road,
Erandawane, Pune - 411 004,
Mobile: 9822192885
Phone: 020-25459218, 32922958,
25389179, 30220916,
Telefax: 020-25459218
E-mail
vinaykpolymerrindustries@yahoo.com

Everthing must be made as simple as possible but not simpler

Avinash Musale - 9850079738
Akshay Musale - 9011043499

**PRABHA ENTERPRISE**

*MFG's of automobile components and machine tools. All type of bar turning job works. Spare capacity on CNG SLIDING HEAD & CNC TRAUB*

1325/13, Shivaji Udyam Nagar
Kolhapur- 416234
Contact - 0231 6681336

*Wish you a very Happy Diwali !!*

Shree
Multi Sticks & Labels Pvt. Ltd.
Our Label Establish Your Identity

MANUFACTURER OF
***Product Label, Barcode Labels, Pharma Labels, Food Label, Personal Care Lable***

DEALERS IN
***Barcode Printer, Scanner, Thermal Transfer Ribbons***
***M 9890273970 / 9822468634***
***Email -shreemultiservices@yahoo.com***
***pramoddongre@shreemultiservices.com***

# तिचा रिकामा डबा...

– रेणू दांडेकर



आजूबाजूच्या गावांतून मुलं शाळेत यायची, त्या सगळ्यांचीच परिस्थिती यथातथा होती. घरातले नि शाळेतले कपडे एकच. म्हणजे घरातही खाकी पँट व पांढरा शर्ट आणि बाहेरही तोच. मुलींचंही तेच होतं. हे मला आधी कळलं नाही. कळणार कसं? समजूनच घेतलं नाही. जेव्हा असा विषय पुढे आला की, 'शाळेला गणवेश नको,' तेव्हा मात्र अनेकांना हे पटलं नाही. गणवेश घालूनच मुलं यायची. एक मुलगी म्हणाली, 'गणवेश असलेला बरा. रोज काय घालायचं प्रश्न नसतो,' तेव्हा कळलं, आपल्याकडे असतात तसे वेगवेगळे कपडेच या मुलांकडे नाहीत.

अशीच एक मुलगी शेजारच्या गावातून शाळेत आली; आधी येत नव्हती, नंतर यायला लागली. मला वाटलं, आपला प्रभाव! पण असं नव्हतं. तिच्या आईशी बोलताना कळलं, ''म्होप (पुष्कळ) हुशार आहे ती. घरात, रानात, उन्हातान्हात काम करण्यापेक्षा शाळा बरी असा इचार केला असंल तिनं...'' पायात चपलांचा पत्ता नव्हता. चणीनं बारीक. वेण्या क्वचित वर बांधायची; कारण काळ्या रिबिनी नव्हत्या. उन्हातान्हात, लहान वयात काम करावं लागतं, ही तिची वेदना, दु:ख.

लहानसा डबा घेऊन शाळेत यायची, सगळी मुलं वर्गात जेवायची नि आमच्यापैकी कुणी आलं बघायला, तर डबा झाकून घ्यायची; कारण डब्यात नाचणीची भाकरी आणि चटणी, पोळा (बेसनपिठाचं धिरडं वा घावन) यापैकी काहीतरी असायचं डब्यात. कुणीतरी म्हणालं, ''स्वत:च्या डब्याची त्यांना लाज वाटत असेल. नको जायला वर्गातून,''

'मुलं बारकुडी आहेत. पोटभर जेवतात की नाही? डबा पुरेसा आणतात ना?' हा त्यामागचा माझा विचार होता. मला कुठं त्यांची गरिबी समजली होती! मी येतेय, म्हटल्यावर मुलं स्वत:चा डबाच झाकून घ्यायची.

त्या दिवशी मी तिला म्हणाले, ''आज मी तुझ्या डब्यात जेवणार.''

''नको मॅडम, काहीतरीच काय?''

''मला आवडते नाचणीची भाकरी,'' मी म्हटलं.

''मी तुमच्यासाठी घरची आणेन चांगली,'' ती म्हणाली. ''डब्यात घरचीच आणतेस ना? मग चालेल मला...''



सर्वांच्याच सुखासाठी झटूया जरा। त्यातच आपल्या सुखाचा दिसेल झरा।।
शुभेच्छुक – • सौ. अपर्णा आशीर्वाद बोंद्रे, डोंबिवली
• सौ. आश्विनी साने, डोंबिवली

मी असं म्हटलं, तरी तिनं दाद लागून दिली नाही. डबा घेऊन बाहेर धावली. मला वाटलं, संकोचानं असं झालं असणार! दोन दिवस मधे गेले. जेवणाच्या सुट्टीच्या आधी पी.टी.चा तास होता. सगळी मुलं वर्गाबाहेर गेली होती. मी हळूच हिच्या दप्तरात डब्याचा शोध घेताना डबा हलवून पाहिला. काहीच आवाज येईना. पातळ काही असलं तर सांडेल, तेव्हा उघडून पाहू असा विचार केला. डबा उघडला. तर डबा घासल्यासारखा! इतक्यात एक मुलगी काहीतरी न्यायला वर्गात आली. मला पाहून थबकली.

''ये ये. आत ये. आज ही लवकर जेवली का?'' मी विचारलं; पण ती काही बोलेना. आधीच्या सुट्टीत जेवायचं नाही असा नियम होता. तिला वाटलं, मी रागावेन.

मी म्हणाले, ''अगं, रागवत नाही. एखादे वेळी भूक लागते; म्हणून विचारलं...'' ती रडायलाच लागली.

''हे बघ रडू नकोस. तू सांगितलंस म्हणून ती रागावेल का तुझ्यावर? मी समजावेन तिला...'' तरी ती बोलेना.

मग म्हणाली, ''मॅडम... मॅडम... तिचा डबा रिकामाच असतो. कधीकधीच ती जेवते आमच्यात...''

रोज रिकामा डबा आणणारी नि तरीही हसतमुख असणारी ती! चुणचुणीत! एवढीशी! धावायची तर अशी की, बघता बघता झाडीत दिसेनाशी व्हायची! रिकाम्यापोटी हिचं लक्ष कसं लागणार नि अभ्यास तरी कसा होणार! मला कळलंच नसतं, तर कदाचित मी तिला रागावले असते, चिडले असते... 'वह्या, पुस्तकं सगळं कसं करत असेल?' मी सुन्न होऊन वर्गाच्या



बाहेर पडले. ठरवलं, हिच्यासाठी एकेकानं डबा आणू, तिच्या डब्यात भरून ठेवू. पहिल्याच दिवशी ती डबा घेऊन आली.

''माझ्या डब्यात कुणीतरी चपाती, भाजी ठेवलीय. मी... मी तर रोज भाकरी आणते...'' असं ती म्हणाल्यावर मी म्हणाले,

''मग ही चपाती मावली कशी तुझ्या डब्यात? कारण...''

'तुझा डबा रिकामा असतो,' असं मात्र मी म्हणाले नाही... कुणीतरी दिलेलं तिनं खाल्लं नाही. 'गरिबीत स्वाभिमानही असतो' हे वाचलं होतं; आता अनुभवत होते.

कधी हजर, कधी गैरहजर; कधी मध्येच दिसेनाशी होणारी ती दहावी नापास झाली. तिला विचारलं, ''काय करशील आता?''

''रानात कामाला, कुणाच्या दाराशी...'' तिनं सहज उत्तर दिलं नि तिला आम्ही आमच्याच घरी आणलं. मुलांची ती लाडकी ताई झाली. मी शाळेत गेले की, घरी मासे आणून सर्व मंडळी खाऊ लागली. एक दिवस मी अचानक घरी आले. वास काय लपतोय का? तिला रडू फुटलं.

''पुन्हा नाही करणार! चुकले मी!'' असं म्हणून तिनं दोन हातात तोंड लपवलं.

''रोज नाही आणायचे मासे. कधीतरी आणून

करत जा! आता चव कळलीय. चव भागली नाही की, चोरावंसं वाटतं,'' मी म्हणाले.

त्यावर म्हणाली, ''तुम्हाला कशाला माहीत असेल! मी रोज रिकामा डबा आणायचे; एकदा डब्यात कोणीतरी चपाती ठेवली. मी खाल्ली नाही. मैत्रिणी द्यायच्या, खायचे; कारण त्यात दया नाही तर प्रेम होतं. तुम्हीच सांगायचात ना, 'तुम्हाला हात दिलेत. काम करा, दया-भीक घेऊ नका.' आता मी काम करतेय...''

तिला काय माहीत, मी तिचा रिकामा डबा पाहिला होता ते! कदाचित म्हणून तिच्यातला स्वाभिमान, चांगुलपणा मला जाणवला नाही; वर्गातल्या अनेकांपैकी ती एक!

पुढे तिनं आरोग्य प्रकल्पात उत्तम काम केलं. *फॅमिली प्लॅनिंगचे* काम करताना बायका घरी असायच्या वेळा गाठून ती बोलायला जायची.

आता तिचं लग्न होऊनही बराच काळ लोटलाय. कदाचित मुलांना माहीतही नसेल आईनं दिवस कसे काढले ते! मुलगा *इंजिनिअर*, मुलगी *फॅशन डिझाइन* करतेय. तिच्यावरही सुखाची साय आलीय. एका कार्यक्रमात मुलांना घेऊन मला भेटायला आली. स्वच्छ पांढऱ्या छान कपड्यातील गोंडस मुलं पाहताना मला लहानपणीची ती दिसत होती. म्हणाली,

''एवढं शिकले म्हणून पोरं काय करताहेत ते तरी कळलं. अजून शिकले असते तर पोरांचं ऐकून घ्यावं लागलं नसतं...''

मी तिच्यासमोर तिच्या मुलांना म्हणाले, ''तुमच्या आईला जे कळलं ते मलाही कळलं, नाही. लाड करा आईचे...''

मनात म्हणाले,

''तुझा रिकामा डबा आठवतोय. आता तो काठोकाठ भरून गेलाय गं!''


**– रेणू दांडेकर**

मु. पो. चिखलगाव, ता. दापोली, जि. रत्नागिर

**चित्रकार : चित्रांजली**


---

**पाहूया संवेदनशीलतेचा पैलू दर्शवणारी ॲनिमेटेड शॉर्ट क्लिप**

# असंही जगणं असतं!

**– हेरंब कुलकर्णी**

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

किती छान जग आहे तुमचं!

एक तर तुमच्या आई-वडिलांना तुम्ही एकुलते एक किंवा तुम्ही फारतर दोघे बहीण-भाऊ!

त्यामुळे तुमच्या सर्व आवडीनिवडी पूर्ण होतात. कोणतेच दुःख तुमच्या वाट्याला येऊ नये म्हणून तुमचे पालक जास्तीतजास्त काळजी घेतात. गरिबी, दुःख, झोपडपट्टी, दैन्य असे काहीच तुम्हाला दिसणार नाही, यासाठी ते सतत तुम्हाला सुख दिसेल अशाच ठिकाणी नेतात. सुंदर बागा, *मॉल्समध्ये* घेऊन जातात; चित्रपट दाखवतात. आइस्क्रीम पार्लरमध्ये नेतात; त्यामुळे साहजिकच 'हे सगळे जग खूप सुंदर आहे,' असंच तुम्हाला वाटत असेल ना!

मुलांनो, पण तुमच्या या जगापेक्षा आणखी वेगळं जग असतं. ते जग देखील तुम्ही माहीत करून घ्यायला हवं. तुम्ही रोज छान जेवता, जे पदार्थ आवडतील ते खाता. पण या जगात




गप्प राहाणं, प्रत्येकवेळी बरं नसतं बाई। बोलण्यातून बहरून येते, बोलण्यातली रुजवाई।।

शुभेच्छुक – • श्री. राम गद्रे, पुणे • श्री. राहुल कर्णे, पुणे

अशीही लाखो मुले आहेत, जी मुले रोज नीट जेवूही शकत नाहीत. तुम्हाला घरात - शाळेत शुद्ध पाणी मिळते; पण या जगात अशी लाखो मुले आहेत, ती मुले शुद्ध पाणीही पिऊ शकत नाहीत. तुम्ही छान मजबूत बांधलेल्या घरात राहाता; पण भटक्या-विमुक्तांच्या कुटुंबात राहाणारी अशी हजारो मुलं आहेत की, जी पालावर राहतात आणि पालाबाहेर उघड्यावर झोपतात. ही मुले उघड्यावर अंघोळ करतात. तुमच्या कपड्यांच्या कपाटात नक्कीच अनेक प्रकारचे कपडे असतील; पण केवळ दोन *ड्रेस* घालणारी शेकडो-हजारो मुले-मुली आहेत. काही मुले तर अगदी एक *ड्रेस* ओला झाला, तर उघडे राहून वाळवतात आणि पुन्हा तेच घालतात. हे वाचून तुम्हाला वाईट वाटेल किंवा तुमच्यापैकी अनेकांना हे खरंही वाटणार नाही.

पण माझ्या मित्र-मैत्रिणींनो, अशी अनेक मुले आहेत, त्यांचं जगणं मी तुम्हाला सांगतो! तुम्ही साखर खाता ती साखर कारखान्यात बनते. त्या काळात ऊस तोडायला लाखो ऊसतोड कामगार महाराष्ट्रातील विविध साखर कारखान्यांवर जातात.



त्यांच्यासोबत त्यांची हजारो मुले असतात. या साखर कारखान्यांवर राहण्याची विशेष सोय नसते. हे लोक तिथे कापडी झोपड्या करून राहातात. दिवाळी ते मे महिना या काळात हे लोक तेथे राहातात. या दिवसांत सुरुवातीला तिथे खूप थंडी असते. थंडीत कुडकुडत झोपावं लागतं. फारसे उबदार कपडे त्यांच्याजवळ नसतात. आई-वडील पहाटे कामाला जातात. मुले एकटीच झोपलेली असतात तिथे. सकाळी ती उठतात, पाणी तापवतात; अंघोळ करतात आणि आईने केलेले जेवण घेऊन खातात. कधीकधी त्या झोपडीस आग लागते. कधीकधी मुलं एकटीच खेळताना रस्त्यावर जातात आणि तेथून जाणाऱ्या ट्रकखाली सापडून मुलं मरतातही कधीकधी. सकाळी खूप घाई असल्यामुळे आई जेमतेम भाजी-भाकरी करते. त्या ऊसतोडीच्या फडावर शाळा नसते. असली तरी खूप लांब असते; त्यामुळे शाळेत जाता येत नाही. असंही बालपण असतं, याची कल्पना आहे का तुम्हाला?

काही मजूर वीटभट्टीवर कामाला जातात. तिथेही केवळ विटांच्या छोट्या खोल्या बांधलेल्या असतात. तेथील विटांची धूळ विषारी असते. त्या धुळीत मुलं मळून जातात. कष्ट करणारे आई-वडील दमून जातात. पोटभर जेवण मिळत नाही. ही भट्टी गावाबाहेर असते; त्यामुळे शाळा खूप दूर असते; त्यामुळे ही मुलंही शाळेत जाऊ शकत नाहीत. तुमच्या घराच्या आजूबाजूला कितीतरी इमारती बांधल्या जात आहेत. उंच इमारती बघायला सुंदर दिसतात; पण या इमारती कशा बनतात, याची कल्पना आहे का मुलांनो तुम्हाला? ते कामगार दूर कुठून तरी बंगाल, ओरिसामधून आलेले असतात. तिथेच कामावर पत्र्याच्या खोल्या बांधलेल्या असतात. त्या

बांधकामाच्या दगड आणि सिमेंटच्या प्रदेशात वाट काढत उघडीनागडी मुलं फिरत असतात. दगडखाणीत अनेक मजूर दगड फोडत असतात. त्यांच्या मुलांनाही शाळा नसते.

तुम्ही कधी हॉटेलमध्ये मुलांना काम करताना बघितलं असेल ना? भारतात अशी लाखो मुलं आहेत. ज्यांना शाळा सोडून अशाप्रकारे काम करावं लागतं! अगदी बालमजूर विरोधी कायदा असला तरी! या लेकरांना अनेक तास खूप कष्टाची कामं करावी लागतात. कधी कधी हमालीही करावी लागते.

तुम्हाला खरं तरी वाटेल का? पण तुमच्या वयाच्या लहान मुलींची लवकर लग्ने होतात. ज्या वयात तुम्ही खेळता, त्या वयात या लहान मुली मोठ्या वयाच्या महिलांसारख्या राहतात. ज्या वयात त्यांनी खेळायचं, त्या वयात या मुली त्यांच्या लहान मुला-मुलींना खेळवतात.

हे सारं तुम्हाला खोटं वाटावं, इतकं खरं आहे! मेळघाटात तर अनेक मुले कुपोषणाने मरतात. कुपोषण म्हणजे पुरेसे खायला मिळत नाही म्हणून लहान मुलांचे मरण ओढवते. काही मुलं तर जन्मतःच मेलेली असतात. एकीकडे



तुमची आई तुम्ही सारखं खावं, म्हणून तुमच्या मागे लागते आणि इथे खायला काहीच नाही म्हणून लहान मुलांचा मृत्यू होतो...

असे खूप सारे प्रश्न आहेत. तुम्ही सुखात जगताना तुमच्याच वयाच्या मुलांची ही दुःखे दूर करायला तुम्ही काय करू शकणार आहात, सांगा बरं? किमान ही मुलं जिथं राहतात, तिथं तुमच्या आई-वडिलांसमवेत भेट तरी द्या आणि मग ठरवा तुम्हाला काय करता येईल!

**- हेरंब कुलकर्णी**

herambkulkarni1971@gmail.com

**चित्रकार :चित्रांजली**

---

# संवेदनशीलता आणि वैद्यकीय व्यवसाय

**- डॉ. वर्षा दंडवते**

'गेला दीड महिना आईच्या तब्येतीत काहीच सुधारणा नाही डॉक्टर, तिचा *व्हेंटिलेटर* बंद करावा का?' किंवा

'तुमच्या पायाला *गँग्रीन* झालं आहे; तो पाय काढावाच लागेल, माझा नाइलाज आहे; नाहीतर हे दुखणं तुमच्या जिवावर बेतेल.' किंवा

'तुम्ही *सिझेरियनला* उशिराच परवानगी दिलीत, आम्ही बाळ नाही वाचवू शकलो!'

अशी अनेक वाक्यं तुम्हाला कोणत्याही *हॉस्पिटलमध्ये* दररोज ऐकायला मिळतात. वैद्यकीय व्यवसायाखेरीज माणसांच्या भावनांशी इतका जवळून संबंध येणारा दुसरा कुठलाच



माणसांचा समुद्र भोवती, हेच धन आहे। मीपण सोडणं, माणसं जोडणं, हेच जगणं आहे ।।

शुभेच्छुक - • श्री. विकास देशपांडे, सातारा
• श्री. शैलेश देवी, सातारा



व्यवसाय नसेल. माणसाच्या आयुष्यातले जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व रंग डॉक्टर अतिशय जवळून आणि संवेदनशीलतेने पाहात असतो; पण मानवी भावनांच्या गुंत्यात डॉक्टरांना स्वत: गुंतून राहून चालत नाही.

डॉक्टर या व्यक्तीमध्ये संवेदनशीलता असते, म्हणून तर तो रुग्णाची सहवेदना जाणू शकतो आणि सहवेदना जाणणारा डॉक्टरच त्याच्या रुग्णावर सहृदयतेने उपचार करू शकतो. फक्त 'डॉक्टर' ही व्यक्ती सततच 'संवेदनशील' अवस्थेत राहिली, तर ती तिचं काम व्यवस्थित पार पाडू शकणार नाही. रुग्णांच्या वेदनांची जाणीव तर हवी; पण त्यांच्या कणवेत बुडून तर नाही जायचं! रुग्णाला बरं करण्यासाठी काही कठोर निर्णय खंबीरपणे घ्यायचे; पण स्वत:चं मन विचलित होऊ नाही द्यायचं! अशी ही तारेवरची कसरत असते. रोजच्या कामांत वेगवेगळ्या वृत्तीच्या, स्वभावाच्या, संस्कारांच्या, सामाजिक पातळीच्या, विचारांच्या अनेक माणसांशी डॉक्टरांचा संबंध येतो. सर्वांना त्या-त्या परिस्थितीत समजून घेऊन त्यांच्याशी वागावं लागतं; त्यामुळे डॉक्टरांना 'संवेदनशीलता' जागृत ठेवून संयमाने संवाद साधत आपलं कर्तव्य पूर्ण करायचं असतं.

डॉक्टरांच्या संवेदनशीलतेची काही उदाहरणंच द्यायची झाली, तर लहान मुलांच्या *ऑपरेशनच्या* आधी *ऑपरेशन* थिएटरबाहेर त्यांच्याशी ५ मिनिटे खेळणारे *पिडियाट्रिक सर्जन* मी पाहिले आहेत. लहान मुलांचे *ऑपरेशन* करून त्यांना बाहेर आणल्यावर त्यांच्या बेडवर प्रेमाने एखादं खेळणं ठेवून देणं, *ऑपरेशनसाठी* बाळ उपाशी म्हणून स्वत:ही उपाशी राहणाऱ्या आई-वडिलांना आवर्जून चहा-बिस्किटं खायला लावणं, या सर्व बारीकसारीक गोष्टी 'संवेदनशील' डॉक्टरच करू शकतात. अतिदक्षता विभागातील *पेशंटची* मृत्यूशी सतत झुंज चालू असते. अशा वेळी कदाचित तो रुग्ण वाचणार नाही, याची कटू जाणीव योग्य, तरीही मृदू शब्दांत रुग्णाच्या जवळच्या नातेवाइकांना डॉक्टरांनी करून द्यायची असते. आणि रुग्णाच्या शेवटच्या श्वासापर्यंत डॉक्टरांनी प्रयत्नही चालू ठेवायचे असतात. इथे त्यांच्या संवेदनशीलतेची कसोटीच असते.

सण, उत्सव, साजरे करतानाही एखादा रुग्ण अत्यवस्थ असेल किंवा रुग्णाची सुधारणा अपेक्षेप्रमाणे होत नसेल, तर डॉक्टरही अस्वस्थ असतात, हे सामान्य माणसांना कळत नाही. 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकटले...' अशीच काहीशी डॉक्टरांची मानसिकता असते.

डॉक्टर-रुग्ण हे नातं माणुसकीचं गहिरं नातं असतं, त्याला धर्म, जात, देश, वंश ही कुंपणं आड येत नाही. डॉक्टर आपलं ज्ञान, कौशल्य पणाला लावून आपलं काम करत असतात आणि स्वत:चं वैयक्तिक दु:ख, आनंद, अडचणी बाजूला सारून रुग्णाला बरे करण्याचं व्रत ते पाळतात. ते त्यांची संवेदनशीलता जागृत असते म्हणूनच ना!

आजार गुंतागुंतीचा होऊन रुग्ण दगावल्यास

जरूर पाहा : www. nationalgeographic.com निसर्ग, वन्यजीव यांविषयी माहिती, फोटो

शुभेच्छुक - • सौ. मधुरा जोशी, डोंबिवली
• डॉ. सुखदा कुलकर्णी, पुणे

प्रत्येक वेळी 'डॉक्टरांचा हलगर्जीपणा' हेच कारण कसं असू शकेल? तसं असतं तर डॉक्टरांचे जवळचे नातेवाईक कधीच मृत्यू पावले नसते; पण दुर्दैवाने आज समाज हे लक्षात न घेता डॉक्टरांवर हल्ले करताना दिसतो आहे. हे वाढत गेल्यास याचा परिणाम डॉक्टरांची संवेदनशीलता कमी होऊन 'डॉक्टर-रुग्ण' हे गहिरं नातं 'सेवादाता-ग्राहक' असं कोरडेपणाचं होण्याची शक्यता वाटते. 'डॉक्टर भरपूर पैसे उकळतात' असं काहींना वाटतं; पण कितीतरी डॉक्टर गरीब रुग्णांना स्वत:हून पैशात सूट देतात - ते त्यांच्या संवेदनशीलतेमुळेच ना?

थोडक्यात काय, 'संवेदनशीलता' ही वैद्यकीय व्यवसायाची अविभाज्य; पण काहीशी अव्यक्त बाजू आहे. म्हणूनच तर प्रत्येक डॉक्टरची नेहमी हीच प्रार्थना असते.

**'न त्वहम् कामये राज्यम्, न स्वर्गम्, नापुनर्भवम् ।**
**कामये दु:खतप्तानाम्, प्राणिनाम् आर्तिनाशनम् ।।'**

अर्थात 'मला राज्याची अपेक्षा नाही, स्वर्गप्राप्तीची नाही वा पुनर्जन्माचीही नाही. फक्त वेदनांनी तळमळणाऱ्या जीवांचं दु:ख नाहीसं करण्याचं बळ मला दे!'


रुग्णाप्रती असलेल्या संवेदनक्षमतेचं हे यथार्थ मागणंच नाही का?

**- डॉ. सौ. वर्षा दंडवते**
बी - १०३, सत्यम कॉम्प, स्टेशन रोड, नालासोपारा (प.)
वसई, पालघर 401203

**चित्रकार : राहुल देशपांडे**

## 'विश्वाचे आर्त'

## संदेश



संवेदनशीलता हा मनाचा गुणधर्म आहे. डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा या पंचज्ञानेंद्रियांच्या द्वारे विश्वातील वनस्पती, प्राणी, माणसं या सर्वांच्याच सुख-दु:खाच्या भावना आपल्या मनापर्यंत पोहोचत असतात. या भावनांना आपल्या मनाने दिलेला प्रतिसाद म्हणजे संवेदनशीलता! पावसात भिजणाऱ्या कुष्ठरुग्णाला पाहून करुणेने व्याकूळ झालेले, त्याची सेवा करणारे आणि त्यातून पुढे आनंदवन स्थापन करणारे बाबा आमटे, त्याचप्रमाणे अंगावर पुरेसे वस्त्र नाही म्हणून सभेला न आलेली गरीब स्त्री पाहून, जन्मभर पंचा नेसण्याचा निर्धार करणारे म. गांधीजी ही संवेदनशीलतेची मूर्तिमंत उदाहरणेच आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 'मला काय त्याचे' हा लेख प्रसिद्धच आहे. आपल्या समाजाच्या 'मला काय त्याचे' या प्रवृत्तीवर तो नेमके बोट ठेवतो. पलीकडे आग लागली - मला काय त्याचे? रस्त्यात अपघात झाला - मला काय त्याचे? सांगली, कोल्हापुरात पूर आला - मला काय त्याचे? अशा विचाराने आपली मने बथ्थड बनली आहेत! आपल्या जाणिवा जागृत होवोत. 'विश्वाचे आर्त' आपल्या मनी प्रकटो, संवेदनशील बनो हीच प्रार्थना!

**- श्री. मोहन गुजराथी** (ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ)

**ऐकूया - संवेदनशीलता व्यक्त करणारा अनुभव सांगत आहेत, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. डॉ. स्वर्णलता भिशीकर!**

**पाहूया - संवेदनशीलतेचा आयाम उलगडणारे विचार मांडलेत, ज्येष्ठ मानसज्ञ मा. डॉ. अशोक निरफराके यांनी!**



दुसऱ्याच्या दु:खे दुखवावे, परसंतोषे सुखी व्हावे । प्राणिमात्रास मेळवून घ्यावे, बरव्या शब्दे ।।

शुभेच्छुक - • चि. अंजिश अमित पराळे, पुणे - दिवाळीच्या शुभेच्छा!
• सौ. आसावरी सतीश बापट, पुणे

**PAN INDIA - FULL SERVICE - GLOBAL LOGISTICS**

**ATC Global Logistic PVT. LTD.**

**AEO Certified Organisation**

**Corporate Office :** 901 Peninsula Towers, Ganpatrao Kadam Marg,
Lower Parel (West), Mumbai-400 013. India,
Tel : 91-22-6651 3000 (1000 Lines) Fax : 91-22-6654 1556 / 57,
Email:atc@atc.co.in/www.atc.co.in

# ATC GROUP AT A GLANCE

**20 Offices In 15 Indian Cities**
**Group Staff Strength : 300 + Employees**
**Established : 1957**

## SALIENT FEATURES

- Licensed Custom Broker
- IATA Air Cargo Agent
- ICEGATE Registered
- FMC (USA) Registered NVOCC & OTI
- On the Approved List of Leading Banks
- Licensed Multimodal Transport Operator
- Custom Approved Air & Ocean Consolidator
- Advance Manifest Filing
- Joint Stock Company With All Working Directors
- Illustratious Clientele

## REPERTOIRE OF SERVICES

- Custom Broker
- International Freight Forwarder
- NVOCC : Service Contracts - Rate Agreements
- Over Dimension Cargo
- Road Transport / Own Trucks
- Forklift & Crane Hire
- Air Cargo Agent
- Groupage / Consolidation : Air - Sea
- MTO : DDP / DDU
- Warehousing & Distribution
- Packing & Palletisation
- FCL Consolidation For Single Supplier

## Branch Offices

**Pune I - City, Pune II - Law College Road, Panvel, Nashik, Aurangabad, Kolhapur, Belgaum, Hyderabad, Ahmedabad, New Delhi, Chennai, Kolkata, Bengaluru, Indore, Tuticorin & Gandhidham**

## GLOBAL LOGISTICS SOLUTIONS

# स्नेहल अश्रू

– मृणालिनी चितळे



**ब**हुतेक वेळा राग, उद्वेग, दु;ख, तिटकारा या भावनांचा अतिरेक झाला की, डोळ्यातील पाण्यातून झरत राहातो; परंतु कधीकधी मात्र हेच अश्रू धीर देणारे असतात. आशेचा किरण दाखवणारे असतात. अपयश पचविण्याचे बळ देणारे असतात आणि यश साजरे करणारेही असतात. हे लिहिताना डोळ्यासमोर आली यावर्षी जगज्जेतेपणाचा मान मिळविणारी बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू. गेली दोन वर्षे अंतिम फेरी गाठूनही यश तिला हुलकावणी देत होतं. २०१७ साली तर जपानच्या ओकुहराशी तब्बल ११० मिनिटे निकराची लढत देऊनसुद्धा, तिला हार पत्करावी लागली. त्याच ओकुहराला हरवून तिनं सुवर्णपदक मिळवलं. नेहमीच्या प्रथेप्रमाणे ते स्वीकारताना भारतीय राष्ट्रगीताची धून वाजू लागली. ते ऐकताना सिंधूला डोळ्यातलं पाणी आवरता आलं नाही. तिलाच नाही तर हा सोहळा दूरदर्शनवरून पाहणाऱ्या असंख्य क्रीडाप्रेमींनाही. त्यामध्ये सिंधूविषयीचे कौतुक होते आणि आपण भारतीय असल्याचा अभिमानही.

खरंच अश्रू हे माणसाच्या संवेदनशील वृत्तीचे प्रतीक आहेत. स्थल, काल, जातिधर्म याच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपण्याची, शब्दांवाचून बोलण्याची किमया त्यांच्यामध्ये सामावली आहे. कधी अंदमानला सावरकरांच्या कोठडीसमोर नतमस्तक होताना डोळे भरून येतात. ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्याच्या आठवणीनं डोळ्यांत उभे राहतात, तर कधी युद्धभूमीवर शहीद झालेल्या जवानासाठी, त्याच्या कुटुंबियांसाठी ओघळतात. ते अन्यायाबद्दलची चीड व्यक्त करणारे असतात, सांत्वना देणारे असतात. जगण्याचं बळ वाढवणारे ठरतात. माणूसपणाचं नातं जोडणारे असतात. परंतु या माणूसपणाला आव्हान देणारा एक समज आपल्या समाजात वर्षानुवर्ष रुजला आहे. त्यापायी पुरुषानं चारचौघांत अश्रू ढाळणं, हे त्याच्या नामर्दपणाचं लक्षण समजलं गेलं आहे. आणि एखाद्या दु:खद प्रसंगी स्त्री जर डोळ्यातून टिपं न गाळता वागली तर तिला पाषाणहृदयी



संवाद साधतांना, माझ्या मुक्या मनाशी...। तूही मुकाच तरीही, सांगून सर्व जाशी ।।
शुभेच्छुक – • श्री. संकेत हजारे, बोरीवली
• कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे

संबोधलं जातं. ही धारणा दोघांवरही अन्याय करणारी आहे. खरंतर यश असो वा अपयश, ते पचवताना वेळ प्रसंगी पुरुषाच्या डोळ्यांत पाणी येणं अत्यंत स्वाभाविक असतं, परंतु आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या तथाकथित चौकटीत ते बसू शकत नाही. अशा पुरुषाला भागूबाई म्हणून हिणवलं जातं.

हळूहळू का होई ना या गैरसमजुतीमध्ये कसा सकारात्मक बदल होत आहे, याचा प्रत्यय आला, चांद्रयान मोहीमेच्या निमित्तानं. सात सप्टेंबरच्या मध्यरात्री लाखो भारतीय नागरिक दूरदर्शनला डोळे लावून बसले होते. चंद्राच्या कक्षेत यानानं यशस्वीपणे प्रवेश केला होता. 'विक्रम' चंद्रावर उतरायला काही मिनिटांचा अवधी होता. सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. परंतु अकस्मात 'इस्रो'मधील शास्त्रज्ञांचे चेहरे गंभीर झाले. प्रति सेकंदाला काळजीचे सावट गडद होत गेलं. अखेरीस विक्रमशी असलेला संपर्क तुटला असल्याचं वास्तव सामोरी आलं. अत्यंत हतबल वाटावं असा क्षण. प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि परीक्षेची कसून तयारी केली असतानाही ऐन वेळी यश मिळालं नाही, तर नैराश्य कसं दाटून येतं याचा अनुभव देणारा क्षण!

मोहिमेत सहभागी असलेल्या शास्त्रज्ञांचे मनोबल कायम राहील, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यावेळी 'रॉकेट मॅन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. सिवन यांना अश्रू अनावर झाले. तो प्रसंग पाहताना असंख्य लोकांचे डोळे पाणावले. जणू डोळ्यांतल्या पाण्याद्वारे सर्वजण त्यांच्या कर्तृत्वाला मानवंदना देत राहिले. स्त्री-पुरुष भेदापलीकडे जाऊन त्यांची निराशा वाटून घेत राहिले. सहानुभूतीपेक्षाही मोठी असलेली ही सह-अनुभूतीची भावना! ती पोचविण्याची किमया अश्रूंनी साधली होती!!

अशा क्षणी आठवते कुसुमाग्रजांची एक कविता...

***'घन अंधारी, निबिड वनातून,***
***पथिका दिसतो दूर दिवा***
***तसा मला तव, नेत्रामधला,***
***स्नेहल अश्रू, आज हवा.'***

**– मृणालिनी चितळे**
७५९/३२ 'गोपिकाश्रम',
डेक्कन जिमखाना, पुणे 411004

**चित्रकार : चित्रांजली**

## अशीही मदत!



## संदेश

माझ्या शालेय जीवनातली गोष्ट. त्या वेळी मी इ. ८ किंवा ९ वीत असेन; पण शैक्षणिक वर्षाच्या मध्येच एका नवीन विद्यार्थ्याला त्याचे वडील घेऊन आले.

शाळेत जम बसायला त्याला वेळ लागत होता. आणि एकंदर अभ्यासात मागासलेला होता. आमच्या वर्गातले बहुतेक विद्यार्थी त्याची थट्टामस्करी करत; मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटते; त्यामुळे न समजलेला भाग तो माझ्या मदतीने समजून घ्यायला लागला आणि त्याचा अभ्यास सुधारला. त्याच्या वडिलांनी मला घरी बोलावून त्याच्या मुलाची अडचण ओळखून त्याला मदत केल्याबद्दल माझे आभार मानले. मी खरंतर वेगळं, विशेष असं काहीच केलं नव्हतं!!

**– डॉ. जयंत नारळीकर** (ज्येष्ठ शास्त्रज्ञ)

**जरूर पाहा** : www. sciencekids.com विज्ञानपर खेळ, प्रश्न संच, माहिती

**शुभेच्छुक – • श्री. संजीव वाडीकर, सातारा**
**• श्री. नचिकेत बसोले, बोरीवली**

# माझी रोजनिशी माझा आरसा



– शिल्पा कुलकर्णी

'असं कसं असतं ना मनाचं? एखादी नेमलेली जागा रिकामी झाल्यानंतरच तिथं असलेल्या वस्तूचं अस्तित्व जाणवू लागतं! आणि जर त्या रिकाम्या जागी हाडामासाची व्यक्ती राहात असेल तर...'

*डायरी* लिहिताना रोहनच्या तोंडून अस्फुट हुंदका फुटला. डोळे पाण्याने डबडबले. *डायरीवर* लिहिलेली अक्षरं धूसर दिसू लागली... हो माझं चुकलंच! जरासं नाही तर खूपच! पण आता काय उपयोग...? आजोबांना जाऊन पंधरा दिवस होऊन गेले. घरच्या सर्वांचं *रूटिन* सुरू झालं... मी मात्र, आजोबांच्या खोलीत काहीतरी कारण काढून रेंगाळत असतो.

''आजोबांच्या खोलीत काय शोधतो आहेस?'' असं आई मघाशी विचारूनदेखील गेली.

''सतत माझा पाठलाग करत आहे असं वाटणारी, खरंतर तेव्हा जाचक वाटणारी 'आजोबांची नजर' हरवलीय... ती शोधतोय...'' मी असं उत्तर देईपर्यंत, आई तिच्या कामाला निघूनही गेली होती.

रोज शाळेच्या *व्हॅनमध्ये* बसत असताना आजोबा, तुम्ही तुमच्या खोलीच्या *गॅलरीमध्ये* येऊन मला 'टाटा' करत होतात. कधीकधी माझं लक्षही नसायचं! 'वर बघ रोहन, आजोबा *बाय* करताहेत' अशी मित्र आठवण करायचे.

'डबा घेतला का? पाण्याची बाटली आहे ना?' असे तुमचे एकापुढे एक प्रश्न यायचे.

तेव्हा वाटायचं, 'आता काय लहान आहे का मी?' कधीकधी तुमच्या आवाजाची नक्कल करत *स्कूलव्हॅनमधले* मित्र हेच प्रश्न मला विचारून मला फिदीफिदी हसायचे,

तेव्हा खूप राग यायचा तुमचा! मात्र, एकदा डबा न्यायचा विसरलो आणि उपाशी राहिलो, तेव्हा मला तुमच्या प्रश्नांची, नव्हे, प्रेमाची किंमत कळली.

आता करू देत मित्र तुमची नक्कल, अस्सा खडसावीन ना त्यांना...

आजोबा, आता रोज *स्कूलव्हॅनमध्ये* बसताना न चुकता मी *गॅलरीकडे* बघतो, रिकाम्या *गॅलरीला* 'टाटा' करतो आणि सॅकमधला डबा चाचपून बघतो! शाळेतून घरी येताना बंद दरवाजाचं कुलूप उघडून आत येताना माझे पाय जडावतात आणि क्षणभर तुमच्या खोलीपाशी थबकतात...

मला आठवतं, एकदा शाळेच्या *व्हॅनमधून* उतरताना माझ्या हातात प्रशस्तिपत्रक दिसलं... तुम्ही वरून *गॅलरीतूनच* विचारलंत, 'बच्चू, बक्षीस मिळालं वाटतं?'

'कसे अगदी शाळेत जायच्या-यायच्या वेळेला



बांध मोडणे सोपे, पाणी अडवणे कठीण। माणूस तोडणे सोपे, नाते जडवणे कठीण ।।
शुभेच्छुक – • श्री. एन. पी. पाटील, सातारा
• सौ. गौरी काळे, पुणे

हटकून प्रश्न विचारतात,' या विचारांनी चिडूनच मी म्हटलं 'होय आजोबा, धीर धरा ना जरासा. येतोय मी वर...' तुम्ही तेव्हापासून... नाही... खरंतर पहिल्यापासून माझ्या बाबतीत फक्त धीरच धरला होता! इतरांचं उर्मट बोलणं तुम्ही मुळीच खपवून घेत नव्हता!

मला बक्षीस मिळाल्याचा आनंद तुमच्या शब्दांत मावत नव्हता, याची जाणीव मला आज होते आहे. तेव्हा मात्र, ते बक्षीस तुमच्यापेक्षा मित्रांना दाखवण्याचीच मला जास्त घाई झाली होती. मी प्रशस्तिपत्रक दाखवलेलं नसतानाही, माझ्या अभ्यासाच्या टेबलावर तुम्ही छानसं नवीन पेन, पत्ररूपी आशीर्वाद आणि मोठ्ठी कॅडबरी ठेवून दिली होती.

'असाच लिहीत राहा; अनेक निबंध स्पर्धा गाजव!' असा भरभरून आशीर्वाद होता त्या पत्रात!

खरं तर मला प्रशस्तिपत्रक दाखवायचं नव्हतं, असं काहीच नव्हतं. दुसऱ्यादिवशी मी सहलीला गेलो, मग तुम्ही आजारी पडलात; पण राहून गेलं, ते राहूनच गेलं. आता ते फोटोला दाखवून काय उपयोग?

आजोबा, खरं सांगतो, यापुढे सगळ्या स्पर्धांमध्ये आणि परीक्षेत तुम्ही दिलेलं पेनच मी वापरणार आहे; पण सध्या तरी हा 'काळ'च माझी परीक्षा पाहतोय. त्याला कुठल्या पेनाने नव्हे, तोंडाने उत्तर देऊ??


**– शिल्पा कुलकर्णी**
सी- २०४, पाटे संस्कृती,
सहकारनगर नं. २ पुणे 411009


**चित्रकार : राहुल देशपांडे**

---

## संवेदनशील साहित्याचा खजिना!

**गेल्या २७ वर्षांमध्ये 'संवेदनशीलता' या विषयाला पुढावा देणारे छात्र प्रबोधनमध्ये प्रकाशित झालेले कथा, कविता, ललित आणि व्यक्तिविकसनपर इ. विषयांचे निवडक साहित्य. (पृष्ठे १०३)**

**कथा**

१ **वाचूया - खालील लेखकांच्या निवडक कथा**
नीलिमा करमरकर, मीना वांगीकर, ज्ञानेश्वर गायकवाड, सुहासिनी देशपांडे, भास्कर चंदनशिव, प्रदीप आवटे

**कविता**

२ **वाचूया खालील कवींच्या निवडक कविता**
एकनाथ आव्हाड, आतिश सोसे, सुमन नवलकर, इंद्रजित भालेराव, फ. मुं. शिंदे, सुनील शिनखेडे, मृणालिनी कानिटकर-जोशी, आसावरी काकडे, आश्लेषा महाजन

**ललित**

३ **वाचूया - खालील लेखकांचे निवडक ललित लेख**
शैलजा देशमुख, रवींद्र पिंगे, प्रमोदिनी वडके-कवळे, नमित चित्रे, रामचंद्र देखणे, शिल्पा कुलकर्णी, यशवंत पाठक,

**व्यक्तिविकसन** ४

**वाचूया - खालील लेखकांचे व्यक्तिविकसनपर लेख**
अनघा लवळेकर, उमा बापट, मंगला गोडबोले, दीपाली गोगटे

**जडणघडण** ५

**वाचूया - मान्यवरांची 'जडणघडण' त्यांच्याच शब्दात!**
ज्ञानेश पुरंदरे, गिरीश प्रभुणे, डॉ. हिम्मतराव बावस्कर, डॉ. आशिष सातव, उल्का महाजन, नसिमा हुरजुक, विकास आमटे




**शुभेच्छुक –** • **सौ. माधुरी सोलेगावकर, डोंबिवली** –कै. रमाबाई मुकुंद सोलेगावकर स्मरणार्थ
• **एक हितचिंतक, डोंबिवली** – कै. विमल विनायक खरे,स्मरणार्थ

# बाईस्कोप

– डॉ. छाया महाजन



**गावात भरणाऱ्या जत्रेत नईमचाचांचा बाईस्कोप हे मुलांसाठी मोठ्ठं आकर्षण असायचं. बाईस्कोपच्या छोट्या भोकाला चेहरा लावून त्यातून दिसणारी अद्‌भुत दुनिया बघण्यात मुलं रंगून जायची. वर्षानुवर्ष हे चालत राहिलं... पण आज नईमचाचांनी दाखवलेली दृश्य बदलली होती. ध्वनिमाध्यमांची जोड नसूनही ती दृश्ये खूप काही बोलत होती... शिकवून जात होती...**

नईमचाचा आमच्या गावात भरणाऱ्या जत्रेसाठी हमखास यायचे. वर्षात एकदा गावातल्या विजयेश्वराची यात्रा असायची. विजयेश्वरावर लोकांची फार श्रद्धा होती. बरेचजण म्हणायचे, 'तो नवसाला पावतो.' आम्हीही, 'परीक्षेत चांगले गुण मिळू देत' म्हणून मनात नवस बोलायचो; त्यासाठी खडीसाखरेची बोली लावायचो. या यात्रेसाठी भरणारी जत्रा पंधरा दिवस चालायची. जवळपासच्या खेड्यांतले खूप लोक यायचे.

जत्रेत कापडा-चोपडाच्या दुकानांपासून तोडे, गंठण करणारे, बांगड्यांची, आभूषणांची, वस्तू, खेळण्यांची, भांड्यांची दुकानं लागायची. त्याचबरोबर विजयेश्वराच्या मंदिराच्या मागच्या बाजूला मोठ्या मैदानावर खूप खेळांची सोय असायची. रहाटपाळणा हे मोठं आकर्षण! मौतका कुँवा, रेल्वेचे चार उघडे डबे, गरगरे असे खेळ होते. त्यात बंदुकीने फुगे फोडायचा खेळही असायचा. खाण्याचे *स्टॉल्स* लागायचे. शेव, फाफडा, गाठी-शेव, जिलेबी, बुंदीचे लाडू असे पदार्थ आवर्जून



आकांक्षांना चैतन्याचा जिथे फुलोरा मिळतो, रक्तावाचूनच्या नात्यांचा तिथेच अर्थ कळतो
शुभेच्छुक – • सौ. मेधा लागवणकर, पुणे – कै. सौ. वसुधा पुरुषोत्तम ठाकूर स्मृतिप्रीत्यर्थ.
• श्री. आशिष फडके, पुणे – कै. अविनाश र. फडके स्मरणार्थ

असायचे, भेळेची तर चैन होती. ही चारएक दुकानं असायची; मग रसवंतीची दोन दुकानं.

मागच्या शेताचा काही भागही घेतला जायचा, तेव्हा भाडं देणं वगैरे भानगड नसावी.

रसवंतीनंतरच्या मोकळ्या जागेत नईमचाचा उभे असायचे. त्यांच्याजवळ त्यांचा बाईस्कोप असायचा; त्यावर पुठ्ठ्याची पाटी असायची. 'नईम का बाईस्कोप' असं त्यावर लिहिलेलं असायचं. मला चाचा खूप तरुण कधीच दिसले नाहीत. चाळिशीच्या आसपास असावेत; पण त्यांना बाईस्कोपची - त्या खेळाची जाहिरात करावी लागायचीच नाही. लहान-मोठी मुलं सतत त्यांच्या आजूबाजूला असायची. छोट्या भोकाला चेहरा लावून त्यांच्या बाईस्कोपचा आनंद आम्ही खूप वेळा घेतला आहे. मागे हिंदी सिनेमातलं एखादं प्रसिद्ध गाणं असे. त्याचा आवाज सुरेल असला, तरी ते खरखर होत चाले; पण डोळ्यांसमोर बदलणाऱ्या रंगीबेरंगी आकृती एवढ्या भुरळ घालत की, त्या संगीताकडे आमचं लक्ष नसे. एकीकडे नईमचाचांचा हात पाठीमागून चक्राकार चालत असे.

आमचं गाव समुद्राजवळ होतं. मागे काही अंतरावर त्याला नदी येऊन मिळत होती. मग चाचा काही नदीची, काही समुद्राची आणि काही शहरातली अशी चित्रे दाखवत. मग विविध आकृत्या, फुलं आणि फिकट झालेले नट-नट्यांचे फोटोही!

खूप मजा येई. बाईस्कोप सुरू होताच मन आश्‍चर्यानं आणि आनंदानं भरून जाई. वाळूत कंबरेला रग लागे; पण आम्ही डोके बाजूला करत नसू.

संध्याकाळी ती भली मोठी पेटी डोक्यावर आणि काढणी खांद्याला लावून चाचा तिथून निघून जात. सकाळी नऊला दुकान सुरू करत.

मधली बरीच वर्षं मी गावी गेलो तरी मला यात्रेचा काळ गाठता आला नव्हता. यात्रा होऊन गेलेली तरी, नाहीतर होणार तरी, असं असायचं. मन खट्टू व्हायचं. गुडी शेवेची चव आठवायची. वर जाणारे हलते पाळणे; त्याबरोबर भीती आणि आनंदानं हलणारं उसळतं मन आठवायचं आणि नईम चाचाही! कारण संध्याकाळी त्यांच्याबरोबर चालत जाण्याची मजा असायची. त्यांना आम्ही प्रश्‍न विचारायचो. विशेषत: दरवर्षी बदलणाऱ्या त्या चित्रांविषयी; तेही मंद हसत. ओझ्याची तमा न बाळगता उत्तर देत.

मी आणि धीरू म्हणजे धीरेंद्र, आम्ही जत्रेला जायचं ठरवलं. आमची दहावीची परीक्षा होऊन गेल्यानं आता थोडी मोकळीक होती.

दुपारी ऊन उतरल्यावर आम्ही विजयेश्‍वराच्या मैदानाकडे गेलो. थोडी उन्हं होती. विशेषत: पाळणा वर गेल्यावर जाणवत होतं. मग आम्ही हॉटेलात फक्कड भेळ खाल्ली; वर चहा मारला. हॉटेलच्या शेजारी उकिरडा झाला होता. माशा घोंघावत होत्या. आमचा मोर्चा नईम चाचांकडे वळला. बाईस्कोप घेऊन ते बसले होते. थोडी थोडी मुलं येत होती. तीन झरोक्यांपाशी तीनजण चिकटले होते. मध्येच हसत होते. मध्येच गप्प होत होते. चाचा मागे हँडल फिरवत होते.

आम्ही आमची ओळख दिली. त्यांना क्षणात ती पटली. ते हसले. म्हणाले,

जरूर पाहा : www.englishgrammar.org इंग्रजी भाषेचे व्याकरणाविषयी प्रश्‍न व माहिती
शुभेच्छुक - • सौ. माधवी दाते, पुणे - कै. निर्मला व कै दिनकर जोशी-पुराणिक स्मरणार्थ.
• सौ. सुलभा आशिष फडके, पुणे - कै. रामचंद्र जनार्दन काळे स्मरणार्थ.



*''अरे, आप तो बडे हो गये।''* ते थोडे थकले होते. हात व चेहरा सुरकुतलेला होता. खोकतही होते. मुख्य म्हणजे फक्त बाईस्कोप दाखवण्यापुरतं उभे राहात होते; मग प्लॅस्टिकच्या स्टुलावर टेकत होते. त्यांना बरं वाटत नसावं.

''आम्हालाही पाहायचाय बाईस्कोप, चाचा.''

*''अरे, आप यह देखोगे? आपकी पढाई भी हुई है। इस चीजमें आपको रुची है?''*

मी आणि धीरूने उत्साहानं मान हलवली.

*''ठीक है।''* म्हणत ते उठले.

आम्ही झरोक्याला डोळे लावले. गुडघ्यावर बसलो, गाणं सुरू झालं.

आता त्यात नुसती चित्रं तर होतीच; पण दोन-चार मिनिटांची छोटी चलत्‌चित्रंही होती.

आधी काही नट-नट्यांची चित्रं आली. मग चार्ली चॅप्लिनचा एक मूकपट. आम्ही हसत होतो. मागे एका नव्या सिनेमाचं नवं गाणं चालू होतं.

एकदम एका मोठ्या लाटेसह समुद्राची हालचाल दिसू लागली. आधी स्वच्छ किनारा, मऊ वाळूवर चालणारी माणसं, पळणारी मुलं, काही वाळूत खेळणारी, तर काही घरं-किल्ले बनवणारी मुलं.


मग समुद्र, उंच उठणाऱ्या लाटा, किनाऱ्यावर धडकणाऱ्या; मळकट, पिवळा फेस किनाऱ्यावरून विरत जाणारा. आणि एकाएकी लाटेसह किनाऱ्यावर येऊन पडणारे मासे, काही तडफणारे आणि काही मेलेले; पण ढिगाने येणारे मासे. त्या मेलेल्या चमचमणाऱ्या माशांनी किनारा चंद्रासारखा चमकत होता. त्यात कासवं होती; मोठमोठे खेकडे होते आणि अनेक जलचर प्राणीसुद्धा!

नंतर समुद्राच्या पाण्यावरचा तेलकट तवंग आणि निळ्याशार पाण्याऐवजी काळपट, हिरवं पाणी, किनाऱ्यावर कॅमेरा फिरू लागला. प्लॅस्टिकच्या पिशव्या, अगणित बाटल्या, कपडे, पालापाचोळा, वर्तमानपत्रांचे कागद,



झाडे लावुनी शुद्ध खेळती हवा मिळवूया। शुद्ध हवेच्या सवे, निरामय आयुष्य जगू या।।
शुभेच्छुक - ● श्री. विक्रम चाफेकर, पुणे - छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा!
● श्री. अरविंद मेढेकर, ठाणे


सोलापूर सिद्धेश्वर
सहकारी बँक लि., सोलापूर.
संपूर्ण कोअर बँकिंग
२०५, पूर्व मंगळवार पेठ, पहिला मजला, सोलापूर-२. फोन (०२१७) २६२६८११, २७४२९१०
E-mail : solapursiddheshwarho@gmail.com
कर्जे
वाहन कर्ज
मोटार कारसाठी व्याजदर फक्त ९.७५% आणि १०.८०%
सहज व सुलभ कर्ज उपलब्ध
कार खरेदीसाठी डॉक्टर, इंजिनिअर, चार्टर्ड अकौटंट, वकील इ. प्रोफेशनल्ससाठी विशेष सवलतीचा व्याजदर
व्यवसाय वृद्धीसाठी
रु. ५० हजार ते रु. ४ कोटी
सोनेतारण कर्ज
व्याजदर फक्त
११%
(मासिक व्याजदर १% पेक्षाही कमी)
त्वरित कर्ज उपलब्ध
श्री. प्रकाश संगप्पे वाले
चेअरमन
श्री. नरेंद्र महादेव गंभिरे
व्हा. चेअरमन
श्री. राम ब. शर्मा
सरव्यवस्थापक
संचालक मंडळ
श्री. तुकाराम जिवबा काळे
श्री. बसवराज शंकरराव माशाळे
ॲड. मल्लिनाथ कल्याणप्पा पाटील
ॲड. धानय्या गुरूबसय्या चिवरी
(तज्ञ संचालक)
श्री. मल्लिनाथ गंगाधर विभुते
श्री. अशोक अण्णाराव लांबतुरे
श्री. बसवराज निलप्पा दुलंगे
श्री. श्रीधर हेमंत रिसबुड CA
(तज्ञ संचालक)
श्री. श्रीशैल रेवणसिद्ध बनशेट्टी
श्री. पशुपतीनाथ विजयकुमार
श्री. नागनाथ धर्मण्णा जावळे
श्री. संजय शिवकुमार घाळे
(कार्यलक्षी संचालक)
श्री. चंद्रकांत गुंडप्पा रमणशेट्टी
सौ. सुचेता मिलिंद थोबडे
सौ. रुपाली बसवराज बिराजदार


The best six doctors anywhere...
no one can deny it... are
Diet, Sunshine,
Rest, Water,
Air, Exercise
YOGA
ENTERPRISES
Medical Equipments
Surgical Disposables
Office No. A 58, Shreenath Plaza,
Sant Dyaneshwar Paduka Chowk,
F.C. Road, Shivaji Nagar, Pune 411 005,
Ph. No. 020 25530063, 9011089487


सण आहे दिव्यांचा दूर करणाऱ्या अंधाराचा
एकच वर मागायचा उजेड पडू दे ज्ञानाचा.
रामचंद्र अँड कंपनी
७५२, गगणपती पेठ, सांगली ४१६४१६
ramchandra_co@hotmail.com
Phone : ०२३३ – २३७६८८५, २३७२८२२

प्लॅस्टिकचे कप, पेले अशा कितीतरी गोष्टी.

मग किनारा जवळजवळ निर्मनुष्य! ठिकठिकाणी अडकलेलं शेवाळं. त्यात रुतलेले कपडे आणि प्लॅस्टिकच्या वस्तू, पिशव्या. माणसानं फेकलेली आणि केलेली घाण, बेपर्वाईनं.

मग एक-दोन नागडी, हातापायांच्या काड्या झालेली छोटी मुलं. त्या घाणीत वाळू चिवडत बसलेली. कष्टानं उठून पळल्यासारखी चालणारी. एक मूल जवळून दाखवलं. त्यामागे काठी टेकत, खोकत चालणारा माणूस. दुरून म्हातारा वाटणारा आणि जवळून दाखवला तेव्हा तरुण!

मी फार अस्वस्थ झालो. झरोक्यावरचे हात घट्ट झाले. मागचं संगीत थांबलं होतं. समुद्राला नदी मिळते, त्या भागाची चित्रं होती. तिच्यात मिसळलेले प्रवाह होते. ते काळसर, हिरवे, लाल, किरमिजी रंगाचे होते. मागे कारखान्यांची उंचच उंच नळकांडी होती.

आम्ही दोघांनी एकदम झरोके सोडले, कारण नंतरचं चित्र स्मशानभूमीचं होतं. त्यानंतर दफनभूमीचं. कपड्यात गुंडाळलेली शरीरं.

आम्ही नि:शब्द झालो. मन उदास झालं होतं. अजूनही बाईस्कोपमधली कहाणी संपली नव्हती.

आम्ही पाहू लागलो.

तरुण मुलांचा जथ्था आला. त्यांनी किनारा साफ करायला सुरुवात केली. खाण्याच्या गाड्यांपाशी कचराकुंड्या ठेवल्या. किनाऱ्यावर दूर रांगेनं लावलेली हिरवीगार झाडं दिसली. मागे प्रसन्न संगीत सुरू झालं.

*''पर बच्चे तो खूश होने के लिए आते हैं।''* धीरू म्हणाला.

''त्यांनी हे असं पाहिलं तर आनंदी कसे होतील?''

''सत्य कळून आकळत नाही. मोठ्यांकडून चुका झाल्या तरी नव्या पिढीनं त्या करू नयेत,'' मी म्हणालो.

*'बिलकूल सही है बेटा।'* हेच तर मी दाखवतो. आपल्या भागातलंच आहे हे; दूरचं नाही. *बच्चे* चकित होतात. दोन परस्परविरोधी दृश्य पाहून मला प्रश्न विचारतात. मी जमेल तसं सांगतो.

''एवढं तर मला करता येतं म्हणून करतो; तेवढीच सेवा. त्या मुलांना कळलं तरी खूप आहे. सावध होतील. मग शेवटी एक आनंदाचं गाणं लावतो. त्यात पाणी आहे, पक्षी आहेत, मुलं आहेत. तुम्ही पाहा ना.''

त्यांनी हॅंडल फिरवायला सुरुवात केली. आम्ही खूश झालो.

पैसे घेताना ते म्हणाले, ''पाणी जीवन आहे *बेटा* हे कधी विसरू नका.'' आम्ही हसलो.

पाळण्याकडे जाऊ लागलो; पाळणा वर गेल्यावर हसण्या-खिदळण्यापेक्षा आजूबाजूचा निसर्ग पाहायचा, असं ठरवूनच!

**- डॉ. छाया महाजन**
'चेतन', कल्याणी नर्सिंग होम,
न्यू समर्थ नगर, औरंगाबाद 431001
**चित्रकार : राहुल देशपांडे**

**वाचूया**
**रशियन कथा - सिल्व्हर कार्प**
**मूळ लेखक - निकालाय नासोव्ह**
**अनुवाद - अनघा भट-बेहेरे**



निसर्गाचा राखण्या समतोल । पर्यावरणाचे मोल अनमोल ।।
शुभेच्छुक - • श्री. विष्णू विनायक देवधर, सातारा
• श्री. भालचंद्र देव, बदलापूर



## वाचलेच पाहिजे असे काही

# पाडस



गेल्या महिन्यात, मी एक ‘पाडस’ नावाचं पुस्तक वाचलं. मार्जरी किनन रॉलिंग्ज यांनी लिहिलेल्या 'The yearling' चा राम पटवर्धनांनी केलेला तो अनुवाद आहे. 'The yearling' या पुस्तकाला १९३९ साली पुलिन्झर पारितोषिक देखील मिळालं होतं. इतकं जुनं पुस्तक माझ्या वयाच्या मुलाला वाचायला मिळणं हे माझं भाग्यच! या पुस्तकाचं वाङ्‌मयातील स्थान स्थलकाळातीत आहे.

ज्योडी बॅक्स्टर हा या पुस्तकाचा नायक आहे. पेनी व ओरी बॅक्स्टर हे त्याचे आई-बाबा असतात. त्यांच्या बरोबरच घरापासून दोन मैल लांब असलेले गुंड आणि ज्योडीचा शेजारी फॉरेस्टर यांचा देखील पुस्तकात मुख्य वाटा आहे. अजून दोन मुख्य पात्रं म्हणजे ज्योडीच्या वडिलांचे मित्र हतोआजी व ऑलिव्हर हतो आणि अर्थातच फ्लँग-ज्योडीचं पाडस! ज्याचा परिचय आपल्याला कादंबरीच्या काहीशा मध्यभागी होतो. याशिवाय, ज्या जंगलात पाडस ज्योडी राहात असतो, ते जंगलसुद्धा जणू काही एक वेगळं पात्रच आहे.

मला हे पुस्तक फार आवडलं. मुख्य म्हणजे, जरी त्याची गोष्ट काल्पनिक असली, तरी प्रत्येक वाक्यात एक सत्यता आपल्याला जाणवत राहाते. या पुस्तकातील वर्णनं, पात्रांचे एकमेकांतील संबंध इतके खरे आहेत, की या पुस्तकाला एका खास, वेगळ्या लेखन शैलीची गरजच पडत नाही. सगळं आपोआपच डोळ्यांसमोर उभं राहतं!

पण मला, या पुस्तकाची भाषा थोडी जड वाटली. या पुस्तकातील वर्णनं फारच छान आहेत. मूळ लेखकाने ती सुंदर रंगवली आहेत व पटवर्धनांनी अप्रतिम अनुवाद केला आहे. थोट्या नावाच्या त्रासदायक अस्वलाच्या शिकारी सारख्या खिळवून ठेवणाऱ्या प्रसंगापासून ते फ्लॅग पाडसच्या हत्येच्या करूण प्रसंगापर्यंत; प्रत्येक गोष्ट सिनेमासारखी डोळ्यांसमोर येते. याशिवाय ऋतुनुसार बदलणारी निसर्गवर्णनंही परिणामकारक आहेत. उदा. एकदा पेनी व ज्योडी करकोच्यांचा नाच बघतात. एका लयीत ते पाण्यात पाय आपटत असतात व चोचींमधून आवाज काढत असतात. या साध्या प्रसंगाचं इतकं सुंदर वर्णन केलं आहे...

या पुस्तकातील पात्रांच्या वर्णनातील दोन मोठ्या गंमती आहेत. एक म्हणजे फॉडरविंग फॉरेस्टर, ह्या ज्योडीच्या प्रिय मित्राबाबत आहे. पुस्तकात त्याचा प्रसंग एकच आहे; पण फॉडरविंग शिवाय हे पुस्तक पूर्ण करता येत नाही. एका बागेत जर गुलाबाची

फुलं लावली असतील, तर जसा त्यांचा वास बागभर पसरतो, तसा फॉडरविंगचा 'वास' पुस्तकभर जाणवत रहातो. दुसरी गंमत म्हणजे तुम्ही कितीही निवडलं, *शॉर्टलिस्ट* केलं, तरी पुस्तकात दोनच मुख्य पात्रं आहेत. ज्योडी व त्याचे वडील पेनी. अगदी फ्लॅग-ज्याचं नाव देखील पुस्तकाला आहे व ओरी जिच्यामुळे फ्लॅग मरतो; ते सुद्धा ज्योडी आणि पेनी इतक्या तपशीलात या पुस्तकात आलेले नाहीत. ज्योडी व त्याचे वडील जणू काही पुस्तकाचे आधारस्तंभ आहेत.

पुस्तकात मला एक गोष्ट फार तीव्रतेने जाणवली; ती म्हणजे पुस्तकाची लेखिका रॉनिंग्ज या एक मध्यमवयीन बाई असूनही, बारा-चौदा वर्षांच्या ज्योडीच्या मनात कधी काय येईल, ते त्यांनी अचूकपणे ओळखलं आहे.

दर प्रकरणाच्या सुरुवातीस एक लहानसं चित्र आहे, जे त्या-त्या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रसंग अधोरेखित करतं. ही चित्रं आपल्याला अधिकच खिळवून ठेवतात.

माझे आई व बाबा पाडसचे खूप चाहते असल्यानं (विशेषत: आई) मला वय वर्ष पाच असल्यापासून 'बे एके बे'च्या संगतीत 'पाडस' हा 'The yearling' चा अनुवाद आहे.' हे पाठच झालं होतं. हे एक मराठी पुस्तकच मूळ वाटावं! इतका सुरेख अनुवाद पटवर्धनांनी केला आहे. याच कारणामुळे ते पुस्तक मला खूप बोलकं वाटलं.

पाडसची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याचा शेवट आहे. 'फ्लॅग' हे ज्योडीचं पाडस जसजसं मोठं होतं, तसतसं ते सरळ जाऊन शेतातील पिकं खाऊन व उद्ध्वस्त करून टाकायला लागतं. बॅक्स्टर कुटुंब आर्थिकदृष्ट्या चांगल्या अवस्थेत नसतात. त्यामुळे त्याची आई ज्योडीला त्या पाडसाला गोळी घालायला लावते. नंतर पेनीचं एक सुंदर वाक्य ज्योडीला उद्देशून आहे - 'हे जग कितीही सुंदर असलं तरी सोपं अजिबात नाही.' या पुस्तकाचा शेवट असा आहे.

*ज्योडी झोपेत मध्येच 'फ्लॅग' अशी हाक मारतो... पण ती त्याची नसते... ती एका पाडसाशी खेळणाऱ्या कोवळ्या मुलाची असते... आणि हा कोवळा मुलगा आणि तो पाडा जंगलाच्या राईत शिरून कायमचे हरवून जातात...!*

या प्रसंगानं आयुष्यातील पहिलीच इतकी क्लिष्ट श्रेयस-प्रेयसातील निवड ज्योडीला करावी लागते. फ्लॅग म्हणजे प्रेयस व शेतीतलं पीक व पर्यायानं कुटुंबाची निकड हे श्रेयस! आणि यात जेव्हा त्याला दु:खद श्रेयसाची निवड करावी लागते. तेव्हा ज्योडी बदलतो. प्रगल्भ होतो. तो जेव्हा फ्लॅगला मारतो, तेव्हा फ्लॅगबरोबर ज्योडीचं पोरपण ही मरतं. त्याच्यातील एक गोड निष्पापपणा हरवतो... तो लहान राहिलेला नसतो. तो मोठा झालेला असतो.

माझ्यासारख्या कल्पनारम्य, इंग्रजी पुस्तकांमध्ये रमणाऱ्या मुलासाठी 'पाडस' हे पुस्तक फार वेगळं होतं. एकतर, ते एवढं मोठं मराठी पुस्तक व ते खऱ्या आयुष्यावर आधारित! फ्लॅगच्या मृत्यूच्या प्रसंगाच्या वेळेस माझे डोळे खूप भरून आले होते. 'पाडस' वाचताना तुम्ही ते नुसतं वाचत नाही. तुम्ही ते अनुभवता!



माणसांचे दु:ख, माझे बनत आहे। सोसताना 'मी' नव्याने घडत आहे।।
शुभेच्छुक - • श्री. अतुल एदलाबादकर, पुणे
• कु. सानिका जयराम जोशी, पुणे

जिसके घर हो किर्लोस्कर
उसके सर हो नो फिकर

किर्लोस्कर पम्पस् १२५ सालों का भरोसा

Kirloskar
Enriching Lives



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
किर्लोस्कर ग्रुप कंपनी
स्थापित १८८८

www.kirloskarpumps.com

Toll-Free No.
1800 103 4443

AQUALIFT
Rising to new heights

Authorised Distributor
**AQUALIFT ENGINEERS & SOLUTIONS PVT. LTD.**

Register Office
Office No. 203, 'RENATA' Bldg. N. C. Phadke Chowk,
2145, Sadashiv Peth, Pune - 411030.
Ph.: 7620525245, 8888860754 • E-mail : alepumps2@gmail.com

Godown Address
Sr. No. 43/2/1, Krushnai Warehouses, Mantarwadi,
Urali Devachi, Tal. Haveli, Dist.- Pune - 412308

ही ‘पाडस’ची जादू आहे. ‘हॅरी पॉटर’ मधलीच भारावून टाकणारी जादू; पण फक्त जरा वेगळ्या स्वरूपात...!!

मी ‘पाडस’ हे पुस्तक तुम्हाला आवर्जून वाचायला सांगीन. बुकगंगा, ॲमॅझॉन व अक्षरधाराच्या *ऑनलाईन साईटवर* तुम्हांला ते मिळेल आणि विकतच घ्या. हे पुस्तक पारायण करण्याच्या योग्यतेचं आहे!!

– **चारूवाक् चासकर** (इ. ९ वी)
सरिता वैभव, नवश्या मारूतीजवळ,
सिंहगड रस्ता, पुणे 411030

**पुस्तकाचे नाव : पाडस**
**मूळ लेखक :**
**मार्जोरी किनन रॉलिंग्ज**
**अनुवाद : राम पटवर्धन**
**प्रकाशन : मौज**
**किंमत : रु. ५००/–**

---

मुलांचे पान

# रंग फुलांचे...

जेव्हा फुलांना नव्हते मुळीच रंग
सुंदर दिसत नव्हते त्यांचे अंग
एकदा एक फुलपाखरू आले,
रंगांचे स्वप्न फुलांना देऊन गेले...
फुलांनी घातले देवाला साकडे,
रंगहीन आयुष्याला कंटाळलो गडे.

पहाटे येईल रंगीबेरंगी पावसाची सर
रंग त्यातले टिपून घ्या भरभर
फुले सुखावली, स्वप्नात रमली
उद्याची वाट पाहत झोपी गेली.

रंगीबेरंगी पावसात जेजे न्हाले
त्यांनाच रंग मग देवाने दिले
आळशी फुले जी उठली उशिरा
मोगरा, निशिगंध ती राहिली रंगाविना
रुसून तशीच ती देवाकडे गेली
समजूत त्यांची देवाने घातली
‘रंगतर जवळचे गेलेत संपून,
गंध हवेतर देतो वाटून...

सुवास घेऊन आली परत पावसाची सर
सुगंध प्यायली मग फुले पोटभर,
तेव्हापासून जाई, मोगरा, निशिगंध
या श्वेत फुलांना पण येतो सुगंध !!



– **कु. मैत्रेयी लोहार,** (इ. ८ वी)
३०३, स्वरूप बिल्डिंग सी विंग, पंचरत्न पार्क, आगाशिवनगर,
मलकापूर, कराड 415539

चित्रकार : चि. साहिल लोहार, निगडी (इ. ९ वी)

**पाहूया**
**छात्र प्रबोधन आयोजित राज्यस्तरीय**
**हस्तलिखित स्पर्धा २०१९**
**प्रथम क्रमांकप्राप्त हस्तलिखित ‘पारिजात’**



डोंगरदऱ्या नदी, नाले, दगड, काटेकुटे । झाडे, झुडपे, पाने, फुले, आपले सच्चे मित्र खरे ।।
शुभेच्छुक – ● वैद्य धनंजय वसंत कुलकर्णी, पुणे
● श्री. श्रीधर लोणकर, वेंगुर्ला



# कांचनजुंगाच्या शिखरावरून...

**– भूषण हर्षे**

१९ मे, २०१९ समुद्रसपाटीपासून ६३०० मीटर उंचीवर मैलोन्‌मैल पसरलेल्या पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या मैदानावर आमचा *कॅम्प* २ वसला होता. दुपारचे २ वाजले असतील. पहाटे ५ वाजता *बेसकॅम्प* सोडून तब्बल ८ तासांच्या चढाईनंतर आम्ही *कॅम्प* २ ला येऊन पोहोचलो होतो. शेर्पा मंडळींनी बनवलेली *रेडी टू इट* खिचडी खाऊन आम्ही तंबूमध्ये विसावलो होतो. आकाशात थोडे-थोडे ढग जमायला सुरुवात झाली होती. तंबूच्या बाहेर बघितलं, तर आकाशात वाहणाऱ्या ढगांची सावली बर्फावरून पुढेपुढे सरकताना दिसली. काळ्या-पांढऱ्या रंगांचा सुरू असलेला खेळ डोळ्यांना सुखावत होता. ढग आल्यानं तापमान झटक्यात खाली जाऊ लागलं; त्यामुळे इतका वेळ गप्पा मारत बाहेर उभी असलेली शेर्पा मंडळीसुद्धा आपापल्या तंबूत जाऊन बसली.

'गिरिप्रेमी'च्या आमच्या संघात एकूण १० गिर्यारोहकांचा समावेश होता. आमच्यापैकी काहीजण आपापल्या तंबूत आराम करत होते, तर काहीजण जुन्या मोहिमांमधील गप्पांच्या मैफलीत रमले होते. आमच्या तंबूत मात्र रंगला होता पत्त्यांचा डाव. आम्ही सगळे जगातील तिसऱ्या उंचीच्या आणि भारतातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या कांचनजुंगा शिखराच्या माथ्याच्या दिशेने चढाई करत होतो.

आमच्या summit push अर्थात शेवटच्या चढाईमधला आज आमचा पहिला मुक्काम होता. आता उद्या *कॅम्प* ३, परवा *कॅम्प* ४ वर विश्रांती आणि १४ मे रोजी शिखर गाठायचं, असं आमचं नियोजन होतं. आमचे route open करणारे शेर्पा आज *कॅम्पच्यावर* काही अंतर जाऊन त्या ठिकाणी दोर पक्का करून *कॅम्प* ४ ला मुक्काम करणार होते. त्यांच्याशी *वॉकी-टॉकीवरून* बोलणं झालं की, आम्ही आमची पुढची हालचाल ठरवणार होतो. सुमारे ४ वाजता *बेस कॅम्पवरून* मामा – उमेश झिरपे म्हणजेच आमच्या मोहिमेचे नेते- *वॉकी-टॉकीवर* बोलणार होते. घड्याळात पावणेचार वाजले होते. बाहेर थोडी हिमवृष्टी सुरू होती. मामांच्या आदेशापूर्वी आधी नैसर्गिक विधी उरकावेत म्हणून मी तंबूच्या बाहेर जायला निघालो. इथे तंबूतून बाहेर पडायचं म्हणजे कमीतकमी १५

सांस्कृतिक वारसा स्थळे : सूर्य मंदिर - पुरी, ओडिया - बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावरील देवस्थान.
शुभेच्छुक – • श्री. आशिष फडके, पुणे – कै. श्रीमती कमलाबाई फडके स्मरणार्थ
• सौ. माधवी दाते, पुणे – कै. पद्‌मजा व कै गणेश दाते स्मरणार्थ




मिनिटांचा कार्यक्रम असतो. *फ्लीस जॅकेटवर* फेदर *जॅकेट*, पायात बर्फात वापरायचे बूट घालून सर्व जामानिमा करावा लागतो. तंबूत दुपारी नुसतं बसताना साधारणपणे थर्मल इनर, त्यावर *टी-शर्ट* आणि एक *फ्लीस जॅकेट* इतपत कपडे पुरतात; परंतु बाहेर पडताना मात्र त्यावर फेदर *जॅकेट* किंवा wind cheater घालणं अनिवार्य असतं. तसंच पायातदेखील बर्फात घालायचे बूट घालावे लागतात. बर्फावर *कॅम्पिंग* करताना नैसर्गिक विधींसाठी सर्व गिर्यारोहकांना ठरावीक परिसरच वापरावा लागतो; ज्याला *यलो एरिया* असं संबोधतात. साधारणपणे हा भाग दरीकडील उतारावर असतो; तर पिण्याचे पाणी बनवायला आणायचा बर्फ हा *कॅम्पच्या* विरुद्ध बाजूने आणला जातो. या गोष्टी कटाक्षाने पाळाव्या लागतात; अन्यथा पिण्याच्या पाण्यातून पोटाचे आजार होऊन मोहीम सोडावी लागू शकते. पाच-दहा मिनिटांत मी पुन्हा तंबूकडे परतलो; तंबूत शिरण्यापूर्वी मी एकदा कांचनजुंगा शिखराच्या दिशेने नजर फिरवली. 'खरंच, पोहोचू शकू ना तिथपर्यंत,' असा विचार मनात येऊन गेला.

इतक्यात *वॉकी टॉकी* खणखणला. *''हॅलो, कॅम्प २ कॅम्प २... बेस कॅम्प कॉलिंग ओव्हर''* *बेस कॅम्पवरून* मामा अर्थात आमच्या मोहिमेचे नेते उमेश झिरपे बोलत होते. ''हं, बोला मामा. ऐकू येतंय ओव्हर.'' मी म्हणालो. ''पुण्यातून अविनाशनं पाठवलेल्या हवामानाच्या अंदाजानुसार आज संध्याकाळी, रात्री आणि कदाचित उद्यासुद्धा सकाळी हिमवृष्टी होऊ शकेल; त्यामुळे मला असं वाटतं की, तुम्ही सर्वांनी उद्या सकाळी *कॅम्प* सोडायची घाई करू नका, *ओव्हर.'' ''ओके* मामा! ओव्हर.'' एवढं बोलून मी आमचा शेर्पा सरदार पेम चिरी शेर्पा यालादेखील पुढचं संभाषण ऐकायला तंबूमध्ये बोलावलं. मामांचा पुढचा निरोप आला, ''मी थोड्या वेळानं *कॅम्प* ४ वर मुक्कामी असलेल्या शेर्पांशी बोलतो आणि उद्याचं नियोजन ठरवतो. ठीक आहे.'' म्हणून मी *वॉकी-टॉकी* तंबूच्या कप्प्यात ठेवून दिला. हवामानाचा ताजा अहवाल संपूर्ण *बेस कॅम्पवर* पसरला. आता हवामानाचं काय होणार अशी चर्चा सुरू झाली.



भेदण्यास आकाशाला, नित्य कल्पना नव्या। देहाला अन् पंखांना, नित नव्या भराऱ्या हव्या।।
शुभेच्छुक - • श्री. आर. टी. हांडे, पुणे
• श्री. शरद गद्रे, डोंबिवली




**।। दीपावलीच्या शुभेच्छा ।।**

ही दीपावली व नववर्ष आपणांस सुखसमृद्धीचे भरभराटीचे जावो हीच शुभकामना !

# दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर

सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य बँक

१७ शाखा व दोन विस्तारीत कक्षांसह जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर

- सीबीएस कार्यप्रणाली सर्व शाखांमध्ये कार्यान्वित
- सभासदांना औषधोपचाराचा खर्च देणारी
- एटीम/डेबिट कार्ड सेवा कार्यान्वित
- सर्व शाखांमध्ये सेफ डिपॉझिट लॉकर्स ची सोय
- आरटीजीएस/नेफ्ट आणि ई-पेमेंट सुविधा
- स्वनिधीवर व्यवहार करणारी जिल्ह्यातील अग्रेसर बँक
- सभासदांच्या पाल्यांना तांत्रिक शिक्षणासाठी फी मध्ये सवलत उपलब्ध करून देणारी बँक

**मार्च २०१९**

**भाग भांडवल रू. ११.८० कोटी, राखीव निधी रु. ४०.४४ कोटी**
**एकूण ठेवी रू. ४०८.३८ कोटी, कर्जे रू. २६७.७४ कोटी**
**नफा रु. १.३६ कोटी**

संजय वसंत एकबोटे — सरव्यवस्थापक
वीरेंद्र विश्वनाथ पाटील — व्हाईस चेअरमन
ॲड. भास्कर व्यंकटेश नेर्लेकर — चेअरमन
आणि समस्त संचालक मंडळ

आजपासून सव्वा महिन्यापूर्वी ६ एप्रिल रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर आम्ही अकरा सदस्य आणि आमचे शेर्पा सगळ्यांनी काठमांडू सोडलं आणि १० दिवसांचा खडतर ट्रेक करून १७ एप्रिल रोजी आम्ही कांचनजुंगाचा पायथा गाठला. त्यानंतर आम्ही *कॅम्प* एक, *कॅम्प* दोन, कॅम्प तीनपर्यंत आमच्या फेऱ्या (rotations) पूर्ण केल्या होत्या. इतके दिवस आम्हाला वातावरणाची अत्यंत छान साथ लाभली होती. आणि आता आमची चढाई शेवटच्या टप्प्यात असताना नेमकं वातावरण खराब होतंय म्हटल्यावर सर्वांनाच थोडं *टेन्शन* आलं. सगळ्या कॅम्पवर शांतता पसरली. संध्याकाळ होताच पुन्हा एकदा शेर्पांनी बनवलेलं सूप आणि *रेडी टू इट* खिचडी खाऊन मामांच्या *वॉकी-टॉकी* संदेशाची वाट पाहात बसलो. ७ वाजताची वेळ ठरलेली होती... ७.३० वाजले तरी मामांचा संदेश येत नव्हता. आम्ही सतत *बेस कॅम्पला* संपर्क करण्याचा प्रयत्न करत होतो; पण त्यालाही यश येत नव्हतं. अखेर ९ वाजत आले तरीही संपर्क होत नाही म्हटल्यावर आम्ही नाद सोडून दिला आणि झोपण्यासाठी आडवे पडलो.

आधीच आम्ही ६३०० मीटरवर होतो आणि त्यात आता या खराब वातावरणाची भर पडली. झोप येणं जरा अवघडच होतं. काही वेळ बरा गेला आणि नंतर जोरदार वाऱ्याला जी सुरुवात झाली. इतकी की, जवळपास रात्रभर वारा थांबलाच नाही. उलट परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडतच गेली. वारा कमी होता म्हणून की काय, थोड्या वेळात जोरजोरात विजा कडकडायला लागल्या. अशी काही परिस्थिती ओढवेल असा कुणी विचारही केला नव्हता. रात्रभर हिमवृष्टी सुरूच होती. पहाटे मामांच्या *वॉकी-टॉकी* संदेशानं जाग आली. आजचा



दिवस इथेच मुक्काम करून उद्या कॅम्प ३ ला जायचं हे नक्की झालं.

दिवसभर पुन्हा कधी तंबूच्या आत, कधी बाहेर असं करत करत दिवस काढायचा होता. काही वेळासाठी आनंद आमच्या तंबूत आला आणि आमच्या गप्पा सुरू झाल्या. काल कॅम्पला पोहोचताना झालेला रॉक कॉल. आणि त्यातून बचावलेलो आम्ही, हा प्रसंग पुन्हा डोळ्यांसमोर उभा राहिला. काल पहाटे ५ वाजता *बेस कॅम्पवरून* निघून आम्ही *कॅम्प* २ च्या दिशेने निघालो होतो. या मार्गात आम्हाला एका अवघड टप्प्यातून जीव मुठीत धरून जावं लागलं. आणि तो म्हणजे रॉक कॉल. त्यात माझा आणि रॉक कॉलचा तर चांगलाच ऋणानुबंध होता. २०१० च्या देवतिब्बा मोहिमेत खूप मोठा रॉक कॉल मी डोळ्यांनी बघितला होता; २०१२ च्या एव्हरेस्ट मोहिमेत तर डोक्यात दगड पडून मला मोहीम सोडावी लागली होती. २०१३ सालीदेखील एक मोठा दगड माझ्या आणि आनंदच्या मधून गडगडत गेला होता. इथे तर हा टप्पाच *रॉक कॉलचा* होता!! देवाचं नाव घेत पाऊल पुढे टाकलं. एकानं वरून दगड पडतोय का, याकडे लक्ष ठेवायचं आणि दुसऱ्याने पळतपळत ते अंतर पार करायचं, असं करावं लागणार होतं. मी अर्धा टप्पा पार केला आणि आनंदचा आवाज ऐकू



आकाशाची नीलिमा, ही तर माझी शांती। भूमीवरची हिरवळ, ही तर माझी विश्रांती।।
शुभेच्छुक – • सौ. निलिमा राजेंद्र सेठिया, पुणे
• सौ. आसावरी टेंबे, डोंबिवली

आला; भूषण, *वॉच द रॉक* आणि दुसऱ्या क्षणी भले मोठे दगड कोसळल्याचा आवाज आला. मी अक्षरशः जीव मुठीत धरून जोरात पळालो आणि समोर १०-१५ फुटांवर दिसणाऱ्या बर्फाच्या उतारावर उडी मारली. ही उडी बहुधा माझ्या आजवरच्या आयुष्यातली सगळ्यात लांब उडी असेल. दगड चुकविण्यासाठी मी त्या बर्फात झोपलो आणि सुदैवानं त्या दिव्यातून पार झालो. जेव्हा त्या धक्क्यातून सावरून आनंदपाशी पोहोचलो, तेव्हा मी आणि तो दोघेही काहीच बोलू शकलो नाही. केवळ नजरेतूनच 'वाचलो!!' या विचाराची देवाणघेवाण झाली आणि आम्ही पुन्हा चालायला सुरुवात करून *कॅम्प* २ गाठला होता... हा थरार आठवून पुन्हा एकदा दोघांच्या अंगावर काटा आला. इथूनच आम्हाला परतही जायचं होतं. संध्याकाळी ठरल्याप्रमाणे सूप आणि भात खाऊन आमचा दिवस मावळला.

*कॅम्प* २चा मुक्काम करून आम्ही ठरल्याप्रमाणे १३ तारखेला *कॅम्प* ३ आणि १४ तारखेला *कॅम्प* ४ गाठला. *कॅम्प* २ ते *कॅम्प* ४ हा टप्पा तसा कमी आव्हानात्मक होता. तसंच *कॅम्प* ३ च्या पुढे सर्वांनी कृत्रिम प्राणवायू अर्थात ऑक्सिजन सिलेंडर वापरायला सुरुवात केली; त्यामुळे चालायचा वेग मंदावला होता. *कॅम्प* ४ च्याजवळ पोहोचताच झालेलं मकालू शिखराचं दर्शन, आम्हाला आम्ही बऱ्यापैकी उंचावर आल्याची जाणीव देऊन गेलं.

*कॅम्प* ४ च्या पुढे मात्र आमचा खरा कस लागणार होता. १४ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता *कॅम्प* ४ चं विश्व खूपच वेगळं भासत होतं. 'गिरिप्रेमी'चे आम्ही १० गिर्यारोहक, इतर संघांचे देश-विदेशांतील सुमारे १५ गिर्यारोहक आणि सर्व शेर्पा, सर्वांमध्ये एक वेगळंच चैतन्य संचारलं होतं. कोणी बूट घालत होते, कोणी *क्रॅम्पॉन* तर कोणी *हार्नेस* तपासून बघत होते, कोणी आपल्या *बॅगमध्ये* पुरेसे पाणी असल्याची खात्री करत होते, तर कोणी आपापल्या शेर्पाकडून प्राणवायूचा *सिलिंडर* आणि *मास्क* तपासून घेत होते. एखाद्या मंगलप्रसंगी, मुहूर्त जवळ आल्यावर जशी लगबग सुरू होते तसाच काहीसा *कॅम्प* ४ भासत होता. मीदेखील माझा सहकारी पासांग शेर्पा याच्या बरोबरीनं निघण्यासाठी सज्ज झालो. कांचनजुंगा पर्वतमातेला अभिवादन करून मी आणि पासांग शेर्पा आमच्या अंतिम ध्येयाकडे मार्गस्थ झालो.

पहिले दोन तास गुडघ्याइतक्या बर्फातून चालता चालता पुढची चढाई किती अवघड असेल याची प्रचीती आली. थोड्यावेळाने अंधार पडला. माझ्या पुढे आणि मागे हेड *टॉर्चची* रांग दिसू लागली. नजर आणि समोर दिसणाऱ्या मार्गाची कक्षा आता केवळ हेड *टॉर्चच्या* प्रकाशापुरती सीमित झाली; त्यामुळे खाली मान घालून, पावलं मोजत चालत राहणे हा एकच पर्याय उरला होता. वाटेत एक एक टप्पा पार होत होता आणि चढाईतील खडतरपणा वाढतच होता. सुमारे ७८०० मीटर्सवर समोर उभी ठाकलेली *रॉक* चिमणी पार करताना एव्हरेस्टच्या *हिलरी स्टेपची* आठवण झाली. क्रॅम्पॉन पायात असतांना कातळावरून चालताना अतिशय काळजीपूर्वक चालावं लागत होतं. *रॉक* चिमणी पार झाल्यावर वाटेत एकदा पाणी पिण्यासाठी थांबलो. ३ थर्मास आणि काही पाण्याच्या बाटल्या अशा ५ लीटरपैकी २ थर्मास आणि २ बाटल्यांची झाकणं उणे तापमानामुळे गोठून गेली होती. सुदैवाने एका थर्मासचं झाकण उघडू शकलं आणि काही पाण्याचे घोट नशीबी आले.



शुभेच्छुक - • सौ. मंदाकिनी कुलकर्णी, डोंबिवली
• सौ. मिहिका काळे, पुणे

रात्री सुमारे १ वाजता पासांग शेर्पानं पुन्हा मला थांबण्याची खूण केली. आम्ही थांबलो आणि आमचा दोघांचा *ऑक्सिजन सिलिंडर* बदलला. आता हा *सिलिंडर* अजून ७ तास चालेल असं आमचं गणित होतं. जसजशी रात्र पहाटेकडे सरकू लागली, तसतशी थंडी जाणवू लागली. हातापायाची बोटं गार पडायला सुरुवात झाली. आता चालण्याचा वेग थोडा वाढवणं भाग होतं; पण मनातून कितीही ठरवलं तरी समोरच्या एका गिर्यारोहकाला *ओव्हरटेक* करून पुढे जायचं म्हणजे उसनं बळ आणावं लागत होतं आणि एक *ओव्हरटेक* केला की दुप्पट विश्रांती घ्यावी लागत होती. अखेर पहाटे ३ च्या सुमाराला आम्ही ओम मोराल या ठिकाणी पोहोचलो. आम्ही *बेस कॅम्पपासून* ऐकत होतो की, एकदा इथे पोहोचलो की *सबमीट* नक्की होणार!! आणि अखेर आम्ही इथवर मजल मारली होती. आता काही तासांचाच अवकाश आणि गेले दोन वर्षं बघितलेलं स्वप्न सत्यात उतरणार होतं. थोड्या वेळात उजाडू लागलं आणि काही अंतरावर दिसणारा कांचनजुंगा शिखराचा माथा आता डोळ्यांना सुखावू लागला; पण इतका वेळ जी दरी दिसत नव्हती, तीही आता दिसू लागली आणि या २७०० फुटांवरच्या हिमालयातील *रॉक क्लाईंबिंगची* भेदकता अधिक प्रकर्षानं जाणवू लागली. माथा गाठण्याच्या आनंदापेक्षा, 'चढतो तर आहे; पण इथून खाली कसं उतरायचं!!' या विचारांनी जास्त दडपण आलं.

अखेर १५ मे २०१९ सकाळी साडेपाच!! माझा स्वतःवर विश्वास बसत नव्हता. सूर्याची पहिली किरणं चेहऱ्यावर पडली. नेपाळचा झेंडा आणि नेपाळी (प्रार्थना पताका) धारण केलेला कांचनजुंगा शिखराचा माथा अक्षरशः दहा



पावलांवर होता. एक वेगळीच ऊर्जा, वेगळाच उत्साह आणि अवर्णनीय आनंदानं स्तब्ध व्हायला झालं. डोळे आपोआप भरून आले. आजवरचा थकवा आणि शीण आनंदाश्रूंच्या रूपानं वाहून गेला. मीही बरोबर नेलेली प्रार्थना–पताका माथ्यावर वाहून एव्हरेस्टनंतर इतक्या वर्षांनी मला इथवर येण्याची शारीरिक आणि मानसिक ताकद दिल्याबद्दल कांचनजुंगाचे मनापासून आभार मानले. तेथे भारताचा तिरंगा फडकावून एक फोटोही काढला. आजूबाजूचं सगळं वातावरण स्वच्छ होतं. यालुंग खांग, कांग्बाचेन, कुंभकर्ण, काब्रू ही शिखरं सकाळच्या सोनेरी सूर्यप्रकाशात न्हाली होती. लांब क्षितिजावर दिसणारे एव्हरेस्ट, ल्होत्से, मकालू इतक्या लांबूनदेखील नजरेत भरत होते. जगातील तिसऱ्या आणि भारतातील सर्वांत उंच शिखरावरून भोवतालच्या जगाकडे बघण्याचा आनंद काही औरच होता...!!

**– भूषण हर्षे**
बी ६०४, मेरी गोल्ड अॅव्हन्यू, गल्ली क्र. १,
बावधन खुर्द, पुणे 411021

**पाहूया कांचनजुंगाची रोमहर्षक चढाई.**



मावळतीवर चमकू लागती गिरिशिखरांचे कडे। ती जादूची सुवर्णनगरी वसते त्या पलीकडे।।
शुभेच्छुक – • श्री. चंद्रशेखर देशपांडे, सातारा
• श्री. सुधीर रायकर, डोंबिवली


प्रत्येकाच्या विश्वासाचं,
कुटुंबातल्या प्रत्येकाचं
नेत्रारोग्य जपणारं
आयुर्वेदिक अंजन
WESTERN INDIA CHEMICAL CO.
Jai KAJAL
जाई काजल
MUMBAI - 400066 INDIA
Jai KAJAL
डोळ्यांचे स्वास्थ्य बिघडू नये यासाठी
जाई काजळ वापरा. त्यामुळे डोळे
थंड व निरोगी राहून दृष्टी स्वच्छ होते
आणि डोळ्यांचा थकवा देखील जातो.
जाई काजळ
आयुर्वेदिक अंजन
लहान थोरांस सारखेच उपयुक्त.
वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी, बोरीवली (पूर्व), मुंबई 400066, फॅक्टरी – फोन (0250) 645 26 11

# समशेर सोडवतो घोड्याचं रहस्य

(पान क्रमांक ४९ वरून पुढे चालू)

समशेरने पोलीस अधिकाऱ्यांकडे सूचक नजरेनं पाहिलं. पोलीस अधिकारी एकदम तल्लख झाले. पटकन त्यांनी दोन पोलिसांना काही सूचना दिल्या आणि खासगी, साध्या पोशाखात जाण्याबद्दलही सांगितलं. ते आता खूप अपेक्षेने समशेरकडे पाहू लागले. समशेर म्हणाला,

''आता आपण पुढच्या काही शब्दांकडे येऊ... *'इक्यूस'* म्हणजे काय?''

त्याने पोलीस अधिकाऱ्यांना विचारलं. पोलीस अधिकाऱ्याच्या डोळ्यांत समशेरबद्दल आदर दिसू लागला. ते हसून म्हणाले,

''मी इंग्लिश बोलू शकतो, लिहू-वाचू शकतो; पण मी इंग्रजीचा विद्वान नाही... खरं सांगायचं तर मला त्याचा अर्थच माहिती नाही.''

समशेरनं पुन्हा बुद्धिबळाच्या डावाकडे पाहायला सुरुवात केली आणि तो सगळीकडे शोधक नजरेने पाहत फिरू लागला. मग स्वतःशीच म्हणाला,

*''टूथपेस्ट! टूथपेस्ट* असते कुठे? *बाथरूममध्ये? बाथरूमबाहेरच्या* वॉशबेसिनच्या आरशाजवळ?''

त्याने भराभर चालत जाऊन *बाथरूम* पाहिलं. त्याबाहेरचा आरसा पाहिला. तिथं ठेवलेली टूथपेस्टसुद्धा पाहिली आणि तो एकदम थबकला. तो मोठ्याने म्हणाला,

''टसकरकाका! तुम्हाला *'इक्यूस'* म्हणजे काय माहीत आहे का?''

''खरं सांगायचं तर नाही... कारण मी संस्कृतचा विद्वान आहे... पण आपल्याला *डिक्शनरीत* बघता येईल... पण काय रे, तू मला का विचारतोस? तुला तरी माहीत आहे का?''



''होऽ!''

''तुला माहीत आहे?'' सगळे आश्चर्याने ओरडले.

**८/ इक्यूस-पुढे चालू**

समशेर म्हणाला,

''गाढव माणसं पैशामागे धावतात... त्यांनी घोड्यामागे तरी धावलं पाहिजे असं संदेशात म्हटलंय ना?... जी कोण बदमाश आणि ठग माणसं डॉक्टरांवर दबाव टाकत होती, त्यांना उद्देशून त्यांनी 'गाढव माणसं' असं म्हटलेलं असावं!... पण त्यांनी घोड्याच्या मागे धावलं पाहिजे असं *सजेशन* मात्र डॉक्टरांनी दिलंय... 'इक्यूस' हा शब्द त्यांनीच मला शिकवला होता... तो लॅटिन शब्द आहे... त्याचा अर्थ घोडा असा होतो... *टूथपेस्टवाला* घोड्यावरून येतो असंही त्यांनी म्हटलंय!... म्हणजे हे घोड्याचं कोडं आहे... आपल्याला घोड्याची प्रतिमा, एखादं चित्र, एखादी मूर्ती असं शोधावं लागेल...''



असे दांडगी इच्छा ज्यांची, मार्ग तयाला मिळती सत्वर।
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर।।
वार्षिक प्रायोजक - ● कु. रेवती सारंग व्हाडपांडे, पुणे

मुलं घरभर विखुरली आणि शोधक नजरेनं पाहू लागली. थोड्याच वेळात अचानक सुनंदाताईनं आनंदानं आरोळी ठोकली.

''समशेर! हा पाहा भिंतीवरचा घोडा... हे चित्र टूथपेस्टच्या अगदी जवळ लावलेलं आहे...''

सगळे तिकडे धावले. भिंतीत एका चित्राची फ्रेम लावली होती आणि त्यावर घोड्याचं चित्र होतं. समशेरनं हलक्या हातानं त्या चित्राची *फ्रेम* खाली उतरवली. भिंतीवर, त्यामागे काही बटनं आणि काही लहान लहान दिवे दिसू लागले. फ्रेम उतरवल्यामुळे आता ते सगळे दिवे एकदम प्रकाशमान झाले होते आणि लुकलुकत होते. मामा आणि पोलीस अधिकारी आश्चर्याने थक्क होऊन पाहत राहिले आणि एकदम म्हणाले,

''म्हणजे ही *इलेक्ट्रॉनिक* तिजोरी दिसतेय... पण ही उघडायची कशी?''

समशेर या बटनांकडे पाहत स्तब्ध उभा राहिला. एकाग्र झाला आणि म्हणाला,

''डॉक्टरकाकांना बुद्धिबळ खूप आवडत असे... त्यांनी या बटनांनासुद्धा तशीच काही नावं दिलेली आहेत... म्हणजे *किंग, क्वीन, पॉन* इत्यादी... आणि त्याखाली इंग्रजी आकडे आहेत... हे कोणतं तरी *कॉम्बिनेशन* असणार... हे दाबलं की, तिजोरी उघडू शकेल असं वाटतं...''

''पण हे *कॉम्बिनेशन* कळणार कसं? समशेर, काही सांगू शकशील?''

''प्रयत्न करतो...''

समशेर पुन्हा एकदा बुद्धिबळाचा डाव पाहून आला. नंतर एकाग्रपणे बटनांकडे पाहात उभा राहिला आणि म्हणाला,

''इथे पुन्हा घोड्याचंच कोडं आहे... घोड्याची एक खेळी आणि प्रतिस्पर्ध्याच्या राजावर मात होते!... काकांनी मला शिकवलेल्या *नोटेशनप्रमाणे* जर घोडा वजिराच्या आठव्या घरात ठेवून चेक दिला तर *मेट* होते... त्यामुळे मी आता एन् म्हणजे *नाइट* म्हणजे घोडा आठव्या घरात ठेवतो... म्हणजेच *एन् डी एट्*''

असं म्हणून समशेरने हलक्या हाताने 'एन्' असं लिहिलेलं बटन दाबलं. मग 'डी' असं लिहिलेलं बटन दाबलं आणि इंग्रजी आठचा आकडा दाबला. पाठोपाठ एकदम झगमगाट झाला आणि भिंतीत लावलेलं दार सावकाश हळूहळू उघडत राहिलं...

सगळ्यांच्या तोंडून मोठा आश्चर्योद्गार बाहेर पडला!

**९/ समारोप**

पोलीस अधिकाऱ्याने आतमध्ये अर्थातच कुणाला हात लावू दिला नाही; पण ते आश्चर्याने थक्क झाले होते. त्यांना त्यांच्या वरिष्ठांना फोन करण्याची घाई झाली. मामांनी सर्व मुलांना हळूहळू मागे सरकायला सांगितलं. टसकर अतिशय उत्सुकतेने तिजोरीमध्ये वाकून पाहू लागले. समशेर त्यांच्या चेहऱ्याकडे पाहत राहिला. मग कुजबुजत पोलीस अधिकाऱ्याच्या कानात म्हणाला,

''*ब्रुटस्! ब्रुटस्* नको असं काका संदेशात म्हणाले आहेत!... लक्षात आहे ना? ब्रुटस् हा गद्दार मित्र होता... मैत्रीच्या बुरख्याआडचा शत्रूच... *ब्रुटस्! बी. आर.* टसकर! असं तर नाही?''

पोलीस अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरचे भाव वेगाने बदलत गेले. त्यांनी अनपेक्षितपणे टसकरांना मागे खेचलं आणि म्हणाले,

सांस्कृतिक वारसा स्थळे : जंतर-मंतर - जयपूर - स्थापत्य खगोल शास्त्रीय वाद्यांचा संग्रह.
शुभेच्छुक - ● श्री. चंद्रशेखर बेडेकर, सांगली

''आम्हाला शंका होतीच!... आता तर खात्री पटली आहे... ब्रुटस्!... कारस्थानाचा सूत्रधार!''

सगळे आश्चर्योद्‌गार काढत असतानाच बी. आर. टसकर यांनी अनपेक्षितपणे स्वतःला सोडवून घेतलं आणि ते दारातून पळण्याच्या प्रयत्नाला लागले; पण आपला मोती कुत्रा कसा, गप्प बसेल? एका झेपेत त्याने टसकरांना पकडलं आणि पुन्हा पोलिसांनी त्यांना धरून ठेवलं.

हे नाट्य घडत असतानाच दोन पोलिसांच्या बरोबर डॉक्टर बुद्धिसागरांनी हसत हसत *'एन्ट्री'* घेतली. एका पोलिसाने सांगितलं,

''दोन्ही बदमाश सापडले आहेत!... त्यांनी डॉक्टरांना त्या बंद लॉजमध्ये डांबून ठेवलं होतं... आम्ही त्यांना सोडवून घेऊन आलो...''

बुद्धिसागरांनी समशेरकडे मोठ्या कौतुकानं पाहिलं. ते म्हणाले,

''ते दोन धटिंगण मला कुठे घेऊन जाणार आहे हे त्या दोघांनी मला 'ओपनली' सांगितलं होतंच... इतकंच नाही तर त्यांचा 'साहेब' त्यांना तिथं भेटायला येणार आहे हेही सांगितलं होतं!... जेव्हा ते मला श्लोकाबद्दल न विचारता 'कपडा किधर छिपाकर रख्खा है?' असं विचारू लागले, तेव्हाच मला शंका आली; कारण श्लोक कापडावर लिहिले आहेत हे फक्त मला आणि टसकरांनाच माहीत होतं... त्या वेळी मी शेक्सपिअरच्या पुस्तकात गेम लिहीत होतो... मग ब्रुटस् वगैरेचा क्ल्यू मी संदेशात पेरला आणि त्या *लॉजचाही क्लू* सांगितला आणि तुम्ही बरोबर अंदाज केलातऽ... तुम्ही त्यांच्या 'साहेबा'ला बरोबर पकडलंत... लक्षात आलं ना, ब्रुटस्?''

आता, सगळ्यांची *राउंड कॉन्फरन्स.* मामा, पोलीस अधिकारी, खाली मान घालून बसलेले ब्रुटस्, अर्थात बी.आर. टसकर आणि खुद्द



## हितचिंतक, ग्राहक आणि भागधारक
## सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

### कर्ज कुठलेही असो, बँक एकच!




दररोज कमी होत जाणाऱ्या शिलकीवर व्याज

कमीतकमी कागदपत्र • त्वरित कर्जमंजूरी • आकर्षक व्याजदर • सुलभ व जलद प्रक्रिया

आमच्या इतर आकर्षक योजना

गोल्ड लोन | एज्युकेशन लोन

SMS 'LOAN' to 70659 66665

जनकल्याण सहकारी बँक लि.
(शेडयुल्ड बँक)
एकदा प्रत्यक्ष भेटा, बदल अनुभवा...

www.jksbl.com • Toll Free: 1800 225 381



**Success favours those who PERSEVER**

POWER CARE

## CUBE POWER CARE PVT. LTD.

KIRLOSKAR GREEN POWER IDEAS

15, Muktangan Commercial Complex Opp. Sarang Society,
Sahakarnagar No. 2, Pune 411009, Tele/fax : 91 20 2422 44 45, 2422 29 20
Email : cubegen@dataone.in


सांस्कृतिक वारसा स्थळे : सुंदरवन - नॅशनल पार्क, पश्चिम बंगाल -
हे पार्क गंगा डेल्टावरील सुंदरबनचा भाग.

डॉक्टर बुद्धिसागर बसलेले. इतर मित्रमंडळीसुद्धा बसून पाहताहेत. सर्वांसमोर आपला शेरलॉक अर्थात समशेर उभा. जणू एखादा जादूगार प्रेक्षकांच्या समोर उभा राहतो तसा. तो खुलासा करीत म्हणाला,

''डॉक्टरकाकांनी घोड्याची शेवटची चाल मुद्दामच केली नव्हती. कारण त्याबद्दल मी विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा होती... त्यांनी गेम तिथल्या तिथं शेक्सपिअरच्या पुस्तकात लिहून ठेवला होता... म्हणजे तो महत्त्वाचा आहे हे लक्षात आलं... पण *'एन् डी एट्'*चं महत्त्व पुढे लक्षात आलं... आपण ते रहस्य या तिजोरीत लपवून ठेवणार आहोत, हे त्यांना आधीच माहिती असल्यामुळे त्यांनी मला *'इक्यूस'* हा शब्द सांगितला होता... हा लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ घोडा असा होतो... त्यांच्या संदेशात माणसांनी घोड्यामागे धावलं पाहिजे असं त्यांनी म्हटलं आहे... तेव्हा घोड्याचं चित्र सापडलं, तेव्हा 'त्यामागे' शोधलं पाहिजे हे आपोआपच स्पष्ट झालं... त्या बदमाश ठगांना कळूच नये म्हणून त्यांनी हे थोडं कोडं टाकलेलं असावं... *'एन् डी एट्'* या पासवर्डमुळे *इलेक्ट्रॉनिक* तिजोरी उघडली गेली. आणि आपल्या पूर्वजांनी जपलेलं हे रहस्य आता आपल्याला मिळालेलं आहे... 'ब्रुटस् नको' हा संदेश माझ्या लक्षात येत नव्हता; पण टसकरांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मला शंका आली...

आता बदमाशांच्या ताब्यात असलेले डॉक्टरकाका आपल्याला मिळालेले आहेत, ते रहस्यदेखील आता सुरक्षित राहील...आणि सूत्रधारही सापडला आहे, त्या दोन बदम ाशांसह–''

इतकं बोलून समशेर खाली बसला. सगळे टाळ्या वाजवीत असतानाच डॉक्टर बुद्धिसागर भावनावश झाले आणि त्यांनी समशेरला प्रेमानं जवळ घेतलं. मामाही गहिवरलेल्या आवाजात म्हणाले,

''तू समशेर, ऊर्फ शेरलॉक होम्स्!... तू काय महान कार्य केलं आहेस हे तुला माहीतंच नाही बाळा!... तुम्हा सगळ्यांना मी माझ्या खर्चाने कुरुक्षेत्राला घेऊन जातो; अगदी, गंपूच्या मोती कुत्र्यालासुद्धा... त्यानेही ब्रुटस्ला पकडून मोठं काम केलं आहे...''

''आम्ही पण येणार तुमच्याबरोबर...''

सगळे पोलीस एका सुरात म्हणाले आणि हसू लागले.

समशेरच्या मित्रांनी मात्र एकच गलका केला. त्यांनी समशेरला उंच उचलून धरलं. गंपूचा कुत्रा मोतीसुद्धा उंच उड्या मारू लागला. आपल्यालाही त्या जल्लोषात सामील व्हायला आवडेल ना? चला, तर मग!!

**– भारत सासणे**
२०४, लक्ष्मी एनक्लेव्ह,
गणेशखिंड रस्ता,
मॉडेल कॉलनीजवळ,
शिवाजीनगर, पुणे 411016

**चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे**

**वाचूया**
**विज्ञान कथा – वटवाघूळ**
**लेखक – डॉ. संजय ढोले**

# Subodhan Capacitor

## Built On Strong Sense of Self Respect



**Be with Subodhan in Nation Building, Power Saving is Power Generating**

**Happy Diwali ! !**

- Offering Power Quality Solutions along with Complete Range of required Products under One Roof.
- Technology driven Organization offering Optimum, Efficient & Reliable Solutions.
- More than 3500 MVARs installation base across India.

सुबोधन®
SUBODHAN CAPACITOR

**SUBODHAN ENGINEERS (PUNE) PVT LTD**

(An ISO 9001:2015 Certified Company)
Head Office: 27, Marble House, 473, Sadashiv Peth, Pune- 411030.
Contact No.: +91 20 24476187
Works: B9, Co-operative Industrial Estate. Jalochi, Baramati, Dist. Pune- 413102.
Contact No.: +919657727709

# यशस्वी भव

– आसावरी काकडे

**ब**रेच दिवसांनी शाळेतली एक मैत्रीण आपल्या नातीला घेऊन भेटायला आली. खूप वर्षांनी भेटलो होतो. बऱ्याच गप्पा झाल्या. मग चहापाणी झाल्यावर ती निघाली. तिची नात, सई नुकतीच दहावी पास झाली होती आणि महाविद्यालय-प्रवेशासाठी तिचे प्रयत्न सुरू होते. निघताना ती सईला म्हणाली, ''आजीला नमस्कार कर.'' तिनं लगेच वाकून मला नमस्कार केला. डोक्यावर हात ठेवून मी तिला ''यशस्वी भव!'' असा आशीर्वाद दिला. ती माझ्याकडं बघायला लागली. मी काय म्हटलं ते बहुतेक इंग्रजी माध्यमात शिकलेल्या सईला समजलं नव्हतं. तिनं हळूच आपल्या आजीला विचारलं. मैत्रिणीनं समजावलं, ''अगं, यशस्वी भव म्हणजे *सक्सेसफुल* हो.''

*'ओके!'* नात म्हणाली आणि दोघेही 'अच्छा' करत बाहेर पडल्या. माझ्या मनात आलं, 'यशस्वी भव' म्हणजे '*सक्सेसफुल* हो,' एवढं सांगणं पुरेसं होईल का? खरंतर, तिला आता 'यश' म्हणजे काय हे कळायला हवं.



मैत्रीण गेल्यावरही मनातल्या मनात त्या दिशेनं माझा विचार सुरू राहिला. विचार करता करता यश म्हणजे काय, यशाकडं कसं पाहायला हवं, हे सूचित करणारे वेगवेगळे किस्से, प्रसंग मला आठवू लागले...

काही दिवसांपूर्वी एक अतिशय बोलके *कार्टून* पाहिले होते. स्पर्धेत यशस्वी झालेली दोन मुलं त्या चित्रात गळ्यात आपापली पदकं घालून उभी आहेत, असं दाखवलं होतं. एकाच्या हातात पहिला *नंबर* आल्याचे प्रशस्तिपत्रक आणि दुसऱ्याच्या हातात तृतीय क्रमांकाचं प्रशस्तिपत्रक होते. पहिल्या *नंबरचा* मुलगा हातातलं प्रशस्तिपत्रक दाखवत मख्खसारखा उभा होता; त्रासलेला वाटत होता. तर दुसरा, *वर्ल्डकप* जिंकल्याच्या आविर्भावात आपलं प्रशस्तिपत्रक सर्वांना उंचावून दाखवत होता. त्याचा आनंद त्याच्या सर्वांगातून व्यक्त होत होता... या चित्रातून आपापल्या यशाकडे पाहण्याच्या दोन वृत्ती दिसत होत्या. एकजण पहिला *नंबर* येऊनही त्रासलेला दिसत होता, तर दुसरा तिसऱ्या *नंबराचाही* आनंद घेत होता. दोघांच्या



जे जे असेल अज्ञात, घेता करुनी ज्ञात ।
पाठीवर मात्र हवा, कुण्या प्रेमळाचा हात।।

अपेक्षा काय होत्या? त्यांनी त्यासाठी किती प्रयत्न केले होते, त्यांच्यावर झालेले संस्कार कसे होते... अशा बऱ्याच गोष्टी त्यांच्या व्यक्त होण्यामागे असतील. या बोलक्या चित्रातून बरेच अर्थ सूचित होतात. प्रत्येकानं स्वतः विचार करून बघावं.

लक्षात राहिलेल्या अशाच एका *व्हिडिओ* क्लिपमधलं दृश्य तर फारच हृदयस्पर्शी होतं. यात लहान, मतिमंद मुलांची पळण्याची शर्यत दाखवली होती. सगळी मुलं हसत, मजेत धावताहेत. धावताना एक मुलगा पाय अडकून पडतो. ते पाहून, जवळची मुलं त्याला परत उभं राहायला मदत करतात! ते पाहून पुढे गेलेली मुलंही मागं येतात. आणि सगळी मिळून परत धावू लागतात. शेवटची मर्यादारेषा मजेत पार करतात. सगळ्यांनीच शर्यत जिंकलेली असते. त्या आनंदात सगळी हातात हात घालून नाचू लागतात. इतरांना मागं टाकून सर्वांत पुढं जाऊन पहिला *नंबर* मिळवणं, त्यांना कळत नव्हतं. त्यांना फक्त 'सगळ्यांनी मिळून जाण्यात'ला आनंद कळत होता.

ती *क्लिप* बघून मनात आलं, 'यश' म्हणजे काय हे त्या मुलांना कळत नसेल; पण आनंद कळत होता. तो साजरा करणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरची, ती अजाणती निरागसता संस्मरणीय वाटली. छोट्या स्पर्धेतल्या यशाकडे बघण्याचा हा एक आदर्श विचार ठरू शकतो.

याच्या उलट एक घटना घडलेली ऐकली! दहावीला ९४ टक्के मार्क्स पडूनही, पाहिजे त्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही; म्हणून एका हुशार मुलाने आत्महत्या केली...! त्यानं इतकं पराकोटीचं निराश होण्याची कारणं, आपण कल्पनेनं समजून घेऊ शकतो. जास्तीतजास्त *मार्क्स* मिळवण्यासाठी त्यानं खूप जीवतोड मेहनत घेतली असेल. अभ्यास करताना ज्ञान मिळवणं हे प्राथमिक उद्दिष्ट कमी प्रतीचं ठरून, सर्वांत उत्तम मानल्या जाणाऱ्या *कॉलेजमध्ये* प्रवेश मिळवणं, हेच उद्दिष्ट प्राधान्यक्रमात वर आलं असेल! कारण तिथली पदवी म्हणजे उत्तम नोकरीची हमी. उत्तम नोकरी म्हणजे पुढचं सगळं मार्गी लागणं... शिक्षक, पालक यांनी सतत याबद्दल बोलून ते त्याच्यावर बिंबवलं असेल. हवं ते *कॉलेज* न मिळणं म्हणजे पूर्ण भविष्य अंधारात अशी त्याची धारणा झाली असणार; पण प्रत्यक्षात जीव गमावून त्यानं भविष्यावरच फुली मारली. आता अपेक्षित असं काही होण्याची शक्यताच उरली नाही. दुसऱ्या कॉलेजात प्रवेश मिळवून 'हे' नाही तर ते, 'काहीतरी' हाती आलंच असतं; पण या 'मुलानं ९४ टक्के गुण मिळाले', या यशाकडे साफ दुर्लक्ष केलं. इतर पर्याय जाणूनही घेतले नाहीत.

यशाचे वेगवेगळे पैलू लक्षात आणून देणारी, ही काही आजची उदाहरणं...

पूर्वी अंथरूण पाहून पाय पसरावेत अशी शिकवण असे; पण त्यामुळे माणूस अल्पसंतुष्ट राहातो, त्याची प्रगती होत नाही अशा धारणेतून ती शिकवण आता कालबाह्य ठरवली गेली. आता मुलांना सांगितलं जातं की, आपल्याला हवे तसे पाय पसरता येतील एवढं मोठं अंथरूण मिळवा.

माणसाला महत्त्वाकांक्षा जरूर असावी. *'नॉट फेल्युअर; बट लो एम इज क्राइम!'* असं म्हटलं जातं, तेही खरं आहे;



पण महत्त्वाकांक्षा कशाची धरावी, तिचा पाठपुरावा कसा करावा, वाटेतल्या छोट्या-छोट्या अपयशांकडे कसं बघावं, हे सारासार विचार करून ठरवावं लागतं. अपयशाचं व्यवस्थापन करता येण्यातून यशाकडे जाणारी वाट प्रशस्त होत असते.

खऱ्या यशस्वी जीवनासाठी समाधान आणि महत्त्वाकांक्षा दोन्हींची सांगड घालता यायला हवी. त्याचबरोबर याचंही भान हवं की, सध्याच्या अतिवेगवान जीवनात बघता बघता नव्या गोष्टी मागे पडताहेत, तशा यशस्वी जीवनाविषयीच्या कल्पनाही कालबाह्य होत चालल्या आहेत. आता वर्षानुवर्षे टिकणाऱ्या वस्तू बनवल्याच जात नाहीत. *'युज अँड थ्रो'चा* जमाना आला आहे.

ही बदललेली मानसिकता आता यश म्हणजे गाडी, बंगला, स्थैर्य... हे समीकरण नाकारू पाहाते आहे. नवी पिढी महागड्या वस्तू जमवण्यापेक्षा *ट्रेकिंग, पॅरा-ग्लायडिंग, स्कूबा डायव्हिंग...* असे नवनवीन अनुभव घेण्याला महत्त्व देऊ लागली आहे. दर दोन-तीन वर्षांनी नोकरी बदलणं, हे तर सर्रास चालू आहे. या वेगवान काळाशी जमवून घेता यायला हवं. साचेबद्ध विचारसरणीतून बाहेर पडून, खुलेपणानं, डोळे उघडे ठेवून निर्णय घेता यायला हवेत.

''यशस्वी भव!' म्हणजे काय गं आजी?'' या सईच्या प्रश्नाचं खरं उत्तर कसं द्यायला हवं, याचा विचार करता करता यशाची इतकी वेगवेगळी रूपं कुठून कुठून मनासमोर हजर झाली...! स्वप्नं डोळ्यांत घेऊन आलेल्या सईची भिरभिरती नजर आठवली आणि भविष्याच्या उंबरठ्यावर उभी असलेली हजारो कोवळी मुलं नजरेसमोर आली. त्या सर्वांना मनातल्या मनात 'यशस्वी भव!' म्हणताना आता त्या शब्दांमध्ये यशाचे हे सर्व पैलू सामावलेले होते...!

**- आसावरी काकडे**
सेतु डी-१/३ स्टेट बँकनगर,
कर्वेनगर, पुणे ४११०५२
**चित्रकार : चित्रांजली**



फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश।
मनामनातून वाहे, नवा प्रकाश... प्रकाश...।।

# नेकी

– अमर हबीब



"आपण झाडाला पाणी दिलं, खत टाकलं, नीट जोपासना केली, तर ते झाड आपल्याला गार हवा देतं, सावली देतं, फूल देतं, फळ देतं आणि शेवटी लाकूडदेखील देतं. माणसांची नातीदेखील अशीच जोपासली जातात, नाही का?" नजीरभाईने कौसरआपाला समजावून सांगितलं आणि ते कौसरआपाला पटलंसुद्धा! नजीरभाईला पुस्तक वाचनाचा नाद होता. रात्री तो हमखास वाचत बसायचा; म्हणून त्याला असं छान-छान बोलता यायचं.

कौसरआपानं त्यांच्याकडील सोन्याच्या सगळ्या दागिन्यांची पुरचुंडी केली आणि कपड्यांच्या *बॅगेत* खालच्या बाजूला ठेवून दिली. 'सलमाला लग्नात दिले, तेच हे दागिने आहेत. सूनबाईकडे ते सोपवले म्हणजे आपण मोकळे!' कौसरआपानं विचार केला. गळ्यातलं मंगळसूत्र आणि तिच्या आईने दिलेली बोटातली अंगठी मात्र, कौसर आपाने स्वत:कडेच ठेवून घेतली.

दोघं पुण्याला जायला निघाले, तेव्हा रात्र झाली होती. ते दोन-तीन दिवसांनंतर परत गावी येणार होते.

नजीरभाई धोबी. कपडे धुणं व इस्त्री करून देणं हा त्याचा व्यवसाय. कपडे धुण्याचं काम नजीरभाई करायचा. कौसरआपा दिवसभर इस्त्री करीत राहायची. दोघांच्या कष्टावर त्यांचा संसार उभा राहिलेला होता.

त्यांना दोन मुलं. एक मुलगी आणि एक मुलगा. सलमा आणि खुर्शीद. सलमा बी. एड्. झाली. ती चंद्रपूर जिल्ह्यात तिच्या नवऱ्यासोबत नोकरी करते. तिला एक मुलगी आहे. खुर्शीद इंजिनिअर झाला. त्यालाही मोठ्या कंपनीत नोकरी लागली. तो पुण्यात असतो. त्याची बायको सातारची. बरीच शिकलेली असली, तरी घरीच असते. लेकरांचा सांभाळ करते. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. खुर्शीदचा त्याच्या अम्मी-अब्बांवर फार जीव! आई-वडिलांनी आता कष्टाची कामं करू नये. त्यांच्याकडे पुण्याला येऊन राहावं, असं खुर्शीदला वाटायचं; पण नजीरभाईला ते मान्य नव्हतं. 'जोपर्यंत करता येईल तोपर्यंत काम करायचं,' असं त्यानं

**नजीरभाई ईदचा सण साजरा करण्यासाठी मुलाकडे पुण्याला गेले होते. इकडे घरात चोरी झाली; सगळ्या वस्तू अस्ताव्यस्त फेकल्या गेल्या होत्या. मात्र, घरात विशिष्ट जागी ठेवलेले पैसे जाणार नाही, याची नजीरभाईंना खात्री होती. काय होतं त्याचं कारण? त्यामागचं त्यांच्या मनातील तत्त्वज्ञान?**

ठरवलं होतं. त्याहीपेक्षा गावाचा लागलेला लळा, गाव सोडू देत नव्हता. खुर्शीद वडिलांशी फार बोलत नसे. तो त्याच्या अम्मीलाच फोन करायचा. गेल्या रविवारी खुर्शीद म्हणाला, ''*अम्मी, रमजान की ईद को यहाँ आओ; सब मिलके ईद मनाएंगे ।*''

पुण्याला जायचं, तर चार दिवस घराला कुलूप! हल्लीचा जमाना असा. कोण कधी घर धुवून नेईल, सांगता येत नाही. फार वर्षांपूर्वी नजीरभाईच्या घरी चोरी झाली होती. लेकीच्या लग्नासाठी जमविलेले सगळे सोन्याचे दागिने गेले होते. कौसरआपा खूप रडली होती. तेव्हापासून त्यांनी धास्ती घेतली होती. मागच्या-पुढच्या दाराला अघळपट्टी घातल्याशिवाय झोपत नसे. घर सोडून जाणं टाळत असे. आता काय करणार? हा विचार करत असतानाच नजीरभाई म्हणाला, ''असंही आपलं वय झालंय. आज ना उद्या आपण हे जग सोडून निघून जाणार. दागदागिने येथेच सोडून जावं लागणार. आपल्यानंतर आपली सूनच आपल्या घराची मालकीण होणार आहे. हे घर आणि सोनं-नाणं तिचंच तर होणार आहे. तोपर्यंत वाट पाहाण्याऐवजी, जर आपण आजच तिला हे दागिने देऊन टाकले, तर तिला किती बरं वाटेल. तसंही आपण ईदला जातोच आहोत. दागिने घेऊन जाऊ म्हणजे घराची काळजीही राहाणार नाही.''

कौसरआपा नजीरभाईच्या म्हणण्याला मोडता घालू शकत नव्हती. म्हणूनच यंदा ती ईदच्या निमित्ताने सगळे दागिने घेऊन निघाली होती.

खरंतर, बस निघाली तेव्हाच नजीरभाईला पुस्तकात ठेवलेल्या पैशांची आठवण झाली; पण त्यानं तो विषय काढला नाही. विषय काढला तर कौसर काळजीत पडेल, असं वाटल्याने, तो गप्पच राहिला. महादेव त्याचा मित्र. तो रंगकाम करतो. नव्या इमारतींना रंग द्यायची कामं घेतो. त्याच्या मुलीचं लग्न होतं. त्यानं हुंड्यासाठी कोणाकडून तरी हातउसने पंधरा हजार रुपये आणले होते. महादेव म्हणाला, ''नजीरभाई, हे पैसे तुझ्याकडे ठेव. माझ्या घरी ठेवले, तर त्याला पाय फुटतील. लग्नाच्या वेळी दे.''

लग्न काही लांब नव्हतं. नजीरभाईंनी पैसे घेतले आणि तो वाचत असलेल्या पुस्तकात तसेच ठेवून दिले. ही घटना होऊनही तीन-चार दिवस झाले होते. लगबगीत ते पैसे तसेच राहिले आणि हे दोघे सुनेकडे दागिने सोपविण्यासाठी थेट





विरलेल्या पाऊलखुणा, तरी जुना उमाळे घाव।
व्रण दुखवी हृदयापास, जागवी आस, कवळे भाव।।

व्याधिंवर संजीवन योगोपचार

# कबीरबाग मठ संस्था

संचालक : योगविज्ञान वाचस्पती आचार्य योगानंद उर्फ

## डॉ. श्री. वि. करंदीकर एम.बी.बी.एस.

पुढील आजारांवर उपचार केले जातील

- रक्तदाब
- मणक्यांचे विकार
- हृदयविकार
- कंपवात
- अस्थमा
- पोटाचे विकार
- मधुमेह
- संधीवात
- गुडघेदुखी

**संजीवन योगोपचाराचे स्वरुप**

- प्रत्येक पेशंटची गरज ओळखुन विकसीत केलेली उपचार पध्दती.

## कबीरबाग मठ संस्था - अंतर्गत

संजीवन योग फौंडेशन - संचलित

## योगवैद्यक पदविका अभ्यासक्रम

पदवीधरांना व्यवसायाचा नवीन मार्ग

व्याधींवर शास्त्रशुद्ध पध्दतीने योगोपचार देण्यास शिका

| - कालावधी - | - पात्रता - | - आरंभ - |
|---|---|---|
| २ वर्ष | कोणत्याही शाखेची पदवी | जुलै महिन्यात |

## कबीरबाग मठ संस्था

51, नारायण पेठ, **पुणे -30** । फोन : 020-24450181, 9823029707

Email : kabirbaug123@gmail.com I Web : www.kabirbaug.org

पुण्याला जाऊन पोहोचले.

ईदच्या दिवशी *नमाज अदा* करून नजीरभाई घरी आले. खुर्शीदनं वडिलांना आलिंगन दिलं. त्याला हा आनंद वर्षातून फक्त एकदाच मिळत असे. सूनबाई डोक्यावर पदर घेऊन हातात शीर-खुरम्याचा प्याला घेऊन आली. अदबीनं तिनं *सलाम* केला. पाठोपाठ कौसर आली. मुलानं घेतलेली साडी तिनं नेसली होती. तिनेही सलाम केला. नजीरभाईने शीर-खुरम्याचा प्याला उचलला, तेवढ्यात त्याचा *मोबाईल* वाजला. शेजारच्या दगडू गवंड्याचा फोन होता. ''नजीरभाई, लवकर ये. चोरांनी तुझं घर फोडलं आहे.''

नजीरभाई शांतपणे म्हणाला, ''हो येतो.''

चोरांना हवं असलेलं घरात काहीच नाही, हे नजीरभाईला माहीत होतं. सगळे दागिने सोबत आणण्याची अक्कल दिल्याबद्दल, त्यानं *अल्लाचे* आभार मानले. तेवढ्यात नजीरभाईला ते पंधरा हजार रुपये आठवले. तो अचानक उठला. म्हणाला, ''मला लगेच निघावं लागेल.''



नजीरभाईला कोणी काही बोलायची सोय नव्हती. थांबवावे तरी कसे? कौसरही मागोमाग निघाली.

प्रवासात ना कौसर काही बोलली ना नजीरभाई! गाड्या बदलत ते एकदाचे गावी पोहोचले; तोपर्यंत रात्र झाली होती. तरीही गल्लीतल्या चार-चौघांनी त्यांना पाहिलं आणि तेही त्यांच्याबरोबर चालू लागले. घरात घुसताच नजीरभाई थेट आपल्या पलंगाजवळ गेला आणि उशाशी ठेवलेले पुस्तक त्यानं उचललं! उघडून पाहतो तर काय, त्यात पंधरा हजार रुपये जसेच्या तसे होते. त्याने पुस्तक कपाळाला लावले अन् *''अल्ला तेरा शुकर है।''* असं काहीतरी पुटपुटला.

महादेवची *अमानत* सुरक्षित असल्याचं पाहून नजीरभाईला हायसं वाटलं. मग त्याचं लक्ष घराकडे गेलं. घरातील सामान अस्ताव्यस्त पडलं होतं. कपाटाचं कुलूप तोडून, त्यातलं सामान बाहेर फेकलेलं होतं. चोरांनी एकूण एक कपडा चाळला होता. तोही नजीरभाईच्या पलंगावर बसून; पण त्यांनी तेथेच पडलेल्या पुस्तकाला हातही लावला नाही. पुस्तकातले पैसे जसेच्या तसे पाहून सगळे अवाक झाले. नजीरभाई एवढंच म्हणाला,

''चोरांनी जर पुस्तकाला हात लावला असता तर ते चोरी करायला आलेच नसते...!!''

**- अमर हबीब,**
अंबर, पंचायत समितीच्या बाजूला,
अंबाजोगाई

**चित्रकार : गोपाळ नांदुरकर**

**वाचूया**
**प्राणी कथा : माझी मैत्रीण सोना**
**लेखिका - सुहासिनी देशपांडे**



सगळे जग वाईट आहे, असे नाही। शोध घे, सापडेलच छान काही।।

## ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

॥ राष्ट्रदेवो भव ॥

**खालील उपक्रमांद्वारा ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी व्हा !**

### पहिली ते पाचवीतील बालगटासाठी

१) बालविकास शिबिरे, निरंतर विकास कार्यक्रम - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४३३१११०

२) पाचवी प्रवेश-पुणे-ज्ञान प्रबोधिनी प्रशाला-२४२०७१२१, निगडी-क्रीडाकुल-२७६५५२४९, गुरूकुल-२७१६८०००

३) ओळख स्पर्शाची - लैंगिकता दुर्वर्तन जाणीव जागृती अभियान - द्वारा संवादिनी - २४२०७२२२

### सहावी ते बारावीपर्यंतच्या किशोर-कुमारांसाठी

१) क्षमता संवर्धन शिबिरे, बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी वर्षभर 'प्रज्ञा प्रबोधन वर्ग' - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४३३१११०

२) क्रीडा-विज्ञान-कला दले-सुट्टी शिबिरे-द्वारा युवक विभाग- अखिलेश-९३२५६३६८८८, युवती विभाग-प्रज्ञा- ८९८३४०१५०७

३) छात्र प्रबोधन मासिक, उपक्रम, स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा - द्वारा छात्र प्रबोधन - २४२०७१०६/१७५

४) नागरी वस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - द्वारा नागरी वस्ती अभ्यास गट - हर्षाताई - ९४०३८५२७७४ / २४२०७२२१

५) मानसपट मापन-(५वी ते ९वी), अभिक्षमता मापन व व्यवसाय मार्गदर्शन-(१०/१२वी)-द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४४

६) सामूहिक विद्याव्रत संस्कार - द्वारा संवादिनी - २४२०७२२२, संत्रिका - २४२०७१४६

७) 'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन)- द्वारा संवादिनी - ९९७०१५३२३७

८) अभ्यासपूरक शिक्षण, विद्याव्रत पूर्वतयारी व पाठपुरावा, जीवनकौशल्ये यांच्या शाळांमध्ये तासिका - द्वारा संवादिनी- २४२०७२२२

९) विविध कौशल्यांचे प्रशिक्षण, प्रज्ञा विकास कार्यक्रम, छोटे सायंटिस्ट उपक्रम - द्वारा बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र - २४२०७ १९४/२०९

### पदवीपूर्व व पदव्युत्तर युवक-युवतींसाठी

१) Preparatory & Foundation Courses - पदवीपूर्व गटासाठी २ वर्षांचा अभ्यासक्रम
(प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी)-द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र- २४२०७१७९

२) UPSC परिक्षा पूर्वतयारी वर्ग - द्वारा स्पर्धा परीक्षा केंद्र - २४२०७१३४

३) पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका- २४२०७१४४

४) अभ्यासगट, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, विज्ञान दल, कला दल, नागरी वस्ती व ग्रामीण प्रज्ञा कार्यक्रमात सहभाग
द्वारा युवक विभाग - नचिकेत - ७०३०५५९५०६, २४२०७१७७ - युवती विभाग - मेधाविनी- ९४२३१६२१३४

५) ज्ञानसेतू - देशाच्या दुर्गम भागात विज्ञानविषयक उपक्रमांमध्ये सहभाग - शैक्षणिक उपक्रम संशोधिका - २४२०७१९४

६) अभ्यासपूर्ण व्याख्यानमाला - आंतरविद्याशाखीय व्याख्यानमाला व अभ्यासगट - द्वारा संत्रिका - २४२०७१८७

७) मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम-१. शालेय मानसशास्त्र २. प्रज्ञावंतांचे शिक्षण ३. बाल-कुमारांचे मानसशास्त्र (पत्राद्वारे)
- द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७२२८

८) तरुणाईची आव्हाने - जीवनकौशल्य प्रशिक्षण - द्वारा संवादिनी - २४२०७२२२

### प्रौढ गटासाठी

१) संवादिनी - स्वयंविकासातून समाज परिवर्तन या हेतूने महिलांसाठी दरमहा कार्यक्रम - द्वारा संवादिनी - २४२०७२२२

२) पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग - द्वारा संस्कृत संस्कृति संशोधिका - २४२०७१४६

३) शिक्षक प्रशिक्षण - द्वारा वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र - २४२०७१९४

४) संयोजक प्रशिक्षण-आपापल्या भागात विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी प्रशिक्षण, छात्र प्रबोधन - २४२०७१७४

५) बहर जोपासताना - किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी - द्वारा संवादिनी - २४२०७२२२

६) बुद्धिमान मुलांच्या पालकांसाठी स्व-मदत गट 'प्रज्ञा मैत्र' - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४२

७) कुटुंब/वैवाहिक/अन्य वैयक्तिक समस्यांसाठी समुपदेशन - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४५

८) मानसशास्त्राशी व त्याच्या उपयोजनाशी निगडित विविध प्रशिक्षण वर्ग- द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४२

याशिवाय संग्राह्य प्रकाशने, विविध संस्कार व पूजांचे अर्थपूर्ण पौरोहित्य, मानसशास्त्रीय चाचण्या व समुपदेशन इ. अनेक सेवा उपलब्ध.

**पुण्याव्यतिरिक्त ज्ञान प्रबोधिनीच्या खालील केंद्र-उपकेंद्र-विस्तारकेंद्रांवरही विविध उपक्रम योजले जातात.**

**निगडी** - ०२०-२७१६८०००, **साळुंब्रे** (जि. पुणे) - ०२११४-२८७२९०, **सोलापूर** - ०२१७-२३१७७८२, **हराळी** (जि.उस्मानाबाद) - ८८८८०२६३८, **अंबाजोगाई** (जि. बीड)- ९४२१३७३५३६, **बोरीवली** (मुंबई)- ९९६९०५१५७३, **डोंबिवली** (जि. ठाणे)-९१६७७५०६१९

**मुख्य कार्यालय** - ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, दूरभाष - ०२० - २४२०७०००



कविता

# सरी गुरुंच्या




सुरू व्हायची जेव्हा शाळा
पहिला पाऊस सुरू व्हायचा
वर्गामध्ये भिजवायला
दर तासाला गुरू यायचा !

भुरभुर पाऊस घेऊन येती
गणिताचे वेलणकर मास्तर
अवघड संख्यांच्या थेंबांना
मिळवुन देती सोपे उत्तर !

संस्कृतचे अवघडपण लीलया
हसत मोडती वायंगणकर सर
पाठांतर मग घोकत बसता
बरसे जणु मधुश्लोकांची सर !

लखलख भाषा विजेसारखी
घेऊन येती भाटे मॅडम
इंग्लिश त्यांचे ऐकून कळले
इंग्रजीला का म्हणती वाघीण!

मराठीच्या जोशी बाईंचे
विजेसारखे सुंदर अक्षर
मधाळ त्यांच्या शिकवण्यातुनी
साहित्याचे लागे अत्तर

वर्गाची हो प्रयोगशाळा
करिती गुरुजी विज्ञानाचे
आर्किमिडीज नि न्यूटन
म्हणजे दोस्तच जणु कर्वे
सरांचे

करीत गडगड ढगासारखी
येती गुरुजी इतिहासाचे
मानेसर अभिमाने गाती
शंभर गुण शिवछत्रपतींचे

भूगोल शिकवित तांबे बाई
नेती पृथ्वीच्या पाठीवर
खंड जगाचे म्हणजे वाटे
कातळ फुटले रेखांशावर

शिकता साऱ्या भाषा कळते
कुणीच नसते परके बिरके
देसाई सर हिंदीचे म्हणती
'साथ जिएंगे हम सब मिलके!'

पी.टी.च्या दातार सरांचा
पिरियड संपे इतका पटकन
व्यायामाचे प्रकार करता
अंग मोकळे होई झटकन !

ड्रॉइंगच्या चित्रे गुरुजींची
रेषा इतकी रेखीव, सुंदर
मनातल्या सुंदर चित्रांना
खडूतूनि आणती फळ्यावर!

अशा वेगळ्या सरी गुरूंच्या
विषय जसा ह्या तशा बरसती
वर्गामधल्या सरींत भिजता
अभ्यासाची धरणे भरती !

वाचूया
कविता : खिल्ली
कवी – कल्याण इनामदार


**अरुण म्हात्रे**
१–२, एम–२, राजमाता सोसा.,
कशिशपार्क लाल बहाद्दुर शास्त्री मार्ग,
मुलुंड चेकनाक्याजवळ, ठाणे 400604
चित्रकार : चित्रांजली



Hydrolinks
*If you want to be happy and successful in life, never stop learning*

*With best Compliments from...*

**Shri. Darekar**

Xtrim AutoTechnologies Pvt. Ltd.
CORPORATE OFFICE :
D4, Ingle Acrade, Opp. Hastkala,
Sarjepura, Ahmednagar
☎ (0241-2324078)

There is no blue without yellow,
and without orange

Best Compliments from...

**Print-O-Tech Engineers**

(ISO 9001 COMPANY)

***Survey No. 29, Mantri park,***
***Shop No 16,17, Near Natraj Gas, Kothrud,***
***Pune - 411 029, Tel : 25384374***
***Email : paradkaruday@yahoo.co.in***
***paneha@gmail.com***

## ग्रंथसंपदा एका जिज्ञासू फिरस्त्याची



**पेशाने डॉक्टर, जिज्ञासू फिरस्ता असणारे डॉ. संदीप श्रोत्री यांनी पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या कार्याबरोबरच पाहिलेल्या, एकलेल्या, भावलेल्या असंख्य गोष्टी शब्दबद्ध आणि कॅमेराबद्ध केल्या. त्यातूनच आकाराला आली त्यांची मौलिक ग्रंथसंपदा.**



**'एव्हरेस्टच्या पायथ्याशी'**
माउंट एव्हरेस्ट या ट्रेकचे केलेले सचित्र आणि थरारक वर्णन.
**प्रकाशक** – कॉन्टिनेंटल, पुणे
**किंमत** – ₹ २५०

**मार्क इंग्लिस**
दक्षिण मराठी साहित्य परिषदेचा पुरस्कारप्राप्त पुस्तक
**प्रकाशक**– राजहंस, पुणे **किंमत** ₹ २००/-



**काटेरी केनियाची मुलायम सफर**
केनियाचे भौगोलिक, पर्यावरणीय संस्कृतीचे डोळस व शास्त्रीय चित्रण
**प्रकाशक**– मैत्रेय, मुंबई **किंमत** रु.१६०/-





**साद अन्नपूर्णेची**
नैसर्गिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैशिष्ट्ये सांगणारा दैनंदिन सचित्र वृत्तांत!
**प्रकाशक**– मैत्रेय, मुंबई, **किंमत** – ₹ ३२५

**'मनू'चे अरण्य**
ॲमेझॉनच्या खोऱ्यातील जंगल भटकंती
**प्रकाशक**–राजहंस प्रकाशन
**किंमत**– ₹ २५०



**कासवाचे बेट**
गालापगोस बेटांची अद्भूत सफर
**प्रकाशक**–राजहंस प्रकाशन
**किंमत**– ₹ १८०



**पुष्पपठार कास**
पुष्पपठार कासची पर्यावरणीय लेणे म्हणून सार्थ ओळख
**प्रकाशक**–डॉ. स्वाती श्रोत्री
**किंमत**– ₹ २५०



उपलब्धता : दत्तकाशी हॉस्पिटल, देवी चौक, सातारा ०२१६२-२३४९२२, २२६५२२
कॉल/एसएमएस : ९८२२०५८५८३. ई-मेल – ss1028@gmail.com


सांस्कृतिक वारसा स्थळे : ग्रेट हिमालय राष्ट्रीय उद्यान
- हिमाचल प्रदेश - असंख्य वनस्पती आणि प्रजाती










मनाच्या व बुद्धीच्या क्षमतांवर संशोधन, संवर्धन
व मूल्यमापन करणारे जागतिक स्तरावरील केंद्र
– प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे



With Best Compliments From...
SWAPNIL KALYANKAR
ARCHITECTS
---------- S K A ----------
ADDRESS
2ND FLOOR, D WING, SIDDHANT MARKET,
OPP. BJP OFFICE, OLD PANVEL - 410206.
LAND MARK - NEAR RUPALI CINEMA
EMAIL - skaplanners@gmail.com
LANDLINE - 022 - 27468533


NATURE AT
YOUR DOORSTEP !
SERVICED APARTMENTS
BHUGAON
SERVICED BUNGALOWS
BHOR
• DESTINATION EVENTS
• WEEKEND HOMES
• SERVICED APARTMENTS
• TOURISM
jaisons
SYNERGY
Holiday village
+91 88888 18963 / 64
www.jaisonsgroup.com
www.synergyholidayvillage.com










# 'क्विलिंग'च्या कल्पक कलाकृती!!









# चला, प्रश्न विचारू या!


**– रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**

**वैज्ञानिक बनण्यासाठी सर्वात महत्त्वाची व कठीण गोष्ट आहे प्रश्न विचारणे! तुम्ही म्हणाल यात कठीण काय आहे? प्रश्न विचारणे ही तर सर्वात सोपी बाब आहे. आपल्याला रोज कितीतरी प्रश्न पडतात, त्यातील किती आपण मोकळेपणाने विचारतो? त्यातील किती प्रश्नांची उत्तरे आपण स्वतःहून शोधतो?**

महासत्ता बनू पाहणाऱ्या एका युवक देशाचे तुम्ही भावी नागरिक आहात. तुम्हाला अनेक प्रश्न पडत असतील. सव्वाशे कोटी लोकसंख्येचा आपला देश; पण इतर देशांच्या तुलनेत आपण कुठे आहोत? बालमृत्यूदरासारख्या सामाजिक निकषांचा विचार केला, तर आपला क्रमांक पहिल्या शंभर देशातही लागत नाही. अतिसारासारख्या (डायरिया) विकाराने किंवा वैद्यकीय सल्ला किंवा मदत न मिळाल्यामुळे आजही देशातील लाखो माणसे दरवर्षी मृत्युमुखी पडतात. अतिवृष्टी झाली की, हजारो लोक पुरात वाहून जातात. हवामानाचा अंदाज न आल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते आणि ते आत्महत्या करतात. आपल्याला हे थांबवता येणार नाही का?

या साऱ्या बाबी वैज्ञानिक संशोधनाच्या बळावर थोपविता येतील. हवामानाचा अचूक अंदाज घेता आला आणि तो नियमितपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविता आला, तर शेतकऱ्यांना केव्हा, काय पेरायचं याची योग्य आखणी करता येईल. पाणी शुद्ध करण्याचं सोपे, योग्य उपाय सापडले आणि अतिसार झालेल्या व्यक्तीपर्यंत पुनर्जलीकरणाची (ओआरएस) पॅकेट्स पोहोचविता आली, तर अतिसाराला प्रतिबंध करता येईल. दुर्गम भागात डॉक्टर नसतात; पण *टेलीमेडिसिनच्या* मदतीने हजारो किलोमीटर दूर असणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरला रुग्णाची माहिती साध्या *मोबाईलवरून* पाठविता येईल आणि त्याच्या रोगाचे निदान करता येईल. जो देश चंद्रावर किंवा मंगळावर अवकाशयान पाठवू शकतो, त्याला हे संशोधन करणे अशक्य नक्कीच नाही.

आणखी काही वर्षांतच तुमची पिढी मोठी होईल आणि या देशाची सूत्रे तुमच्या हातात येतील, तेव्हा काय परिस्थिती असेल? एकीकडे विज्ञानाच्या साहाय्याने जग नवनवी क्षितिजे पादाक्रांत करताना दिसेल, तर दुसरीकडे आपल्या देशातील विविध समस्या आव्हाने बनून तुमच्यासमोर उभ्या असतील. खरे तर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या किल्लीने समस्यांची कुलपे उघडणे अशक्य नाही; पण त्यासाठी आताच





पुस्तकातुनी सांगितले ते, जडबुद्धीने मानू नका। जिज्ञासेने अनुभव घेऊनी, खरे शास्त्र हो तुम्ही शिका ।।

शुभेच्छुक – • मे. मार्व्हल सर्व्हिस एन्टरप्राइझेस, सोलापूर

सुरुवात करावी लागेल; कारण तुरळक अपवाद वगळले तर आपल्या देशात जागतिक दर्जाचे वैज्ञानिक संशोधन होत नाही. स्वातंत्र्यानंतरच्या वर्षात आपल्याला विज्ञानाच्या क्षेत्रातील एकही नोबेल पुरस्कार मिळू शकला नाही; कारण आपल्या देशात विज्ञानाला प्रतिष्ठा नाही. डॉक्टर, इंजिनिअर, आयएएस अधिकारी होणे हे बुद्धिमान युवकांचे ध्येय असते; वैज्ञानिक होण्याचे स्वप्न त्यांना कोणी दाखवतच नाही.

**संशोधनाची अद्भुत दुनिया**

वैज्ञानिक संशोधनाची दुनिया खरोखर अद्भुत आहे. ज्यांना विज्ञानाचे वेड लागते, ती माणसे वर्षानुवर्षे एखाद्या गोष्टीचा ध्यास घेऊन तिचा रात्रंदिवस पाठपुरावा करतात. विविध पद्धतींनी प्रयोग करतात. अपयश आले तरी निराश न होता नव्याने, वेगळ्या अंगाने आपला अभ्यास पुन्हा सुरू करतात आणि समस्येचे निराकरण झाल्याशिवाय थांबत नाहीत. कधीकधी त्या समस्येचे उत्तर काही वर्षांत सापडते, तर कधी त्यासाठी पिढ्या उलटाव्या लागतात. विज्ञान ही सतत प्रगत होत जाणारी गोष्ट आहे. त्यात अंतिम सत्य असे नसते. आज जे सत्य वाटते, त्याच्या मर्यादा उद्या ध्यानात येतात आणि त्याहून खोल, अधिक व्यापक सत्य डोळ्यांसमोर येते. हा शोध असाच पुढे चालत राहातो. आईनस्टाईनच्या शोधामुळे न्यूटन खोटा ठरत नाही, तर न्यूटनचे विज्ञान आईनस्टाईनमुळे अधिक प्रगल्भ होते, विकसित होते.

तंत्रज्ञान म्हणजे विज्ञानाचे उपयोजन, वैज्ञानिक सिद्धांताचा वापर करून एखादा प्रश्न सोडविणे. विज्ञानाच्या प्रगतीसोबत तंत्रज्ञानाचीही प्रगती होते. एखाद्या समस्येवर तंत्रज्ञानाने शोधलेले उपायही काळानुसार अधिकाधिक उन्नत, प्रगल्भ होत जातात. पूर्वी साधा फोन होता. तो अवजड होता. एकीकडून दुसरीकडे हलविता येत नव्हता. त्याच्यावरून दुसऱ्या गावाला फोन करणे ही सोपी बाब नव्हती. आजचा सेलफोन आपल्या खिशात मावतो. तो घेऊन आपण जगातील कोणाशीही, केव्हाही सहज बोलू शकतो. बोलणाऱ्या व्यक्तीचा चेहराही आपल्याला दिसू शकतो. शिवाय त्यातच आपली *डायरी, कॅलेंडर, सिनेमा थिएटर* सर्व काही येते. विज्ञानाच्या विविध क्षेत्रांत प्रगती झाली नसती, तर इतका बहुगुणी फोन आपल्याला मिळाला नसता.

**वैज्ञानिक होण्यासाठी काय करावे लागेल?**


वैज्ञानिक होण्यासाठी असामान्य बुद्धिमत्ता असणे आवश्यक नाही. आईन्स्टाईनच्या लहानपणी त्याच्या आई-वडिलांना इतर मुलांच्या तुलनेत तो मंद आहे, अशी भीती वाटत होती. त्याच्या एका शिक्षकांनी तर तो आयुष्यात काही करू शकणार नाही असे भाकीत वर्तवले होते. मग कशाच्या बळावर ही माणसे इतके मोठे शोध लावतात? त्यासाठी सर्वांत महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे **प्रश्न विचारण्याची सवय आणि प्रचंड मेहनत!** वैज्ञानिक होऊ इच्छिणाऱ्याला **एखाद्या प्रश्नाचा ध्यास घेऊन तिच्यासाठी वेडे होता यायला हवे.**

प्रश्न मोठा असेल - हे विश्व कसे आहे? ते कसे निर्माण झाले? उद्या त्याचे काय होईल?, किंवा लहान - या रोगाचे कारण काय? मुंग्यांना साखरेचा वास कसा येतो? वगैरे! त्या ही माहिती इतर मुंग्यांना कशी सांगतात? - पण प्रश्नांची उत्तरे शोधायची असल्यास वैज्ञानिक पद्धतीचा वापर करावा लागेल. वाचन किंवा निरीक्षणांच्या आधारावर गृहीतक ठरवावे लागेल; ते सिद्ध करण्यासाठी प्रयोगांची आखणी करावी लागेल. मुख्य म्हणजे न कंटाळता काळजीपूर्वक प्रयोग करून त्यांची निरीक्षणे नोंदवावी लागतील. त्यात

जरूर पाहा : चित्रपट -इक्कबाल
मूक-बधिर मुलाने जिद्दीने खेळात मिळवलेल्या यशाची कहाणी

त्रुटी राहू नयेत, म्हणून पुन:पुन्हा प्रयोग व निरीक्षणे करावी लागतील. अखेरीस त्यांच्या आधारावर निष्कर्ष काढावा लागेल. तो चुकीचा ठरला तर नव्याने प्रयोग करावे लागतील. **यातील चिकाटीने प्रयोग करणे व अचूक निरीक्षणे नोंदविणे हे सर्वात किचकट पण महत्त्वाचे काम आहे.** मेरी क्युरीने आपल्या पडक्या प्रयोगशाळेत राबून टनावारी *पिचब्लेंडपासून* चिमूटभर *रेडियम* वेगळे केले. त्यासाठी तिची कितीतरी वर्षे खर्च झाली; पण त्या शोधाने तिला नोबेल पुरस्कार मिळवून दिला.

वैज्ञानिक बनण्यासाठी **सर्वात महत्त्वाची व कठीण गोष्ट आहे प्रश्न विचारणे!** तुम्ही म्हणाल यात कठीण काय आहे? प्रश्न विचारणे ही तर सर्वात सोपी बाब आहे. आपल्याला रोज कितीतरी प्रश्न पडतात, त्यातील किती आपण मोकळेपणाने विचारतो? त्यातील किती प्रश्नांची उत्तरे आपण स्वतःहून शोधतो? मोठ्या माणसांनी सांगितलेली उत्तरे आपण किती वेळा तपासून घेतो? याचा विचार केला तर तुमच्या लक्षात येईल की, आपल्या घरीदारी, शाळा-कॉलेजात, समाजात कुतूहल दाखविणे, शंका घेणे, प्रश्न विचारणे यांना फारसे प्रोत्साहन दिले जात नाही, उलट असे करणे म्हणजे थोरा-मोठ्यांचा अवमान करणे मानले जाते. याला पु. ल. देशपांडे यांनी 'गप्प बसा संस्कृती' असे नाव दिले होते. जे आहे ते बिनतक्रार स्वीकारण्याची एकदा सवय लागली की, नावीन्याचा शोध संपतो. अशा मातीत विज्ञानाचे रोपटे रुजू किंवा वाढू शकत नाही. एके काळी आपल्या देशातही प्रश्न विचारण्याला महत्त्व देणारी संस्कृती नांदत होती, तेव्हा देशात विविध विषयांवर जाहीर वादविवाद आयोजित केले जात आणि त्यातून विद्वान व सर्वसामान्य सर्वांचे प्रबोधन होत असे.



त्या काळात देशात आपला देश विज्ञानाच्या बाबतीत प्रगतिपथावर होता. प्रश्न विचारणे हा आपल्या संस्कृतीचा इतका महत्वाचा घटक होता की नोबेल विजेते भारतीय अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी भारतीयांचे वर्णन वाद घालणारा (argumentative) या शब्दाने केले आहे.

**चला तर मग, 'आपणही नवे प्रश्न खुलेपणाने विचारू, त्यांची उत्तरे वैज्ञानिक पद्धतीने शोधू आणि नवा वैज्ञानिक भारत घडवू!**

**– रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**
३०२, अमृतवर्षा अपार्ट., वजलवाल ड्राव्हिंगस्कूलसमोर, शिवाजीनगर, नागपूर 440010
**चित्रकार : सौरभ उपळेकर**

**वाचूया – विज्ञान शिबिरे कशी घ्याल!**
**लेखक – नचिकेत नित्सुरे**



का? कसे? प्रश्न पडू द्या, सोडवू या कोडे । निरीक्षणाचा छंद जडू दे, उकलूया गुढे ।।
शुभेच्छुक – • श्री. अद्वैत सहस्रबुद्धे, पुणे

## अवश्य वाचा

**बालकुमारांसाठी प्रकाशित होणारे अन्य दिवाळी अंक - २०१९**

**किशोर :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११००४

**मुलांचे मासिक :** १६८ हनुमाननगर, नागपूर ४४००२४

**ऋग्वेद :** सातोरकर बिल्डिंग, आजरा अर्बन बँकेसमोर, मु. पो. ता. आजरा, जि. कोल्हापूर ४१६५०५

**निर्मळ रानवारा :** ४०५/९ नारायण पेठ, पुणे ४११०३०

**वयम् :** न्यू वंदना को. ऑप. सोसा., लाल बहाद्दुर शास्त्री मार्ग, ठाणे ४००६०२

**माऊस :** उन्मेष १०७/१६, भारती निवास कॉलनी, प्रभात रस्ता, गल्ली क्र. १४, एरंडवणे, पुणे ४११००४

**याशिवाय प्रकाशित होणारी प्रकाशित होणारी बालकुमार मासिके छोट्यांचा दोस्त छोटू, साधना, खेळगडी, पासवर्ड, छोट्यांचा आवाज, सृष्टीज्ञान**


Since 1994
Khamitkar
COMPUTERS SALES & SERVICES
168/B, Sakhar Peth, Near Padma Talkies, SOLAPUR-5.
Ph.: 0217-2622168 M.: 9822269128 E-mail :khamitkar.computers@gmail.com

- All Types of Computer, Laptop Sales & Service
- All Types of Printers Sales & Repairs
- Networking Solution
- Computer Consumables
- Toner Refilling

intel inside, LG, Seagate, hp, ASUS, EPSON, AMD, D-Link, Canon, Microsoft

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**





उत्सव परंपरेचा,
संस्कारांचा
नव भारताच्या
निर्मितीचा

आमच्या सर्व ठेवीदार,
ग्राहक आणि हितचिंतक यांना
दीपावलीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

**जनता सहकारी बँक लि., पुणे**
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग,
पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com


जरूर पाहा : चित्रपट -लाइफ ऑफ पाय : एका लहानग्या मुलाने अनुभवलेला हिंस्त्र वाघ्याचा चित्तथरारक सहवास

गाणं म्हणत जगण्यासाठी, फुलासारखं फुलण्यासाठी, हवं **'छात्र प्रबोधन'** हाती

# नव्या ताकदीने नवे स्वप्न पाहू

नव्या ताकदीने नवे स्वप्न पाहू
लढाया नव्या जिंकण्या सज्ज बाहू
आम्ही सूर्यकन्या, नव्हे फक्त छाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ध्रु. ।।

जिथे ज्योत तेवे स्वयंनिश्चयाची
तिथे अंध तर्का मिळे मूठमाती
विवेके विचारे कृती नित्य व्हाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। १।।

जनी क्षेम चिंतीत सृजनी रमावे
कशाला वृथा भंजनाला भजावे
स्वयंप्रज्ञ तेजाळते दीप बनण्या
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। २।।

स्वत: उंच जाऊ, समाजास नेऊ
सदा भारतीला जयवंत ठेवू
अशी प्रेरणा लक्ष हृदयी रूजाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ३ ।।

कवाडे खुली शिक्षणातून व्हावी
प्रभा नारीची स्नेहरूपी दिसावी
असे शेकडो संघ एकत्र येण्या
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ४ ।।



**ऐकूया पद्याची झलक**
**पद्याची चाल – श्री. मिलिंद संत**

**– वाच. अनघा लवळेकर**

**पद्याचा भावार्थ :** स्वत:च्या कर्तृत्वाच्या जोरावर नवनवी स्वप्ने पाहणाऱ्या, वेगवेगळ्या आघाड्यांवर विरोध झाला तरी त्याचा प्रतिकार करण्यासाठी समर्थ असणाऱ्या, आम्ही सर्व जणी 'सूर्यकन्या' आहोत, हा 'स्त्री शक्ती'चा सार्थ विश्वास या पद्यातून मांडला आहे.

अंधश्रद्धांना मूठमाती देत, योग्य-अयोग्य विचार करून, आत्मविश्वासपूर्वक कृती करण्याचे सामर्थ्य आम्ही मिळवू. सर्वांच्या कल्याणासाठी काळजी वाहणाऱ्या, तरीही सतत नवनिर्माणात रमलेल्या, स्वयंतेजाने झळाळणाऱ्या दीपज्योती आम्ही होऊ. हे सामर्थ्य मिळवण्यासाठी उगाचच आक्रमक मार्ग न स्वीकारता; आम्ही निश्चयाने पुढे जाऊ.

स्वत:ची प्रगती तर करून घेऊच; पण त्याचबरोबर समाजाला प्रगतिपथावर नेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. जगामध्ये आपल्या मातृभूमीचे नाव उज्ज्वल करण्यासाठी, झटण्याची प्रेरणा लक्षावधी स्त्रियांच्या मनात रूजवू.

त्यासाठी सर्वांना शिक्षणाची दारे खुली व्हायला हवीत. सामर्थ्याबरोबरच प्रेमभावनेने समाजाला बांधून ठेवणाऱ्या लक्ष-लक्ष स्त्रियांचे समूह तयार व्हायला हवे. आपल्या देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आधी प्रत्येकीने स्वत: आत्मनिर्भर होण्याचे, समर्थ होण्याचे स्वप्न पाहाण्याचे आणि समाजातील 'स्त्रीशक्ती' जागी करण्याचे आवाहन प्रस्तुत पद्यात केले आहे.



खूप शिकावे, खूप शिकावे, रोजच काही नवे करावे।
नवनव्या कृतींमधुनी कल्पकतेचे दर्शन व्हावे ।।


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!
BOI
होम लोन
प्रधानमंत्री आवास योजना उपलब्ध
कमीतकमी व्याज दर
टॉप अप लोन सुविधा
BOI
आपले सोने तारण कर्ज ठेवा
सुरक्षित एवम त्वरित
बँक ऑफ इंडियाच्या
सोने तारण कर्ज योजनेमध्ये
सोने तारण कर्ज
आकर्षक व्याजदर
लवचिक कर्ज परतफेड सुविधा
वेगवान मंजुरी
प्रति माह व्याजदर फक्त ७२* पैसे प्रत्येकी ₹१०० कर्जासाठी शेतकऱ्यांसाठी
प्रति माह व्याजदर फक्त ८२* पैसे प्रत्येकी ₹१०० कर्जासाठी इतरांसाठी
अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या बँक ऑफ इंडिया शाखेशी संपर्क साधा
BOI
100% फाइनेन्स
वाहन कर्ज
आकर्षक ब्याज दर
• आकर्षक ब्याज दर
• कोई प्रोसेसिंग प्रभार नहीं
• आसान चुकौती शर्तें
• अध्ययन और ऋणस्थगन (मोरैटोरियम) अवधि के दौरान साधारण ब्याज
• छात्राओं के लिए 1% तक ब्याज में छूट
• ऑनलाइन आवेदन सुविधा
एक बैंक जो आपके भविष्य की देखभाल करता है।
बीओआई शिक्षा ऋण
BOI STAR GURUKUL
Salary Account
BOI
Bank of India's Star Gurukul Salary A/c is specially formed for managing finance of teaching & non-teaching staff of educational Institutes
Salient Feature:
अधिक जानकारी हेतु बैंक ऑफ इंडिया की नजदीकी शाखा से संपर्क करें।
विशेष जानकारी हेतु सम्पर्क : बी.ओ.आई रिटेल बिझनेस सेंटर, सोलापूर
मो. नं. 0217 2312315/6
टोल फ्री नं. 1800220229
बैंक ऑफ़ इंडिया
रिश्तों की जमापूँजी
बैंक ऑफ़ इंडिया
Bank of India
Relationships beyond banking.

**स्वयंसेवी वृत्तीने छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांची विशेष नोंदणी करणाऱ्या**

## सर्व केंद्रप्रमुखांचे हार्दिक अभिनंदन !!!

### छात्र प्रबोधनच्या तीन दिवाळी अंकांची एकत्रित प्रकाशनपूर्व नोंदणी ३८०००

**(सुबोध अंक १८,०००, छात्र प्रबोधन नित्य अंक – १५,०००, इंग्रजी अंक – ५,०००)**

**१००१ पेक्षा अधिक अंकांची नोंदणी (६ केंद्रे) –** ज्ञान प्रबोधिनी प्रशाला (पुणे), ज्ञान प्रबोधिनी (निगडी केंद्र), श्री. प्रसाद काणे (चिपळूण), रचना विद्यालय (नाशिक), डॉ. अंजली फडके (कोपरगाव), सौ. विद्या धुपकर (डोंबिवली)

**५०१ ते १००० अंकांची नोंदणी (६ केंद्रे) –** श्री. मिलिंद शहा (कोरेगाव), श्री. गोपाळ जोशी (कुरुंदवाड), श्री. सतीश कुलकर्णी, (सातारा), नगर वाचन मंदिर (पुणे), श्री. नितीन ठाकूर (लातूर), श्री. सुहास दळवी (३२ शिराळा)

**२०१ ते ५०० अंकांची नोंदणी (१८ केंद्रे) –** सौ. अंजली पै (दादर), श्रीमती कल्पना खांडेकर (सासवड), ज्ञान प्रबोधिनी (सोलापूर केंद्र), सौ. वैशाली पाटील-देवरे (शिरपूर), श्री. राम जोशी (अलिबाग), सौ. अश्विनी कुलकर्णी (अंबरनाथ), वैद्य मनीषा नारकर (तळेरे), डॉ. अविनाश अरगडे (चाकण), सौ. स्मिता सोमण (ठाणे), श्री. अनिल चव्हाण (मनमाड), श्री. अभिजीत जोंधळे (अंबाजोगाई), श्री. विनायक माळी (कान्हेरी मठ), सौ. नीलिमा जोशी (शिर्डी), श्री. पवन लाठी (चोपडा), श्री. उमेश लाभे (वरोरा), श्री. विनायक गद्रे (इचलकरंजी), श्री. श्रीकांत कुलकर्णी (मिरज), ग्राम प्रबोधिनी (साळुंब्रे).

**१०० ते २०० (१४ केंद्र) –** चिखली, खेड, धुळे, मार्दोळ, संगमनेर, अंमळनेर, चिखली गुरुकुल, बारामती, बोरीवली, सांगली, कणकवली, नंदुरबार, पारनेर, अकोला

**याशिवाय २७ केंद्रांनी ५० ते १०० अंकांची नोंदणी केली**

**सर्व केंद्रप्रमुखांचे संपर्क पत्ते व दूरभाष क्रमांक**


### प्रशिक्षक : प्रयोगशील-प्रतिभासंपन्न शिक्षकांचे व्यासपीठ

**ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका निर्मित प्रशिक्षक मासिकाचे ॲप्लिकेशन पालक व शिक्षक यांच्यासाठी शिक्षणातील नवनवीन उपक्रम, नवीन प्रयोग व माहितीपर लेख वाचण्यासाठी वरील QR code स्कॅन करून ॲप्लिकेशन डाऊनलोड करा.**

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा विविध विषयांवरच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी संपर्क : प्रा. प्रशांत दिवेकर ९४२३५७२४०४**


**जरा डोकं चालवा!**

एका खोलीला एका बाजूने एक दार तर दुसऱ्या बाजूने तीन दारं आहेत. तुम्ही एका बाजूच्या एका दरवाज्यातून आत खोलीत शिरल्यावर तो दरवाजा बाहेरून धाडकन बंद होतो. दुसऱ्या बाजूची तीनही दारं उघडी होती, त्यातूनच तुम्हाला बाहेर पडता येईल, पण एका दाराजवळ आग लागली होती, तर दुसऱ्या दाराजवळ एक डाकू पिस्तूल घेऊन उभा होता, तो कोणालाच आत-बाहेर जाऊ देत नव्हता. आणि तिसऱ्या दाराजवळ दहा महिने उपाशी असलेला सिंह होता. तुम्ही कोणत्या दाराने बाहेर पडू शकाल?

# छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण सांघिक स्पर्धा

## राज्यस्तरीय 'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धा २०२०

**(इ ७ वी ते इ १० वी मधील ५ ते ८ विद्यार्थ्यांचा गट अपेक्षित)**

• हस्तलिखित ५६ ते ६० पृष्ठसंख्येचे असावे. • ९०% लेखन विद्यार्थ्यांचेच असावे व १०% संकलन चालेल. • एकाच विषयाला वाहिलेले हस्तलिखित नको. • विविध लेखन प्रकारांचा त्यामध्ये समावेश असावा. प्रत्येक हस्तलिखितामध्ये असायलाच हव्यात अशा काही गोष्टी व स्पर्धेचे अन्य तपशील, विभागवार रचना कशी असेल याची **माहिती २० नोव्हेंबर २०१९ नंतर छात्र प्रबोधन च्या संकेतस्थळावर उपलब्ध** होईल. विभागस्तरावर नोंदणी केलेल्या संघांमधील विद्यार्थ्यांसाठी **१० ते २० डिसेंबर २०१९** दरम्यान ४ तासांची **लेखन-संपादन कार्यशाळा मोफत** घेतली जाईल.

**बक्षिसे** : विभागस्तरावर किमान ५ संघ अपेक्षित, प्रथम क्रमांक रु. ७००/- द्वितीय क्रमांक रु. ६००/- तृतीय क्रमांक रु. ५००/- (विभागस्तरावर सहभागी संघांची संख्या १० ते १५ असल्यास)

**राज्यस्तरीय प्रथम क्रमांक रु. २०००/-, द्वितीय क्रमांक रु. १५००/-,**

**तृतीय क्रमांक रु. १२००/-** (सर्व बक्षिसे ४०% रोख व ६०% पुस्तक रूपाने दिली जातील.)

**हस्तलिखित स्पर्धा तपशील**

**स्पर्धा नि:शुल्क असेल.** या स्पर्धेमध्ये शाळा व स्वतंत्रपणेही गट सहभागी होऊ शकतात. एका शाळेतील जास्तीत जास्त ४ गट सहभागी होऊ शकतील. स्वतंत्र गटामध्ये एकापेक्षा अधिक शाळेचे विद्यार्थी सहभागी होणे अपेक्षित. तथापि छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयात **१० डिसेंबर २०१९ पर्यंत नोंदणी करणे आवश्यक,**

**हस्तलिखिते पाठवण्याचा अंतिम दि. - ५ जानेवारी २०२०**

## सफर दिवाळी विशेषांकाची - 'छात्र प्रबोधन'तर्फे वैयक्तिक स्पर्धा

**(इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी, प्रवेश नि:शुल्क)**

**अंक वाचण्याचा आनंद लुटता लुटता बक्षिसेही जिंका! बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी!**

**या अंकावर आधारित प्रश्न खाली देत आहोत. * हे प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत. उर्वरित ८ पैकी कोणतेही किमान ६ प्रश्न सोडवा. त्या प्रश्नांची उत्तरे लिहून 'छात्र प्रबोधन'कडे ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत पाठवा.**

**बक्षिसे : विशेष गुणवत्ताप्राप्त पहिल्या २० जणांना प्रत्येकी एक वर्षाची वर्गणी!**

**त्यानंतरच्या २० जणांना प्रत्येकी ६ महिन्यांची वर्गणी!** उत्तरे पाठवताना नाव, पत्ता, मोबाईल संपर्क, शाळा, इयत्ता लिहिणे आवश्यक.

१) 'ऑपरेशन वंडकपुरा' या कथेत लेखकाला कोणती गोष्ट लहानपणापासून करायची होती व ती करायला मिळाली?

२) 'थंडीचे कुंपण' या कवितेत भवतालातील थंडीचे कसे वर्णन केले आहे?

३) 'धुमसत्या बर्फातील आनंदघर' या लेखात अधिक कदम यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते पैलू तुम्हाला भावले? का?

४) 'यशस्वी भव' या ललित लेखात लेखिकेला 'यशस्वी' होण्यामध्ये काय काय अपेक्षित आहे?

५) संवेदनशीलता कशी जोपासता येईल असे 'संवेदनशीलता जाणीवपूर्वक जोपासताना' या लेखात लेखिकेने सुचविले आहे.

६) 'गोधडी' या कथेत नात आजीवर का रागावली होती?

७) पैशापेक्षा कोणत्या गोष्टी मौल्यवान आहेत असे लेखकाला वाटते?

८) 'समशेर सोडवतो घोड्याचं रहस्य' या कथेत समशेर रहस्यापर्यंत कसा पोहोचला?

*९) 'क्यू आर कोड' स्कॅन करून वाचा/ऐका/पाहा व तुम्हाला भावलेल्या कोणत्याही एकाबद्दल १० ओळी लिहा.

*१०) अंकातील कोणत्याही लेखकांना अथवा संपादकांना प्रतिसाद देणारे पत्र लिहा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २२ आश्विन, शके १९४१, १४ ऑक्टोबर २०१९ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२ पर्वती टॉवर्स, पुणे ४११००९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

**ज्ञान प्रबोधिनी निर्मित**
**QR CODE व्हिडिओ**
**महाराष्ट्र राज्य**
**पाठ्यपुस्तकात उपलब्ध**

## Install
the Diksha app



1 Click on **Play Store**

2 Type **'Diksha'** in the search box & click on **install**

3 **Open** the app

## Scan
QR codes in your textbook

## Access
digital content linked to the curriculum!



4 Select **preferred language**

5 Choose your role : **Student or Teacher**


6 **Grant access** to app



7 Click to **scan**


8 **Focus** camera on the QR code in textbook

9 **Play** content



इयत्ता ७ वी ते १० वी विज्ञान, ७ वी आणि ८ वी गणित,
८ वी ते १० वी संस्कृत आणि १० वी भूगोल विषयांसाठी उपलब्ध.
**www.diksha.jnanaprabodhini.org**
शिक्षक आणि विद्यार्थांनी याचा जरूर लाभ घ्यावा **YouTube Chanel: ERCJPP**

सौर कार्तिक शके १९४१/नोव्हेंबर २०१९ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक: (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month




**छात्र प्रबोधनतर्फे विशेष योजना! अवश्य लाभ घ्या!!**

**१. वर्ग ग्रंथालय योजना –** १० रुपयांत वर्षभरात १००० पाने वाचा. वाचते व्हा! समृद्ध व्हा! यशस्वी व्हा! **२. कुमारकथा ॲप** छात्र प्रबोधनमधील १०० कथा वाचा. **३. छात्र प्रबोधनचे ३०० अंक** संकेतस्थळावर उपलब्ध! **४. गावोगावी विद्यार्थ्यांचे साहित्य मेळावे**

सर्व देणगीदार, जाहिरातदार, प्रायोजक यांना मनापासून धन्यवाद! त्यांच्या अर्थसाहाय्यामुळे १५ हजार विद्यार्थ्यांना हा अंक ५० रुपयांमध्ये देता आला.

मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
दूरभाष : ०२०-२४२०७१७४/१७५ ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर २२ आश्विन शके १९४१, (१४ ऑक्टोबर २०१९)
वार्षिक वर्गणी ₹ २००. या अंकाची किंमत ₹ ८०